# एव्हरेस्ट

## राजा हिमशिखरांचा!

म ग्रं. सं. ठाणे
विषय ७/-२
स. क्र. ८८७



REFBK-0025286

प्रकाश [illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६१३
अ. प्र. ग्र. क्र. २०२८६
२।५।८६

# एव्हरेस्ट

## राजा हिमशिखरांचा

प्र. के. घाणेकर

REFBK-0025286

स्नेहल प्रकाशन
स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह

स्नेहल ५०

प्रकाशक

रवींद्र कृष्ण घाटपांडे
१२२८ / ब, शिवाजीनगर
पुणे ४११ ००४

© प्र के घाणेकर
१०८ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

द्विबिंदू वर्गीकरण
वर्गांक MY 26 2.g7 HE
ग्रथांक 155 N 86
वर्गांक ढस २६ २.च७ हिए
ग्रथांक १५५ थ ८६

दशांश वर्गीकरण
वर्गांक 796 5220954
ग्रथांक GHA
वर्गांक ७९६ ५२२०९५४
ग्रथांक घाणेक

मुखपृष्ठ सजावट
श्री अनिल उपळेकर

प्रथम आवृत्ती
संकष्टी चतुर्थी
१८ जानेवारी १९८७

मुद्रक

प्रमोद वि बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

मूल्य ९० रुपये

पर्वतशिखरे चढण्याच्या वेडापायी
ज्यांनी डोंगरदऱ्या पालथ्या घातल्या, व
जे वेळप्रसंगी मृत्यूलाही सामोरे गेले,
त्या माझ्या सर्व
पर्वतारोही बहीण-भावांना,
सादर अर्पण !

— प्र. के. घाणेकर

# अ नु क्र म णि का


| | | |
|---|---|---|
| १) | स्थावराणा हिमालय | ९ |
| २) | एव्हरेस्टची मोजणी | १५ |
| ३) | एव्हरेस्टचे वारसे | २५ |
| ४) | असं आहे एव्हरेस्ट | ३५ |
| ५) | एव्हरेस्टचा कालपट | ४५ |
| ६) | आव्हान तिसऱ्या ध्रुवाचे | ६१ |
| ७) | शोध शिखराच्या वाटेचा | ६५ |
| ८) | एव्हरेस्ट कहाणीतील पुढचे पर्व | ८९ |
| ९) | पुन: पुन्हा एव्हरेस्ट चढाया | १०५ |
| १०) | नवे धोके– नव्या जाणिवा | १३१ |
| ११) | नव्या दमाचे शूर शिपाई– एव्हरेस्टचे भय आम्हा नाही | १४३ |
| १२) | एव्हरेस्ट विजेत्यांच्या द्विशतकाकडे घोडदौड | १७९ |
| १३) | एव्हरेस्ट वीरांना मानाचा मुजरा | १९३ |
| १४) | असंच, काही बाही | २१७ |
| १५) | यती (हिममानव) | २२९ |
| १६) | माथा नाही, तर पायथा तरी | २३५ |
| १७) | भारतीय गिर्यारोहण | २७१ |
| १८) | 'तिसऱ्या ध्रुवा'चा मानकरी तेनसिंग नोर्गे | २८१ |
| १९) | कहाणी दुसऱ्या शिखराची | २८९ |

# लेखक परिचय

प्र. के घाणेकर जन्मदिनांक– ७ मे १९४८ जन्मगाव– आवास ता अलिबाग जि. रायगड

**शिक्षण**– एम् एस्सी वनस्पतिशास्त्र– पुणे विद्यापीठ (१९७१)

**इतर**– १९७४ मध्ये मनाली (हिमाचल प्रदेश) येथील गिर्यारोहणाचा प्राथमिक अभ्यासक्रम 'ए' ग्रेड मध्ये उत्तीर्ण

१९७८ मध्ये एव्हरेस्ट विजयाच्या रौप्य महोत्सवी वर्षी एव्हरेस्टसमोरच्या ५६३० मी / १८४७१ फूट उंचीच्या अनामिक शिखरावरील यशस्वी मोहिमेचा नेता

१९७९ मध्ये महाराष्ट्र शासनाचा 'बेसिक कोर्स इन फोटोग्राफी पहिल्या वर्गात प्रथम क्रमाकाने उत्तीर्ण

१९८६ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'सर्टिफिकेट कोर्स इन इंडॉलॉजी' म्हणजे 'भारतविद्या पदविका प्रमाणपत्र' परीक्षा पहिल्या वर्गात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण

पुणे विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळाचा व्याख्याता आकाशवाणी व दूरदर्शनवर भाषणे आजवर महाराष्ट्रातील किल्ले– हिमालय– गिर्यारोहण– निसर्ग या विषयावर ३५० हून अधिक सदीप व्याख्याने

१) चला जरा भटकायला, २) साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्याची, ३) महाराष्ट्र– स्थलदर्शन, ४) महाराष्ट्र– निसर्गदर्शन, ५) कोकणचा मानबिंदू– सिंधुदुर्ग, ६) समर्थांचा सज्जनगड, ७) शिवतीर्थाच्या आख्यायिका, ८) पर्यावरण, ९) एव्हरेस्ट– राजा हिमशिखरांचा, ही पुस्तके प्रसिद्ध झाली निरनिराळी दैनिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, मासिके, स्मरणिका इ मध्ये ३०० हून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत

भारत इतिहास संशोधक मंडळ, मराठी विज्ञान परिषद– पुणे विभाग, वर्ल्ड वाइल्ड लाइफ फंड पुणे, यूथ हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया– पुणे, श्रीशिवाजी राजगड स्मारक मंडळ, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, महात्मा फुले वस्तु संग्रहालय–पुणे, भारत आऊटवर्ड बाऊंड पायोनियर्स– पुणे इ संस्थांच्या कार्यात सहभाग व आजीव सभासद

आजवर १५० हून अधिक किल्ले पायी हिंडून पाहिले आहेत

**व्यवसाय**– पुण्यातील आबासाहेब गरवारे महाविद्यालयात, वनस्पतिशास्त्र विभागात १९७२ पासून नोकरी

**वास्तव्य**– १०८, नारायण पेठ, पुणे ४११०३०

## माझ्या मनातलं. . .

एव्हरेस्ट ! एक उत्तुंग शिखर !! अत्युच्च शिखर !!! या विश्वकळसाची माहिती देणारं चांगलंसं पुस्तक मराठीत उपलब्ध नव्हतं माझे मित्र श्री रवी घाटपांडे यांनी या तिसऱ्या ध्रुवाची माहिती देणारं पुस्तक लिहायची गळ घातली मी ती मान्य केली त्यांच्यामुळेच ही लेखनसेवा घडू शकली म्हणून त्यांना धन्यवाद द्यायलाच हवेत पुस्तकाच्या अंतरंग व बहिरंग सजाविन्यासाठी श्री अनिल उपळेकरांनी बराच वेळ घालवला मीटर अन् फुटाच्या गुंताड्यातून मार्ग काढण्यासाठी प्रा सुधीर किंकर यांनी बहुमोल मदत केली त्यांचे हे ऋण मी मान्य करतो


हे पुस्तक म्हणजे काही 'एव्हरेस्ट' संदर्भातला शेवटचा शब्द नाही पण एव्हरेस्टबाबत बरीचशी माहिती एकत्रित व कमीत कमी शब्दात देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे यात काही सुधारणा आवश्यक वाटल्या तर मला त्या आवर्जून कळवाव्यात काही गोष्टींबाबत प्रयत्न करूनही माहिती मिळू शकली नाही एव्हरेस्ट अन् हिमालयाबद्दल माहिती मिळविताना पूर्वसूरींनी केलेले प्रयत्न, ग्रंथ-पुस्तके- पुस्तिका, इंडियन माऊंटेनियर आणि हिमालयन माऊंटेनियरिंग जर्नल असंख्य वृत्तपत्रीय बातम्या व लेखांची कात्रणे या सर्वांची अतोनात मदत झाली आहे अशा संदर्भाविना हे पुस्तक लिहिणं जमलंच नसतं

एक काम हातावेगळं झालं हे एक मानसिक समाधान निःश्चित आहे पण उरलेल्या अनेक हिमाच्छादित गिरीशिखराबाबत, तिथल्या आरोहणाच्या चित्तथरारक कथांबाबत या पुस्तकात काहीच समाविष्ट करता आलं नाही, हा सल शिल्लक राहतोच


'शिखरावरून परत फिरायचं, ते पुन पुन्हा शिखरे चढण्यासाठी' हे खरं मानलं तर या साहसयात्रांचं मर्म तुमच्या ध्यानी येईल

– प्र के घाणेकर
१०८, नारायण पेठ,
पुणे, ४११०३०







एव्हरेस्ट चढाईचा दक्षिण बाजूकडून मार्ग




सुरुवातीच्या मोहीमांचा उत्तर बाजूकडून एव्हरेस्ट चढाईचा मार्ग

# स्थावरणां हिमालयः



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# स्थावराणां हिमालयः (भगवदगीता)

इसवी सनाच्या तिसऱ्या-चौथ्या शतकात महाकवी कालिदास 'कुमार सभव' या महाकाव्यात म्हणतो,


> य सर्वं शैला' परिकल्प्य वत्सम् ।
> मेरौ स्थिते दोग्धरि दोहृदक्षे
> भास्वन्ति रत्नानि महौषधीश्च ।
> पृथूपदिष्टां दु दुहुर्धरित्रीम् ॥१ २॥

मेरू पर्वत हा सर्व पर्वतात वृद्ध असून, हिमालय पर्वत हा सर्व पर्वतात तरुण पर्वत आहे


आधुनिक वैज्ञानिकानी ते शास्त्रीय तत्त्व सिद्ध केलेच, पण हा तरुण पर्वत सर्वांत उच्च आहे अशी पुस्तीही त्यानी जोडली.

## जन्म हिमालयाचा–

जिथे इतर साऱ्या पर्वतरांगा संपतात, त्या उंचीवर हिमालय सुरू होतो पण हा हिमालय जगातला सर्वांत तरुण डोंगर आहे हे सांगितले तर कदाचित खरे वाटणार नाही



साधारणत: ५० दशलक्ष वर्षांपूर्वीची गोष्ट पृथ्वीच्या पाठीवर लॉरेशिया आणि गोंडवन हे दोनच भूखड होते. भूशास्त्रीय घडामोडींमुळे गोंडवनाचे तुकडे झाले व भारत-ऑस्ट्रेलियाचा टवका ईशान्य दिशेने हळूहळू सरकू लागला. पुढे भारतीय द्वीपकल्प व ऑस्ट्रेलिया हे तुकडे वेगळे झाले अर्थात ह्या घडामोडींना हजारो वर्षांचा काळ लागला





हे विलगलेले भारतीय भूखड शेवटी तिबेटी प्रदेशाशी धडकले त्यामुळे तिथला समुद्रतळ हळूहळू वर येऊ लागला, तिथल्या भूकवचाला घड्या पडू लागल्या या अजस्त्र घड्या म्हणजेच हिमालयाच्या डोंगररांगा हे सार खर कशावरून, हा प्रश्न तुम्हाला पडला असणार उगाचच आपल, कोट्यवधी वर्षांपूर्वी अस असं झाल म्हणण हा काही शास्त्रज्ञाचा कल्पनाविलास नाही समुद्रतळी सापडणाऱ्या जल-जीवाचे अश्मीभूत अवशेष (जीवाश्म किंवा फॉसिल्स) हिमालयात अजूनही सापडतात

इथल भूकवच वर येण्याची क्रिया अजून काही सपलेली नाही तरुण हिमालयाची उंची अजूनही वाढतच राहील लाखो वर्षांत त्याची झीज होत राहील. आजच चित्र कोट्यवधी वर्षांनी बदललेल असेल सिंधू, ब्रह्मपुत्रा आदी नद्यांची, हिमालयातील डोंगररांगा कापीत निघालेली पात्रे पाहिली की या साऱ्या भूशास्त्रीय घडामोडींची कल्पना व सत्यता पटते.

## हिमालयाचा विस्तार–

जगाच छप्पर असलेल पामीरच पठार म्हणजे जगातला सर्वात नाजूक, संवेदनक्षम–महत्त्वाचा, भू-राजनैतिक भाग रशिया–अफगाणिस्तान–पाकिस्तान–हिंदु-




स्थान–तिबेट– सिंकियाग– चीन या देशाच्या सरहद्दी इथ मिळतात पामीरच्या नैऋत्येला हिंदुकुश पर्वतराजी आहे, तर वायव्येला अलाई डोंगरराजी आहे. तिएन शानची पर्वतराजी ईशान्येकडे आहे, तर आग्नेयेला हिमालयाच्या डोंगररागा आहेत कुनलुन–काराकोरम– कैलास–लडाख– झान्स्कर हिमालय– पीरपजाल आणि धौलाधार या साऱ्या एकापाठोपाठच्या डोंगररागा मिळून हिमालय होतो या डोंगर-रांगा थोडयाशा धनुष्याकृती आहेत. पामीरच्या बाजूला एक बाक व आसामच्या बाजूला दुसरा बाक या डोंगररागाना आहे

हिमालयामुळे भारतीय उपखडाच्या भू-राजनैतिक, आर्थिक, कृषी व सामाजिक जीवनावर दूरगामी परिणाम झालेले आढळतात मोसमी वारे अडवून पाऊस पाडण्यास हिमालयाच्या रागा मदत करतात. सिंकियांग– गोबी– तिबेटची थड-शुष्क वाळवटे अन् सिंधू– गगा– यमुना– ब्रह्मपुत्रा यांनी सुजलाम् सुफलाम केलेला हिंदुस्थान याना विभागणारी ही उपकर्ती डोंगरराजी आहे उत्तरेकडील अमानुष टोळयांची आक्रमणे हिंदी द्वीपकल्पीय व उपखडीय प्रदेशावर न होण्याचे कारण म्हणजे हा हिमालय.

अपारपरिक ऊर्जा स्रोत, पर्यावरण, पाणी पुरवठा, खनिज सपत्ती, अध्यात्मिक साधना, गिरिस्थाने (हिल स्टेशन्स), जगल सपत्ती, संरक्षण आदी अनेक गोष्टींसाठी भारताला हिमालयाकडेच पाहावे लागते व पुढेही ते तसेच असेल. पाश्चात्यांच्या सपर्कामुळे गिर्यारोहणासाठी हिमालयाकडे पाहण्याची एक नवी

मिती प्राप्त झाली आणि 'एव्हरेस्ट' हा एक मानदंड गिर्यारोहणाच्या प्रांतात मानला जाऊ लागला हे सारं का ? कसं ? याचीच कहाणी पुढील पानात आपण वाचणार आहोत

मुळातच 'एव्हरेस्ट' हे एक रौद्रभीषण महाकाव्य आहे त्याच्या दर्शना-साठी, तिथं पाऊल टेकवण्यासाठी साहसी, जिद्दी, धाडसी मानवाने जी अथक परि-श्रमाची शिडी उभारली त्याला तोड नाही मानवी आकांक्षा अन् निसर्गावर विजय मिळवण्याच्या कल्पनेची मोजपट्टी म्हणजे एव्हरेस्ट मोहिमा

एव्हरेस्ट विजयाला तीस-पस्तीस वर्षे होऊन गेली एव्हरेस्ट मोहिमाचं शतक होऊन गेलं एव्हरेस्ट विजेत्याच्या द्विशतकी संख्येच्या जवळपास आपण येऊन ठेपलो पण, एव्हरेस्टची मोहिनी संपलेली नाही त्याच्या भात्यातली सारी शस्त्रं आजही तशीच परजलेली आहेत. पण अनुभव, नवनवे शास्त्रीय शोध आणि भरपूर सराव असलेले, कसलेले गिर्यारोहक यामुळे एव्हरेस्टचं पूर्वीचं गूढरम्यतेचं वलय हळूहळू फिकं पडू लागलं आहे. तर या एव्हरेस्ट विजयाची शौर्यकथा, विजयगाथा कळण्या-साठी पुढची पानं उलटणं भाग आहे

# एव्हरेस्टची मोजणी



# एव्हरेस्टची मोजणी

१७११ साली चिनी लामानी जेसुइटस्च्या सूचनेवरून तिबेटच्या भूप्रदेशाची पाहणी-मोजणी व नकाशांकन केले त्यासाठी त्यांना पेकिंग / बिजिंगच्या चिनी सरकारचीही मदत मिळाली होती

१७१७ साली बिजिंगच्या जेसुइट पाद्र्यानी तयार केलेल्या तिबेटच्या नकाशात ४० मैल / ६४ कि मी लाबीची पर्वतराजी तिबेटच्या दक्षिणेस 'त्चौ मौ लक्मा' या नावाने दाखविलेली होती

१७३३ मध्ये डी ॲनव्हिले या प्रख्यात भूगोलतज्ज्ञाने पॅरिसमध्ये आपला तिबेटचा नकाशा प्रसिद्ध केला होता त्यासाठी त्याने आधीच्या जेसुइटाच्या पाहणी अहवालांचा उपयोग केला होता


अर्थात येथपर्यंत एव्हरेस्ट शिखरच अज्ञात होते आणि अशा शिखराची उची जगात सर्वांत जास्त आहे याचीही कल्पना कोणाला नसल्याने मुद्दाम एव्हरेस्ट परिसराचा नकाशा करणे, मोजणी केली जाणे असे घडलेले नव्हते स्थानिक लोकाना देखील पुढे 'एव्हरेस्ट' नावाने ओळखले गेलेले शिखर जगातील सर्वोच्च शिखर आहे, याची स्पष्ट कल्पना होती, असे वाटत नाही. तसा पुरावा उपलब्ध नाही

## एव्हरेस्टचे मोजणी कार्य–

१८५० पर्यंत ७८१८ २ मी/२५६५० फूट उचीचे भारतातील नदादेवी शिखर हेच जगातील सर्वोच्च शिखर मानले जात होते पण १८५० च्या धवलगिरीच्या पाहणी-मोजणीनतर मात्र ८१६८ ७ मी /२६८०० फूट उचीच्या त्या शिखराला तो मान देण्यात येऊ लागला कांचनगगा ८५९७ मी / २८२०७ फूट या शिखरालाही काहीजण जगातील सर्वोच्च शिखर समजत असत

१८४९ नोव्हेंबर ते जानेवारी १८५० या काळात जे ओ निकोल्सन याने एच (h) नावाने नोंदलेल्या शिखराची पाहणी केली सहा ठिकाणाहून थिओडोलाइटचा वापर करून केलेल्या या निरीक्षणानतर या शिखराला X V (पंधरा) हा क्रमांक देण्यात आला

अनेक ठिकाणाहून घेतलेली निरीक्षणे, त्यामध्ये तपमान, हवेचा दाब, गुरुत्वाकर्षण, वातावरणातील बारीकसारीक फेरबदल आणि मोजणी यत्रांची अचूकता





## हिमालयातील उच्च शिखरे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तिरीचमीर<br>२५२३०<br>७६९० २ मी. | कम्पायर दि आर<br>२२४३७<br>७१४२ ७ मी | दिस्तेघील सार<br>२५८६८<br>७८८४ ६ मी | मशेरब्रुम<br>२५६६०<br>७८२१.२ मी. | गशेरब्रुम<br>२६४७०<br>८०६८.१ मी. | के२<br>२८२५०<br>८६१०.७ मी. |
| नंगापर्वत<br>२६६६०<br>८१२६ मी | नुन कुन<br>२३४१०<br>७१३५ ४ मी | रग सेर कांग्री<br>२५१७०<br>७६७१.९ मी | राकापोशी | शिला<br>२३०५०<br>७०२५.७ मी | कामेट<br>२५४४७'<br>७७५६ ३ मी. |
| बंदरपूंछ<br>२०७२०<br>६३१५.५ मी | नंदादेवी<br>२५६४५<br>७८१६.६ मी | कैलास<br>२२०२८<br>६७१४.२ मी | गुर्लामांधाता<br>२५३६५'<br>७७३१ ३ मी | अपि<br>२३३९९<br>७१३२ १ मी. | सैपाल<br>२३०७९<br>७०३४.५ मी. |
| धवलगिरी<br>२६७९५<br>८१६७ २ मी. | अन्नपूर्णा<br>२६५०४'<br>८०७८.५ मी. | हिमालचुली<br>२५८०१<br>७८६४.२ मी. | गौरीशंकर<br>२३४४०<br>७१४४.५ मी. | गोसाईनथान<br>२६२९१<br>८०१३ ५ मी | मकालू<br>८४८०.८ मी.<br>२७८२४' |
| एव्हरेस्ट<br>२९०२८<br>८८४८ मी. | पौहुन्री<br>२३१८०<br>७०६५ मी. | कांचनगंगा<br>२५१६८<br>८५८५.७ मी. | चोमोल्हारी<br>२३९९७'<br>७३१४.३ मी. | कुलचाकांग्री<br>२४७८४<br>७५५४.२ मी. | कांग्टो<br>२३२६०<br>७०८९ ७ मी. |
| | | | | | नामचाबरवा<br>२५४४५'<br>७७५५ ७ मी. |

या सर्वांचा विचार करून उंचीची गणिते करावी लागतात त्यामुळे निरीक्षणे घेतल्यानंतर प्रत्यक्ष उंची ठरवायला थोडा वेळ लागणे स्वाभाविक असते

१८५१ मध्ये ह्या गणिती कामाला खूपच वेग आला होता. उंचीची गणिते वारंवार तपासणे, त्यातील बारीकसारीक चुका दूर करणे असे हे काम होते

जे ओ निकोल्सनच्या मोजणीत १७३ ते १९० कि मी / १०८ ते ११९ मैल अंतरावरील जारोल, मिर्झापूर, जजिपती, लाडनिया, हरपूर आणि मिनाई या सहा ठिकाणाहून घेतलेल्या वेधाचा समावेश होता ही सारी ठिकाणे बिहारमधील दरभंगा जवळ आहेत




नेपाळ– तिबेटच्या सरहद्दीवरील या पंधराव्या क्रमाकाने दर्शविलेल्या आणि २७°५९' १६" उत्तर अक्षांश आणि ८६° ५५' ४०" पूर्व रेखांश येथे असणाऱ्या या शिखराची उंची जारोलहून ८८३६·७४ मी / २८९९१ ६ फूट, मिर्झापूरहून ८८४० ९२ मी/ २९००५ ३ फूट, जजीपतीहून ८८३९·८५ मी / २९००१ ८ फूट, लाडनियाहून ८८३८·८८ मी/ २८९९८ ६फूट, हरपूरहून ८८४७·२६ मी/२९०२६ १ फूट आणि मिनाईहून ८८३६ ३८ मी/ २८९९०·४ फूट अशी भरत होती

एका कथेप्रमाणे मोजणीदार श्री राधानाथ सिकदर धावत धावत आपल्या वरिष्ठ गोऱ्या साहेबाच्या खोलीत गेला आणि त्याने जगातील सर्वोच्च शिखराची उंची ठरविण्यात आपल्याला यश आल्याचे सांगितले ही सर्व गणिते श्री ॲण्ड्र्यू वॉघ याने तपासून पाहिली व हा निष्कर्ष बरोबर असल्याचे सांगितले

राधानाथ सिकदराच्या बाबत मात्र एक शंका नव्यानेच घेतली जाऊ लागली आहे निकोल्सनने प्रत्यक्ष मोजणी केली आणि ती मोजणी पुरी होण्याच्या बेतातच राधानाथ सिकदर या मोजणी खात्यातून निवृत्त झाला होता त्याने आपले डेहरा-

डूनचे वास्तव्य हलविल्यानंतरच गणिती कामाला सुरुवात झाली त्यामुळे श्री हेन्नेसी या अँग्लोइंडियन गृहस्थाने ही आकडेमोड केली; असा सूर काही जण काढतात

वस्तुत २८९९० फूट ते २९०२६ फूट या दरम्यान पधराव्या क्रमांकाने दर्शविलेल्या शिखराची उंची भरत होती परंतु ही उंची २९००२ फूट ठरविण्यात अगदी फुटापर्यंत बरोबर उंची ठरविल्याचे श्रेय मिळणार होते. ही थोडीशी धूळफेकही होती तब्बल एक शतकभर हीच उंची या शिखराची अचूक व प्रमाणभूत उंची मानली जात होती

कोणत्याही शिखराची उंची ठरवायची म्हणजे पुढील काही गोष्टींचा विचार करणे अगत्याचे असते पाहणी किंवा मोजणी करताना त्या शिखरमाथ्याचे वेध घेऊन मग आकडेमोड करून ही उंची निश्चित करता येते. पण प्रकाशकिरण वातावरणातून जाताना थोडे वाकतात थंडीत, उन्हाळ्यात, सकाळी, दुपारी, सायकाळी अशी वेगवेगळ्या वेळी व वेगवेगळ्या काळात मोजणी-पाहणी केली तर ही उंची वेगवेगळी येते


कर्नल क्रॉफर्डने १८१० साली काठमांडूस भेट दिली तेव्हा त्याने आसपासच्या शिखराची उंची मोजली तेव्हा हा फरक ३०० मी./ १००० फूट इतका पडल्याची नोंद केली आहे हीच गोष्ट १८१२ साली कॅप्टन वेबने गंगेच्या उगमाजवळील गंगोत्री शिखर आणि यमुनेच्या उगमाजवळील बंदरपूंछ शिखर यांची मोजणी केली तेव्हा घडलेली आढळते गंगोत्रीची त्याने ठरवलेली उंची २२८०० फूट / ६९४९ ५ मी. भरते ती प्रत्यक्षात ११०० फूट/३३५.२८ मी ने कमी आहे. बंदरपूंछची उंची त्याच्या निरीक्षणाप्रमाणे २५००० फूट/ ७६२० १ मी. भरते. ती प्रत्यक्षात ४००० फूट/१२१९ २१ मी ने कमी आहे." अॅटमॉस्फेरिक रिफ्रॅक्शनचा (वातावरणीय परावर्तनाचा) एवढा परिणाम होऊ शकतो.

शिखराची उंची ठरवताना दुसरा प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे उंची कशापासून मोजावयाची ? सर्वसाधारणपणे समुद्रसपाटीपासून उंची मोजण्याचा प्रघात आहे समुद्रसपाटीची काल्पनिक रेषा पर्वतपायथ्यापर्यंत आणताना पृथ्वीच्या गोलाव्याचा विचार करावा लागतो त्यातील अचूकता साधणे महाकर्मकठीण आहे या पातळीला 'जिऑइड म्हणतात. त्याचा विचार करणे आवश्यक ठरते १८८०-८३ च्या पाहणीत एव्हरेस्ट शिखराची उंची २९००२ फूट/८८३९ ९ मी ठरविण्यात आली होती तर १९०५ साली सर सिडनी बर्राड याने ती २९१४१ फूट/८८८२ २ मी ठरविली, यात अचूकतेप्रमाणे २३ फूट/७.०१ मी फरक पडण्याची शक्यताही त्याने नोंदून ठेवली होती

१९१० साली डॉ जे. डी ग्राफहूटर यान अॅटमॉस्फेरिक रिफ्रॅक्शनबाबतचा

नवा सिद्धांत मांडला. तो त्याने १९१३ साली प्रकाशित केला १९२२ साली एव्हरेस्टची उंची २९०८० फूट/८८६३ ६९ मी असल्याचे इंडियन सायन्स काँग्रेस पुढे सांगितले मात्र नेपाळमध्ये जाऊन आणखी पाहणी करता आली तर ही उंची अचूक ठरविता येईल असे त्याने प्रतिपादन केले

१९५० नंतर सर्व्हे ऑफ इंडियाला नेपाळात प्रवेश मिळाला बी, एल् गुलाटी हा त्या वेळी जिओडेटीक शाखेचे सर्व्हे ऑफ इंडियातील प्रमुख अधिकारी होता



१९७५ च्या चिनी मोहिमेने एव्हरेस्टवर रोवलेले तिकाटणे

डिसेंबर ५२ ते डिसेंबर ५३ या काळात एव्हरेस्टची निरीक्षणे करण्यात आली त्यानुसार २९०२८ फूट/८८४८ मी उची निश्चित केली गेली अर्थात यातही १० फूट/ ३ मी पर्यंतचा फरक पडू शकेल याची पुस्ती त्या वेळी जोडण्यात आली

१९७५ साली चीनने तिबेटच्या विशेषत एव्हरेस्टच्या परिसरात आखणी–मोजणी– नोंदणी व नकाशांकनाचा फार मोठा प्रकल्प हाती घेतला होता १९७५च्या मे मध्ये चीनच्या एव्हरेस्ट मोहिमेला यश मिळाले त्या वेळी त्यानी ४किलो वजनाचा एक तिपाईवर चढविलेला दाडा एव्हरेस्ट शिखरावर रोवण्यात यश मिळवले. हिम व बर्फाच्या थराच्या तळापर्यंत म्हणजे ० ९२ मी / ३ ०२ फूट इतके खोदून एव्हरेस्टच्या कातळ माथ्याशी ह्या तिपाईची टोके भिडविण्यात आली आहेत अत्यत हलक्या वजनाचा पण मजबूत असा हा मिश्रधातूचा दाडा ३ ५ मीटर उचीचा आहे या लाल रगाच्या दाड्याला नायलॉनच्या दोरखडानी ताणून बाधून मजबूती आणलेली आहे ही बला इथवर आणण्यासाठी चिनी व तिबेटी गिर्यारोहकांनी जे कष्ट घेतले त्याला खरोखरच तोड नाही आपले शरीर तिथवर नेणे हेच जिथे ओझे वाटते तिथे हे अवजड प्रकरण तिथे सुखरूप नेणे म्हणजे मानवी सहनशक्तीची मर्यादा अफाट ताणणेच आहे तिथल्या जबरी वाऱ्याशी झुजणारा हा दाडा म्हणजे मानवी कष्ट आणि धाडसाचेच प्रतीक बनला आहे

ऑस्ट्रीयन जर्नल ऑफ सर्व्हेइग अँण्ड फोटो ग्रॅमेट्री या सशोधन नियतकालिकात १९८० मध्ये चेन जे वाय् (Chen J–Y) याचा सशोधन निबध प्रसिद्ध झाला आहे त्यात ८८४८ १३ मी.$\pm$० ३५ मी म्हणजे २९०२९ फूट $\pm$१.१ फूट अशी एव्हरेस्टची उची नोंदण्यात आली आहे. अतिशय परिश्रमपूर्वक आखलेल्या या चिनी मोहिमेचे फल म्हणजे एव्हरेस्टच्या उचीत झालेली थोडीशी वाढ. सध्याच्या सर्व अत्याधुनिक मोजमापनानतर ही उची ठरविण्यात यश आले आहे.

## एव्हरेस्ट परिसराचा नवा नकाशा


१९८५च्या दार्जिलिगमधील गिर्यारोहण व पर्यटन समेलनात बोलताना ॲडम्स कार्टर या अमेरिकन अल्पाइन जर्नलच्या सपादकाने एव्हरेस्ट परिसराच्या नव्या सकल्पित नकाशाची कल्पना तपशीलवार माडली

बोस्टन म्युझियम ऑफ सायन्स आणि नॅशनल जिओग्राफिक सोसायटी यानी हा सयुक्त प्रकल्प हाती घेतला आहे झुरिच येथील स्विसएअर फोटो सर्व्हेज लि आणि बर्नची लॅण्डसटोपोग्राफिक यांच्या सहकार्याने १९८७ पर्यंत हा नवा नकाशा तयार होईल

१ १०,००० या प्रमाणात २० मीटर उचीच्या पातळीरेषा (कन्टूर लाइन्स) असणारा मूळचा नकाशा १ ५०,००० या प्रमाणात छापला जाईल त्यासाठी

१९८३ व ८४ च्या स्पेस शटल या अमेरिकन उपक्रमाची मदतही मिळणार आहे नेपाळ व चीन यांची अधिकृत मजुरी या नव्या योजनेसाठी मिळवली होती जून १९८४ मध्ये व २० डिसें १९८४ रोजी ३९२०० फूट/११९५० मी उंचीवरून ४०० चौ मैल/९०० चौ कि मी परिसराचे नकाशाकन करण्यास हवाई चित्रीकरण केले गेले यामधील ६० टक्के भाग तिबेटचा व ४० टक्के भाग नेपाळच्या हद्दील मोडतो वाइल्ड आर सी १० या कॅमेन्याने १५३.३७ मि मी भिंगाने कोर्डेक प्लस एक्स एरोग्राफिक ३४०२ या फिलमने हे चित्रीकरण केले गेले लीर्जेट ३५ ए या स्विसएअरच्या विमानातून ब्रॅडफोर्डच्या नेतृत्वाखाली ही हवाई मोहीम आखली गेली होती बॅरी बिशप हा नॅशनल जिओग्राफिक सोसायटीचा व वार्नर अल्थर हा स्विस एअर फोटो सर्व्हेचा चित्रणकार याच्यावर चित्रीकरणाची जबाबदारी सोपवली होती १९८७साली हा नकाशा वितरीत होईल २९,०००फुटावरून/ ११८८७ मी वरून एव्हरेस्टच्या माथ्यावरून घेतलेला फोटो, नव्या दिल्लीतील आय् एम् एफ् च्या संग्रहालयाला दिला जाणार आहे

# एव्हरेस्टचे वारसे



ए. २

# ३ एव्हरेस्टचे बारसे

जगातील सर्वांत उच्च असणाऱ्या पहिल्या आणि दुसऱ्या शिखराच्या नामकरणाबाबत बरेच वादंग माजले आहे सध्या सर्वोच्च शिखर ' एव्हरेस्ट ' आणि त्या खालोखालचे शिखर ' के टू ' (K–2) या नावाने ओळखले जाते या नामकरणाचे श्रेय ब्रिटिशाकडे जात असल्याने जुन्या गुलामगिरीच्या या खुणा किंवा हे ओरखडे नाहीसे करण्याचे प्रयत्न अधून मधून चालू असतात

सध्या मान्य असलेल्या घटनेनुसार जे ओ निकोल्सन याने केलेल्या मोजणीवरून, गणिती आकडेमोड करून राधानाथ सिकदर या मोजणीदाराने XV या क्रमाकाने दर्शविलेल्या शिखराची उची सर्व ज्ञात शिखरापेक्षा अधिक आहे, हे तत्कालीन सर्व्हेअर जनरल ॲण्ड्र्यू वॉघ याच्या नजरेला आणून दिले आता या शिखराला कोणते तरी नाव देण्याचा प्रश्न निर्माण झाला

नुकत्याच निवृत्त झालेल्या भारताच्या पहिल्या सर्व्हेअर जनरलचे म्हणजे सर जॉर्ज एव्हरेस्ट याचे नाव या शिखराला द्यावे असे ॲण्ड्र्यू वॉघ याने त्या वेळी सुचविले ही कल्पना फारसा विरोध न होता पाश्चात्त्य जगात मान्यही झाली वॉघ हा एव्हरेस्ट याचा शिष्य आणि वारसदार होता त्याने आपल्या गुरूचे नाव देण्याचे सुचवावे यात फारसे आक्षेपार्ह काहीच नव्हते खुद्द सर जॉर्ज एव्हरेस्टचा मात्र असे नाव देण्यास थोडा विरोधच होता जरी त्याच्या भारतीय उपखडाच्या जिओडेसिक सर्व्हेच्या प्रचड कामगिरीचे सर्वोच्च शिखराला नाव देऊन कौतुक होणार होते, तरी एव्हरेस्ट या उच्चाराऐवजी इव्हरेस्ट हा बरोबर उच्चार आणि तो जसाच्या तसा सर्व लिपी व भाषांमध्ये लिहिता येणार नाही (विशेषत नेपाळी व तिबेटीमध्ये), म्हणूनही त्याला हा प्रस्ताव फारसा रुचला नव्हता

ब्रिटिशाचे साम्राज्यशाही अवशेष आता मोडीत काढले पाहिजेत असे आग्रहाने प्रतिपादन करणाऱ्याना ' एव्हरेस्ट ' ऐवजी पर्यायी नावे पुढे आणणे भाग होते ज्या एव्हरेस्ट साहेबाने एव्हरेस्ट शिखराचे ना दर्शन घेतले, ना मोजमाप केले त्याचे नाव त्या शिखराला द्यायचेच कशाला, असा प्रश्न ही मडळी उपस्थित करतात ल्होत्से, नुप्त्से, पुमोरी, आमाई दाब्लाम, कागतेगा, त्रामसेरकू, क्वांगडे, तावेचे,

लोबुचे अशा या एतद्देशीय नावाच्या गराड्यात ' **एव्हरेस्ट** ' हे नाव अगदी घासात खडा लागावा असे बोचते हे या मडळींचे म्हणणे आहे काही प्रमाणात या म्हणण्यात थोडेफार तथ्यही आहे असे प्रथमदर्शनी वाटते

सध्या तिबेटी मडळींकडून ' **चोमोलुगमा** ' (Chomolungma) आणि नेपाळी लोकाकडून ' **सागरमाथा** ' ((Sagarmatha) हे प्रतिनाव आग्रहाने पुढे केले जाते ' **एव्हरेस्ट** ' ऐवजी या नावाचा वापर हे लोक आवर्जून करतात

लेफ्टनट कर्नल हॉवर्डबरी याच्या नेतृत्वाखालील १९२१ च्या पहिल्या अधिकृत मोहिमेच्या वृत्तांतात ' **चोमोलुगमा** ' या एव्हरेस्ट शिखराच्या स्थानिक नावाचा उल्लेख आढळतो पण याच ठिकाणी '**एव्हरेस्ट**' आणि त्याचा बडा शेजारी '**मकालू**' या दोघानाही चोमोलुगमा हे नाव वापरले जात असल्याची माहिती काही ठिकाणी आहे काहीजण एव्हरेस्टला ' **चोमोउरी** ' Chomo– Uri सबोधतात असाही उल्लेख मिळतो

एव्हरेस्टच्या दुसऱ्या मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या जनरल ब्रूस याने ' ट्वेंटी इयर्स इन हिमालया ' या पुस्तकात ' **चोमोलुगमा** ' म्हणजे ' **माऊट एव्हरेस्ट** ' असा निर्वाळा दिला असला, तरी ' **छोलग्बू** ' (Chholungbu) असे नावही वापरात असल्याचा पुसट उल्लेख त्यात आढळतो डग्लस फ्रेशफिल्डने ' राऊड काचनगगा ' या ग्रथात ' **चोमो ककर** ' (Chomo Kankar) हे एव्हरेस्टचे स्थानिक नाव असल्याची नोद केलेली आहे

## एव्हरेस्ट आणि गौरीशंकर

१८५५ मध्ये हर्मन श्लागिंटवेट (Herman Schlagintweit) या जर्मन साहसी पर्यटकाने सिक्कीम आणि नेपाळमध्ये प्रवेश करण्यास आणि एव्हरेस्ट परिसराचा अभ्यास करण्यास परवानगी मिळवली (मात्र त्याच वेळेला ज्याचा दरारा जगभर होता त्या ब्रिटिश भारताच्या सर्व्हे ऑफ इडियाला अस काम करण्याची अनुमती मिळू शकत नव्हती ) सिक्कीममधील एका शिखरावरून त्याने नेपाळातील एक शिखर पाहिले त्याचे त्याने नामकरण केले ' **गौरीशकर** ' त्याने नकाशांकित केलेली दिशा मात्र एव्हरेस्टचीच आहे काही जणांच्या मते ते मकालू शिखर (उची ८४७३ ५ मी /२७८०० फूट) असावे. पुढे नेपाळमधून त्याने कौलिया येथून एव्हरेस्टच्या दिशेला पाहिले तेव्हा त्याला एक बर्फाळ शिखर आढळले त्याला तो पूर्वीचेच ' **गौरीशकर** ' समजला ते प्रत्यक्षात खरे गौरीशकरच होते (उची ७१३२ ४ मी / २३४०० फूट). पण श्लागिंटवेट याने सिक्कीममधून पाहिलेले शिखर नेमके या शिखराआड दडलेले होते. म्हणजे दिशा बरोबर पण शिखर वेगळेच असे घडले होते त्यामुळे जुन्या जर्मन नकाशामध्ये ' **माउट गौरीशंकर** ' ऊर्फ ' **माउट एव्हरेस्ट**'

असे नाव आढळते (१९५३ मधील एव्हरेस्ट विजयानंतर एका मराठी कवीने आज जिंकला गौरीशंकर . अशी कविता केली होती त्याला हा पुरावा मिळाला होता की काय कोण जाणे ?)

१८८६ मध्ये सर अँण्ड्र्यू वॉघ नंतर सर्व्हेअर जनरल ऑफ इंडिया बनलेल्या जनरल वॉकरने ' जिओफिजिकल जर्नल ' मध्ये लेख लिहून ' एव्हरेस्ट ' आणि ' गौरीशंकर ' ही एकमेकापासून ६४ ४ कि मी/४० मैल दूर असलेली वेगवेगळी शिखरे आहेत हे दाखवून दिले त्यांच्या उंचीमध्ये देखील १५२४ मी./५००० फुटांचा फरक आहे हे त्याने सप्रमाण सिद्ध केले तरीही सर्वांचे समाधान झाले नाहीच

मग १९०४ मध्ये नेपाळमध्ये ' गौरीशंकर ' च्या स्थाननिश्चितीसाठी एक मोहीम काढली गेली अशी नोंद मिळते हे सगळे रामायण घडून गेले तरीही टाइम्सने १९२० मध्ये या परिसराचा जो नकाशा प्रकाशित केला त्यात ' गौरी-शंकर ' ऊर्फ **'एव्हरेस्ट'** अशी नोंद मिळतेच

फ्रेंच जेसुईटांसाठी १७१७ मध्ये पेकिन मध्ये तयार केलेल्या आणि पुढे पॅरिस-मध्ये डी ॲनव्हिले येथे १७३३ मध्ये छापलेल्या तिबेटच्या नकाशात '' त्चौमौ लंक्मा ' (Tchoumou Lancma) असे शिखर एव्हरेस्टच्या जागी दाखविलेले आढळते त्चौमौ लंक्माचे चोमोलुंगमाशी थोडेसे साधर्म्य वाटते डॉ स्वेन हेडीन यानेही हे नाव स्वीकारलेले दिसते

सर्व्हे ऑफ इंडियाच्या प्रोफेशनल पेपर्समध्ये १९३१ साली माऊंट एव्हरेस्ट नावाबद्दल काही ऊहापोह केलेला आढळतो सर सिडनी बर्राड याच्या २६ क्रमा-काच्या संशोधनपत्रात सर चार्लस बेल याने उपस्थित केलेला मुद्दा महत्त्वाचा आहे. १९२० मध्ये तिबेटच्या लामाशाहीकडून एव्हरेस्ट पथकासाठी जी अनुमती मिळाली ' त्यामध्ये **चा–मा–लुंग** ' (Cha–ma–lung) असा उल्लेख आहे मूळ पत्रातील उल्लेखाचा अनुवाद असा–' हिमशिखरांच्या पाच मोठ्या खजिन्यातील दक्षिणेकडील पक्षीराज्यातील मोडणाऱ्या चा–मा–लुंग भागात जाण्यास ही अनुज्ञा दिली जात आहे ' याच पत्रातील ल्हो–चा–झी–मा–लुंग–पा (Lho–cha–dzi–ma–lung–pa) या मूळ तिबेटी शब्दसमुच्चयाचा अर्थ, दक्षिण सुभ्यात जेथे पक्षी ठेवलेले आहेत, असा होतो इ स पूर्व ६५० ते ८०० इतक्या प्राचीन काळापासून दूध कोसी व अरुण नदी दरम्यानच्या प्रदेशाच्या उत्तर भागात काही पक्षी मुद्दाम पाळले जात होते असा पुरावा मिळतो हा भाग रोंगबुक धर्ममठाच्या परिसरातील आहे लुंग (Lung) या एकट्या शब्दाचा अर्थ मात्र तिबेटी भाषेत दरी असा होतो. त्याचा दूरान्वयानेही डोंगर किंवा शिखर असा अर्थ होऊ शकत नाही पण चा (Cha) ऐवजी चो (Cho) शब्द वापरला तर मात्र बराच फरक पडतो चा म्हणजे पक्षी पण चो म्हणजे देव किंवा देवाचा प्रमुख. पण हे शब्दाचे स्त्रीलिंगी रूप आहे.

त्यामुळे '**चामालुंग**' की '**चोमोलुंगमा**' हा भागही महत्त्वाचा ठरतो

१९३० मध्ये डेव्हिड मॅकडोनाल्ड हा ल्हासामध्ये ब्रिटिश ट्रेड एजट म्हणून काम करीत असे त्याच्या म्हणण्यानुसार एव्हरेस्ट शिखराला '**मि–टी–गु–टीचा–पू–लोंग-ग्मा**' असे म्हणतात. याचे भाषांतर त्याने No line, Nine lines, Flying Bird Blind असे केले आहे त्याचा अर्थ असा की, 'तुम्ही हे ठिकाण जवळून पाहू शकत नाही पण नऊ (म्हणजे अनेक) ठिकाणाहून हे शिखर दिसू शकते एखादा पक्षी त्या शिखराएवढ्या उचीवरून उडाला तर तो आंधळा होतो हे नाव किंवा हा शब्दसमुच्चय मॅकडोनाल्डशिवाय इतर कोणीही वापरल्याचे आढळत नाही

'एव्हरेस्ट–१९३३' या पुस्तकात एव्हरेस्ट मोहिमेच्या ह्यूज रटलज या नेत्याला तिबेटी धर्मशहाकडून आलेल्या पत्रात ही परवानगी '**चामालुंग**' (चोमोलुग्मा नव्हे !) या हिमप्रदेशात जाण्यासाठी देण्यात येत आहे' असा उल्लेख आहे या ठिकाणीही प्रत्यक्ष शिखरासाठी एखादे विशेष नाव वापरल्याचे दिसत नाही सर चार्लस् बेल अत्यत परखडपणे कोणतेही स्थानिक नाव '**एव्हरेस्ट**' शिखरासाठी वापरले जात नव्हते, असे स्पष्टपणे नोदवतो

अर्थात एखाद्या गोष्टीकडे पाहायची तिबेटी शासनाची व पाश्चात्त्य मडळींची दृष्टी अगदी मिळती जुळती असेलच असे नाही त्याचे रीतीरिवाज, नावे ठेवण्याच्या पद्धती, दृष्टिकोन यामध्ये दोन वेगवेगळ्या सस्कृतींमध्ये पडतो तो नैसर्गिक फरक या ठिकाणी फारसा कोणी लक्षात घेतलेला दिसत नाही

सध्या स्वतत्र सार्वभौम तिबेटचा घास घेतलेले चिनी राज्यकर्ते तिबेटवर सत्ता गाजवीत आहेत त्यामुळे तिबेटी लोकाची मते जाणून घेण्याची शक्यता आता फारशी उरलेली नाही खरं तर जिथे कोणतेही मौल्यवान पदार्थ नाहीत, एवढेच काय जिथे प्यायला पाणी आणि श्वासोच्छ्वासाला पुरेशी हवाही नाही, तिथे जीवावर उदार होऊन ही मडळी कशासाठी जातात? हाच प्रश्न तिबेटयांना पडे पण स्थानिक मडळींना त्यातून थोडाफार आर्थिक फायदा होत असे त्यामुळे अधून मधून तिकडे जाण्यास परवानगी मिळत असे अर्थात सर्वच पर्वतशिखरावर अनादि काळापासून एकांतात राहणाऱ्या दैवताच्या कोपाबद्दलही त्यांच्या मनात भय होते त्यामुळे अशी परवानगी त्यानी अनेक वेळा नाकारलेली देखील आहे

चिनी सत्ताधीशांनी सध्या '**कोमोलगमा फेंग**' (Qomolangma Feng) हे नवेच नाव एव्हरेस्ट शिखरासाठी वापरायला सुरवात केली आहे इतरांनी कोणते नाव वापरावे याबद्दल सध्या ते काहीच बोलत नाहीत पण **कोमोलगमा फेंग** या नावाबद्दलचा आपला आग्रहही ते अजिबात सोडत नाहीत त्याशिवाय '**माउट जोमो (जोल्मो) लगमा**' (Mount Jolmo langma) असाही शब्दप्रयोग त्यांच्या साहित्यात काही ठिकाणी आढळतो

बिल एटकेन (Bill Aitken) या नामवंत भारतीय गिर्यारोहकाने मध्याच्या दलाई लामांकडून 'चोमोलुंगमा' या नावाचा शहानिशा करून घेण्याचे ठरविले त्यातून निघालेले निष्कर्ष वेगळेच सांगतात

पाश्चात्य मंडळी सध्या ज्याला 'एव्हरेस्ट' म्हणतात त्याला पारंपरिक तिबेटी रूढी– प्रथा–व साहित्यात '**गांग– थोंग– थिंग– ग्याल मो**' (Gang–Thong– Thing– Gyalmo) म्हणजे '**स्नो-हाय ब्ल्यू-क्वीन**', '**हिमशिखरांची उत्तुंग नीलराणी**' म्हणतात तरीही सर्वसामान्य तिबेटी लोक '**गांग– री– जोमो-लुंगमा**' (Gang– Ri–Jomolungma) या नावाने ही पर्वतराजी आणि एव्हरेस्ट शिखराला फक्त '**जोमोलुंगमा**' (Jomolungma) असे म्हणतात त्यांच्या श्रद्धेनुसार ताशी त्सेरींग मा (Tashi Tsering ma) या शिखरदेवतेच्या वास्तव्याचे हे कायमचे ठिकाण आहे म्हणूनच श्रद्धेय तिबेटी मंडळींना हे ठिकाण पूजनीय व श्रद्धेचे ठिकाण वाटत असते या देवतेसाठीच शिखराच्या उत्तर पायथ्याशी रोंगबुक धर्ममठाची स्थापनाही केली गेली होती

एव्हरेस्ट, चोमोलुंगमा, सागरमाथा, देवधुंगा, चोमो-उरी, छोलम्बू, चोमो कंकर, गौरीशंकर, त्चौमौ लंक्मा, चा-मा लुंग, मिटीगुटीचा पू लोंगग्पा, कोमोलंगमा फर्ग अशी अनेक नावे या शिखरासाठी सुचवली– वापरली गेलेली आढळतात या मतमतांतराच्या गलबल्यात नक्की निर्णय घेणे कठीणच होऊन बसते

## एव्हरेस्टचे नेपाळी नाव 'सागरमाथा'

आजमितीला नेपाळमधून 'एव्हरेस्ट इंडस्ट्री'ला प्रचंड महत्त्व दिले जात आहे एव्हरेस्टकडे जाणाऱ्या शिखरमोहिमा, एव्हरेस्टच्या परिसरातील शिखरावर जाण्याचे प्रयत्न आणि एव्हरेस्ट ट्रेक यामुळे नेपाळला बरेच परकीय चलन तर मिळतेच पण त्यामुळे खूप स्थानिक रोजगारही उपलब्ध होतो नेपाळच्या शाही शासनाने '**एव्हरेस्ट**' ऐवजी '**सागरमाथा**' हा शब्द सर्रास वापरायला आरंभ केला आहे (सागरमाथा–Sagarmatha– ऐवजी हा शब्द सरगमाथा किंवा स्वर्ग-माथा–Saragmatha–असावा अशी शंका काहीजण घेतात पण सागरमाथा Sagarmatha हा शब्दच अधिकृतरीत्या वापरण्यात येतो हे निश्चित )

अती प्राचीनकाळी हिंदुस्थानचे द्वीपकल्प, आफ्रिका खंड, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अंटार्क्टिका हं सारा भाग एकत्र जोडलेला होता त्याला गोंडवन भूखंड असे नाव शास्त्रज्ञांनी दिले आहे ते भूखंड चिरफाळले जाऊन हे तुकडे वेगवेगळ्या दिशेला सरकू लागले भारतीय द्वीपकल्प वाहत वाहत तिबेटी पठाराकडे सरकू लागले शेवटी ते त्यावर आपटले भारतीय उपखंड आणि तिबेटी प्रदेशाच्या दरम्यान असणाऱ्या समुद्राचा तळ हळूहळू उचलला जाऊ लागला व त्यातून हिमा-

लयाचा जन्म झाला  या समुद्रतळाच्या प्रदेशाला पडलेल्या घड्यामुळे हिमालयाच्या डोंगररांगा तयार झाल्या  त्यातील सर्वोच्च शिखराला ' सागरमाथा ' म्हणणे खरोखर शास्त्रशुद्ध आहे  पण हे नाव कधी– कोणी– केव्हा– कोणत्या अर्थाने वापरायला सुरुवात केली ते सध्या तरी अज्ञातच आहे

नेपाळी प्रदेशातून एव्हरेस्ट शिखर जाणवण्याइतके उंच वाटत नाही  एव्हरेस्टचे उत्तम दर्शन होते त्या गोरखशेपवरून तर नुप्त्से शिखरच उंच वाटते  अर्थात एव्हरेस्टपेक्षा नुप्त्से जवळ असल्याने असे दिसते

नेपाळी प्रथेप्रमाणे शिखराचे समूह एका नावाने ओळखले  जातात  कांचनगंगा शिखर असणारा सिंगालिला हिमाल, धवलगिरी शिखराचा अंतर्भाव असणारा धवलगिरी हिमाल, गौरीशंकर शिखराचा समावेश होणारा रौलवलिंग हिमाल, तसेच एव्हरेस्ट किंवा सागरमाथा शिखर असणारा महालंगूर हिमाल या नावाने तो सारा शिखरपरिसर ओळखला जातो  कर्नल सर एडवर्ड टॅन्डी याने नेपाळचा सर्व्हे केला तेव्हा त्याला नेपाळी लेफ्टनंट कर्नल गणेशबहादूर याचे अतोनात सहकार्य मिळाले याचा वृत्तान्त सर्व्हे ऑफ इंडियाच्या १९२६–२७ च्या वृत्तान्तात मिळतो  गणेशबहादूर याच्या मते ' **महालंगूर हिमाल** 'लाच उत्तरेकडील तिबेटी प्रशासक ' **चोमोलामो** ' किंवा ' **चोमोलोमो** ' म्हणतात

## एव्हरेस्टचे आणखी एक नाव ? देवधुंगा ?

१८५४ मध्ये हॉड्‌ग्सन  (Hodgson)  या  नेपाळी भाषातज्ञाने एव्हरेस्ट शिखरालाच ' **देवधुंगा** ' म्हणतात असा दावा केला  मात्र  त्यानंतर  कधीही ' **देवधुंगा** ' या नावाचा उल्लेख  आढळत  नाही  या  नावाबाबत  कोणी  फारसा आग्रहही धरत नाही  सध्याच्या नेपाळी लोकांकडून ' देवधुंगा ' नावाला दुजोराही मिळत नाही  त्यामुळे या नावाचा एव्हरेस्टच्या संदर्भात विचार केला  जात  नाही

## एव्हरेस्टसाठी नवे नाव !

एव्हरेस्ट नाव नको  चोमोलुंगमाबद्दल गोंधळच फार  सागरमाथा शास्त्रीय नाव वाटले तरी शास्त्रीय पार्श्वभूमी माहिती नसेल तर बुचकळ्यात टाकणारे म्हणून एव्हरेस्टसाठी नवेच नाव वापरात का आणू नये, या विचाराने काही विचारवंतांना झपाटून टाकले

राधानाथ सिकदरने एव्हरेस्टच्या उंचीची अचूक आकडेमोड केली  म्हणून त्याचेच नाव या शिखराला द्यावे  व ' **शैल राधानाथ** '– ' **माउंट राधानाथ** ' असे नाव वापरावे हे काही जणांचे मत आहे  काहींच्या मते ही कामगिरी हेन्नेसी याने केली  राधानाथच्या आकडेमोडीचाच विचार करायचा तर जे  ओ  निकोल्सनचा

विचार का करू नये ? त्या विचाऱ्याने नोकरीचा भाग म्हणून का होईना २४ इंची/ ६० सें मी थिओडोलाइटचा वापर करण्यासाठी भल्या पहाटे उठून सूर्योदयापूर्वी शिखराची निरीक्षणे घ्यायला सुरुवात करायची ती थेट दहा वाजेपर्यंत त्यासाठी दुर्गम डोंगरी प्रदेशात निरीक्षण मनोरे किंवा मचाणे बांधून त्यावर सर्व साहित्य मांडून तयार ठेवायचे निरीक्षणे घ्यायची, ती सगतवार लावून ठेवायची हे कष्ट-दायक काम ज्याने केले त्याचा विचार करणे कोणाच्या मनातही येत नाही हे आश्चर्यच आहे!

'चोमोलुगमा' म्हणजे 'जगन्माता' किंवा 'जगाची आई' हे नाव त्या-मागील मतमतांतराच्या गलबल्यामुळे नको म्हणून तेनसिंग आणि हिलरी या पहिल्या एव्हरेस्टविजेत्या जोडगोळीच्या नावावरून '**एडसिंग**' किंवा '**तेनरी**' अशी नावेही एव्हरेस्टला पर्यायी नावे म्हणून सुचवली गेली मॅलरी आणि आयर्विनच्या आरोहणाबाबत काही नवीनच माहिती उलब्ध झाली तर तेनरी / एडसिंग किंवा अन्य सकरित नाव धोक्यात येऊ शकेल याचाही विचार आत्ताच करून ठेवायला हवा

एव्हरेस्ट हे शिखर सध्या तरी नेपाळ आणि तिबेट (चीन) च्या सामायिक मालकीचे व त्याच्या सरहद्दीवर आहे तेव्हा त्याच्या प्रदेशातील एखाद्या ठिकाणाचे नाव कोणते असावे, कोणते असू नये, हा प्रश्न त्याच्या मर्जीवर का असू नये ? एव्हरेस्ट–चोमोलुगमा–सागरमाथा– आणि कोमोलुगमा फेंग अशी सगळीच नावे वापरात आहेत पण एव्हरेस्ट' हेच नाव अधिक रुळलेले आहे जगाच्या काना-कोपऱ्यातील शाळकरी मुलानाही 'एव्हरेस्ट' म्हणजे पृथ्वीवरील सर्वोच्च शिखर हे माहिती आहे

एव्हरेस्टच्या बारशाची अशी ही लांबलचक नि गुतागुतीची कहाणी आहे

## सर जॉर्ज एव्हरेस्ट

४ जुलै १७९० रोजी ग्वेर्नव्हले या वेल्स परगण्यातील ब्रॅक्नॉकशायर भागात जॉर्ज एव्हरेस्ट याचा जन्म झाला जॉर्जचे वडील ग्रीनविच व चेल्सीया इथल्या हॉस्पिटलचे सॉलिसिटर होते

ब्रिटनमध्ये लष्करी शिक्षण पूर्ण केल्यावर १८०६ मध्ये तो नोकरीच्या निमि-त्ताने हिंदुस्थानात आला येथील लष्करात त्याने बगाल आर्टिलरीत सेकड लेफ्टनंट म्हणून नोकरीस सुरुवात केली पुढे नोकरीचाच एक भाग म्हणून इंडोनेशियातील जावा बेटाची भौगोलिक माहिती जमा करण्यासाठी त्याची रवानगी तिकडे कर-ण्यात आली या पाहणीचे (सर्व्हेइंगचे) काम सपल्यावर, १८१५ मध्ये तो हिंदु-स्थानात परतला व सेनादलाच्या बांधकाम व तत्रशाखेत (इंजिनिअरिंग) काम


करू लागला १८१७ मध्ये त्याची ट्रिगनॉमेट्रिकल सर्व्हेच्या 'चीफ असिस्टट 'पदी नेमणूक झाली १८२३ मध्ये त्यांची पदोन्नती होऊन 'सुपरिंटेंडेंट' आणि १८३० साली 'सर्व्हेअर जनरल ऑफ इडिया' या पदावर काम करू लागला ते १८४३ पर्यंत हिंदुस्थानच्या या पहिल्या सर्व्हेअर जनरलचा 'ॲन अकाउट ऑफ द मेरिडिओनल आर्क ऑफ इडिया' हा ग्रथ १८४७ साली प्रकाशित झाला पुढे तो खूपच नावाजला गेला

१८५० च्या सुमारास तो निवृत्त झाला त्यानतर सर ॲण्ड्र्यू वॉघ सर्व्हेअर जनरल झाला १८५२ मध्ये XV क्रमाकाचे नेपाळ तिबेट सरहद्दीवरील २७°५९'१६" उत्तर अक्षाश आणि ८६°५५'४०" पूर्व रेखाश या ठिकाणी असणारे शिखर सर्वोच्च असल्याचे ठरल्यानतर त्या शिखराला सर जॉर्ज एव्हरेस्ट याच्या कामगिरीबद्दल 'माउट एव्हरेस्ट' असे नाव द्यावे ही शिफारस सर ॲण्ड्र्यू वॉघ व कर्नल हेन्री थुलिअर यानी प्रस्तावित केली ही सूचना मान्य झाल्यानतर १८६५ मध्ये या शिखराला 'माऊट एव्हरेस्ट' हे नाव अधिकृतपणे देण्यात आले

१८३३ ते १८४३ अशी तब्बल दहा वर्षे जॉर्ज एव्हरेस्टचा मुक्काम मसुरी-लाच होता १८५६ मध्ये इग्लडला गेल्यावर थॉमस विगची मुलगी 'एमा' शी त्याचा विवाह झाला १८६१ मध्ये राजदरबाराकडून त्याला 'सर' हा बहुमानाचा किताब मिळाला एमा व जॉर्जला सहा अपत्ये झाली, पण दुर्दैवाने एकही जगले नाही १ डिसेबर १८६६ रोजी सर जॉर्ज एव्हरेस्टचा लडन येथे मृत्यू झाला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६३
क्र. २०२८६
२।५।८०
शाखा

# असं आहे एव्हरेस्ट


एव्हरेस्ट
८८४८ मी.
२९०२८'
दक्षिण शिखर
ल्होत्से शिखर
८५०१ मी.
२७८९०'
उत्तर कणा
दक्षिण प्रपाती
उचवटा
नैऋत्य कणा
ल्होत्से कडा
पश्चिम तणाव
अमेरीकन चढाईचा मार्ग
वेस्टर्न कूम
खुंबू हिमप्रपात
खुंबू हिमनदी

# ४ असं आहे एव्हरेस्ट

एव्हरेस्ट मोहिमेवरचे वृत्तात किंवा एव्हरेस्टवरची पुस्तक वाचायला घेतली की अनेक नवे शब्द आपल्याभोवती गिरक्या घेऊ लागतात आपण आपल्यापुरता त्या शब्दाचा कसातरी अर्थ लावून पुढे जातो पण ते काही खर नाही

१९८४ च्या भारतीय मोहिमेला खूपच वृत्तपत्रीय प्रसिद्धी मिळाली, पण मराठी वृत्तपत्रात त्यासबधी बातम्या येऊ लागल्या तेव्हा '**बर्फाचा धबधबा** ओलांडला', '**भारतीय तुकडीचा तसराळ्यात मुक्काम**', '**भारतीय तुकडीची साऊथ पोल (दक्षिण ध्रुव!) च्या दिशेने आगेकूच**' असे मथळे येऊ लागले मूळ एव्हरेस्टची कल्पना नसल्याने हे हास्यास्पद प्रकार घडले होते त्या शब्दाची आपण थोडीफार माहिती घेतली तर हा गोंधळ कमी होईल

**एव्हरेस्ट पर्वत** आणि **एव्हरेस्ट शिखर** या दोन गोष्टीत **थोडा** फरक आहे एव्हरेस्ट शिखर हा पृथ्वीवरचा समुद्रसपाटीपासूनचा **सर्वोच्च** बिंदू। हा विश्वकळस ज्या डोंगरराजीत आहे तो भाग दक्षिणेकडून एखाद्या नालासारखा वाटतो. नालाच्या एका टोकाकडे आहे, **नुप्त्से शिखर मालिका**, मध्यभागी आहे **ल्होत्से शिखर** आणि उत्तरेकडील दुसऱ्या भागात आहे, 'तिसरा ध्रुव– **एव्हरेस्ट**'। त्यापुढे डोकावतो **पश्चिम कणा** म्हणजे **वेस्ट शोल्डर** एव्हरेस्ट ल्होत्से-नुप्त्से याच्यामधील भागास म्हणतात– **वेस्टर्न कूम** Western CWM याच अर्थश भाषांतर होईल **हिमतसराळे** म्हणजे अस की त्या गगनचुंबी डोंगररागेत होत असतो हिमवर्षाव सूर्याच्या उष्णतेने काही हिमसाठा वितळतो तर काही सुटावून घसरू लागतो हा घसरणारा हिमसाठा बरेच वेळा अजस्त्र रूप घेतो त्या घसरत्या हिमढिसाळालाच **अवधान** किंवा **ॲव्हलांच** म्हणतात अनेक शिखरमोहिमा अशा ढिसाळात सापडून अपघात झाले आहेत हा ढिसाळ भुसभुशीत भुकटीसारख्या हिमाचा असल्याने तो नाकातोंडात जाऊन गुद-मरून किंवा त्या प्रचड ओझ्याखाली चेमटून आजवर अनेक गिर्यारोहक मृत्यूमुखी पडले आहेत.


या हिमाचे थरावर थर साचत गेले की त्याचे **बर्फात** रूपातर होते **हिम** म्हणजे **स्नो** आणि **बर्फ** म्हणजे **आइस** हा ढिसाळ हिमालयाच्या तीव्र उतरणीवरून खाली घसरून साचू लागतो तिथे हिमतसराळे / वेस्टर्न कूमसारखी जागा तयार

होते प्रमाणाबाहेर हे तसराळे भरले की त्यातून वर्षाला काही सेंटिमीटर वाहणारी **हिमनदी** किंवा **हिमानी** जन्मते पर्वतीय रचनामुळे अशा हिमानीला डोंगरकडेने घासत जाऊन व मधल्या भागात भेगाळून जाऊन खालच्या उताराकडे घसरणे सुलभ होते या भेगा म्हणजे मृत्यूचे पसरलेले जबडेच **हिमखाई** असेच त्याचे वर्णन होईल या **क्रीव्हास** म्हणजे हिमखाया गिर्यारोहकाना केव्हाही गिळकृत करतात त्यांचे स्वरूपही सतत बदलत असते खूप उचीवरून खालच्या उचीवर येताना एखादा कड्यासारखा भाग वाटेत आला की तेथे मनोरे, **आइसटॉवर्स** किंवा **सेरॅक्स** तयार होतात अशा ठिकाणाहून जाणे खूपच धोकादायक असते प्रत्येक हिमानी आपल्या-बरोबर खूप खरवड घेऊन येत असते ती हिमानीच्या दोन्ही अगास साचते त्याला **लॅटरल मोरेन** म्हणजे **उभय अगांची हिमोढ** म्हणतात जी हिमोढ पुढे येऊन साचते तिला नुसतेच **हिमोढ** किंवा **मोरेन** म्हणतात हिमानीतला बर्फ वितळून जेथे नदीच्या प्रवाहाचा उगम होतो त्याला **नाकाड** किंवा **स्नाऊट** म्हणतात बऱ्याच वेळा तेथे एखादी गुहा किंवा विवर असल्यासारखा बोगदेवजा भाग असतो (गगोत्रीच्या पुढे गोमुखाजवळ हा प्रकार व्यवस्थितरीत्या पाहता येतो ) एव्हरेस्ट वर्णनात बऱ्याच वेळा **बर्गश्रुंड** म्हणजे फारच **लांब-रुद हिमखाई** किंवा **हिमदरी** असल्याची नोंद पाहायला मिळते काही वेळा या दऱ्या किंवा भेगा नव्या हिमवर्षावामुळे झाकलेल्या असतात त्यामुळे अपघाताची शक्यता वाढते कधीकधी अशा हिमदऱ्यावर बर्फाचे पूल तयार झालेले आढळतात त्याना **स्नोब्रिज** म्हणतात या हिमदऱ्या उडी मारून पलीकडे जाण्याएवढ्या छोट्यापासून कैक मीटर लांबी-रुदीच्या आढळतात हिम खाईत पडलेल्या अभागी जीवाना वाचविण्यासाठी थोड्या प्रशिक्षणाची / क्रीव्हास रेस्क्यूची आवश्यकता असते

एव्हरेस्टवर जाणाऱ्या बहुसख्य मोहिमा खुबू हिमानीवर मुक्काम करतात. त्याला **बेस कॅप** किंवा **पायतळ** म्हणतात तेथून हिमतसराळ्यात जाताना **खुंबू आइसफॉल** लागतो वरून सतत येणारा हिम, बर्फ व इतर ढिसाळाच्या रेट्याने हिमतसराळ्याच्या तोडाशी शतश: विदीर्ण होऊन हिमखायानी भरलेल्या या भागाला **खुबू प्रपात** म्हणतात

एव्हरेस्ट पर्वत डावीकडे व नुप्त्से पर्वत उजवीकडे ठेवून ल्होत्से पर्वतकड्या-पर्यंत जाऊन साऊथ कोलच्या उचीपर्यंत ल्होत्से कड्यावर जायचे व मग आडवा प्रवास करीत **हिमसंपथावरून** म्हणजे **कुलियरवरून साऊथ कोल** म्हणजे **दक्षिण प्रपाती उचवट्याशी** पोहोचावयाचे तेथून **जिनीव्हा स्पर** म्हणजे एका डोंगरधारेवरून **साऊथ समीट** म्हणजे **दक्षिण शृग** किंवा **दक्षिण शिखर** गाठायचे तेथून **हिलरी स्टेप** किंवा **हिलरीची पायरी** गाठायची जेव्हा तेनसिंग व हिलरी २९ मे ५३ रोजी या ठिकाणी आले तेव्हा ते दक्षिण शिखरावरून थोडे खाली उतरून एका अरुद व चढ

असणाऱ्या कड्यावरून पुढे आले तेव्हा खडकाचा एक सुळका वाटेत आला तो प्रस्तरखड म्हणजे विजयाच्या मार्गातला एक अडथळाच होता तेथे हिलरी प्रथम वर चढला आणि त्याने खाली सोडलेल्या दोराच्या सहाय्याने तेनसिंग वर गेला तेथून दृष्टीच्या टप्प्यात एव्हरेस्ट माथा आहे पण वाटेत हिमराशीही आहेत प्रत्यक्ष शिखरावर गेले तरच तिबेटमधील **रोंगबुक हिमानी** दिसते पूर्वी तेथे पोहोचणारे गिर्यारोहक एखादा दांडा किंवा हिमकुठारीवर आपापले राष्ट्रध्वज रोवून विजयाचा आनंद साजरा करीत असत, पण आता मात्र चिनी पथकाने तेथे रोवलेले **तिकाटणे** (ट्रायपॉड) आहे त्याचा त्यासाठी उपयोग करतात साधारणतः ७६२० मी / २५००० फूट उंचीवर एक चूनखडीचा पिवळट पट्टा आढळतो त्यालाच **यलो बँड** किंवा **पीतपट्टा** म्हणतात एव्हरेस्ट पर्वतावर चढत असताना हिमतसराळचातून पलीकडे डोकावणारे **पुमोरी** ७१४५ मी / २३४४२ फूट हे शिखर आहे त्याचा उपयोग आपण किती उंची गाठली हे कळण्यासाठी होतो खुद्द एव्हरेस्टवर सातत्याने





नेपाळमधून– दक्षिणेकडून दिसणारे एव्हरेस्ट

प्रचंड वाऱ्यामुळे पडलेले हिम एका जागी ठरत नाही ते सतत तिबेटच्या बाजूकडे उधळले जाते त्यामुळे हिमाचा एक तुराच तयार होतो. त्याला **हिमतुरा** किंवा **स्नो प्लूट** म्हणतात हिमशिखरांच्या सम्राटाला साजेसा असाच तो आहे

एव्हरेस्ट शिखरापासून एक डोंगरधार पश्चिमेकडे गेली आहे तिलाच **वेस्टरिज** किंवा **पश्चिम कणा** म्हणतात पश्चिम कणा व आग्नेय कणा यामध्ये असणाऱ्या कड्यात एक नैऋत्य कड्यामध्ये घळ किंवा दरड आहे तिला **'ग्रेट सेंट्रल गली'** म्हणतात. ख्रिस बॉनिंगटनच्या मोहिमेने त्यातून वर जाऊन शिखर गाठण्यात यश मिळवले होते तर पश्चिम कण्यावरून वर जाण्यात अमेरिकन मोहिमेने यश प्राप्त केले होते

उत्तरेकडून दिसणार एव्हरेस्ट हे साफ निराळ आहे पूर्वेच्या बाजूला सरळ तुटलेला **'पूर्वकडा'** हा **'कांगशुग फेस'** म्हणून ओळखला जातो तर उत्तरेकडे असणाऱ्या डोंगरधारेला दोन टप्पे आहेत **'खालचा टप्पा'– 'पहिली पायरी'** आणि **'वरचा टप्पा– दुसरी पायरी'** म्हणून ओळखतात दक्षिण शृंगाप्रमाणेच उत्तरेकडेही एक **उत्तरशृंग** किंवा **उत्तर शिखर** आहे

तिबेटी लोकांच्या बौद्धमठाला मोनॅस्ट्री म्हणतात उत्तरेकडे रोंगबुक हिमानी-




तिबेटमधून– उत्तरेकडून दिसणारे एव्हरेस्ट

जवळ **रोंगबुक धर्ममठ** आहे रोंगबुक हिमानीचे उत्तर व पूर्व असे दोन फाटे आहेत. ते एकत्र मिळून मुख्य रोंगबुक हिमनदी तयार होते.

एव्हरेस्ट चढाईच्या वेळेला पायतळानंतर जे तळ किंवा मुक्कामाच्या जागा असतात, त्याना पायतळानंतरचा तळ १, नंतरचा तळ २ याप्रमाणे क्रमाक दिले जातात साधारणत' पाच-सहा तळ उभारले जातात

अलीकडे '**अल्पाइन स्टाइल**' हा नवा प्रकार पुढे आला आहे पूर्वीच्या





नेपाळमधून एव्हरेस्टचा आरोहण मार्ग– आग्नेय कण्यावरून

ए. ३

पद्धतीत पायतळावर मोहिमेचे सर्व सामान ठेवले जात असे मग रोज भारवाहक आणि गिर्यारोहक त्यातील पुढे लागणारे सामान थोडथोडे नेऊन पुढचे तळ उभारत असत तबू ठोकणे, अथरूण-पाघरूण किंवा निद्राथैली, स्वयपाकाचे साहित्य, इतर आवश्यक साधने याचा त्यात समावेश असे यामध्ये वेळ व पैसा खूप खर्च होतो त्याऐवजी अत्यावश्यक असे अगदी हलके सामान बरोबर घेऊन एक किंवा दोन आरोहक थेट शिखराकडेच कूच करतात त्यामुळे सारखे खाली-वर करावे लागत नाही वेळ व पैशाची बचत होते तबूचे वजनही नको असल्यास भुसभुशीत हिमात एक छोटीशी गुहा तयार करून त्यातच मुक्काम करायचा हिम किंवा बर्फ हे निसर्गत उष्णतेचे वहन करीत नाही ते 'बॅड कडक्टर ऑफ हीट' आहे म्हणून ती गुहा गार ठणक न बनता थोडीशी उबदारच असते मात्र अशा गुहा वाऱ्याची दिशा, हिमढिसाळाबाबतचा अदाज घेऊन काळजीपूर्वक खोदाव्या लागतात सध्या या अल्पाइन तत्राचा व प्राणवायूच्या नळकांड्याचा उपयोग न करता, आखलेल्या मोहिमेत वेळ, पैसा, श्रम याचा कमीत कमी वापर होतो हे तत्र अद्याप भारतीय गिर्यारोहकाच्या पुरेसे अगवळणी पडलेले नाही

## नऊ वाटांनी एव्हरेस्ट आरोहण

एव्हरेस्टवर जाण ही निश्चितपणे अभिमानाची, चिकाटीची व काही प्रमाणात नशिबाचीही गोष्ट आहे एव्हरेस्टवरील पहिल्या अनेक चढाया तिबेटमधून उत्तरेकडून झाल्या ईशान्य कण्यावरून केलेल्या या आरोहणाना अपयश पदरी पडत राहिले दुसऱ्या महायुद्धानतर इथली राजकीय परिस्थिती बदलली आणि नेपाळमधून दक्षिणेकडून एव्हरेस्ट चढाया सुरू झाल्या कर्नल जॉन हट या ब्रिटिश गिर्यारोहकाच्या नेतृत्वाखालील तुकडीमधील तेनसिंग नोर्गे (भारतीय) व एडमड हिलरी (न्यूझीलड) याना २९ मे १९५३ रोजी एव्हरेस्ट माथा गाठण्यात यश मिळाले ते आग्नेय कण्यावरून आता ही वाट चक्क मळवाट झाली आहे आजवर मानवाने १३७ वेळा या वाटेने चढून जाण्यात यश मिळवल आहे आग्नेय कण्यावरील दक्षिण स्तभावरील चढाईत प्रथम १९८० मध्ये पोलिश गिर्यारोहकांना यश मिळालं इकडून आजवर १० यशस्वी चढणी नोंदल्या गेल्या आहेत तिसरी वाट नैऋत्य कण्याची नैऋत्य स्तभाची १९८२ मध्ये रशियन गिर्यारोहकांनी या बाजूने शिखर गाठल या वाटेवर ११ जणांच्या पदरी यश पडलं. नैऋत्य कड्यावरून जाण्यात १९७५ मध्ये ब्रिटिश तुकडी यशस्वी झाली त्या बाजूने ४ जणांना शिखर गाठता आल पश्चिम कण्याच्या दक्षिण बाजूकडून डोंगरधारेवरून जाण्यात युगोस्लाव्हियन गिर्यारोहकांना १९७९ मध्ये प्रथम यश मिळालं तिकडून ५ शिखरविजेत्यांची नोंद झाली आहे पश्चिम कण्याच्या उत्तर बाजूने प्रथम चढले १९६३ मध्ये अमेरिकन गिर्यारोहक त्या हॉर्नबीन कोलवरून केवळ दोघेच शिखरावर चढल्याची नोंद आहे उत्तर कड्या-




वरून १९८० मध्ये जपान्यानी यशस्वी चढाई केली तिकडून ४ जण शिखरावर गेले ईशान्य कण्यावरून चिनी गिर्यारोहकानी १९६० मध्ये शिखर गाठण्यात यश मिळवलं त्या बाजूने आजवर १६ जणांनी शिखरावर यशस्वी आरोहण केल आहे. असा नऊ वाटांनी १९४ वेळा मानवान एव्हरेस्टचा उन्नत माथा गाठला आहे व एकदर १८० एव्हरेस्टवीराना हा एव्हरेस्ट विजयाचा मान मिळाला आहे कारण एकाने ४ वेळा, तीन जणानी प्रत्येकी ३ वेळा, आणि पाच जणांनी प्रत्येकी २ वेळा एव्हरेस्ट गाठले आहे

## एव्हरेस्ट आरोहण

शेवटी पर्वत शिखरावर जायचच कशाला ? निसर्गावर विजय मिळवण्याच्या प्रयत्नापैकी हा एक मार्ग एव्हरेस्टऐवजी दुसऱ्या शिखरावर जाणाऱ्याच एवढं कोडकौतुक, इतका बोलबाला का नाही होत ?

एव्हरेस्ट अत्युच्च आहे अनेकवेळा मानवी पदार्पण होऊनही एव्हरेस्टचे आव्हान कायम आहे एव्हरेस्ट गाठून आलेला मानव, पूर्वीचा राहत नाही तो आमूलाग्र बदलून जातो विराट निसर्गापुढे मानवाच क्षुद्रत्व त्याला सतत अस्वस्थ करीत असत तिथे गेल्यावर विजयाच्या आनंदापेक्षा परतीची काळजी अन् घरच्यांची

आठवण त्याला बेचैन करते अहलुवालियासारख्या जिद्दीच्या गिर्यारोहकाने तिथे ठेवलेल गुरू नानकाच चित्र, रावतने ठेवलेल दुर्गेच चित्र, फू दोर्जीन अर्पिलेल भगवान बुद्धाच चित्र, एडमड हिलरीन ठेवलेला पवित्र क्रूस आणि चिन्यानी तेथवर नेलेला माओ-त्से-तुगचा अर्धपुतळा, या सर्वांमधून आपल्या क्षुद्रत्वाची आणि थोर परमात्म्यापुढे नतमस्तक होण्याची प्रवृत्तीच दिसते "थुजीचे, चोमोलुग्मा थुजीचे !" हे शेर्पा तेनसिंगचे शब्दही तीच भावना व्यक्त करतात

तिथवर जाण्यासाठी केलेले अथक परिश्रम, अफाट जिद्द, अद्वितीय धाडस, सुयोग्य नियोजन याबरोबरच कोणाच्याही हाती नसलेल अज्ञात दैव वा नशीब यामुळेच विश्वकळसाच्या माथ्यावर पोहोचता येत अस असख्य शिखरविजेत्या गिर्यारोहकाच मत आहे

# एव्हरेस्टचा कालपट

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २०२८५
[illegible]



## ५ एव्हरेस्टचा कालपट

### पहिला सर्ग

| | |
|---|---|
| नोव्हें १८४९ ते जाने १८५० | जे ओ निकोल्सनचे मोजणीकाम. एच् "h" शिखराची पहाणी व त्याची पधरा XV क्रमांकाने नोंदणी |
| १८५१–५२ | पूर्व मोजणीनुसार आकडेमोड करून राधानाथ सिकदर (काहींच्या मते हेन्नेसी) यांनी XV हे शिखर सर्व ज्ञात शिखरांपेक्षा अधिक उच आहे, हे अनुमान काढले ही उची २९००२ फूट/८८३९ ९ मी भरली |
| १८६५ | सर्वोच्च शिखराला भारताचा पहिला सर्व्हेअर जनरल असणाऱ्या जॉर्ज एव्हरेस्टच्या कामगिरीप्रीत्यर्थ 'माऊट एव्हरेस्ट' असे नामकरण |
| १ डिसें १८६६ | सर जॉर्ज एव्हरेस्टचा लडन येथे मृत्यू |
| १९०५ : | लॉर्ड कर्झनची एव्हरेस्ट चढाईची सूचना पण पुढे काही प्रगती नाही. |
| १९०७ | तिबेटमधून एका अनधिकृत, अयशस्वी, शकास्पद प्रयत्नाबद्दल कुणकुण |
| १९०७ | नाथासिग या भारतीयाने खुबू हिमानीपर्यंत मजल मारली |
| १९०८ | मे ज मॅनर्स स्मिथची नेपाळ सरकारशी एव्हरेस्ट मोहिमेबाबत बोलणी पण प्रत्यक्षात अशी मोहीम मात्र निघालीच नाही |
| १९१३ | कॅप्टन जॉन नोएलची दार्जिलिगमार्गे लखू खिडीपर्यंत धडक एव्हरेस्टचे ६४ कि मी वरून दर्शन घेणारा पहिला पाश्चात्य |
| १९१४ | जनरल रौलिंगच्या पुढाकाराने एव्हरेस्ट मोहिमेच्या आखणीची सुरुवात पहिल्या महायुद्धामुळे मोहीम बारगळली |

## दुसरा सर्ग

| मोहीम क्रमाक | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्याची सख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्टचे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९२१ | × | इग्लड | कर्नल जी के हॉवर्डबरी | – | – | – | १ ली एव्हरेस्ट मोहीम ७०१०४ मी /२३००० फूट उची गाठली मे मोर्शीड व मे व्हीलरने उत्तम नकाशे बनवले प्राणवायूच्या नळकाड्यांचा उपयोग केला गेला नव्हता |
| २ | १९२२ | × | इग्लड | जनरल जी सी ब्रूस | – | – | – | गिर्यारोहणात प्रथमच प्राणवायू नळकाड्याचा वापर ८३२१ १ मी/ २७३०० फूट उची गाठली गेली |
| ३ | १९२४ | × | इग्लड | जनरल जी सी ब्रूस | – | – | – | मॅलरी व आयर्विन याचा मृत्यू त्यांनी शिखर जिकले की नाही हे अद्याप गूढच राहिले आहे ८५७२.९ मी/ २८१२६ फूट उची निश्चित गाठली गेली |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्यांची सख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्टये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १९३३ | × | इग्लड | ह्यूज रटलज | — | — | — | ८५६४ ९ मी/२८१०० फूट गाठली गेली |
| — | १९३३ | पहिली | | | हवाई | | | मोहीम |
| ५ | १९३४ | × | इग्लड | मॉरीस विल्सन | — | — | — | अत्यत रोमहर्षक चढाई एकट्याचा सहभाग |
| ६ | १९३५ | × | इग्लंड | एरिक शिप्टन | — | — | — | ७००७.४ मी/२२९९० फूट उची गाठली गेली |
| ७ | १९३६ | × | इग्लड | ह्यूज रटलज | — | — | — | ७००७ ४ मी/२२९९० फूट उची गाठली गेली |
| ८ | १९३८ | × | इग्लड | हॅरॉल्ड विल्सन | — | — | — | ८२९० ६ मी/२७२०० फूट उची गाठली गेली |
| — | १९४२ | अमेरिकन | | पायलट रॉबर्ट | स्कॉटची | | हवाई | मोहीम |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्याची संख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्टये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १९४७ | × | इग्लंड | अर्ल डेनमान | – | – | – | तिबेटमधून गेलेली शेवटची मोहीम अनधिकृत मोहीम |
| १० | १९५० | × | इग्लंड | हॅरॉल्ड डब्ल्यू टिलमन | – | – | – | नेपाळमधून दक्षिणेकडून गेलेली पहिली मोहीम |
| ११ | १९५१ | × | इग्लंड | डेन आर बी लार्सन | – | – | – | सुरुवात नेपाळमधून, अंतिम चढाई तिबेटमधून |
| १२ | १९५१ | × | इग्लंड | एरिक शिप्टन | – | – | – | पावसाळ्यानंतर लगेच जाणारी पहिली मोहीम |
| १३ | १९५२ | × | इग्लंड | एरिक शिप्टन | – | – | – | अनधिकृत मोहीम |
| १४ | १९५२ | × | स्वित्झर्लंड | ॲडॉर्ड विस ड्यूनाट | – | – | – | पहिली ब्रिटिशेतर मोहीम |
| १५ | १९५२ | × | स्वित्झर्लंड | डॉ ग्रॅब्रियल शिव्हलरी | – | – | – | –– |
| १६ | १९५३ | × | रशिया | डॉ पॉवेल डाश्चनोलिअन | – | – | – | रशियाचा पहिला प्रयत्न उत्तरेकडून गुप्ततेने काढलेली मोहीम अधिकृत-रीत्या या प्रयत्नास दुजोरा किंवा इन्कार नाही खूप मृत्यू घडले |

| मोहीम क्र. | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्याची संख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १९५३ | १ ली यशस्वी | इग्लंड | कर्नल जॉन हुट | २ | २ | २ | २९ मे १९५३ रोजी तेनसिंग नोर्गे (भारतीय) व एडमंड हिलरी (न्यूझीलंड) शिखरावर पोहोचले हे पहिले ज्ञात एव्हरेस्ट आरोहण |
| — | १९५३ | १ ली भारतीय | | हवाई | मोहीम | नेतृत्व | सितू | मलिक |
| | चौथा सर्ग : | | | | | | | |
| १८ | १९५६ | २ री यशस्वी | स्विट्झर्लंड | आल्बर्ट एगलर | ४ | ६ | ६ | १ ली ब्रिटिशेतर यशस्वी |
| १९ | १९६० | ३ री यशस्वी | चीन | शिह चेन चुन | ३ | ९ | ९ | उत्तरेकडून ईशान्य कण्यावरून पहिली यशस्वी मोहीम रात्री शिखर आरोहण माओ त्से तुगचा अर्धपुतळा वर नेला |
| २० | १९६० | × | भारत | ब्रि ग्यानसिंह | — | — | — | — |
| २१ | १९६२ | × | भारत | जॉन डायस | — | — | — | — |
| २२ | १९६२ | × | अमेरिका | वूड्रोसैरे विल्सन | — | — | — | अनधिकृत मोहीम सुरुवात दक्षिणेकडून नेपाळमधून शेवटची चढाई उत्तरेकडून तिबेटमधून |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्यांची संख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | १९६३ | ४ थी यशस्वी | अमेरिका | नॉर्मन् जी डायहर्न फर्थ | ६ | १५ | १५ | पश्चिम कण्याच्या उत्तर बाजूकडून यशस्वीरीत्या चढणारी पहिली यशस्वी मोहीम एका वाटेने वर जाऊन दुसऱ्या वाटेने खाली उतरण्याचे २ गिर्यारोहकाचे आगळे साहस |
| २४ | १९६५ | ५ वी यशस्वी | भारत | एम एस कोहली | ९ | २३ | २४ | नवाग गोंबू एव्हरेस्टवर दोनदा जाणारा पहिला मानव एकाच मोहिमेतील ९ जण शिखरावर |
| — | १९६५ | २ री भारतीय हवाई मोहीम | | | | | | |
| — | १९६८ | जपानी चित्रीकरण मोहीम | | | | | | |
| २५ | १९६९ | × | जपान | योशिरो फुजिता | — | — | — | — |
| २६ | ऑक्टो ६९ | × | जपान | | — | — | — | — |
| २७ | १९७० | ६ वी यशस्वी | जपान | हिरोमी ओहत्सुका | ४ | २७ | २८ | नाओमी उएमुरा हा पचखंडातील सर्वोच्च शिखरे जिंकणारा एकमेव मानव |
| — | १९७० | जपानी स्कीइंग मोहीम साऊथ कोलवरून युइचिरो मिऊरा याने स्कीइंग केले | | | | | | |
| २८ | १९७१ | × | आंतरराष्ट्रीय | नॉर्मन जी डायहर्न फर्थ | — | — | — | १ ल्या आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट मोहिमेचा फज्जा उडाला हर्ष बहुगुणाचा अपमृत्यू |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्यांची सख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्टचे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | नोव्हे ७१ | × | अर्जेंटीना | ले. क हेक्टर कॅटिन्हा तोलीसा | – | – | – | –– |
| ३० | १९७२ | × | इग्लड | क्रिस बॉनिंग्टन | – | – | – | नैर्ऋत्य कडयावरून चढाईत अपयश |
| ३१ | १९७२ | × | जर्मनी | डॉ. कार्ल हेर्लिकॉफर | – | – | – | –– |
| ३२ | १९७३ | ७ वी यशस्वी | इटली | काऊट गुइजे मोन्झिनो | ८ | ३५ | ३६ | –– |
| ३३ | ऑक्टो ७३ | ८ वी यशस्वी | जपान | मिचिओ युआसा | २ | ३७ | ३८ | पावसाळयानतर लगेच एव्हरेस्ट गाठणारी पहिली तुकडी |
| ३४ | १९७४ | × | स्पेन | जुआन इक्नासिओ लॉरेन्टे झुगाझा | – | – | – | –– |
| ३५ | १९७४ | × | फ्रान्स | जेरार्ड डेहोऑकॉक्स | – | – | – | –– |
| ३६ | १९७५ | ९ वी यशस्वी | जपान | श्रीमती आयको हिसाने | २ | ३९ | ४० | जुको ताबेई ही पहिली जपानी महिला एव्हरेस्टवर पोहोचली |
| ३७ | १९७५ | १० वी यशस्वी | चीन | शिह–चेन–चुन | ९ | ४८ | ४९ | एकाच वेळी ९ जण एव्हरेस्टवर, प्रचड शास्त्रीय पाहणीची जोड फांत हॉग ही तिबेटी महिला एव्हरेस्टवर |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्यांची सख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्टचे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | ऑक्टो ७५ | ११ वी यशस्वी | इग्लड | क्रिस बॉनिग्टन | ४ | ५२ | ५३ | नैऋत्य कण्यावरून पहिली यशस्वी चढाई |
| ३९ | १९७६ | १२ वी यशस्वी | इग्लड-नेपाळ सयुक्त | ले कर्नल टोनी स्ट्रीथर | २ | ५४ | ५५ | — |
| ४० | ऑक्टो ७६ | १३ वी यशस्वी | अमेरिका | फिल ट्रिबल | २ | ५६ | ५७ | अमेरिकन स्वातत्र्याची द्विशताब्दी साजरी |
| ४१ | १९७६ | × | न्यूझीलड | कीथ वुडफोर्ड | — | — | — | — |
| ४२ | सप्टे ७७ | १४ वी यशस्वी | दक्षिण कोरिया | याग–दो–किम | २ | ५८ | ५९ | अवघ्या ३७ दिवसांत पूर्ण होणारी झटपट एव्हरेस्ट मोहीम |
| ४३ | १९७८ | १५ वी यशस्वी | ऑस्ट्रिया | वुल्फगँग नैर्झ | ९ | ६७ | ६८ | प्राणवायूच्या नळकांडयाचा अजिबात उपयोग न करता रेनहोल्ड मेसनर व पीटर हेब्लरची यशस्वी एव्हरेस्ट चढाई अशा तऱ्हेचा हा पहिलाच यशस्वी प्रयत्न |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्यांची संख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४४ | ऑक्टो ७८ | १६ वी यशस्वी | फ्रँको–जर्मन | डॉ कार्ल हेर्लिकॉफर व पीयरे माझौद | १६ | ८३ | ८४ | एकाच मोहिमेतील १६ जण शिखरावर पोहोचण्याचा विक्रम वाडा रूटकीविक्स या पोलिश महिलेचे शिखरावर पदार्पण |
| ४५ | १९७९ | १७ वी यशस्वी | युगोस्लाव्हिया | टोन स्कार्जा | ५ | ८७ | ८९ | पश्चिम कण्याच्या दक्षिण बाजूकडून शिखरावर जाणारी पहिली यशस्वी मोहीम. |
| ४६ | ऑक्टो ७९ | १८ वी यशस्वी | प जर्मनी | डॉ गेऱ्हार्ड स्माटझ् | १३ | ९९ | १०२ | डॉ. गेऱ्हार्ड स्माटझ् व त्याची पत्नी हॅनलोर स्माटझ् याचे शिखरावर पदार्पण. एव्हरेस्ट आरोहण करणारे पहिले जोडपे |
| ४७ | ऑक्टो ७९ | × | इग्लंड | डग स्कॉट | – | – | – | — |
| ४८ | फेब्रु ८० | १९ वी यशस्वी | पोलंड | ॲण्ड्रेज झावाडा | २ | १०१ | १०४ | कडाक्याच्या थंडीत, भलत्याच वेळी यशस्वी एव्हरेस्ट आरोहण |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्याची संख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४९ | १९८० | २० वी यशस्वी | जपान | इसाबुरो निशिबोरी | ३ | १०३ | १०७ | चिनी तुकडीशिवाय उत्तरेकडून यशस्वी आरोहण करणारी पहिली तुकडी |
| ५० | १९८० | २१ वी यशस्वी | स्पेन | जुआन इग्नाझिओ | २ | १०५ | १०९ | — |
| ५१ | १९८० | × | जपान | नाओमी उएमुरा | – | – | – | — |
| ५२ | १९८० | २२ वी यशस्वी | पोलंड | ॲण्ड्रेज झावाडा | २ | १०७ | १११ | आग्नेय कण्यावरील दक्षिण स्तंभावरून पहिली यशस्वी चढाई |
| ५३ | ऑगस्ट ८० | २३ वी यशस्वी | इटली | रेनहोल्ड मेसनर | १ | १०७ | ११२ | एकट्याने उत्तरेकडून—जादा प्राणवायूशिवाय कमीत कमी दिवसांत एव्हरेस्टवरील यशस्वी आरोहण |
| ५४ | ऑक्टो ८० | × | नेपाळ-इटली संयुक्त | फ्रान्सेस्को सॅन्टन | – | – | – | — |
| ५५ | जाने ८१ | × | इंग्लंड | ॲलन रौझ | – | – | – | — |
| ५६ | जाने ८१ | × | जपान | शिनीची नाकाजीमा | – | – | – | — |
| ५७ | ऑक्टो ८१ | २४ वी यशस्वी | अमेरिका | रिचर्ड ब्लूम | ५ | १११ | ११७ | — |
| ५८ | ऑक्टो ८१ | × | न्यूझीलंड | रसेल ब्राइस | – | – | – | — |
| ५९ | १९८२ | २५ वी यशस्वी | रशिया | व्हॅटॅन्टाइन इव्हनॉव्ह (टॅम ?) | ११ | १२२ | १२८ | नैऋत्य कण्यावरील नैऋत्य स्तंभावरून पहिली यशस्वी चढाई |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्याची संख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्टचे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६० | १९८२ | × | इंग्लंड | क्रिस बॉनिंग्टन | – | – | – | — |
| ६१ | १९८२ | × | अमेरिका | जेम्स व्हिटॅकर | – | – | – | — |
| ६२ | ऑक्टो ८२ | २६ वी यशस्वी | कॅनडा | विल्यम जे मार्चे | ६ | १२७ | १३४ | एव्हरेस्ट मोहिमेचे दूरदर्शनवरून थेट प्रक्षेपण ३ वेळा एव्हरेस्ट जिंकणारा शेर्पा सुदारे हा पहिला मानव ठरला |
| ६३ | ऑक्टो ८२ | × | स्पेन | लुईस बेल्व्हिस | – | – | – | — |
| ६४ | डिसें ८२ | २७ वी यशस्वी | जपान | यासुओ काटो | १ | १२७ | १३५ | ३ वेळा एव्हरेस्ट जिंकणारा यासुओ काटो हा २ रा गिर्यारोहक |
| ६५ | डिसे ८२ जाने ८३ | × | फ्रान्स | मायकेल मेत्झगर | – | – | – | एव्हरेस्ट पर्वतावरून घसरलेला व हरवलेला गिर्यारोहक आश्चर्यजनक-रीत्या बचावला व सुखरूप परतला |
| ६६ | १९८३ | २८ वी यशस्वी | अमेरिका | डॉ जेम्स मॉरिसी | ८ | १३५ | १४३ | — |
| ६७ | ऑक्टो ८३ | २९ वी यशस्वी | जर्मन | जेरार्ड लेन्सर | ६ | १४१ | १४९ | — |
| ६८ | ऑक्टो ८३ | ३० वी यशस्वी | जपान | हारूइचि कावामुरा | २ | १४३ | १५१ | — |
| ६९ | ऑक्टो ८३ | ३१ वी यशस्वी | जपान | हारूयुकी एंडो | ३ | १४६ | १५४ | — |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्याची संख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्टचे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७० | ऑक्टो ८३ | × | अमेरिका | डॉ जेम्स मॉरिसी | – | – | – | — |
| ७१ | डिसें ८३ | × | जपान | ताकाबाशी | – | – | – | — |
| ७२ | डिसें ८३ | ३२ वी यशस्वी | जपान | ? | ४ | १५० | १५८ | — |
| ७३ | १९८४ | ३३ वी यशस्वी | बल्गेरिया | ? | ५ | १५५ | १६३ | — |
| ७४ | १९८४ | ३४ वी यशस्वी | भारत | कर्नल डी के खुल्लर | ५ | १५९ | १६८ | बचेंद्रीपाल या भारतीय महिलेचा एव्हरेस्टवर पदन्यास ५ वी महिला एव्हरेस्ट विजेती |
| ७५ | ऑक्टो ८४ | ३५ वी यशस्वी | ऑस्ट्रेलिया | ? | २ | १६७ | १७० | — |
| ७६ | ऑक्टो ८४ | ३६ वी यशस्वी | झेकोस्लोव्हाकिया | फँटीसुक केले | ३ | १७० | १७३ | — |
| ७७ | ऑक्टो ८४ | × | न्यूझीलड | पीटर हिलरी | – | – | – | — |
| ७८ | ऑक्टो ८४ | × | नेपाळ-अमेरिका स्वच्छता मोहीम | योगेंद्र थापा (नेपाळ) रिचर्ड बास (अमेरिका) | – | – | – | — |
| ७९ | ऑक्टो ८४ | ३७ वी यशस्वी | नेदर्लंड (डच) | हॅन टीमर्स | १ | १७१ | १७४ | बार्ट व्हासच्या यशस्वी शिखर आरोहणाबाबत शका |
| ८० | ऑक्टो ८४ | ३८ वी यशस्वी | अमेरिका | लुईस व्हिटॅकर | १ | १७२ | १७५ | उत्तरेकडून पण ईशान्य कण्याने आरोहण |

| मोहीम क्र | केव्हा गेली | यशस्वी/ अयशस्वी | राष्ट्र | नेता | तुकडीतील शिखर विजेत्यांची सख्या | एकूण शिखर विजेते | एकूण मानवी पदन्यास | मोहिमेची वैशिष्टये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८१ | जाने ८५ | × | फ्रान्स | एरिक डोसीन | – | – | – | — |
| ८२ | एप्रिल ८५ | ३९ वी यशस्वी | नॉर्वे | आर्ने नीस | १७ | १८५ | १९२ | पेरतेंबाचे तिसरे आरोहण. आंग रिटाचे तिसरे आरोहण शेर्पा सुदारेचे चौथे आरोहण आग फूर्बाचे दुसरे आरोहण. |
| ८३ | ऑक्टो ८५ | × | भारत | लेफ्टनट कर्नल प्रेमचद | – | – | – | — |
| ८४ | ? | × | जपान | ? | – | – | – | — |
| ८५ | ? | ४० वी यशस्वी | कॅनडा | ? | २ | १८७ | १९४ | शॅरन वुड (२८) व वेन कॉंगडन (२९) या महिलाचे यशस्वी आरोहण |

## यशापयश

| देश | एकूण मोहीमा | अयशस्वी | यशस्वी |
|---|---|---|---|
| इंग्लड | १९ | १७ | २ |
| जपान | १४ | ६ | ८ |
| अमेरिका | ८ | ३ | ५ |
| हिंदुस्थान | ५ | ३ | २ |
| जर्मनी | ३ | १ | २ |
| स्पेन | ३ | २ | १ |
| स्वित्झर्लंड | ३ | २ | १ |
| न्यूझीलंड | ३ | ३ | — |
| फ्रान्स | ३ | ३ | — |
| पोलंड | २ | — | २ |
| चीन | २ | — | २ |
| इटली | २ | — | २ |
| रशिया | २ | १ | १ |
| कॅनडा | २ | — | २ |
| कोरिया | १ | — | १ |
| ऑस्ट्रिया | १ | — | १ |
| ऑस्ट्रेलिया | १ | — | १ |
| बल्गेरिया | १ | — | १ |
| युगोस्लाव्हिया | १ | — | १ |
| झेकोस्लोव्हाकिया | १ | — | १ |
| नॉर्वे | १ | — | १ |
| नेदर्लंड (डच) | १ | — | १ |
| इंग्लंड-नेपाळ | १ | — | १ |
| फ्रँको-जर्मन | १ | — | १ |
| अर्जेन्टिना | १ | १ | — |
| आंतरराष्ट्रीय | १ | १ | — |
| नेपाळ-इटली | १ | १ | — |
| नेपाळ-अमेरिका | १ | १ | — |
| एकूण | ८५ | ४५ | ४० |

# आव्हान तिसऱ्या ध्रुवाचे



# ६ आव्हान तिसऱ्या ध्रुवाचे

## १९०५

भारताचा व्हाइसरॉय असणाऱ्या लॉर्ड कर्झनने रॉयल जिओग्राफिकल सोसा-यटी आणि अल्पाइन क्लब याना XV म्हणजे १५ व्या शिखरावर एखादी मोहीम आखता येण्याच्या शक्यतेबाबत काही सूचना केल्याचे आढळते या अशा प्रयत्नाला तिबेट व नेपाळच्या सत्ताधीशाकडून कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने असा एखादा प्रस्ताव त्या वेळी मांडला गेलाच नाही

## नाथासिंग एव्हरेस्टच्या अंगणात

१९०७ साली नाथासिंग या हिंदी सर्व्हेअरने कोणाही युरोपिअन माणसाच्या सोबतीविना थेट सोलोखुंबूत धडक मारली दूध कोसीच्या उगमप्रदेशात जाणे व त्या परिसराची माहिती घेणे हा त्याचा मुख्य उद्देश होता त्याच्या निरीक्षणात व रेखा-टनात एव्हरेस्ट परिसराचा दक्षिण भागही चित्रित केलेला आढळतो दुर्दैवाने नाथा-सिंगबद्दल वैयक्तिक माहिती आणि त्याच्या एव्हरेस्ट परिसरातील भ्रमणाबाबत फारशी माहिती मात्र उपलब्ध होऊ शकत नाही

एव्हरेस्टवरील काही लिखाणात १९०७ या वर्षीच तिबेटी प्रदेशातून एव्हरे-स्टवर जाण्याचा एखादा अनधिकृत अयशस्वी शंकास्पद प्रयत्न झाला असावा अशी नोंद मिळते परंतु त्याबाबत जास्त काहीही माहिती मिळू शकत नाही अशी मोहीम कोणी, केव्हा, कशी काढली याबाबत सध्या खात्रीशीरपणे सांगता येत नाही.

## १९०८

मेजर जनरल मॅनर्स स्मिथ हा नेपाळमध्ये ब्रिटिश रेसिडेंट म्हणून काम करीत होता त्याने नेपाळच्या पंतप्रधानांशी १९०९ मध्ये एखादी नेपाळ-ब्रिटन यांची संयुक्त मोहीम एव्हरेस्ट शिखरावर पाठविण्यासंबंधी बोलणी केली परंतु अशी मोहीम प्रत्यक्षात मात्र होऊ शकली नाही एवढेच खरे

## कॅप्टन जॉन नोएलची धडक


भारतीय सैन्यात कॅप्टनच्या हुद्द्यावर काम करणाऱ्या जॉन नोएल याने १९१३ मध्ये एक धाडसी सकल्प सोडला एव्हरेस्टवर आरोहण करण्याचे त्याच्या मनात नक्की होते की नाही कोण जाणे पण त्या परिसराची पाहणी आणि मुख्यत' प्रकाशचित्रणाची कल्पना त्याच्या डोक्यात नक्की असावी त्या काळात उपलब्ध असलेली फोटोग्राफीची अद्ययावत सामुग्री घेऊन दार्जिलिंग मार्गे त्याने एव्हरेस्टच्य दिशेने मुमड़ी मारली कॅप्टन जे एल बी. नोएलने ल्होनाक या गावाजवळ सरहद्द ओलांडून तिबेटमध्ये प्रवेश केला आणि वाटेत चोर्टेन निड्मला ५८१८ ७ मी/१९०९० फूट उचीची खिड पार केली तेथून ताशिराक मार्गे ती लंगबूला येथे पोहोचला तिबेटी रक्षकांच्या ध्यानात ही घुसखोरी आल्यावर त्यानी त्या घुसखोराला लगबू खिडीपासूनच परत फिरवले तेथून त्याने अवघ्या ६४ किमी/४० मैल अतरावरून एव्हरेस्ट शिखर पाहिले धुक्याच्या समुद्रातून वर डोकावणारी शिखर तर अनेक होतीच पण एक उचच उच शिखर आपला हिमतुरा फडफडवीत खूपच उच दिसत होत इतक्या जवळून एव्हरेस्ट पाहणारा हा पहिलावहिला पाश्चात्त्य होता एव्हरेस्टच्या आणखी जवळ जाण्याचा त्याचा प्रयत्न मात्र दक्ष तिबेटी पहारेकऱ्यांमुळे सफल होऊ शकला नाही पुढे १९२२ च्या मोहिमेत त्याने भाग घेतला १९२४ च्या मोहिमेत तर त्याने नॉर्थ कोल ६९८० मी / २२९०० फूट एवढी उचीही गाठली

## १९१४

१९१४ साली जनरल रौलिग याने एव्हरेस्ट मोहिमेची आखणी करण्यास सुरुवात केली. पण पहिल्या जागतिक महायुद्धामुळे ही मोहीम बारगळली

# शोध शिखराच्या वाटेचा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.



# शोध शिखराच्या वाटेचा

शे-दीडशे वर्षांपूर्वी प्रमुख तीर्थक्षेत्रांशिवाय हिमालयातील गावे, जमाती, शिखरे, नद्या, सुंदर ठिकाणे, खिंडी, हिमनद्या याबद्दल फारशी माहिती बाहेरच्या जगाला नव्हती तिबेट आणि नेपाळ या देशांच्या सत्ताधीशांचाही बाहेरच्या लोकांना इकडे येऊ देण्याविरुद्धच कल होता यात भरीसभर म्हणून दळणवळणाच्या साधनांचाही अभाव होताच.

हिंदुस्थान सरकारच्या 'सर्व्हे ऑफ इंडिया' या खात्याने १८०० च्या सुमारास जमीन मोजणी–पहाणी–नोंदणी–आखणी या कामास सुरुवात करून या प्रदेशाचे शास्त्रीय नकाशे करण्याच्या कामाला सुरुवात केली सखल प्रदेशातील काम संपल्यावर हिमालयाच्या डोंगराळ भागाकडे त्याचे लक्ष गेले मात्र ह्या नव्या उपक्रमात मोजणीदारांना अतिशय कष्टप्रद प्रवास करावा लागत असे वाटेत येणारे डोंगर, लहान-मोठ्या टेकड्या, नद्या या सान्या अडीअडचणीतून मार्ग काढत, त्यासाठी लागणारी निशाणे, मोजणीयंत्रे इ घेऊन ही मोजणी होऊ लागली १८५२ पर्यंत या भागापैकी बराचसा भाग नकाशांकित झाला मात्र त्यातील शिखरांची उंची, दरीची खोली इ ठरविण्यासाठी किचकट आकडेमोड करण्याची आवश्यकता होती XV क्रमांकाने दर्शविलेले शिखर सर्वोच्च असल्याचा शोध लागला आणि भारताचे पहिले सर्व्हेअर जनरल असणाऱ्या जॉर्ज एव्हरेस्ट याचे नाव या पधराव्या शिखराला देण्यात आले

एव्हरेस्टचा शोध लागला त्याच बारस साल आणि या सर्वोच्च शिखरावर पाय ठेवण्याची स्वप्ने अनेकाना पडू लागली ही कल्पना नक्की कोणाच्या डोक्यात पहिल्यांदा आली कुणास ठाउक !

पण स्लागिनबरोब एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी कामेट शिखरावर ६७०५.६ मी. / २२००० फूट उंची गाठण, बुलॉक वर्कमनने काराकोरम भागात ७०१०.४ मी / २३००० फूट उंचीवर पोहोचण, नगापर्वतावरील ममरीची चढाई

व त्याच बेपत्ता होण हे गिर्यारोहणाची भारतात पहाट फुटण्यावेळेच नाटय १९१३ मध्ये कॅप्टन नोएलचा एव्हरेस्ट परिसरातील सचार आणि लगबू खिडीपर्यंत पोहोचण तेथून ६०–६५ किमी वरून (४० मैलावरून) एव्हरेस्टच दर्शन होण हेही याच कोटीतल यानतरच एव्हरेस्टचा माथा गाठण्याची कल्पना नोएल साहेबाच्या डोक्यात घोळू लागली डॉ नोएल हा रॉयल जिओग्राफिकल सोसायटीचे अध्यक्ष होता डॉ केलास या प्रसिद्ध गिर्यारोहकाची साथ त्याला मिळाली परतु महायुद्धामुळे हा सारा बेतच विस्कळीत झाला १९२१ च्या मोहिमेत डॉ केलास याचा मृत्यूही ओढवला पुढे सर फ्रान्सिस यगहजबड हा रॉयल जिओग्राफिकल सोसायटीचे अध्यक्ष झाला यगहजबड आणि जनरल ब्रूस यांना हिमालयीन साहसांची प्रचड इच्छा होती १९०४ मधील ब्रिटिशाच्या ल्हासा (तिबेटची राजधानी) येथे गेलेल्या शिष्टमडळातही यगहजबड होता ' एव्हरेस्ट द चॅलेंज–' हे त्याचे पुस्तक आणि ' मौंट एव्हरेस्ट कमिटी ' ही त्याची कृतिस्मारकेच ठरली आहे

एव्हरेस्ट काय किंवा कोणचही अन्य शिखर काय, ते लाबून जितक स्पष्ट, खुलासेवार आणि नीट दिसत, तितक ते जवळून दिसत नाही वर जाण्याच्या मार्गाची ढोबळ कल्पना लाबून जरी नीट असली तरी प्रत्यक्ष मार्गातील अडीअडचणी तिथवर गेल्याशिवाय कळत नाहीत आरोहण करताना शिखर दिसत नसतं, पण कडे दऱ्या-उचवटे– प्रस्तरखड इ अडचणीतून दिशेच्या अनुरोधाने अदाजानुसार जावे लागते वाटेत एखादी दरी-हिमभेग– अवघड कडा– हिमअवधावाचा भाग आला तर ठरवलेला मार्ग सोडून देऊन नवी वाट चोखाळावी लागते एव्हरेस्ट बाबतही हीच गोष्ट घडली खुद्द एव्हरेस्ट मोहिमेच्या पायतळावरून एव्हरेस्ट शिखर दिसत नाही परतु एव्हरेस्टच्या दक्षिणेकडील गोरखशेप– काला पठार १८४७१ फूट / ५६३० मी उचीच्या शिखरावरून एव्हरेस्टचे अती उत्तम दर्शन घडते उत्तरेकडील रोंगबुक मठाजवळून एव्हरेस्ट शिखर दिसते. त्यापुढे गेल की मात्र ते दिसत नाही

एव्हरेस्ट कथेतील पहिला टप्पा इथे सपला एव्हरेस्टची ही शोधकथा पण त्यातून पुढच महाभारत घडल, ते तिथवर पोहोचून मानवी जिद्दीची झेप किती अफाट आहे, हे दाखविण्याची मालिका असलेला दुसरा टप्पा ही तर एक शौर्यगाथाच ठरली

तसं पाहिलं तर एव्हरेस्ट शिखरावर जावं ही कल्पना कोण्या एकाच्या डोक्यात आली व मग तिचा पाठपुरावा केला गेला असं दिसत नाही. ममरीची ८११२ ८ मी. २६६२० फूट उंचीच्या नंगा पर्वत शिखरावरील चढाई, त्रिशूल शिखरावरील लाँगस्टाफची मोहीम, ड्यूक ऑफ ॲब्रुझीची केटू शिखर मोहीम, फ्रेशफिल्डची कांचनगंगा निरीक्षण मोहीम या व अशा उंच उंच शिखर मोहिमा-मधून त्या काळी बऱ्याच जणांना असं वाटू लागलं होतं की, ७६२० मी./२५,००० फूट उंचीच्या पलीकडील विरळ वातावरणात मानवाला तग धरून राहणं अशक्य कोटीतील गोष्ट आहे. यदाकदाचित मानव अशा उंचीवर पोहोचलाच तर तो आपले दैनंदिन व्यवहार त्या विरळ वातावरणात करूच शकणार नाही, असेही मानले जात असे.

पण एके दिवशी कॅप्टन जे. बी. नोएलचे रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीपुढे भाषण होते. एव्हरेस्टचा परिसर आहे तरी कसा हे किमान माहिती व्हावं म्हणून त्या बाजूला एखादा अभ्यास दौरा आखायची कल्पना त्यानं बोलून दाखवली. शिवाय अशा पहाणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबतही त्यानं आपली व्यथा बोलून दाखवली. हे प्रतिपादन इतकं मर्मस्पर्शी होतं की, अल्पाइन क्लबचे अध्यक्ष कॅप्टन पर्सी फारार याने, 'पायथाच कशाला माथाच गाठा' असं सांगितलं. अशा मोहिमेच्या केवळ पैशातील वाटाच नव्हे तर काही उत्तमोत्तम गिर्यारोहक भिडूबाबतही प्रयत्न करण्याचं त्याने आश्वासन दिलं.

सर फ्रान्सिस यंगहजबंड याने देखील एव्हरेस्ट शिखर मोहिमेबद्दल अनुकूल मत मांडलं. पुढे रॉयल जिओग्राफिक सोसायटीचे अध्यक्षपदच यंगहजबंड याच्या गळ्यात पडले आणि एव्हरेस्ट मोहिमेची चक्रे वेगात फिरू लागली. याच काळात आर. जी. इर्विंगसारख्या नामवंत गिर्यारोहकाने मात्र गिर्यारोहण मोहिमा वैयक्तिक पातळीवर असाव्यात, सर्वांनी त्यात लक्ष घालू नये असे मत मांडले. ड्यूक ऑफ ॲब्रुझीची काराकोरम मोहीम, ममरीची नंगापर्वत मोहीम याचे दाखले त्याने त्यासाठी दिले.

पण तरीही पुढे 'एव्हरेस्ट कमिटी'ची स्थापना झाली आणि एक एव्हरेस्ट आरोहण मोहीम प्रत्यक्षात येण्याची चिन्हे दिसू लागली. कर्नल हॉवर्डबरी आणि सर चार्लस बेल यांची खटपट-धडपड सुरू झाली.

तिबेटच्या शासनकर्त्या धर्मशहांची अनुमती मिळाली, पैसेही जमले आणि जी. के. हॉवर्डबरीच्या नेतृत्वाखाली हा पहाणीदौरा निघाला. एव्हरेस्ट शिखर परिसराची पहाणी आणि पुढील एव्हरेस्ट चढायासाठी सुयोग्य मार्गाची निश्चिती ही प्रमुख

ध्येये या मोहिमेपुढे होती एव्हरेस्ट शिखराची उंची २९,००२ फूट./८८३९ ९ मी आहे (त्यावेळी हीच उंची मानली जात होती) आणि ते जगातील सर्वोच्च शिखर आहे, एवढीच माहिती उपलब्ध होती त्याच्या आसपास फारसे कोणी फिरकलेच नव्हते परंतु मॅलरीसारखे खंदे गिर्यारोहक असलेल्या या तुकडीला यश मिळण्याची खूप शक्यता होती कारण कोणीच कशाची खात्री देऊ शकत नव्हता तुकडीच्या मते यश त्याच्या आवाक्यातील होते

एव्हरेस्टच्या परिसरातील ६० कि मी च्या टापूत (४० मैल) कोणीही पाश्चात्त्य गिर्यारोहक पोहोचला नव्हता शिखराच्या पायथ्याशी गेल की शिखरमाथा दिसेनासा होतो जवळचे कडे मधे आल्याने फार वरचा भागही दिसत नाही त्यामुळे दिशाभूलही होऊ शकते वाटेतील सोपे-अवघड-कठीण टप्पे न्याहाळून वर वर आणि उंच उंच जावे लागते

एव्हरेस्टच्या उत्तरेकडील रोंगबुक धर्ममठाशी या मोहिमेने तळ ठोकला मॅलरी या ख्यातनाम गिर्यारोहकाने हळूहळू हिमनदीच्या उगमापर्यंत मजल मारली व त्या हिमानीला त्याने रोंगबुक हिमानी असे नाव दिले या भागातील बर्फमनोरे, हिमखाया, आगळे वातावरण याचाही परिणाम गिर्यारोहकावर होत होताच रोंगबुक हिमानीचा आरंभ ज्या वायव्य कण्याशी होतो तेथवर मॅलरी व त्याचे सहाय्यक पोहोचले तेथे असलेला कडा उल्लंघिणे त्यांना त्यांच्या मर्यादेबाहेरचे वाटल्याने त्यांनी ईशान्यकण्याची पहाणी केली तो भाग नेपाळच्या हद्दीत असल्याने त्या मार्गाचा विचार त्यांना करता येणार नव्हता म्हणून जवळच्या पश्चिमेकडील एका शिखरावर चढून त्यानी निरीक्षण केले तेव्हा शिखरमाथ्याजवळील उत्तर शिखर आणि ईशान्य कणा जोडणारी एक अखंड डोंगरधारा त्याना दिसली या डोंगरधारेवरील टेकाडाला त्यांनी नॉर्थकोल म्हणजे उत्तर प्रपाती उचवटा असे नाव दिले. या सर्व पहाणीपायी तब्बल सव्वा महिना त्यांना लागला सतत खूप उंचीवर व बर्फाळ प्रदेशात राहून होणारा त्रास टाळण्यासाठी ही मंडळी रोंगबुकला येऊन खालच्या खर्ता खोऱ्यात गेली काही दिवस तेथे जाऊन राहिल्यावर हा थोडा हवापालट त्याना सोयीस्कर वाटला पुन्हा दीड महिना त्यांनी नव्या मार्गाची पाहणी केली दरम्यान मोर्सहेड आणि व्हिलर या मोजणीदारानी या प्रदेशाचे उत्तम नकाशे तयार केले विशेषत पूर्व रोंगबुक हिमानी ते नॉर्थकोल हा भाग फारच चांगल्या तऱ्हेने नकाशांकित झाला सुरवातीला पूर्वेकडे वहात जाणारा हा हिमानीप्रवाह एकदम पश्चिमेकडे वळून मग मुख्य रोंगबुक हिमप्रवाहाला मिळतो या हिमानीच्या टोकाशी एक अजस्र बर्फभिंत आहे या कड्यामध्ये बारीकसारीक खड्डे, उचवटे, सपाटद्या व भेगा आहेत मॅलरी, बुलक व व्हीलर यानी बर्फकड्याच्या पायथ्याशी मुक्काम ठोकला बऱ्याच परिश्रमानंतर ते त्या भिंतीच्या माथ्याशी पोहोचले नॉर्थकोल तर गाठला

आता पुढचा भागही पाहू असे त्याच्या मनात आले नसते तरच नवल पण तिकडच्या वाटचालीत त्याना वादळाने अडवले व त्यामुळे त्याना परतीचा मार्ग चोखाळावा लागला.

अशा तऱ्हेने एव्हरेस्टवर गेलेली ही पहिली वहिली मोहीम एव्हरेस्ट माथा न गाठताच परत आली अर्थात केवळ एव्हरेस्ट माथा गाठलाच पाहिजे असं मात्र या मोहिमेच उद्दीष्ट नव्हत १९२१ मध्ये मानव आणि एव्हरेस्टच्या झटापटीला प्रारभ झाला अर्थात ७०१० मी /२३००० फूट ही उची प्राणवायूच्या नळकांड्या-शिवाय गाठली गेली होती या मोहिमेत डॉ केलासचा मृत्यू ओढवला व एव्हरेस्टने आपला पहिला बळी नोंदवला

या पहिल्या तुकडीत एच् रीबर्न, डॉ ए एम् केलास, जी एल् मॅलरी, जी एच् बुलक, डॉ ए एफ् आर वोल्लास्टन, हे गिर्यारोहक होते शिवाय मेजर एच् टी, मोर्सहेड, मेजर इ ओ व्हीलर, सर्व्हेअर लालबीर सिग, सर्व्हेअर गुज्जरसिग, सर्व्हेअर तोराबाझ खान, प्रकाशचित्रणकार अब्दुल जलील आणि भूशास्त्रज्ञ डॉ ए एम् हेरन याचा समावेश होता

## दुसरा हल्ला

१९२२ मध्ये लगेचच जनरल जी सी ब्रूसच्या नेतृत्वाखाली एव्हरेस्ट स्वारीचा बेत पुन आखण्यात आला ब्रूसचे वय लक्षात घेता त्याने स्वत चढाईत भाग घेण जरी शक्य नसल तरी त्याच्या प्रदीर्घ अनुभवाचा प्रचड फायदा या मोहिमेला मिळाला मॅलरी, नॉर्टन, सॉमरवेल आणि जॉर्ज फिंच या धडाडीच्या गिर्यारोहकांचा या तुकडीत समावेश होताच डॉ सॉमरव्हेल हा उत्कृष्ट शल्य-विशारद तर होताच पण सगीत व चित्रकला हे गुणही त्याच्या अगी होते ही मोहीम सपल्यावर हिंदुस्थान पाहाताना दक्षिणेकडील राज्यातील दारिद्र्य व रोगराई यामुळे पीडलेल्या लोकातच कार्य करण्याचं त्याने ठरवल व पुढील आयुष्य अमेरिकन मिशनमध्ये सहभागी होऊन त्याने भारतातच व्यतीत केले आल्पस् पर्वतराजीतील गिर्यारोहणाचा उदड अनुभव पाठीशी असलेला जॉर्ज फिंच मूळचा रसायनशास्त्राचा प्राध्यापक होता १९१३ साली चोरून एव्हरेस्ट परिसरात शिरणारा नोएल स्वत च्या डोळ्यानी अवघ्या ६० कि मी वरून एव्हरेस्ट पाहाणारा एक धडपड्या गिर्यारोहक होता या मोहिमेत चढाईशिवाय प्रकाशचित्रणाची जबाबदारीही त्याच्याकडेच होती त्याने घेतलेली प्रकाशचित्रे (फोटो) व चलत्‌चित्रण अव्वल दर्जाचे ठरले. (छायाचित्रण हा शब्द अचूक नाही म्हणून फोटोला प्रकाशचित्र व फोटो-ग्राफीला प्रकाशचित्रण शब्द वापरले आहेत )

याच काळात एक अभिनव कल्पना पुढे आली सुयोग्य ऋतू गाठून थडी-वारा-वादळ टाळता येते जस, प्रत्यक्ष थडीचा त्रास ऊन कपडे वापरून कमी करता येतो

तसच विरळ हवेला व अनुषगाने येणाऱ्या प्राणवायूच्या तुटवड्याला तोड देण्यासाठी प्राणवायू नळकांड्यात भरून न्यावा व तेथे तो वापरावा म्हणजे यश मिळण्याची शक्यता वाढेल त्यासाठी १२ ते १५ किलो (३० पौंड अदमासे) वजनाच्या नळकांड्याची मदत घेण्यात आली काही जणानी तरी हे उपकरण अती उचीवर वापरून पाहावे अस ठरवलं पण एवढ वजन तिथवर नेण्यातच गिर्यारोहकांची बरीच शक्ती खर्ची पडेल अस काहीजणाच मत होत हळूहळू चढाई केली तर विरळ हवेला तोंड देणे शक्य होईल व प्राणवायूच्या नळकाड्याच लोढण टाळता येईल असा दुसराही मतप्रवाह होता

दार्जिलिंग सिक्कीम-तिबेट अशी तब्बल महिनाभराची वाटचाल करीत ब्रूसची ही तुकडी रोंगबुक परिसरात दाखल झाली

१३ मे रोजी मॅलरी, सॉमरव्हेल आणि एक भारवाहक यांनी तिसरा तळ सोडला व नॉर्थकोलवर चौथा तळ बसविण्यासाठी प्रयत्न सुरू केले ७०१० मी / २३,००० फूट उचीवर हा तळ ठोकला गेला या मोहिमेतील यापुढील सर्व शिखर गाठण्याच्या प्रयत्नांसाठी लागणारे साहित्य येथे साठविण्यात आले होते

२० मे रोजी मॅलरी, सॉमरव्हेल, नॉर्टन यांनी पुढचा तळ ठोकायला प्रस्थान ठेवले ७६२० १ मी / ०५,००० फूट उची त्यानी गाठली व एक बऱ्यापैकी जागा निवडली तेथे दोन तबू ठोकून एका तबूत दोन याप्रमाणे मॅलरी व सॉमरव्हेल आणि नॉर्टन व मोर्सहेड असे चारजण राहिले दुसऱ्या दिवशी ८२२५ १ मी / २६९८५ फूट उची त्यांनी गाठली व नतर त्यानी खाली परत जाण्याचा निर्णय घेतला येथवर मोर्सहेड वगळता इतर सर्वजण आले मोर्सहेडने हवाबद कपडे न नेल्याने व ती उची सहन न झाल्याने तो तबूतच राहिला होता परतीच्या प्रवासातील एक अपघात व मोर्सहेडला सभाळून परत आणता आणता नॉर्थकोलवर यायला त्यांना रात्रीचे १०॥ वाजले वरच्या तळावर स्टोव्ह न ठेवला गेल्याने ३६ तासात त्याना पेयच मिळाले नव्हते तिसऱ्या तळावर आल्यावर सॉमरव्हेल छत्तीस कप चहा प्यायला, अशी नोद मिळते

या तुकडीनतर फिंच व जॉफ्रे ब्रूस यांनी प्राणवायूची नळकांडी घेऊन चढाई सुरू केली त्याच्याबरोबर तेजवीर हा शेर्पाही होता ७९२४ ८ मी / २६००० फूट उचीवर गेल्यावर तेजवीर इतका थकला की तो खालीच कोसळला त्यामुळे प्राणवायूची दोन नळकांडी फुटून गेली ८३३१ मी / २७,३०० फूट उचीवर फिचच्या प्राणवायू पुरवठ्यात बिघाड झाला इथवर येण्यासाठी त्यानी जादा प्राणवायूचा उपयोग केला होता त्यामुळे त्याचे शरीर विरळ हवेला व प्राणवायूच्या कमी पुरवठ्याला सरावलेले नव्हते या साऱ्या गोष्टीत खूप वेळ गेल्याने त्याना शिखर गाठता आले नाही अर्थात प्राणवायूच्या मदतीमुळे त्याना बरीच मजल

भारता आली हे नाकारून चालणार नाही.

एव्हरेस्टच्या या दुसऱ्या मोहिमेच्या पदरीदेखील अपयश आले पण त्यामुळे खचून न जाता दार्जिलिंग गाठण्याअगोदर पुन एकवार प्रयत्न करण्याचे ठरले पावसाळ्याला सुरवात झाली होती, त्यामुळे अडचणीमध्ये आणखी भरच पडली तरीही सॉमरव्हेल, मॅलरी, क्रॉफर्ड व १४ भारवाहक याना नॉर्थकोलखाली अवघे १८२ ८ मी /६०० फूट एका विचित्र अपघाताला तोंड द्यावे लागले. एकाएकी झालेल्या हिमढिसाळामुळे तुकडीतील सात भारवाहक प्राणाला मुकले व या प्रयत्नावरही पाणी पडले ही अयशस्वी मोहीम तेथेच थांबविण्यात आली

नॉर्टनच्या मनात फिरून एक प्रयत्न करण्याची इच्छा होती त्याने दार्जिलिंगहून एव्हरेस्ट कमिटीला असा प्रयत्न करण्याची विनंती तारेने केली होती. तिबेटच्या शासकांकडे तसा एक अर्ज पाठविण्यातही आला होता. पण आधीच्या मोहिमातील शेर्पांच्या मृत्यूमुळे शिखरदेव कोपला आहे, अशी तिबेटी सत्ताधीशाची भावना झाल्याने ह्या विनंतीचा विचारच केला गेला नाही

## १९२४ ची अयशस्वी (?) चढाई

एव्हरेस्टच्या या तिसऱ्या मोहिमेची सूत्रेही ब्रिगेडीयर जनरल जी सी ब्रूसकडे सोपविली गेली, मार्चमध्ये दार्जिलिंग–फारी झाँग– शेखर झाँग अशी मजल दरमजल करीत ही तुकडी एव्हरेस्ट परिसरात पोहोचली. या तुकडीचा सामानाचा बोजा फार वाढला तो मात्र एका गमतीशीर गोष्टीमुळे

१९२२ साली तिबेटमध्ये चांदीची नाणी होती त्यामुळे मोहिमेचा खजिना अवघ्या तीन खेचरांवर लादता येत होता परतु काही गडबडी व अपहाराच्या प्रकरणामुळे तांब्याची नाणी शासनाने सुरू केली होती अर्थात पूर्वीएवढी रक्कम न्यायला तब्बल दहा खेचर लागली शेखर झाँगला आल्यावर तुकडीचा नेता ब्रूस आजारी पडला त्याचा आजार बळावल्याने त्याला दार्जिलिंगला परतावे लागले. साहजिकच नेतृत्वाची जबाबदारी नॉर्टनला पत्करावी लागली

नॉर्टन, मॅलरी, सॉमरव्हेल, जॉफ्रे ब्रूस हे अनुभवी गिर्यारोहक एव्हरेस्ट परिसराशी परिचित होते ओडेल हा नवा तरुण भूशास्त्रज्ञ (जिऑलॉजिस्ट) होता हिमालयाचा जन्म सागरतळाला धडचा पडल्याने झाला आहे त्यामुळे एव्हरेस्ट पर्वतावर काही जलचरांचे विशेषत सागरी जीवाचे अवशेष (फॉसिल्स) सापडतील अशी अटकळ होती म्हणून, ओडेल मुद्दाम या मोहिमेत सहभागी झाला होता अवघ्या २२ वर्षांचा आयर्विनही या धाडसात सहभागी झाला होता मॅलरीचा दोस्त असणारा हा खटपट्या विविध यंत्रे दुरुस्त करण्यात पटाईत होता.

ए ..५

पायथ्याशी पोहोचल्यावर अवघ्या सहा दिवसात ६४०० मी /२१००० फूट उचीवर मोहिमेचा ३ रा तळ ठोकला गेला अर्थात १५० भारवाहकाची मदत त्यासाठी कारणीभूत झाली होती पण लागोपाठ दोन आठवडे एव्हरेस्टच्या लहरी हवामानामुळे सगळी मडळी खाली परतली नॉर्टनने भारवाहकातील मानसिक आजारपणावर नामी तोडगा काढला रोंगबुक धर्ममठाच्या आचार्यांना मोहिमेसाठी परमेश्वराजवळ करुणा भाकण्यास तयार केले त्यासाठी सर्व भारवाहक रोंगबुक धर्ममठात जमा झाले ते सारेजण खाली आल्यामुळे अती उचीवरील वातावरणाचा दुष्परिणाम नाहीसा झाला आणि त्याच्या मनातही नवी उभारी आली

१९ मे रोजी पुन चढाईला प्रारभ झाला तिसरा तळ गाठला व दुसऱ्याच दिवशी आयर्विन– हॅझार्ड–सॉमरव्हेल व १२ भारवाहकानी चौथ्या तळासाठी प्रस्थान ठेवले तेथे हॅझार्ड व सर्व भारवाहक राहिले आयर्विन व सॉमरव्हेल तिसऱ्या तळावर आले पुन: हवा बिघडली हॅझार्डबरोबर आठच भारवाहक खाली आले चार भारवाहक चौथ्याच तळावर हटून राहिले नॉर्टनला हे कळताच तो स्वत आणि मॅलरी व आयर्विन तशा हिम-वादळातही तेथवर गेले आणि त्या भित्री भागुबाई झालेल्या चौघा भारवाहकाना त्यांनी सुखरूप खाली आणले हवेचा असहकार चालूच राहिला

अखेर ५० पैकी अवघे १५ भारवाहक पुढच्या प्रयत्नात साथ देण्याच्या स्थितीत राहिलो म्हणून छोटया छोटया गटांनी एकानतर एक प्रमाणे एव्हरेस्ट गाठण्याचे प्रयत्न करावेत असे नॉर्टनने ठरविले

२ जूनला मॅलरी व जॉफ्रे ब्रूस यांनी ७६२० मी / २५००० फूट उचीवर ५ वा तळ ठोकला नॉर्टन व सॉमरव्हेलने ४ थ्या तळावरून ५ व्या तळावर जाऊन तेथून शिखर माथा गाठण्याचे ठरले होते नॉर्टन-सॉमरव्हेल वर चढू लागले व मॅलरी– जॉफ्रेब्रूस खाली येत होते रात्री नॉर्टन-सॉमरव्हेलने ५ व्या तळावर मुक्काम केला व पुढच्या ८२२९ मी / २७००० फूट उंचीवरील तळाची माडामाड करण्यासाठी आगेकूच करण्याचे ठरविले पण घाबरलेले व थकलेले भारवाहक पुढे यायला तयारच होईनात अखेर ल्हकपा चेडीच्या मदतीने साऱ्यांना कसेबसे तयार केले तोवर सकाळचे ९ वाजले होते बहुमूल्य असे चार तास फुकटच वाया गेले होते त्यानी ८१६८७ मी / २६८०० फूट उचीवर सहावा तळ ठोकला रात्री तेथे मुक्काम करून नॉर्टन–सॉमरव्हेल यांनी पुढील वाटचाल सुरू केली सॉमरव्हेलची घसादुखी, नॉर्टनला उचीमुळे झालेला भ्रम आणि सततचे कष्ट यामुळे शिखराखालून ३०० मीटर/१००० फूट इतक्या जवळून अपयश कवटाळून परतावे लागले पाचव्या तळावर सॉमरव्हेलच दुखण अधिकच बळावलं आणि नॉर्टनला हिमाधत्व आल या जोडीच्या पदरी अपयश आल म्हणून मॅलरी-आयर्विन या जोडीने हल्ला

करायच ठरवल ३७ वर्षांचा मॅलरी जमल तर आत्ताच नाहीतर, पुन्हा कधीच नाही अशा निर्धाराने आगेकूच करीत होता ८५३४५ मी / २८००० फूट उंची प्राणवायूच्या जादा पुरवठ्यामुळे गाठता येते हे उमगलं होत त्या ठिकाणापर्यंतच्या अडीअडचणींची कल्पना होती आणि मुख्य म्हणजे त्याचा निर्धार अभग होता

४ जूनला नॉर्थकोल, ६ जूनला पाचवा तळ व ७ जूनला सहावा तळ त्यानी गाठला ओडेलसारखा दर्दी गिर्यारोहक त्याची पाठराखण करीत होताच सहाव्या तळावर दोघांचीच सोय होऊ शकणार असल्याने ओडेलने आघाडीवीराच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था करून पाचव्या तळावर परतायचे असे ठरविण्यात आले होते

८ जून १९२४ रोजी सकाळी ओडेलने तहानलाडू, भूकलाडू घेतले व वाटेतील दगडांचे नमुने पाहत पाहत (तो भूशास्त्रज्ञ होता) सहाव्या तळाकडे जाऊ लागला एव्हरेस्टने धुक्याचा बुरखा घेतलेला होताच दरम्यान धुकटाचे पांघरूण दुभगले आणि नॉर्टन-आर्यविनच्या जोडगोळीचे त्याला दर्शन झाले ती जागा शिखराखाली जेमतेम ३०५ मी / १००० फूट होती अर्थात ही प्रगती सथ होती पण त्या दमदार वीराना एव्हरेस्ट गाठणे अशक्य नव्हते मॅलरी-आर्यविनचे हे दर्शन शेवटचे ठरले त्यानतर ते कोणालाच कधीही दिसले नाहीत त्यानी एव्हरेस्टवर पदन्यास केला की नाही ? ते सर्वोच्च शिखरावर पोहोचले की नाही ? त्याना मृत्यू कसा आला ? सार काही अज्ञाताच्या पोकळीत बदिस्त झाल आहे हे कोड पुढे कधी उलगडलच नाही आणि यापुढेही उलगडण्याची शक्यता नाही

दुसऱ्या दिवशी बरीच वाट पाहूनही आघाडीची जोडी खालच्या तळावर आली नाही, म्हणून ओडेल पुन वरच्या तळावर गेला त्याने हाका मारल्या, तबूत डोकावून पाहिले पण मॅलरी-आर्यविन रात्री त्या तबूत परतले असल्याचं कोणतंही चिन्ह त्याला दिसल नाही त्यान ठेवलेल पेय-अन्न व इतर वस्तू जशाच्या तशाच होत्या त्यान थोडफार वर जाऊनही पाहिल पण तो एकटाच होता आधीचे सारे कष्ट आणि शोधण्यातल्या विफलतेची जाणीव याच्या जोडीला घोंघावणार हिम-वादळ होतं ओडेलने साकेतिक खुणांनी ४ थ्या तळावरील हॅझार्डला ही दु खद वार्ता कळवली त्याने ती तिसऱ्या तळावरील नोएल व ब्रूसला कळवली नॉर्टन तर या अपघातामुळे खचलाच त्याने ही मोहीम आवरती घेतली व अत्युच्च शिखराशी अज्ञातात विलीन झालेल्या मॅलरी व आर्यविनला अभिवादन केले मॅलरी आर्यविनचे आरोहण हे अखेरपर्यंत एक गूढच राहिले त्याचा मृत्यू थडीने गारठून झाला, की एव्हरेस्ट जिकून परतीच्या प्रवासात सहाव्या तळावर येण्याचा मार्ग न सापडल्याने भुकेजून झाला, की अतीश्रमानी त्यांचा बळी घेतला, हे रहस्य तसेच राहिले

(मॅलरीचा भाऊ सर ट्रॅफर्ड मॅलरी १९४४ साली शाही विमानाने हिंदुस्थानात येत असताना त्याचे विमान त्याच्यासह बेपत्ता झाले ते गूढही तसेच न

उरलेले राहिले आहे दोघा भावाचे अज्ञातात बेपत्ता होणे हा चमत्कारिक योगायोगच म्हणायचा )

## पुन. प्रयत्न

पूर्वीच्या अपयशानंतर देखील एव्हरेस्ट कमिटीने ५००० पौंडाची रक्कम भावी एव्हरेस्ट मोहिमांसाठी बाजूला ठेवली होती १९३२ च्या सुमारास तिबेटी धर्मगुरूची अनुज्ञा मिळण्याची शक्यता निर्माण झाली पण एकेकाळी गाजलेल्या नॉर्टन, सॉमरव्हेल आदी गिर्यारोहकांचे वय लक्षात घेता ते आता अशा मोहिमेत प्रत्यक्ष सहभागी होणे कठीण होते

ह्यूज रटलज (वय ४८) ह्या, अल्मोडा जिल्ह्याच्या मुलकी कारभार प्रमुखाकडे १९३३ च्या चौथ्या एव्हरेस्ट मोहिमेची सूत्रे सोपविण्यात आली त्याचही वय लक्षात घेतल, तरी त्याची गिर्यारोहण व हिमालय क्षेत्रातील जाणकारी एव्हरेस्ट मोहिमेला निश्चित उपयुक्त ठरेल, अशी कल्पना होती पुढे ती खरी ठरली देखील

जर्मन मोहिमेबरोबर ८५८० २ मी / २८,१५० फूट उंचीच्या कांचनगंगा मोहिमेत अनुभवसमृद्ध बनलेला आणि नंतर कामेट या ६६८२ ५ मी / २५४४७ फूट उंचीच्या शिखरावर जाऊन आलेला फ्रँक स्माइद अवघा ३३ वर्षांचा होता त्याचा या मोहिमेत समावेश अपरिहार्य होता एरिक शिप्टन ग्रीन बर्नी विन हॅरिस, वेजर, लाँगलँड अशा अनेकानी या मोहिमेत भाग घेतला

मार्चच्या पहिल्या आठवड्यात गंगटोकहून कूच करीत १९ मार्चला खंबा झाँग येथे पोहोचले व शेखर झाँग मार्गे ते १७ एप्रिलला एव्हरेस्टच्या पायतळाशी पोहोचले २ मे रोजी तिसरा तळ प्रस्थापित केला गेला नॉर्थ कोलवरील चौथा तळ ठोकला आणि नेहमीपेक्षा चक्क पंधरवडाभर आधी पावसाळा सुरू झाला २२ मे रोजी हवामान जरा निवळले, तेव्हा हॅरिस व वेजर यानी ७८३३ ४५ मी / २५७०० फूट उंचीवर ५ वा तळ बनवला त्यानी दुसऱ्या दिवशी ६ वा तळ बनवायचा व शिप्टन आणि स्माइदने पाचव्या तळात मुक्काम करायचा, अशी योजना होती त्याप्रमाणे ते आले पण हवा खराब असल्याने हॅरिस व वेजरला पुढे जाता आलेच नव्हते ते खालच्या तळावर आले व ताज्या दमाच्या शिप्टन-स्माइदला त्यांनी जागा करून दिली पुढचे २८ मेपर्यंतचे दिवस वादळी हवामानाने वाया गेले प्रगती झाली नाही तरी सर्व तळ शाबूत राहिले हेच खूप झाले

२९ मे रोजी सकाळी ८ वाजता ३ गिर्यारोहक व ८ भारवाहक पुढचा तळ बसविण्यासाठी निघाले ८३५१ ६ मी / २७४०० फूट उंचीवर थोड्याशा सपाटीवर त्यानी तळाची जागा मुक्रर केली परतीच्या प्रवासातही हिमवादळाने त्यांची पाठ सोडली नाही लाँगलँड या गिर्यारोहकाला मॅलरी-आयर्विनचा तंबू परतताना दिसला त्यातील एका जुन्या पद्धतीचा टॉर्च त्याने उचलून पाहिला हाताने फिर-

वल्यावर तो प्रकाश देऊ लागला नऊ वर्षे त्या ठिकाणी पडलेला असूनही तो लगेच सुरू झाला, हे मोठे आश्चर्यच मानले जाते. अग तार्के, दात्सेरिंग, निमा दोर्जे, अग त्सेरिंग, किपालामा हे पाच शेर्पा व पासाग, त्सेरिंग तार्के, रिझींग हे भुतिया भारवाहक त्याच्या अद्वितीय कामगिरीसाठी ' टायगर ऑफ द स्नोज ' / एव्हरेस्टचे वाघ या पदवीने गौरविण्यात आले त्याच्यामुळेच इतक्या उचीवरील तळ ठोकता आला होता या तळावर मुक्काम करणाऱ्या हॅरिस व वेजरला दुसऱ्या दिवशीच्या प्रयत्नात त्याना ८२३० मी / २७००० फूट उचीवर एक हिमकुठार (आइस ॲक्स) सापडली ती एका प्रस्तरावर उघडीच पडलेली होती ती किंचितही गजलेली नव्हती ही मॅलरी किंवा आर्यविनची असावी दुपारी १२।। वाजता ते ८५६४ ९ मी / २८१०० फूट उचीवर पोहोचले होते सहाव्या तळावर स्माइद व शिप्टन येणार होते व तेथे फक्त दोघांचीच सोय होती म्हणून हॅरिस व वेजरने परतण्याचे ठरविले येताना त्यानी मॅलरीची हिमकुठार परत आणली व आपली हिमकुठार त्या जागी ठेवली

दुसऱ्या दिवशी १ जून रोजी स्माइद व शिप्टनने सहाव्या तळावरून पुढे मजल मारली आदल्या दिवशीच्या हॅरिस-वेजरच्या जागेशी पोहोचण्यास स्माइदला अकरा वाजले शिप्टन मात्र पोटदुखीमुळे मागेच थावला होता येथे स्माइदला अती उचीवरील विरळ हवेमुळे भ्रम झाला आपल्याबरोबर आणखी कोणीतरी आहे, असा सतत भास त्याला होऊ लागला इतका की, एकदा तर त्याने पाठपिशवीतून खाण्यासाठी केक काढला, त्याचे दोन तुकडे केले एक स्वत घेतला व दुसरा आपल्या सोबत्याला देण्यासाठी पुढे केला पण बरोबर कोणीही नसल्याचे त्याच्या लक्षात आले, तेव्हा तो सर्दच झाला

१९३३ ची ही मोहीम शिखराखालून अवघ्या ३०० मीटर अतरावरून परतली

## जिद्द मानवाची—

आजवर एव्हरेस्ट मोहीम म्हटल की, उत्तुग शिखरावर चढाई असच मानल जात होतं पण एव्हरेस्टच्या हवाई पाहणीची आगळी मोहीम आखली गेली या तिसऱ्या ध्रुवाच्या डोक्यावरून भरारी घ्यायची, परिसराचे हवाई चित्रण करायचे आणि पुढील मोहिमाना मार्गदर्शक ठरतील असे नकाशे व प्रकाशचित्रे (फोटोग्राफ्स) तयार करायची, ही मूळ कल्पना १९३३ ची मोहीम परतीच्या मार्गावर होती अन् त्याच सुमारास मार्क्वीस ऑफ डग्लस आणि क्लायडेस्डेल (पुढे ड्यूक ऑफ हॅमिल्टन, नतर एअर कमोडोर पी ई एम रॉयल एअरफोर्सचे सन्माननीय सभासद) यानी ३ एप्रिल १९३३ व १० एप्रिल १९३३ असे दोन दिवस उड्डाणे करून

हे उद्दिष्ट साध्य केले पण गमत अशी की, या चित्रणावरून १.५०,००० या प्रमाणात अंकित केलेला नकाशा प्रसिद्ध केला गेलाच नाही, तो अजूनही रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीकडे पडून आहे

अतिशय विरळ हवामान, कमी दाबाची हवा, खूप थंडी, खूप उंची, या भागातील हवेचे पट्टे, प्रवाह, अडथळे यांची कल्पना नसणे अशा अनेक अडचणी होत्या तरीही हे धाडस करण्याचे ठरले फार्नबरो येथे अतिउंचीवर असणाऱ्या वातावरणासारखी परिस्थिती कृत्रिमरीत्या निर्माण केली जाऊन या मोहिमेत भाग घेणाऱ्यांची शारीरिक, मानसिक प्रतिक्रिया अजमावण्यात आली या प्रशिक्षणाचा थोडाफार उपयोग निश्चितपणे झाला अखेर हे प्रशिक्षित मोहीमवीर बिहारमध्ये पूर्णियाला दाखल झाले, तेव्हा असंख्य खेडुतांनी ती विमाने पहायलाच गर्दी केली. तिबेटी लोकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकू लागली अत्युच्च शिखरावर बसलेल्या रागीट दैवतांचा अशा उड्डाणामुळे शांतताभंग होईल, मग त्यांचा कोप होईल इ पण सारे काही सुखरूप होऊन हे साहसवीर परत यावेत अशीच सर्वांची इच्छा होती

२ एप्रिलची सायंकाळ अवतरली उद्याचा वेध घेण्यासाठी, अंदाज बांधण्यासाठी एक बलून उंच आकाशात सोडले गेले काही अंदाज, आडाखे बांधायला त्याचा उपयोग झाला अखेर ३ एप्रिल १९३३ हा सुदिन उगवला पूर्णिया गावच्या लालबालू विमानतळाशी एव्हरेस्टच्या डोक्यावरून घिरट्या मारण्याची मनीषा बाळगलेले वीर तयार झाले क्लायडेसडेल हा प्रमुख वैमानिक आणि ब्लॅकर हा प्रमुख निरीक्षक पहिल्या वेस्टलँड विमानात चढले त्यांचा सारा जामानिमा परग्रहावरच्या पाहुण्यासारखा वाटत होता ते बोजड कपडे, तोंड झाकणारे गॉगल्स, विजेच्या तारांचा गुंताडा हे सारं नवख होतं दुसऱ्या विमानात मॅकिंटायर प्रमुख वैमानिक आणि बॉनेट– चलत्‌चित्रीकरण प्रमुख असे स्थानापन्न झाले मॅकिंटायरजवळ एक पोस्टाची थैली होती भारतीय टपालखातेप्रमुखाने या अद्वितीय धाडसप्रसंगी खास स्मरणीय असा शिक्का करून घेतला होता या पत्रांवर तो उमटवला जाणार होता इंग्लंडचा बादशहा, प्रिन्स ऑफ वेल्स (युवराज), लेडी हौस्टन आणि अशाच नामवंतांना खास संदेश असलेली ही पत्रे एव्हरेस्टच्या माथ्यावरून फिरून आली की खास शिक्का मारून हवाईमार्गाने संबंधितांना पाठविली जाणार होती

कर्नल पी टी एथेरटनच्या एका मित्राने एव्हरेस्ट शिखराला भेट देण्यासाठी एक पोस्टकार्ड दिलं होतं ' From us to you, with the best of luck ' असं लिहिलेलं हे पोस्टकार्ड एव्हरेस्टच्या माथ्यावर गेलं की हवेत सोडून द्यायचं एव्हरेस्टला मानवाच्या आगमनाचं सूतोवाच करणारं हे पहिलं ' व्हिजिटिंग कार्ड '! हे सारं झालं, तरी प्रत्यक्ष उड्डाणाच्या वेळी सर्वांच्या मनात प्रचंड कालवाकालव झाली होती या सर्वांचं यथातथ्य वर्णन कर्नल पी. टी एथेरटनच्या ' द लास्ट

स्ट्रॉंग होल्डस् ' या पुस्तकात सापडत

मनाची प्रचड उभारी, नव्या साहसाला तोंड देण्याची तयारी असणारी ही अनोखी धडपड होती एव्हरेस्टची अफाट मोहिनी साद घालीत होती तासाभराच्या उच उड्डाणानतर धुक्याच्या समुद्रातून वर डोकावणारे तेजस्वी ठिपके दिसू लागले ते होते काचनगगा, एव्हरेस्ट आणि मकालूचे दूरदर्शन त्या धुकटाआडूनही चदेरी सापासारखी अरूण नदी जाणवत होती

छोटया-मोठया ४६ गोष्टी करायला हव्या होत्या काही क्षुल्लक वाटणाऱ्या पण खूप महत्त्वाच्या ! कॅमेऱ्याच्या भिगापुढील झाकण काढण्यासारखी गोष्ट केली गेली नाही तरी ही सारी मोहीम व्यर्थ ठरणार होती एकामागोमाग एक करायच्या या गोष्टींची यादीच मडळीसमोर होती ते सार पुर करून एव्हरेस्टच चित्रण करायच होत विमानाच्या आतील तपमान उबदार ठेवणाऱ्या डायनोमोने एकदा असहकार पुकारला पण वेळीच केलेल्या धडपडीला यश आल अन् सार काही शेवटपर्यंत ठाकठीक राहिल

३९६० मीटर / १३,००० फुटाच्या वर विमान झेपावल अन् काचनगगा अवतीर्ण झाली धुक्याच्या दुलईवर– पाढरीफेक काचनगगा निळ्या नवलाईत उठून दिसत होती काही मिनिटांतच हिमशिखरांचा राजा एव्हरेस्ट अन् त्याचा सख्खा सोबती मकालू दिसू लागले जांभळट तपकिरी जमिनीच्या पार्श्वभूमीवर विमानाच्या उजव्या अगास आणि उजव्या पखामागे काचनगगा दिसत होत पश्चिम दिशेकडे वाहणाऱ्या वाऱ्यामुळे १८ अशात विमान कललेले होते त्यामुळे फारच सुरेख दृश्य दिसत होते गौरीशंकरचा माथाही (म्हणजे एव्हरेस्ट नव्हे ! ) मधूनच डोकावत होता थडथडणाऱ्या विमानावर हिमकणांचा मारा होत होता आणि बारीकसारीक जुळण्या पुऱ्या करून विश्वकळसाचे फोटो काढण्याला सुरुवात झाली त्या अति उचावरील थडीला तोंड देण्यासाठी विजेच्या मदतीने कॅमेरा उबदार राखला होता

शिखरसम्राट आपला हिमतुरा फडफडवीत समोर ठाकला, तो क्षण अविस्मरणीय होता एव्हरेस्टच हे न्यार दर्शन केवळ अफलातून होत

तिबेटची पवित्र भूमी आणि जगापासून तुटक असलेल्या नेपाळची राजभूमी याच्या सरहद्दीवर हा तिसरा ध्रुव मांडी ठोकून बसला होता सारा परिसर स्वच्छ हवेमुळे दृष्टीत मावत नव्हता असख्य प्रकाशचित्रे काढायची लगबग चालू होती एव्हरेस्टच्या हिमतुऱ्यातून विमान गेल, ते क्षण केवळ त्यासम तेच होते. पाऊण तासाची ही विमानाची चक्करे सपली, तेव्हा एक अनोख समाधान या साहसवीरांच्या मनात साचल होत त्या प्रसगाची क्षणचित्रे कॅमेऱ्यात बदिस्त झाली होती आजही ती आपल्याला पाहता येतात

अर्थात या साऱ्या मोहिमेला प्रचंड खर्च येणार होता कोणा एकाला ते परवडेल अशी स्थिती नव्हती तेव्हा श्रीमती लेडी हॉस्टन हिने मदतीचा हात पुढे केला दोन छोट्या विमानाच्या बांधणीचा पूर्ण खर्च (काही लाख पौंड) आणि मोहिमेचा सारा खर्च तिने देऊ केला तोपर्यंत इतक्या उंचीवरून विमानोड्डाण झालेले नव्हते फेलोज या लष्करी अधिकाऱ्याकडे या मोहिमेची सूत्रे दिली होती

या मोहिमेत दोन घडामोडी झाल्या—

पहिली म्हणजे पहिल्या विमानाला एक अकल्पित आपत्तीला तोंड द्याव लागल एव्हेरस्टच्या जवळ गेल्यावर वरून खाली असा वाऱ्याचा झोत सुरू झाला आणि ते विमान एव्हरेस्टच्याही खाली आले काही मिनिटातच ते एव्हरेस्टवर आदळणार अशी परिस्थिती निर्माण झाली वाऱ्याचा जोर इतका होता की, वैमानिकाला विमान वर नेणे अशक्य होऊन बसले पण सुदैव एवढेच की अचानक खालून वर असा वाऱ्याचा झोत अशा प्रचंड वेगाने सुरू झाला की ते विमान क्षणार्धात एव्हरेस्टच्या माथ्यावरून पुढे सटकले विमान पूर्णिया विमानतळाजवळ आल तेवढ्यात हातमोजे गरम करणारी विजेची तार उघडी पडली त्यामुळे हातमोजा जळाला वैमानिकाला यंत्रावरील हात बाजूला करता येईना आणि तो चटकाही सहन होईना एवढ्यात विमान जमिनीला टेकल म्हणून बर झाल

दुसऱ्या विमानाबाबत सार आलबेल होत पण त्यातल्या चित्रीकरण करणाऱ्याच सार लक्ष चित्रीकरणात होत त्याच प्राणवायूच्या नळीकड दुर्लक्ष झाल आणि त्याचा पायच त्या नळीवर पडला नळी चिरकटली त्यातूनच प्राणवायू बाहेर पडू लागला त्या चित्रीकरणकर्त्याच्या वेळीच लक्षात आलं, कारण प्राणवायूचा पुरवठाच नाकापर्यंत होईना तो अगदी बेशुद्धच पडला चित्रीकरणाच काम संपल होत म्हणून विमान पूर्णियाकडे वळवल विमान खाली आल्यावर हवेतला प्राणवायू मिळाला आणि चित्रीकरण करणारा शुद्धीवर आला

ही सारी खटपट काही शभर टक्के यशस्वी झाली नाही कारण कमी उजेड दिला गेल्याने सर्व चित्रे अंधुक व अस्पष्ट आली फेलोज याने हे सार लंडनला कळवल तेव्हा त्यांना परतीचा सल्ला मिळाला तेवढ्यात हा नेताच आजारी पडला तो पूर्णियाच्या दवाखान्यात दाखल झाला

वैमानिकांनी उचल खाल्ली व फेलोजला खोट खोट सांगून १९ एप्रिलला पुन्हा उड्डाण केल त्या प्रयत्नालाही यश आल बऱ्यापैकी चित्रे मिळाली पण मूळ उद्दिष्ट पूर्ण होण्याइतपत ती उत्कृष्ट नव्हती

एव्हरेस्टच्या इतिहासातली अशी ही पहिलीवहिली मोहीम सुफल संपूर्ण झाली होती एक नवा इतिहास साकारला होता पृथ्वीच्या गच्चीवरून त्यांनी भ्रमण करून साऱ्या पर्वतशिखरांवरून चक्कर मारल्याच पुण्य जोडल होत ही हवाई मोहीम

' लेडी हौस्टन मोहीम ' या नावाने प्रसिद्ध आहे

## मॉरीस विल्सनचे जगावेगळे धाडस

इग्लडमधील यॉर्कशायर परगण्यात कापडधद्यातील एका सुखवस्तू कुटुबात मॉरीसचा जन्म झाला इग्लडच्या साम्राज्यावरचा सूर्य मावळत नव्हता, त्या काळची ही गोष्ट पहिल्या महायुद्धात प्रत्यक्ष सहभागी झाल्यामुळे त्या हत्याकांडाचा फार खोलवर परिणाम मॉरीसच्या मनावर झाला त्याच तारू आता भरकटू लागल गेलेली मन शांती परत मिळण तर राहू देच, पण शरीरस्वास्थ्यही बिघडू लागल

अखेर उपाय सापडला मॉरीस विल्सनच्या आयुष्यात त्याला त्याचा आध्यात्मिक गुरू मिळाला कडकडीत उपास (फार तर घोट दोन घोट पाणी प्यायची तेवढी मुभा) आणि मुख्य म्हणजे नामस्मरण अथवा प्रभूची प्रार्थना अनेक औषधोपचार करूनही न मिळणारी शाती आता सहजी मिळू लागली "हे प्रभू, मला सजीवन दे, तुझ्या दिव्यत्वाचा स्पर्श मला होऊ दे इच्छित गोष्टी माझ्या मनोबळावर मला प्राप्त होऊ देत" अशा प्रार्थनेनतर मनात उभारी येऊ लागली या ईश्वरी साक्षात्कारानतर आलेला आमूलाग्र बदल त्याने अनुभवला पण. .या साऱ्या अनुभवाची, साक्षात्काराची, दिव्यत्वाची रोखठोक टिंगलटवाळीच झाली सार व्यावहारिक जग तिकडे एकतर दुर्लक्ष तरी करू लागल, नाही तर उपहास तरी हे साऱ्या जगाला पटवून द्यायच तर काहीतरी भव्य दिव्य करायला हव चमत्काराशिवाय नमस्कार नाही हेच खर

याच काळात १९२४ च्या एव्हरेस्टच्या अपयशी मोहिमेची गोष्ट मॉरीस विल्सनच्या वाचनात आली तिथेच ईर्षा बळावली, स्फुल्लिंग पेटला आणि ठरलं ! आपल्या मनोबळावर, आध्यात्मिक सामर्थ्यावर एव्हरेस्ट शिखराचा माथा गाठायचा– तोही एकट्याने ! कसलेल्या गिर्यारोहकांना हुलकावण्या दाखवणार यश खेचून आणायच !

हा जिद्दी माणूस पेटून उठला खरा, पण कित्येक हजार किलोमीटर्सच हे अतर तोडून तिथवर जायला तर हव त्यातून मार्ग एकच ! एकट्यान विमान घेऊन तिकड जायच विमानही घेतल पण चालवता कुठे येत होतं पठ्ठ्यान तेही शिकून घेतल अर्थात नव्या उर्मीतील धसमुसळेपणातच गिर्यारोहणाबाबतही तीच परिस्थिती गिर्यारोहणाच शास्त्रशुद्ध तत्र शिकण्यात वेळ घालवण्यापेक्षा अतीआवश्यक सामान गोळा केल अन् आसपासच्या प्रदेशात हिंडण्याफिरण्याचा सराव सुरू केला

छातीत दम होता मनात उभारी होती चिवट धडपड सुरू होती उपास-तापास–प्रार्थना–मनोबल–निग्रह या शस्त्रावर प्रबळ श्रद्धा होती

१९३३–३४ मधील पूर्ण तयारीची ह्यूज रटलजची मोहीम आगेकूच करीत

होती एव्हरेस्टची हवाई पाहणी ताजी ताजी होती आणि विल्सनच्या एव्हरेस्ट स्वारीची बातमी जाहीर झाली टिंगलटवाळीपासून आगे बढो पर्यंत सारे प्रतिसाद पचवून झाले अडचणीचा हिमालय समोर उभा राहिला आगाऊ परवानगी न घेता हा उपद्व्याप माडला आहे म्हणून नेपाळ सरकारची नाराजी इडिया ऑफिस-मार्फत हवाई वाहतूक खात्याकडे कळवली गेली यातच विमानाचा झालेला छोटासा अपघात, टॉन्सिल्समुळे आलेल आजारपण या साऱ्याला तोंड देत मॉरीस विल्सन अन् त्याच ते ' जिप्सी मॉथ ' विमान पूर्वेच्या प्रवासाला सिद्ध झालं

२१ मे १९३३, लडनच्या स्टॅगलेन विमानतळावरून जिप्सी मॉथने मॉरीस विल्सनसह उड्डाणही केले नुकतच घेतलेल छोट विमान आणि पूर्वानुभवाचा पूर्ण अभाव या अडचणीत भर म्हणून हवाई वाहतूक खात्यान आणलेले अडथळे चाळीस तास विमान उडवण्याचा ' प्रचड ' अनुभव पाठीशी घेऊन विल्सनसाहेब लडन ते पूर्णिया (बिहार) हे ७-८ हजार कि मी अतर एकट्याने पार करणार होता.

आल्पस् पर्वतराजीतील अडचणी दूर करण्यासाठी त्याने आयत्यावेळी मार्ग बदलला जिनिव्हा, मार्सेलिस, पिसा, रोम, नेपल्स, सिसिली या मार्गापेक्षा त्याच्या आठवणीत राहिल ते उत्तर आफ्रिकेतील ट्यूनिस तेथे मिळालेल पाणीयुक्त भेस-ळीच पेट्रोल आणि त्यामुळे ओढवलेला प्रसंग या अनुभवातून शहाण होत होत बिझार्ट, त्रिपोली, बेगाझी, तोब्रुक, सिद्दी बरानी अस उडत-उडत त्यान कैरो गाठल तोपर्यंत तब्बल आठवडा होऊन गेला होता

ब्रिटिश सरकारच्या आडकाठ्याना न जुमानता निघालेल्या, अन् एव्हरेस्ट विजयाची स्वप्ने पाहणाऱ्या या तरुणाला कैरोत कागदी गुताड्याने अडवलं पुढच्या प्रवासाची परवानगी त्याला साफ नाकारली गेली पण या धाडसी वीराने कैरो ते बगदाद या दीडहजार किलोमीटर्स अतराची एका टप्प्याची झेप घेतली त्यात तो यशस्वी कसा झाला हे अद्भुत गूढच आहे त्या जिप्सी मॉथच्या छोट्या घुगुर-ट्याच्या आवाक्याबाहेरचीच ही गोष्ट होती बगदादला एका शाळेत त्याला एक शालेय नकाशा पुस्तक (स्कूल ॲटलास) मिळाल त्यावरून त्याने आपला पुढचा टप्पा निश्चित केला बगदाद ते बहारीन ! प्रवासभर सोबत होती पेटलेल्या वाळवटाची अन् अफाट सागराची हा हजार-बाराशे कि मी टप्पादेखील त्यान लीलया पार केला

इथे परत अडवणूक झाली विमानाच्या टाक्यात पेट्रोल नव्हत आणि वरून आलेल्या आदेशानुसार इराणमधील बाशीर गावी जाऊन प्रवासाचा परवाना मिळ-वण आवश्यक असल्याच त्याला सागण्यात आल बाशीरला जाण म्हणजे ' सरकारी पाहुणचार ' घेण्यास जाण होत हे उघड होत, त्यान मग बाशीरला जाण्यापुरत पेट्रोल मागितल ते त्याला मिळाल प्रत्यक्षात तिथल्या कामगाराचे हात ओले

करून हा जिद्दी वीर आणखीही इंधन मिळविण्यास यशस्वी ठरला बहारीन ते ग्वाडार या प्रवासास अपुऱ्या इंधनासह त्यान उड्डाण केल वाटेतल्या सिंधुसागरावरून उडताना विल्सनसाहेबांच जिप्सी मॉथ सव्वासहाशे मीटर (दोन हजार फूट) उंचीवरून खाली झेपावू लागल लंकेच्या उड्डाणात हनुमानाला भेटलेल्या मैनाक आणि सिंहिका यांच्यासारख तिथ कोणी होत की काय कोण जाणे ? पण समुद्राच्या पाण्यापासून अवघ्या पन्नास मीटरवर त्याची धडपड, प्रयत्न आणि मुख्य म्हणजे प्रार्थना फळाला आली या संकटाला तोंड देऊन सव्वानऊ तासांनी विल्सनच विमान कसबस ग्वाडारला पोहोचल अखेर महिनाभराच्या अथक परिश्रमानंतर त्यान पूर्णिया गाठल खर तर पूर्णिया हे शहर बिहारमधील आणि एव्हरेस्ट होत नेपाळ, तिबेटच्या सरहद्दीवर ! मग पूर्णियाच का ?

पूर्णियाच्या विमानतळावरून एव्हरेस्ट परिसराच हवाई छायाचित्रण करणारी मोहीम नुकतीच निघाली होती ती यशस्वीदेखील ठरली होती विल्सनच्या डोक्यात, एव्हरेस्टवरून भरारी मारताना हवाई छत्रीच्या सहाय्याने खाली उडी घेण्याची कल्पना मूळ धरून बसली होती

पूर्णियात तर ब्रिटिशांनी या मोहिमेला अपशकुनच करण्याच ठरवलं होत तिबेटच्या शासकाकडून विल्सनवर प्रवेशबंदी लादण्यात यश मिळाल आणि पूर्णियाच्या विमानतळावर विल्सनच इटुकल विमान कैदेत पडल तिथला रोजचा दंड भरत बसण्यापेक्षा त्यान ते विमान फुकून टाकलं आणि दार्जिलिंग गाठल तिथे थोडफार भटकून झाल अन् त्याला मार्ग सापडला १९३४ साली झालेल्या प्रचंड भूकंपात उद्ध्वस्त झालेल्या जनसामान्यांच्या पुनर्वसन कार्यात सहभागी व्हायच अफाट कष्टाची शारीरिक काम करता करता शरीर मजबूत होईल आणि एव्हरेस्ट मोहिमात भाग घेतलेल्या शेर्पांचा परिचय होईल आश्चर्याची गोष्ट म्हणजे विल्सनला हे दोन्ही साधल. तेवांग, तेसरिंग आणि रिनझिंग या तीन शेर्पांनी रटलजच्या मोहिमेत अनुभव मिळवला होता त्यांनी विल्सनला साथ द्यायच ठरवलं होत

पण ही कुणकुण पोलिस खात्याच्या लांब कानांपर्यंत आली विल्सनने तिबेटी लामाच सोंग घेतल अन् शेर्पा त्याचे भगत बनले हा सिद्धसाधकांचा चमू निघाला तिबेटकडे ! तशी एक-दोनदा त्यांची व पोलिसांची गाठ पडली, पण कस तरी निभावून नेलं खर २१ मार्च १९३४ च्या रात्री निघालेल्या या टोळक्यान खूप दूरच्या मार्गान सरहद्द ओलांडून तिबेटमध्ये प्रवेश केला खरा, आणि पुढच्या २५ दिवसात तब्बल पाचशे किमी पायपीट करून 'श्रद्धा' आणि 'साधना' यांच्या जीवावर तो विश्वकळसाला गवसणी घालू पाहणार होता

"आता फक्त ८–९ शे मी उंचीच काय ती बाकी आहे तेवढी गाठली की सारी दुनिया माझ्या पायाशी लोटांगण घालील." अशी नोंद खुद्द मॉरीस विल्सनच्या

डायरीत सापडते

१६ एप्रिल १९३४ च्या भल्या पहाटे धर्ममठात होणाऱ्या पवित्र प्रार्थनांच्या वेळीच त्यानं तिसऱ्या ध्रुवाकडे प्रस्थान ठेवलं. आर्यविन, मॅलरी, रटलज ज्या मार्गानं गेले त्या पाऊलखुणांचा मागोवा घेत हा धडपड्या वीर १५-२० किलो वजनाचं ओझं पाठीवर वागवीत निघाला. दुसऱ्याच दिवशी त्यानं रटलजच्या मोहिमेच्या पायतळाची जागा गाठली. उंची होती ५४२५.५ मी. (१७, ८०० फूट)।

१८ एप्रिल– १९ एप्रिल– २० एप्रिल' मॉरीस विल्सनचा मुक्काम केवळ दुसऱ्या छावणीत. भणाण वारा, पिसाट हिमवृष्टी, आणि हाडे गोठवणारी थंडी. त्या जीव-घेण्या शांततेचं त्याला काही वाटत नव्हतं. सुके अंजीर, खजूर असा सात्विक आहार घेऊन त्यानं ही ' हिमकैद ' निभावून नेली. रटलजच्या मोहिमेनं तिसऱ्या तळावर बरेच अन्नपदार्थ ठेवले होते. त्या भरवशावर हा वीर विसंबला होता. २१ एप्रिल। तापसी ' विल्सन ' चा वाढदिवस।! एव्हरेस्टनं– गिरिशिखरांच्या राजानं त्याला भेट पाठवली होती– ' हिमवादळ '।।। ' एव्हरेस्टच्या परिसरात हिमवादळ हे असतं चिरंतन सत्य आणि सुंदर, सुखद, अनुकूल हवा हे असतं क्षणभंगुर स्वप्न।' मॉरीसनं मग निर्णय घेतला– परतीचा. शीर सलामत तो पगडी पचास! अवघ्या दीड दिवसात दीड हजार मीटर उंची काटून हा हरलेला वीर रोंगबुक तळावर परतला. ठेचकाळलेलं अंग, सुजलेले डोळे, उजव्या हातापायातून त्राण गेलेले अशा अवस्थेत मॉरीस परतला. पण मुख्य म्हणजे तो जिवंत होता, त्याची जिगर जिवंत होती. तो आपल्या डायरीत लिहितो, " सायमन पीटरला गॅलीलीच्या पाण्या-वरून चालायला लावणारा सर्वशक्तिमान प्रभू मलादेखील मदतच करील. पण हिम-वादळासारख्या संकटातही माझी श्रद्धा शिल्लक राहिली पाहिजे " आणि ती अविचल श्रद्धा जिवंत राहिलीसुद्धा.

सोबत्यांनी आईच्या मायेनं केलेली शुश्रूषा कामी आली. २१ मे रोजी त्यानं पुन्हा एव्हरेस्टचा मार्ग पकडला. पण या वेळी तो एकटा नव्हता. त्याचे सोबती त्याला तिसऱ्या छावणीपर्यंत सोडायला येणार होते. ही छावणी होती तब्बल ६४००.८ मी. (२१,००० फूट उंचीवर! आश्चर्य म्हणजे त्यानं आपल्या साथीदारासह अवघ्या तीन दिवसांत ती गाठलीदेखील. आता केवळ २४३८.४ मी/८००० फूट उंची राहिली होती. आजवरचा झपाटा पाहता ते आवाक्यातही असल्यासारखं भासत होतं. तिसऱ्या छावणीतील मध, चीज, लोणी, बिस्कीट, चॉकोलेटस् असं सारं त्यांना गवसलं. दोन दिवस तिथं मुक्काम पडला. त्या विरळ हवेला सरावण्यासाठी, पुढच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी प्रार्थना करून सामर्थ्य मिळवण्यासाठी इतपत मुक्काम हवाच होता. भुकेजलेल्या त्या गिर्यारोहकांनी तिथल्या पदार्थांचा यथेच्छ समाचार घेतला. १६ मे ते २१ मे घोंघावणारं वादळ जरा उणावलं आणि २२ मे रोजी

पहाटे मॉरीस पुढे झेपावला थोडा वेळ रिनझिग नॉर्थ कोलकडे जाणारा रस्ता दाखवायला आला खरा,पण अपुरी साधनसामग्री पाहता ही साथ करण जमणार नव्हत

२३ मे रोजी एक उभी दरड, मग दहा मीटर रुंदीची हिमखाई कशीबशी पार करून त्यान थोडी मजल गाठली खरी पुढचा हिमकडा दुर्लंघ्य होता किमान एखादा साथीदार तरी हवा होता मग त्याने थोडी तडजोड पत्करली पुन्हा झेपा-वण्यासाठी तो तिसऱ्या छावणीवर परतला थोड खाणपिण झालं शेर्पा अन् गोऱ्या साहेबाच्या वाटाघाटी झाल्या पण दोघेही आपापल्या भूमिकांना चिकटून होते एव्हरेस्टच्याच कुशीत जन्मलेल्या अन् अंगाखांद्यावर वाढलेल्या शेर्पांना आपल्या मर्यादाची जाणीव होती पण परमेश्वरावर अविचल निष्ठा असणारा विल्सन शिखर गाठण्याच्या प्रयत्नाच्या निर्धारावर ठाम होता

२९ मे रोजी तडजोड झाली मॉरीस विल्सनने एकट्याने शिखराकडे जायच दहा दिवसात त्यान परत तरी यायच किंवा तो न आल्यास शेर्पांनी आपला मुक्काम खाली हलवायचा त्यांचा पुढचा मार्ग त्याना मोकळा होता खर तर त्यान हा जुगार इथेच थांबवला असता तरी फारस काही बिघडणार नव्हत केल हेच इतक होत, अतर्क्य, अविश्वसनीय होत या एकट्यान एव्हरेस्ट जिंकण्याच्या स्वप्नातल हे वास्तव अद्भुतापेक्षा रम्य होत जगान त्याचही कौतुक केल असत. पण जिद्दी विल्सनच ध्येय होत, ' एव्हरेस्ट ' !

त्यान एकट्यान आणखी उंचीही गाठली पण ते त्याच्या मर्यादेबाहेरच ठरल त्या झुंजार वीराला प्रतिकूलतेशी झगडता झगडता वीरगती प्राप्त झाली

वर्षभरान तिथवर गेलेल्या एरिक शिप्टनला अन् तेनसिंग नोर्गेला मॉरीसचा देह अन् नोंदवही मिळाली हा सारा जगावेगळा प्रवास आणि झुज पुन्हा लोकासमोर आली

एव्हरेस्ट मोहिमांचा सारा इतिहासच अशा जिद्दी, धडपड्या घटनानी भर-लेला आहे म्हणूनच एव्हरेस्टची मोहिनी अजूनही ताजी आहे भुरळ घालते आहे.

ही मुलखावेगळी ५ वी मोहीम अयशस्वी ठरली पण नित्य स्मरणीयच राहिली

## एका कोळियाने एकदा आपुले

एव्हरेस्ट ! एक नागड-उघड सत्य ! तिथवर जाण्यासाठी कोण खटाटोप ! अनेक जाणत्या जीवांच्या जीवनाची अखेर घडवणारी संकट ! नव्हे, त्याची मालिकाच ! !

कशासाठी हे सार ? द्विपादान तिथ जाव अस काय आहे ? सोने-नाणे ? हिरे-मोती ? ? तिथे हे काही नसताना जीवावर उदार होऊन तिथे जाण्यात मतलब तो काय ? मृत्यूचे जबडे ठरणाऱ्या हिमखाया, तो बर्फाळ-वैराण मुलुख, हाड

गोठवणारी थंडी, झोंबरे वारे, हिमवादळ, हिमदंश, हिमाघात अशी भय

एव्हरेस्टवरचं आरोहण म्हणजे काही युधिष्ठिरासारखं सदेह स्वर्गारोहण तर खचितच नव्हतं मग पुन पुन्हा प्रयत्न करून तिथे जाण्यात काय स्वारस्य होतं ?

हे तुम्हा-आम्हाला समजायचं नाही ही पर्वताची हाक आहे ती खुम-खुमी सांगून कळायची नाही पडल्या पडल्या डोंगरचढाई करणाऱ्या आपल्या-सारख्यांना 'पर्वतस्य कथा रम्या' इतकं वाटलं तरी खूप

डोंगरचढाई कशासाठी ?

तर, ते तिथे आहेत म्हणून !

हे त्रिकालाबाधित सत्य, धाडसी, साहसी मनांना पटतं अन् मग शिखर मोहि-मांचे बेत सुरू होतात एव्हरेस्टवरील रोमहर्षक नाट्याचे पुढचे प्रयोग रंगत जातात त्यातून दर्शन घडतं ते निराश न होता यश मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या जिद्दीचं मागील पानांवरून पुढे चालू अशी ही उत्तुंग कहाणी

१९३५ साली शिप्टनच्या नेतृत्वाखाली एक छोटंसं पहाणीपथक रवाना झालं त्यांनी एव्हरेस्ट परिसरातील काही शिखरांवर यशस्वी चढाया केल्या, सराव केला आणि नवीन गिर्यारोहक व नवनव्या साधनांची चाचपणी करीत एव्हरेस्टच्या नॉर्थकोलपर्यंत धडक मारली त्यांचं मर्यादित उद्दिष्ट त्यांनी गाठलं अपोलो-८ सारखं ! पुरेशी साधनसामुग्री असती तर ते शिखरावरसुद्धा पोहोचू शकले असते

१९३६ सालची प्रचंड तयारी करून गेलेली ह्यूज रटलजच्या नेतृत्वाखालील मोहीम अयशस्वी ठरली नशीब एवढंच की हॅरिस आणि शिप्टन एका जीवघेण्या अपघातातून मोठ्या सुदैवानेच वाचले अगदी अनपेक्षितपणे फारच लवकर सुरू झालेल्या पावसाने या मोहिमेच्या पदरी अपयशाचे माप पडले

एरिक शिप्टन आणि फ्रँक स्माइदखेरीज विन हॅरीस, सी केम्पसन, डॉ सी बी वॉरेन, लेफ्टनंट पी आर ऑलिव्हर अशी नामांकित मंडळी या जथ्यात सामील झाली होती एप्रिलच्या अखेरीस पायतळ, २२ मेच्या सुमारास नॉर्थ कोल आणि २५ मे पासून अंतीम चढाया त्यामध्ये स्माइद-शिप्टनची पहिली जोडी, विन हॅरीस आणि केम्पसनची दुसरी जोडी, वॉरेन-ऑलिव्हरची प्राणवायूची नळकांडी घेऊन तिसरी जोडी . हे सारं ह्यूज रटलजनं दार्जिलिंग सोडण्याअगोदरच मनाशी पक्कं केलेलं होतं सातव्या तळाची जागा ८९८३ मी / २७८०० फूटावरही त्यानं मनाशी निश्चित केली होती तेथून नऊ तासांची चढाई आणि परतायला ६ तास पुरावेत हा आडाखा सकाळी ६ ला शेवटचा तळ सोडला तर सायंकाळी रात्रपर्यंत परतणं शक्य होईल सातव्या तळावर प्रखर दिव्यांची व्यवस्थाही मनात योजून ठेवली होती .

१९ मार्चला सिक्कीमची राजधानी गंगटोक सोडलं आणि फारी झाँगला

जाण्याचा लाबचा वळसा टाळून थेट खम्पाझाँग माग २७ एप्रिल रोजी त्यानी एव्हरेस्टचा पायथा गाठला देखील ६ मे रोजी दुसरा तळही ठोकून झाला १२ मे रोजी तिसरा आणि १५ मे रोजी स्माइद-शिप्टन नॉर्थ कोलवर पोहोचलेदेखील त्यामुळे २५ मे ऐवजी १७ मे रोजीच चढाईचा अतिम टप्पा गाठता येईल अस वाटू लागल पण... नियतीच्या मनात दुसरच काही होत १५ मे पासून तुफान हिमवृष्टी आणि २४ मे पासून प्रत्यक्ष मोसमी पावसाला सुरवात झाली १ जूनच्या सुमारास नव्या उभारीने पुन एक प्रयत्न केला गेला पण त्या वेळी तर नॉर्थकोलही गाठता आला नाही

ह्या अपयशानतर प्रयत्न थाबले नाहीत तर हॅरॉल्ड टिलमनच्या आठव्या मोहिमेचे १९३८ मध्ये प्रयत्न सुरू झाले अर्थात एव्हरेस्ट आणि अपयश हे समी-करणही तसच चालू राहिल

टिलमनच्या या मोहिमेत शिप्टन, ओडेल, स्माइद, असे कसलेले गिर्यारोहक होते पण ८३२१ मी / २७३०० फूट इतकी उची गाठल्यानतर त्यांना प्रयत्न सोडून द्यावे लागले नॉर्थकोलवर पश्चिम बाजूने चढून पूर्व बाजूने खाली उतरण्याच्या आगळ्या प्रयत्नाची नोंद या मोहिमेच्या खात्यावर जमा झाली

## दुसऱ्या महायुद्धाची काळी सावली

एव्हरेस्टची ८ वी मोहीम अपयश घेऊन माघारी फिरली नतर दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमू लागले नाझी भस्मासुराच्या उदयास्ताचे भेसूर चित्रण चालू होते केवळ गिर्यारोहणाकडे लक्ष द्यायला कोणालाच वेळ नव्हता एव्हरेस्ट मोहिमे-साठी लागणारा प्रचड पैसा, विपुल तयारी आणि भरपूर नियोजन याची त्या वेळी वानवा होती साहजिकच एव्हरेस्टकडे कोणाचेच लक्ष गेले नाही

नाही म्हणायला १९४२ मध्ये कर्नल रॉबर्ट एल स्कॉट या धाडसी अमेरिकन वैमानिकाने ११२७७ मी / ३७००० फूट उचीवरून ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातून हवाई प्रवास करीत ल्हासाच्या डोक्यावरून एव्हरेस्ट परिसराकडे कूच केले तेथून एव्हरेस्ट परिसराचे हवाई छायाचित्रण केले व कूचबिहारमध्ये पाच तासाच्या या हवाई मोहिमेने आपला प्रवास थाबवला, तरीही त्यावेळच्या राजकीय व लष्करी घडामोडी-पुढे या आगळ्या-वेगळ्या साहसाची म्हणावी तशी दखल कोणीच घेतली नाही


एव्हरेस्ट कथेचा दुसरा टप्पा सपला तो अपयशाचा अर्धविराम घेऊन तब्बल आठ चढाया, त्याही जगज्जेत्या ब्रिटिशाच्या ज्याच्या साम्राज्यावरचा सूर्य मावळत नव्हता, त्या आग्लस्थानी मडळीना एव्ह-



मराठी ग्रंथ सग्रहालय ठाणे

रेस्ट विजय प्रयत्न कर-करूनही मिळत नव्हता दुसऱ्या महायुद्धानतर मात्र दक्षिणेकडून आरोहणाचा नवा अध्याय सुरू झाला तोही सर्ग तितकाच आव्हानपूर्ण मानवी शक्ती-बुद्धीची परीक्षा पाहणारा तितकाच कष्टदायक

# एव्हरेस्ट कहाणीतील पुढचे पर्व



# ८ एव्हरेस्ट कहाणीतील पुढचे पर्व

१९४७ साली राजकीय वातावरण निवळू लागले अन् एव्हरेस्टच्या आव्हानाकडे पुन्हा लक्ष जाऊ लागले अर्ल डेनमान या कॅनेडीयन गिर्यारोहकाने शेर्पा तेनसिंग नोर्गे आणि आंग दोवा याना बरोबर घेऊन एव्हरेस्ट शिखरावर जाण्याचा एक प्रयत्न केला या मोहिमेला असा प्रयत्न करण्याची परवानगी मिळालेली नव्हती. आर्थिक– तात्रिक– साधनसामुग्री विषयक अडचणीही पर्वताएवढ्याच मोठ्या होत्या तिबेटी शासनाची परवानगी नसल्याने ही मोहीम चोरून मारून उरकण्याचा प्रयत्न होता अनेक वेळा उपासमारही घडत होती परतु सर्वच गोष्टींची कमतरता असल्याने नॉर्थकोलच्या थोडे खाली जाण्याची यांची कामगिरी स्तुत्यच मानली पाहिजे या अपयशाने धडा घेऊन डेन्मनच्या पुढच्या वर्षीच्या अशाच विनापरवाना प्रयत्नाला मात्र कोणाचीच साथ मिळाली नाही, व ती सकल्पित मोहीम कायमची बारगळली

१९४७ मध्ये भारताला स्वातत्र्य मिळाले ब्रिटिश हिंदुस्थानचे सत्ताधीश म्हणून ब्रिटिशांना मिळणारा मान व सवलती कमी झाल्या होत्या झोपलेला चीन जागा झाला होता लाल चीनने तिबेटच्या निर्वैर शाततेला ग्रहण लावायला सुरवात केली होती नेपाळची गिर्यारोहणाकडे पाहण्याची दृष्टी निवळू लागली होती एव्हरेस्ट मोहिमांमुळे मिळणारा रोजगार व आर्थिक नफा याकडे या गरीब राष्ट्राला दुर्लक्ष करून चालणार नव्हते आपल्या प्रदेशातून एव्हरेस्टवर स्वारी करू देण्यास नेपाळ तयार झाले आणि 'एव्हरेस्ट इडस्ट्री'ची पायाभरणी झाली

हॅरॉल्ड डब्ल्यू टिलमनच्या नेतृत्वाखाली दहावी मोहीम आणि दक्षिणेकडील पहिलीच मोहीम एव्हरेस्टकडे कूच करू लागली एडमड हिलरी, टॉम बॉर्डीलॉन, डब्ल्यू एच मुरे, डॉ चार्लस हौस्टन अशी नामवत मडळी या इग्लिश तुकडीत समाविष्ट होती पण खुबू हिमानीच्या आइसफॉलपर्यंतच त्याना जेमतेम मजल मारता आली

एव्हरेस्टवरील अकरावी मोहीम डेन आर बी लार्सनची या एकाड्या शिलेदारीची कथा मोठी सुरस आहे त्याने नेपाळच्या बाजूने चढाईला सुरवात केली

खरी, पण शिखरावर जाण्यासाठी त्याने तिबेटकडील नॉर्थकोल / उत्तरप्रपाती उचवट्यापर्यंत म्हणजे ६८७०मी /२२९०० फूट उंचीपर्यंतच त्याला मजल मारता आली यापुढची चढाई मात्र त्याला जमली नाही

१९५१ मध्येच एरिक शिप्टनच्या नेतृत्वाखालील बारावी एव्हरेस्ट मोहीम २२ सप्टेंबर १९५१ रोजी खुबू हिमानीशी पोहचली तेथून खुबू आइसफॉल, मग हिमतसराळे (वेस्टर्न कूम), त्यानतर ल्होत्सेकडा मग कुलियार म्हणजे हिमसपथा-वरून दक्षिण कोल हा मार्ग या मोहिमेने निश्चित केला यांनी ठरविलेला हा मार्गच पुढे एव्हरेस्टची मळवाट बनला

१९५२ मध्ये एरिक शिप्टनच्याच नावावर एका अनधिकृत, अयशस्वी अशा तेराव्या मोहिमेची नोंद मिळते त्याचा तपशील मात्र उपलब्ध नाही

## एव्हरेस्ट धोक्यात !

१९५२ मध्ये ॲडॉर्ड विस ड्यूनांटच्या नेतृत्वाखालील स्वित्झलँडच्या गिर्या-रोहण मोहिमेने ब्रिटिशांची मक्तेदारी संपुष्टात आणली राजरोसपणे परवानगीचे सर्व सोपस्कार पुरे करून ही मोहीम निघाली होती. अवघे तेरा शेर्पा या मोहिमेला मदत करायला तयार झाले शेर्पा तेनसिंग हा शेर्पांचा प्रमुख होता २९ मार्चला काठमांडू सोडून १६ दिवसांत ही मडळी नौचे / नामचे बझारला पोहोचली या पुढच्या बर्फाळ प्रदेशात काही स्विस संशोधकाना हिमात उमटलेली पावले आढळली या ठशांचे मोजमाप ११॥ इच × ४॥। इंच/२८ ७५ से मी × १० ८ से मी असे होते हे हिममानवाचे किंवा यतीचे ठसे असावेत असा निष्कर्ष त्या वेळी काढण्यात आला होता.

खुबू हिमानीच्या खुबू आइसफॉलचे अवघड अडथळे पार करून एका प्रचड हिमघळीशी (बर्गश्रुंड) ही तुकडी आली आस्पर या स्विस गिर्यारोहकाने ही घळ ओलांडण्याचे साहस करून हिमतसराळ्यात (वेस्टर्न कूममध्ये) पाऊल टाकले व पुढचा मार्ग खुला केला. डाव्या बाजूला एव्हरेस्ट पर्वत, समोर ल्होत्से शिखराचा अवघड कडा आणि उजव्या हाताला नुप्त्सेची कातेरी शिखरमाला यामध्ये बेचक्यात सापडलेली निःशब्द शांततेची दरी किंवा ६०९६ मी /२०,००० फूट उंचीवरील हा हिमतसराळ्याचा भाग आहे या दरीत चौथा आणि ल्होत्से शिखराच्या पायथ्याशी पाचवा तळ ठोकून स्विस गिर्यारोहक आत्मविश्वासाने पुढे पुढे जात होते यापुढील चढाईसाठी लॅम्बर्ट, ऑबर्ट, फ्लोरी आणि शेर्पा तेनसिंगची निवड झाली

साऊथ कोलच्या थोडे खाली प्रचड थंडीला तोंड देत ७८७९ मी /२५८५० फूट उंचीवर तळ उभारण्यात यश मिळाले तेथून ८३८२ मी /२७५०० फूट उंची गाठून तेथे पुढचा तळ उभारला गेला या उंचीवरील भयाण वातावरणात लॅम्बर्ट

आणि तेनसिंग यांनी मुक्काम केला त्यापुढची ६५० फूट / १९८ मी / उंची गाठायला त्याना तब्बल पाच तास लागले ८६१० मी /२८२५० फूट उंचीवरून ते परत फिरले पण या बाजूने एवढी उंची गाठणारे ते पहिलेच गिर्यारोहक ठरले.

१५ वी मोहीम डॉ ग्रॅबियल शिव्हलरीच्या स्विस गिर्यारोहरण पथकाची होती गिर्यारोहक सभासद व भारवाहक मिळून चारशे माणसाचा हा तांडा होता. सप्टेंबरमध्ये म्हणजे पावसाळ्यानतर लगेचच आरोहण करणारी ही तुकडी होती त्यामुळे त्याच्या अडचणी वाढल्या होत्या लॅम्बर्ट आणि तेनसिंग या जोडगोळीला ८१०० मी /२६५७५ फूट इतकीच उंची या वेळी गाठता आली एकाच वर्षात एव्हरेस्टवरचे हे दोन्ही हल्ले निरर्थक ठरले या मोहिमेनतर नेपाळचे राजे त्रिभुवन यांनी शेर्पा तेनसिंगला ' नेपाल प्रतापवर्धक ' हे बहुमानाचे पदक बहाल केले.

## लाल अस्वलांची बांबूच्या पडद्याआडून एव्हरेस्ट मोहीम

तिबेटचा घास लाल चीनने पचवला होता रशियन कम्युनिस्ट आणि चिनी कम्युनिस्ट यांची दोस्ती वज्रलेप होऊ पाहत होती भांडवलदार–साम्राज्यवादी ब्रिटिशांना न जमलेले जर साम्यवादी रशियाला जमले असते तर तो विजय दैदीप्यमान ठरला असता चिनी सत्ताधीशाच्या मदतीने बांबूच्या पडद्याआड अत्यत गुप्ततेने रशियन मोहीम डॉ पॉवेल डाश्चनोलिअनच्या नेतृत्वाखाली एव्हरेस्टवर चढाई करण्यास सिद्ध झाली त्या बाजूने ८०४६ ८ मी/२६४०० फूट उंची गाठताना तब्बल नऊ गिर्यारोहकाचा मृत्यू ओढवला होता या नाट्यमय मोहिमेचा शेवटही गुप्ततेत झाला आजही रशियन सत्ताधीश अशा मोहिमेचा इन्कारच करतात पण चिनी छळाला कंटाळलेल्या तिबेटी निर्वासिताकडून काही बातम्या बाहेर फुटल्या. पुढे रशिया चीन तेढ विकोपाला गेल्यावर या मोहिमेच्या बातम्याबद्दल गुप्तता पाळण्याचे सोडून दिले गेले पीटर हेक्लरच्या ' एव्हरेस्ट– इम्पॉसिबल व्हिक्टरी ' या पुस्तकात या मोहिमेबद्दल थोडी अधिक माहिती मिळते एव्हरेस्टवरील सोळाव्या मोहिमेची अशी वासलात लागली

प्रोफेसर येव्हगेनी 'टॅम, या १९८२ च्या अधिकृत रशियन एव्हरेस्ट मोहीम प्रमुखाने १९८५ च्या दार्जिलिंगमधील माउटेनियरिंग ॲण्ड टूरिझमसमीटच्या वेळी मात्र १९५२ मधील रशियन एव्हरेस्ट मोहिमेचा स्पष्ट शब्दात इन्कार केलेला आढळतो या तथाकथित रशियन मोहिमेचे भूत म्हणजे रशियाविरोधकांचा वृत्तपत्रीय कावा आहे, अशा शब्दात त्यांनी आपला अभिप्राय नोंदवला

' फेसेस ऑफ एव्हरेस्ट ह्या मेजर एच् पी एस् अहलुवलियाच्या पुस्तकात थोडी जास्त माहिती मिळते ती अशी–१६ ऑक्टो १९५२ रोजी मॉस्कोहून डॉ. पॉवेल डाश्चनोलिअन या आर्मेनियन गिर्यारोहकाच्या नेतृत्वाखालील पहिली रशियन

मोहीम उत्तरेकडून एव्हरेस्ट गाठण्यास निघाली ३५ गिर्यारोहक व ५ शास्त्रज्ञाचा त्यात समावेश होता प्रोफेसर योंडोम्नॉव्ह हा भू-शास्त्रज्ञ आणि डॉ डेंगमॉरोव्ह हा ह्यूमन फिजिऑलॉजिस्ट त्यात सामील झाला होता. नोव्होसिबिर्सकहून इर्कुटस्क मार्गे ल्हासाला ५ लष्करी विमानानी मोहिमेचे साहित्य नेले १ महिन्याच्या प्रयत्नानतर ६ गिर्यारोहकांचा २६,८०० फूट/८१८० मी उचीवर डॉ पॉवेल डाश्चनोलियन, काझिन्स्की, अलेक्झांड्रोव्हीच आणि लॅनित्सोव्ह व आणखी दोन गिर्यारोहकाचा मृत्यू झाला व अपयशी तुकडी २७ डिसेंबर ५२ रोजी नसुलानला परतली २६,८०० फूट / ८१८० मी. उचीवर आठवा तळ ठोकलेल्या या मोहिमेला अंती अपयश पत्करावे लागले या अपघातात सापडलेल्याना मदत तुकडी पाठवली तिने १८ दिवस प्रयत्न करूनही हाती काही लागले नाही ५३ साली पुन एक शोध पथकही पाठविले गेले होते

## ब्रिटिशाचा निकराचा हल्ला आणि यश ! १९५३ !

ब्रिटिशाना पुन्हा सधी मिळाली जमले तर आत्ताच, नाहीतर कधीच नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली होती १९५२ मध्ये स्विस गिर्यारोहकाकडून एव्हरेस्ट विजय अगदी थोडक्यात हुकला होता फ्रेंच, स्विस नेपाळमधून आणि रशियन, तिबेटमधून एव्हरेस्टवर पदन्यास करण्याचा धोका होता साम्राज्य घालविणाऱ्या ब्रिटिशाना आपली मान अजूनही ताठ ठेवण्यासाठी एव्हरेस्ट विजयाचा आधार हवा होता हा पहिला विजय मिळवण्याची ही शेवटची सधी होती

१ मार्च १९५३, दार्जिलिंगहून एव्हरेस्टच्या दिशेने आगेकूच सुरू झाली कर्नल जॉन हट तुकडीचा नेता होता या तुकडीत अनेक भल्या बहाद्दरांचा समावेश होता

चार्लस इव्हान्स हा तेहतीस वर्षाचा F R C. S पदवीधारक डॉक्टर होता लिव्हरपूलच्या वॉल्टन हॉस्पिटलमध्ये तो डॉक्टरी करीत होता तीन हिमालयीन मोहिमाचा अनुभव त्याच्या पाठीशी होता

टॉम बोर्डीलॉन—हा अठ्ठाविशीतील तरुण उत्कृष्ट प्रस्तरारोहक होता गिर्यारोहणाचा बराच अनुभव होता चो ओयू गिर्यारोहण मोहिमेतही हा सहभागी झालेला होता पदार्थ विज्ञानाचा पदवीधारक असणारा टॉम चागला उचापुरा अन् दणकट होता

अल्फ्रेड ग्रेगरी हा ब्लॅकपूलमध्ये एका प्रवासी सस्थेचे काम करीत असे ३९ वर्षांच्या या गिर्यारोहकाला इंग्लड, आल्पस्मधील आणि चो ओयू शिखरावरील मोहिमांचा अनुभव होता

एडमड हिलरी हा न्यूझीलडचा नागरिक डोंगरांचे वेड असणारा हा धडधाकट,

उंचापुरा, तगडा तरुण ३३ वर्षांचा होता न्यूझीलडमध्ये ऑक्लडजवळ मधमाश पाळण्याचा त्याचा व्यवसाय होता

जॉर्ज लोव हाही न्यूझीलडवासीय बर्फाळ प्रदेशात वावरण्याचा प्रचड अनुभव आणि आवड हे याचे प्रमुख गुण होते अवघ्या २८ वर्षांचा हा गिर्यारोहक न्यूझीलड-मधील हेस्टिंग्जमध्ये प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करीत होता

चार्लस् वायली हा गुरखा ब्रिगेडमध्ये काम करणारा आणि मोहिमेच्या सपूर्ण आयोजनात अगदी बारीकसारीक तपशिलाकडे लक्ष देणारा उत्साही तरुण ३२ वर्षे वयाचा होता

मायकेल वेस्ट मॅकॉट हा २७ वर्षांचा तरुण ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या गिर्या-रोहण मडळाचा माजी अध्यक्ष होता रॉथमस्टेड इथल्या सख्याशास्त्र प्रायोगिक केंद्रात हा काम करीत असे

जॉर्ज बँड हा तेवीस वर्षांचा उचापुरा तरुण केंब्रिजचा पदवीधर होता. तिथल्या गिर्यारोहण मडळाचा हा माजी अध्यक्ष होता गिर्यारोहणात त्याने चागले नाव कमावलेले होते

विलफ्रिड नॉइस हा ३४ वर्षांचा शालेय शिकक्ष; चार्टरहाउस येथील शाळेत नोकरी करीत असे एक लेखक म्हणूनही तो नावाजलेला होता (१९५३ च्या एव्हरेस्ट मोहिमेवर लिहिलेले साऊथ कोल हे त्याचे पुस्तक गाजलेले आहे) दुसऱ्या महायुद्ध काळात बर्फाळ प्रदेशातील सैनिकी शिक्षणात मार्गदर्शक म्हणून काश्मीर-मध्ये उघडलेल्या सैनिकी केंद्रात तो काम करीत होता

मायकेल वॉर्ड हा २७ वर्षांचा डॉक्टर पूर्वीच्या एव्हरेस्ट मोहिमेत सहभागी झालेला होता

४२ वर्षांचा जॉन हट, १५ व्या वर्षापासून गिर्यारोहणाचे धडे गिरवीत होता हिमालयीन गिर्यारोहणाचा त्याला चांगलाच अनुभव होता

शेर्पा तेनसिंग नोर्गे याला शेर्पा भारवाहकांचा सरदार म्हणून तर निवडले होतेच, पण त्याला पुढे प्रत्यक्ष मोहिमेचा सभासद म्हणूनही समाविष्ट करण्यात आले होते तेनसिंगची व एव्हरेस्टची पूर्वी सहा वेळा झटापट झालेली होती त्याने लॅम्बर्ट-बरोबर एव्हरेस्टवर केलेला हल्ला थोडक्यात हुकला होता

अशी ही तुकडीची जमवाजमव झाली ३५० भारवाहकानी मोहिमेचे सामान काठमांडूहून एव्हरेस्टच्या दिशेने न्यायला सुरुवात केली १० मार्च ते २५ मार्च असा प्रवास नामचे बझारपर्यंत झाला इथून पुढे विरळ वातावरणाशी समरस होण्यासाठी आसपासच्या छोट्या मोठ्या शिखरावर ही मडळी पाय मोकळे करून येत व गिर्यारोहण तत्राचाही सराव करून घेऊ लागली

१५ एप्रिल ते १५ मे या काळात एव्हरेस्टच्या पायतळापासून पुढे शिखराच्या

दिशेने एकेक तळ उभारण्यासाठी सुरवात केली गेली. प्रत्येक तळावरील सुसज्ज तबूत अन्नपाणी, औषधे, निद्राथैल्या, स्टोव्ह, गिर्यारोहणसामग्री साठविली जाऊ लागली यश मिळवायचं तर अशा सुसज्जतेची निश्चितच आवश्यकता होती

शेवटच्या चढाईसाठी २३ मे रोजी हिमतसराळ्यातून बोर्डीलीन व इव्हान्स याची तुकडी निघाली कर्नल हट स्वत काही भारवाहक घेऊन त्याना मदतनीस म्हणून निघाला पण वाटेत चढाई करता करता हट व भारवाहक थकले त्यानी खालच्या तळावर जाण्याचे ठरविले २५ मे १९५३ रोजी दुपारी एकच्या सुमारास बोर्डीलीन व इव्हान्स ७७५४ मी/२८७२० फूट इतक्या उचीवर पोहोचले पण इतक्या उचीवर प्रत्येक ग्रॅम व प्रत्येक सेंटीमीटरला अफाट किंमत असते जेमतेम शभर मीटर/३०० फूटावरचे एव्हरेस्ट गाठणे त्याच्या शक्तीच्या बाहेरचे व त्याच्या वेळापत्रकात न बसणारे होते बरोबरचा प्राणवायूचा साठा बेताचाच होता सरळ उची जरी थोडी होती, तरी ती काही सरळ चढण नव्हती खूप चढउतार वाटेत होते तिथपासून शिखरावर जाऊन परत यायला पाच सहा तास लागणार होते. अंधारात खूप दमल्यावर इतक्या उचीवर रात्री तळावरील तबूची शोधाशोध करणं जमेल का ? प्रचड वारा आणि थडीत उघड्यावर अन्नपाण्याशिवाय रात्र काढावी लागण्याची शक्यताही डोळ्याआड करता येणार नव्हती

एव्हरेस्टचा माथा आणि मृत्यूचा जबडा हातात हात घालून सामोरे उभे ठाकले होते त्यांना निर्णय घेणे भाग होते खालच्या तळावर असलेले हट व साथीदार याना हे काळे ठिपके शिखराजवळ गेलेले दिसले त्याना यश मिळाल अशा आनदात ते होते पण बोर्डीलीन व इव्हान्स यानी परतीचा निर्णय घेतला हा निर्णय चूक की बरोबर यावर चर्चा करण्यात काहीही अर्थ नाही यशाचा प्याला इतक्या जवळ असताना– एक विश्वविजय नजरेच्या टप्प्यात आलेला असताना त्यानी तो दूर सारला खर तर त्यानी थोडाफार खोटेपणा करून एव्हरेस्ट विजयाची बाजारगप्प उठवली असती, तर ती पचूनही गेली असती पण मोठ्या प्रामाणिकपणे त्यांनी आपले अपयश आठव्या तळावर पोहोचलेल्या हिलरी व तेनसिंगला सागितले २५ मे रोजी हिमतसराळ्यातून हिलरी-तेनसिंग– लो– ग्रेगरी यांची तुकडी हट– बोर्डी-लीन– इव्हान्स याच्या मागोमाग निघाली होती

आठव्या तळावर हिलरी, लो, ग्रेगरी, तेनसिंग, नियमा व पेम्बा असे सहा जण होते २८ मे रोजी झालेल्या श्रमामुळे लो व ग्रेगरी याचे त्राणच सपले आणि हिलरीने, तेनसिंग व हिलरी ही जोडी २९ मे रोजी प्रयत्न करण्यासाठी निवडली रात्री आठव्या तळावर फक्त हिलरी व तेनसिंग मुक्कामाला होते रात्री बिस्किटे– खजूर– अक्रोड– जाम– मध– गरम सूप असा हलका आहार घेऊन 'उद्या काय ?' याबद्दल विचार करीत इवल्याशा तबूत घोघावणाऱ्या वाऱ्यात दोघेजण झोपले गरम

कॉफी आणि लिंबाच्या भुकटीचे सरबत याचा डोस आवश्यक होता तोही अगदी झोपायच्या आधी पोटात रिचवला होता

पहाटे पहाटे तेनसिंगला स्वप्नात सोलोखुंबूतील स्वत:चे घर, चरणारे याकचे कळप आणि एक पांढराशुभ्र घोडा दिसला श्वेत अश्वाच्या मागे उत्तुंग एव्हरेस्ट दिसत होते हे त्याच्या लोकसमजुतीप्रमाणे शुभ चिन्ह होते विजयासाठी आवश्यक असणाऱ्या मनोधैर्य वाढवणाऱ्या या स्वप्नाचा त्याला खूप उपयोग झाला पहाटे साडेतीनला तेनसिंग उठला त्याने स्टोव्ह पेटवून गरम कॉफी अन् लिंबाच्या भुकटीच्या सरबताची तयारी केली तंबूतून बाहेर पाहिले तो तेंगपोचेच्या (थँग-बोचेच्या) पवित्र मठाचे दर्शन झाले चौथ्या क्रमांकाचे ल्होत्से शिखर, आग्नेयेकडचे मकालू आणि दूरवरचे कांचनगंगा असे सारे उत्तुंग त्याच्या तळापेक्षा खालच्या उंचीवर स्पष्टपणे दिसत होते

सकाळी साडेसहा वाजता सारा जामानिमा आटोपून मंडळी विश्वकळसाकडे पावले टाकू लागली १८–२० किलो वजनाचे सामान त्याच्या पाठीवर होते त्यात मुख्य वजन प्राणवायूच्या नळकांड्याचेच होते थंडीला तोंड देण्यासाठी एकावर एक तीन हातमोजे, बुटाला खिळ्याचे तळवे (क्रॅम्पॉन्स), हातात हिमकुठार, डोळ्यावर काळा चष्मा होता निमाने (तेनसिंगची मुलगी) दिलेली लाल निळी पेन्सिल तेनसिंगने खिशात घातली हिमकुठारीला युनो (संयुक्त राष्ट्रसंघ), इंग्लंड, भारत व नेपाळ यांची निशाणे गुंडाळली शिखर देवाला अर्पण करण्यासाठी चॉकलेट–बिस्कीट व खडीसाखरेचे खडे घेतले 'आज आमच्यावर कृपा कर' अशी परमेश्वराची करुणा-भाकून दोघेजण तिसऱ्या ध्रुवाकडे निघाले होते

शिखर चढाईच्या तळावरून दक्षिण शिखराच्या दिशेने ही जोडगोळी आगेकूच करू लागली बरोबर एक वर्षापूर्वी खराब हवेत अन् प्रतिकूल परिस्थितीत लँबर्ट व तेनसिंग पोहोचलेली जागा मागे पडली सकाळी ९ वाजता एव्हरेस्टच्या दक्षिण शिखरावर ही दुक्कल पोहोचली इथवर पोहोचण्यात त्यांच्या आधी बोर्डीलीन व इव्हान्स यांना यश मिळाले होते इथवरच्या अडीअडचणींची कल्पना होती आता पुढचा सारा प्रवास अज्ञाताचा होता शिखर माथ्यापर्यंत जाण्यात काही अडचणी येतील का, यश मिळेल का, हा विचार पिंगा घालीत होताच

अती अरुंद नि बराच चढ असणाऱ्या कड्यावरून जाताना तोल सांभाळण्याची कसरत करावी लागणार होती डाव्या उजव्या बाजूला तोल गेला तर शेकडो मीटर खाली घसरून पडण्याची शक्यता होती हा टप्पाही पार केला आता खडकाचा एक सुळका सामोरा आला यालाच पुढे हिलरी स्टेप म्हणू लागले त्यावर हिलरीने पहिल्याप्रथम आरोहण केले तेनसिंगने खाली सोडलेल्या दोराचा उपयोग करून पण स्वत:च्या ताकदीवर हा टप्पा पार केला आता शिखरमाथा समोरच दिसत

होता हिलरी आणि तेनसिंग त्या दिशेने पावले टाकू लागले धापा टाकीत पण आत्मविश्वासाने टाकली जाणारी पावले अखेर विश्वकळसाच्या माथ्यावरच विश्रांती घेण्यासाठी थाबली

प्रथम विचार आला— सपली चढाई, थाबली बर्फात पायऱ्या खोदण्याची कटकट ' मग ध्यानी आल— मानवाची कित्येक वर्षांची तपश्चर्या— धडपड—आत्मार्पण याची सागता झाली होती तेनसिंग उद्गारला, 'थुजीचे ! चोमोलुगमा थुजीचे ! ! ' ' एव्हरेस्ट, मी तुझा ऋणी आहे ! ! ! .' २९ मे १९५३ दुपारी साडेअकरा वाजता तेनसिंग नोर्गे आणि एडमड हिलरी एव्हरेस्टच्या माथ्यावर पोहोचले हा विश्व-कळस— हा तिसरा ध्रुव, पादाक्रात झाला होता त्यांनी हस्तांदोलन केल तेनसिंगने तर हिलरीला मिठीच मारली व त्याची पाठ थोपटली तेनसिंगच्या हिमकुठारीवरचे चारही ध्वज फडकू लागले या अत्युच्च आनदाच्या क्षणाचे चित्र तुमच्या-आमच्या-साठी हिलरीने कॅमेऱ्यात बदिस्त केले

तेनसिंगने अत्यत आदराने शिखरदेवाला, बुद्धदेवाला स्मरणपूर्वक नैवेद्य ठेवला निमाने दिलेली लाल—निळी पेन्सिल ठेवली हिलरीने छोटा क्रूस तिथेच बर्फात पुरला व येशू ख्रिस्ताचे स्मरण केले

अवघ्या १५ मिनिटाचे ते वास्तव्य त्याच्या लेखी ' आनदाचे डोही— आनद तरग ' असेच होते अधार पडण्यापूर्वी तळावर पोहोचण भाग होते शिखर विजयाची बातमी सहकाऱ्याना कळण जरुरीच होत त्याच्या यशाचा पाया या सोबत्यांनीच रचला होता पधरा मिनिटानी त्या सर्वोच्च शिखरावरून त्यांनी परतीच्या प्रवासाला सुरवात केली

मगाचचा सुळका— (यालाच आता हिलरी स्टेप म्हणून ओळखतात) अवघड निरुद कडा, सारे चढ उतार सपवीत ते दक्षिण शिखरावर आले रात्रीच्या मुक्का-माच्या तळाशी आले तेव्हा ते दोघे प्रचड दमले होते हा ताण त्याना असह्य झाला होता लो आणि नॉइस त्यांच्या स्वागताला हजर होतेच तबूत तयार असलेले गरम गरम अन्नाचे चार घास पोटात ढकलून दोघेजण झोपून गेले

३० मे ५३रोजी हळूहळू ते खाली उतरू लागले पाचव्या तळावरून चौथ्या तळाकडे ते जाऊ लागले शिखर जिकल्याचा सकेत कर्नल हटला मिळाला मग सारा चौथा तळ आनदाच्या— यशाच्या बातमीने धुद झाला आरोळ्या-ओरडणे— नाचणे— गाणे— मिठ्या मारणे— हस्तादोलने याना ऊत आला आनदाच्या पावसात अन् यशाच्या उन्हात ते सारे न्हाऊन निघत होते आता हे प्रसग त्यांच्यावर वारवार येणार होते हुलकावण्या देणाऱ्या यशाला काखोटीला मारून त्यानी असाध्य ते साध्य केले होते खालच्या तळावर त्याना इंग्लडची राणी व पतप्रधान यांच्या शुभेच्छा ताराही मिळाल्या थामे गावी परतीच्या प्रवासात तेनसिंगची आई त्याला

भेटली विजयामुळे कृतार्थ झालेल्या तेनसिंगला तिने विचारले– 'पुन्हा नाही ना तेथे जाणार ?' तिला लोककथांमध्ये एव्हरेस्टवर राहणाऱ्या आकाशी निळ्या रंगाच्या नि सोनेरी आयाळ असणाऱ्या सिंहाची अन् तिथल्या सोनेरी चिमणीची भीती वाटत होती

तेंगपोचे (थँगबोचे) इथल्या धर्ममठातील लामाना या यशाच्या बातमीवर विश्वासच ठेवता येत नव्हता पण त्यांनीही मनापासून अभिनदन केले

काठमाडूत नेपाळचे राजे त्रिभुवन व पतप्रधान कोईराला यानी गौरव केला दिल्लीत भारताचे राष्ट्रपती डॉ राजेंद्रप्रसाद आणि पतप्रधान पडित जवाहरलाल नेहरू यांनी चादीच्या ढाली देऊन सत्कार केला कराची--कैरो-- रोम-- झुरिच अशा गावी मानाची पाने घेत, ३ जुलैला लडनला ते पोहोचले तिथला त्याचा सत्कार म्हणजे त्यांच्या पराक्रमावरचा अखेरचा शिक्कामोर्तबच होता

डोंगरपुत्र तेनसिंगला थोड कडू अन् पुष्कळ गोड अनुभवाची शिदोरी गाठीला बाधता आली 'भारवाहक तेनसिंग'चा आता 'एव्हरेस्टवीर तेनसिंग' झाला होता प्रसिद्धीच्या झगमगाटात तो दिपून जात होता मोठ्या माणसाची छोटी मने अन् छोट्याचे मोठेपण यांचे कगोरे त्याला फार जवळून पाहता आले एव्हरेस्टवर चढण सोप पण ते यश डोक्यात भिनू न देता पचवण अवघड हे त्याला स्वानुभवावरून पटले होते

## एव्हरेस्ट विजयामागील गुप्तता–

ज्यांच्या साम्राज्यावरचा सूर्य मावळत नव्हता, त्या ब्रिटिशांचा केवढा दरारा होता याची कल्पना आजच्या पिढीला येणारच नाही तिबेट आणि नेपाळ या राष्ट्राच्या ब्रिटिश वसाहती झाल्या नव्हत्या, पण त्या पट्टेरी पकडीत या राष्ट्राना इंग्लडने पूर्णपणे कह्यात ठेवलेले होते रॉयल जिओग्राफिक सोसायटी, लडन टाइम्स आणि तमाम ब्रिटिश मडळी याना एव्हरेस्टच जणू काही दानच मिळाल होत या सोमाजी गोमाजी कापशांनी ही सारी मक्तेदारी भरपूर उपभोगलीदेखील एव्हरेस्ट-वर स्वारी करण्याचा (आणि दरवेळी अपयश घेऊन परत फिरण्याचादेखील !) मक्ता फक्त ब्रिटिशानाच मिळाला होता आणि एव्हरेस्टच्या बातम्या छापण्याचा अग्रमान व अधिकार फक्त 'लडन टाइम्स'ला मिळाला होता लडन टाइम्सच्या सौजन्याने कलकत्याच्या स्टेटस्मनला या बातम्या पुनर्मुद्रित करण्याची सवलत मिळाली होती इतर वृत्तसस्थाना 'एव्हरेस्ट' हा विषय आधी चघळायला मिळ-ण्याची कोणतीही शक्यता नव्हती

ब्रिटिशांनी आपलं चबूगबाळ या भागातून नुकतच आवरत घेतल होत आदल्या वर्षी तेनसिंग आणि लॅम्बर्टचा एव्हरेस्टवरील पदन्यास केवळ दुर्दैवाने हुकला होता

आणि ८६६० मी/२८१०० फूट उचीवरून त्यांना परतावे लागले होते लालभाई रशियनाची एव्हरेस्ट मोहीम होणार अशा वावड्याही उठल्या होत्या शिवाय स्विस, फ्रेंच, अमेरिकन मंडळीही पुढच एव्हरेस्टच बुकिंग करून बसली होती त्यामुळे 'एकतर आत्ताच नाही तर कधीच नाही' अशी स्थिती एव्हरेस्टबाबत कर्नल हटच्या मोहिमेची झाली होती 'पहिला एव्हरेस्ट विजय आणि तोही ब्रिटिश मोहिमेचाच!' हे स्वप्न कायमच उराशी बाळगल होत त्याचा चक्काचूर होऊ देण भावनात्मक दृष्ट्या न परवडणार होत त्यामुळे ब्रिटिश मोहिमेच्या विजयाची शक्यता खूपच उचावली होती

राजकीय पाठिंब्याअभावी 'टाइम्स'वर थोडी पडती बाजू आली होती त्याचा फायदा उठवून ब्रिटिश विजयाची बातमी सर्वप्रथम मिळवून देण्याची संधी टिपण्यास रॉयटर आणि इतर वृत्तसस्थानी जिवाचे रान केले होते काठमांडूतील तार कचेरी, रॉयल हॉटेल या ठिकाणी बातम्या मिळवण्यासाठी आणि दुसऱ्याच्या बातम्या फोडण्यासाठी अनेक बुभुक्षित ठाण मांडून बसले होते खडे टाइम्स, डेली मेल, डेली एक्सप्रेस, रॉयटर अशांनी आपापली जाळी शक्य त्या सर्व ठिकाणी विणून ठेवली होती रॉयल हॉटेलचा मालक बोरिस लिसाने विच याने या साऱ्या परिस्थितीचा यथेच्छ फायदा उठवून आपला खिसा चांगलाच गरम करून घेतला यात नवल नाही

लडनच्या टाइम्सने पचखडांच पाणी चाखलेल्या मॉरीसची योजना 'एव्हरेस्ट विजयाची बातमी' न फुटता लडनला पोहोचविण्यासाठी केली होती बिनतारी सदेशयत्रणेतील कच्च्या दुव्यांची पूर्ण माहिती असल्याने हा मॉरीस गिर्यारोहण मोहिमेत सामील होऊन चक्क तिसऱ्या कॅंपशी पोहोचला होता लडनच्या कचेरीशी खास साकेतिक भाषा ठरवून घेऊन दररोज सायंकाळी आपल्या टाइपरायटरवर बातमी टाइप करून, ती पक्की सीलबद केलेली पाकिटे अक्षरश 'रिले रेस' पद्धतीने ७-८ दिवसात काठमांडूला पोहोचत आणि साकेतिक भाषेतील मजकूर उघडगीत्या काठमाडूहून तारकचेरीतून लडनला रवाना होई 'आज न्याहारीसाठी अमुकतमुक', 'जेवणाच्या वेळी हे किंवा ते', अशा या भाषेमुळे कोणालाच कोणता उलगडा होत नसे

३० मे रोजी ॲडव्हान्स बेस कॅंपवरून आलेल्या एव्हरेस्ट विजयाची कथा खुद्द एव्हरेस्ट विजेत्याकडून कळल्यावर मॉरीसच टकलेखन जोरात सुरू झाल सारे अडथळे ओलाडून मॉरीसची बातमी अग्रक्रमाने, न फुटता १ जूनला मध्यरात्री लडनला सुखरूप पोहोचली एलिझाबेथ राणीला ही विजयवार्ता तिची झोपमोड करून ऐकविली गेली राज्यरोहणाआधी तिला मिळालेला हा खास नजराणा होता!

२ जून ५३ च्या पहाटे राणीच्या राज्याभिषेकाच्या गोड बातम्यापेक्षा अधिक चवीने चघळली गेलेली ही सुवार्ता लडनमधील मडळींना आश्चर्याचा सुखद दणकाच

होती

वृत्तपत्रीय वर्तुळात मात्र एव्हरेस्ट विजयापेक्षा मॉरीसचा विजय हा अधिक नेत्रदीपक मानला गेला राणीला समयोचित नजराणा अर्पण करणारा हा वृत्त-वार्ताकार पुढे अधिकच गौरविला गेला

१९५० ते ६० हे दशक गिर्यारोहणात आगळे समजले जाते अन्नपूर्णा (२६५०४'/८०७८ मी ) शिखरावर मॉरीस हेरझॉग पोहोचला तर हर्मन बुल्ह याने नगा पर्वत (२६६५८'/८१२५ मी ) शिखरमाथा गाठला के-टू शिखरावर इटालियन गिर्यारोहक एल. लेसडेल्ली व ए कॉम्पॉग्नोनी यांनी १९५४ मध्ये पाय रोवला चो-ओयू हे सहाव्या क्रमांकाचे शिखर (२६८७०''/८१५३ मी ) हर्बर्ट टिचीने गाठले आणि कांचनगगा (२६१६८'/८५९७ मी ) या तिसऱ्या क्रमाकाच्या शिखरावर जाण्यात १९५५ मध्ये ब्रिटिशांनाच यश मिळाले मकालूचा (२७७९०'/८४८१ मी ) फ्रेंचानी १९५५ मध्येच पाडाव केला १९५६ मध्ये ल्होत्से (२७८९० फूट/८५०१ मी )वरही स्विस गिर्यारोहकानी पाय रोवले

## एव्हरेस्टचे हवाई चित्रीकरण–

भारतीयाची अजोड कामगिरी–

१९५३ मध्ये एव्हरेस्ट पर्वत शिखराचे विमानातून फोटो काढावेत आणि विजयाची अफाट शक्यता असणाऱ्या ब्रिटिश मोहिमेच्या प्रत्यक्ष आरोहणाचे चित्री-करण करावे अशी एक कल्पना पुढे आली परतु पर्वतशिखरी असणारे हिम व बर्फ-कडे प्रचड आवाजातील कपनामुळे सुटावतात व कोसळतात त्यामुळे विमानाच्या घरघराटाचा तसाच परिणाम होऊ शकेल व अपघातांची शक्यता वाढेल हे लक्षात येताच ही योजना बारगळली

परतु एव्हरेस्टच्या माथ्यावरून उडून एव्हरेस्ट व परिसराचे विमानातून चित्रीकरण ब्रिटिश मोहीम परतली की करावे ह्या कल्पनेने मूळ धरले आणि हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले भारतीय विमानदलाने ही कामगिरी स्वीकारली श्री सितू मलिक याच्याकडे या कामगिरीची सूत्रे सोपविण्यात आली

चार इजिनांचे दट्टयाच्या तत्रावर चालणारे ' लिबरेटर ' हे विमान त्यासाठी निवडण्यात आले पण इतक्या उचीवर गेल की विरळ हवेत श्वासोच्छ्वास करण कठीण होतं, त्या उचीवर थंडीही खूप असते या विमानात कृत्रिम रीतीने दाब वाढवणे व तपमान नियत्रित करणे शक्य नव्हते मग विजेच्या मदतीने सर्व यत्रणा, कपडे, कॅमेरे इ गरम ठेवण्याची यत्रणा वापरण्यात आली गया विमानतळावरून जूनच्या पहिल्या आठवड्यात ही विमानोड्डाणाची सिद्धता करावयास सुरुवात झाली

६ जून ५३ रोजी सकाळी ८ वाजता हे विमान एव्हरेस्टकडे निघाले विजयी

एव्हरेस्ट मोहिमेतील अनेकांनी डोक्यावरून जाणारे हे विमान पाहिलेदेखील, पण आपल्यासारखाच एक नवा पराक्रम घडवायला, इतिहास निर्माण करायला निघालेली स्वतंत्र भारताच्या हवाई विमानदलाची ही मोहीम आहे हे त्या वेळी अनेकांना ठाऊकच नव्हते मात्र मान्सूनच्या आगमनामुळे थोडी अनिश्चितता निर्माण झाली होतीच

पाऊसभरल्या काळ्या ढगातून आपली डोकी उचावून सोनेरी उन्हात बसलेली ही हिमशिखरे फारच मोहक दिसत होती, असं त्या मोहिमेत भाग घेतलेल्या सदस्यांनी लिहून ठेवले आहे

गयेपासून अवघ्या ४०० कि मी अतरावरचा हा विश्वकळस ९७५३ मी / ३२००० फूट उचीवरून फारच देखणा दिसत होता आजूबाजूचे बुटके त्याच्या जेमतेम खांद्याशी पोहोचत होते

शोवलालच्या उणे १७ अंश सें तपमानात, तब्बल तासभर एव्हरेस्टभोवती घिरट्या मारून 'हिमशिखरांच्या राजाचे' चित्रीकरण चालू होते एवढ्यावर समाधान झाले नाही, म्हणून दुसऱ्या दिवशी म्हणजे ७ जून ५३ रोजीही पुन्हा एक संधी घेण्यात आली त्यातही असेच यश मिळाले ढगाच्या समुद्रातून डोकावणारी मकालू, कांचनगंगा, कैलास, हिमालयाच्या रांगा अन् तिबेटचं पठार देखणं दिसत होतं श्री सितू मलिक यांच्या नऊ सदस्यांच्या तुकडीने आपली कामगिरी यशस्वी केली होती स्वतंत्र भारताच्या विमानदलाने आपली श्रेष्ठता सिद्ध केली एव्हरेस्टची श्वेतधवल स्थिरचित्रे व रंगीत चलत् चित्रपट्टया मिळाल्या ही बातमीही जगभर वेगाने फैलावली

भारतीय विमानदलाच्या बेनेव्होलेंट फंडाला (कल्याणनिधीला) भरपूर देणगी देऊन या चित्रे व चित्रपट्टयांचा उपयोग करण्यासाठी कित्येक देकार जगाच्या काना-कोपऱ्यातून येऊ लागले राणीच्या राज्यारोहण प्रसंगी एव्हरेस्ट विजयाचा नजराणा मिळाला होताच, तशीच राष्ट्रकुल परिषदेसाठी गेलेल्या पंडित जवाहरलाल नेहरूंची मानही या यशस्वी हवाई चित्रीकरणाने ताठ होणार होती येणाऱ्या देकारांपैकी सर्वांत मोठा देकार स्वीकारून योग्य ती तजवीज करण्याबाबत पंडितजींना विचारणा केली गेली स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंतप्रधानांनी भारतीय विमानदलाच्या या थोर कामगिरीचे तोंडभर कौतुक केले पण ही चित्रे प्रसिद्ध करण्याचा मान मात्र इंग्लंडच्या 'द टाइम्स' या वृत्तपत्रालाच देण्याचा आदेश दिला खरं तर दुसऱ्या महायुद्धात निकामी बनलेल्या लिबरेटर या बॉम्बर विमानाच्या अमेरिकन भंगारा-तून भारतीय कारागिरांनी कानपूर येथे तयार केलेल्या मोचक विमानाने ही जोखीम पत्करून यशस्वी केली होती यातून होणारा आर्थिक फायदा भारतीय विमानदला-च्याच मदतनिधीसाठी उपलब्ध होणार होता मग हा निर्णय घेण्यात काय उद्देश

होता कोण जाणे ? श्री सितू मलिकाची ही मोहीम अयशस्वी ठरली असती तर ती गुप्तच राहिली असती आणि एखादा अपघात घडला असता तर नियमित सराव व प्रशिक्षणासाठी गेलेल्या विमानाचा हा मामुली अपघात होता असे जाहीर झाले असते, पण स्वतंत्र राष्ट्राच्या 'स्वत्वा'ला जपणाऱ्या, मानबिंदू ठरणाऱ्या यशस्वी मोहिमेचा फायदाही आपल्या 'जुन्या मालकाना' देण्यातच त्या वेळच्या सत्ताधीशांना कृतकृत्यता वाटली !

भारतीय हवाईदलाच्या या एव्हरेस्ट हवाई मोहिमेमध्ये ६ जून १९५३ व ७ जून १९५३ रोजी खालील सभासदांचा समावेश होता

उड्डाण चमू  फ्लाइट लेफ्टनंट ए डी पॉल (कॅप्टन)
फ्लाइंग ऑफिसर एस सी अरोरा (सेकंड पायलट)
फ्लाइंग ऑफिसर आर. के घगट (नॅव्हिगेटर)
सार्जंट एस के सरकार (फ्लाइट इंजिनीयर)
सार्जंट ए इ लक्रा (एअर सिग्नलर)

चित्रण चमू  फ्लाइट लेफ्टनंट एन डी जयाल
फ्लाइट लेफ्टनंट बॅनर्जी
फ्लाइंग ऑफिसर कोठारी
स्क्वाड्रनलीडर सितू मलिक

"जे सुदूर, जे असाध्य तेथे मन धावे" ही उक्ती तर खरीच पण एकदा ते साध्य झाले तरीही पुन पुन्हा तिथे जाण्याच्या प्रयत्नाची मालिका, यश-अपयशाच्या आडव्या-उभ्या धाग्यानी गुफलेली ही कहाणी एव्हरेस्ट विजयाला नवी मितीच देते

एक धाडसी-साहसी क्रीडाप्रकार म्हणून गिर्यारोहण आणि त्या अनुषगाने येणारे एव्हरेस्ट चढाईचे आव्हान, हे आता 'एव्हरेस्ट इंडस्ट्री' मध्ये रूपांतर होऊ पाहते आहे


एव्हरेस्टच्या भात्यातील शस्त्रे अजूनही तशीच परजलेली आहेत, हेच या पुढील मोहिमानी सिद्ध केले हा चौथा टप्पा

→



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. २०२८९
२/५/८०

पुनः पुन्हा एव्हरेस्ट चढाया.



# ९ पुनः पुन्हा एव्हरेस्ट चढाया.

२९ मे १९५३ चा एव्हरेस्ट विजय बऱ्याच शेर्पांना अजिबात आवडला नव्हता दरवर्षी वाढत्या सख्येने येणाऱ्या अन् चढत्या भावाने मजुरी देणाऱ्या आपल्या पोटापाण्याच्या बरकतीच्या व्यवसायावर आता ते सार बद झाल्याने पाय येईल अशी त्याची समजूत होती नेपाळच्या राजाने ' नेपाळतारा ' हा सर्वोच्च किताब देऊनही एव्हरेटच्या कुशीत जन्मलेला तेनसिंग– कायदेशीररीत्या भारतीय नागरीक म्हणून मिरवत होता ' थुजी चे चोमोलुगमा ' (' एव्हरेस्ट– तुझा मी ऋणी आहे,') अस म्हणणारा तेनसिंग त्याना दुरावला होता. अर्थात ' यश मिळाल तरी मानव आपले प्रयत्न थाबवीत नाही " हे सत्य सोलोखुबूतल्या साध्या-भोळचा शेर्पांना आता मनापासून पटल आहे आणि त्यामुळे त्याना हायसही वाटल आहे

एव्हरेस्ट शिखरावर पदार्पण आणि तदनतर एव्हरेस्टच्या डोक्यावर केलेली उड्डाणे ताजी असतानाच आल्बर्ट एगलर या कसलेल्या स्विस गिर्यारोहकाच्या नेतृत्वाखाली अकरा गिर्यारोहकाची तुकडी एव्हरेस्टची वाट चालू लागली होती वोल्फगाग डायेल हे उपनेते, हॅन्स ग्रीम (दतवैद्य), हॅन्स रुडॉल्फ, फॉन गुटेन (रसायनशास्त्रज्ञ), एडवर्ड ल्युथोड (डॉक्टर), फ्रित्झ लुखझिगर (सैन्य शिक्षणाधिकारी), युर्ग मार्मेट (यत्रज्ञ खटपटे व प्राणवायू तज्ज्ञ), फ्रित्झ म्युलर (भूगोलवेत्ते व हिमसशोधक), एर्न्स्ट राइस (मार्गदर्शक व विमान यत्रज्ञ,), ॲडॉल्फ राइस्ट (विमान तत्रज्ञ व प्रकाशचित्रण कलाकार) एर्न्स्ट श्मीड हे सभासद होते १९५२ मधील एव्हरेस्ट विजयाने थोडक्यात हुलकावणी दिली म्हणून, नाहीतर लॅम्बर्ट आणि तेनसिंग या जोडीच नाव पहिले एव्हरेस्ट विजेते म्हणून कायमच नोंदल गेल असत ते जरी हुकल असल तरी या वेळची सधी सोडायची नाही, अस पक्क ठरवून ही स्विस मडळी पूर्ण तयारीन निघाली होती सरदार पासाग दावा लामा याला शेर्पांचा प्रमुख म्हणून निवडण्यात आल होत के टू, मशेरब्रुम, चोमोल्हारी या शिखर मोहिमांमध्ये तो सहभागी झाला

होता आणि चो ओयू शिखरावरील डॉ. हर्बर्ट टिशि याच्या १९५४ च्या मोहिमेत त्याने प्राणवायूच्या नळकांड्याशिवाय तीन दिवसांत चो ओयूच्या शिखरमाथ्यावर पाय रोवला होता दावा तेनसिंग या दुय्यम सरदाराखेरीज २२ अनुभवी शेर्पांचा मोहिमेत समावेश होता श्री प्रचंड मानसिंग प्रधान हे या मोहिमेचे संपर्काधिकारी होते

३१ जानेवारी १९५६ रोजी मोहिमेने जिनिव्हा (जिनोआ) येथून प्रयाण केले १३ फेब्रुवारी ५६ रोजी ते सारे मुंबईत दाखल झाले मुंबई, लखनौ, जयनगर अशा रेल्वेप्रवासानंतर जयनगर, चिसापानी या टप्प्यावर सामान वाहून नेण्यासाठी बैलगाड्या वापरल्या गेल्या तेथून मात्र ३५० भारवाहकांनी सारे सामान एव्हरेस्ट बेसकॅम्पपर्यंत (पायतळापर्यंत) नेले ४ लाख रुपये खर्चाच्या या मोहिमेची दांडगी तयारी पाहता अगदी अनपेक्षित काही घडलं तरच यश हुकण्याची शक्यता होती

२१ मार्च ५६ रोजी नौचे (नामचे बझार) येथे ही तुकडी जमली २८ मार्च ५६ रोजी डायेल व फॉन गुटेन यांनी तावेचे जवळील एक अनामिक शिखर चढण्यात यश मिळवले व त्याला 'शिपाई' (सार्जन्ट) असे नाव दिले २९ मार्च ५६ रोजी राइस, राइस्ट, श्मीड यांनी कांगतेगाजवळील ५४१५ मी/१७७६६ फूट उंचीच्या शिखरावर पाय ठेवले भारवाहकांपैकी एकाची लाखपुती नावाची एक कन्याही या शिखर विजेत्यात होती तिचेच नाव या शिखराला दिले गेले एग्लर आणि डायेल हे पांगबोचे शिखर गाठण्यात यशस्वी ठरले श्मीड आणि फॉन गुटेन पिवळी सुई शिखर (स्थानिक लोकांच्या भाषेत 'पहाइन्लो स्तूप') चढून गेले ४ एप्रिल रोजी राइस, राइस्ट व म्युलर यांना 'मोरेन पीक' गाठण्यात यश मिळाले डायेल आणि फान गुटेन यांना ६१८५ मी./२०२९३ फूट उंचीचे 'आयलंड पीक' चढण्यात यश मिळालं २४ एप्रिल रोजी नुप्त्से ट्रिखाग (५९४३ ५ मी/१९५०० फूट) हे शिखर चढून गेले एव्हरेस्ट विजयासाठी ह्या साऱ्या शिखर मोहिमा सराव म्हणून उत्तम ठरल्या पण या सर्वांत महत्त्वाचा भाग ठरला, तो त्यांचा ल्होत्से शिखर विजय

श्मीड आणि एग्लर यांनी एव्हरेस्ट आणि ल्होत्से शिखरादरम्यान असणाऱ्या खोलगट खिंडीतून ल्होत्से शिखरमाथ्याकडे प्रयाण केलं आणि आजवर अजिंक्य ठरलेल्या या शिखरावर पाऊल ठेवलं इतक्या उंचीचं अपराजित राहिलेलं हेच सर्वांत उंच शिखर त्या भागात होतं ल्होत्सेची उंची आहे ८५११ मी/२७९२२ फूट

यानंतर या मोहिमेवर कळस चढवला गेला तो खुद्द एव्हरेस्ट शिखरावरील यशस्वी पदार्पणामुळे मार्मेट व श्मीड ही जोडी शिखरावर पोहोचली विलक्षण आनंदात त्यांनी एक तास तेथे घालवला त्यातील वीस मिनिटं तर त्यांनी प्राणवायूच्या नळकांड्यांचाही उपयोग केला नव्हता २३ मे १९५६ रोजी एव्हरेस्टवर

ही स्विस मोहीम यशस्वी झाली

२४ मे १९५६ रोजी सकाळी ११ वाजता राईस्ट व गुटेन यांनी शिखरावर पाय ठेवला आणि एव्हरेस्ट विजेत्या वीराची सख्या अर्धा डझनावर गेली या तुकडीने तर तब्बल दोन तास शिखरावर वेळ घालवला सुकामेवा आणि ओव्हो-माल्टीनचा यथेच्छ समाचारही त्यानी तेथे घेतला

ही एकुणातली १८ वी मोहीम यशस्वी ठरल्याने एकूण दोन यशस्वी मोहि-मांची नोंद झाली अर्धा डझन मानव एव्हरेस्ट विजेते ठरले

## चिनी चढाई १९६०

चीनने आक्रमण करून तिबेट घशाखाली घातला, आणि बावळट भारतीयानी एक 'बफर स्टेट' / कीलक राष्ट्र हातचे घालवले तिबेटचे धर्मशहा दलाई लामा निर्वासित म्हणून भारताच्या आश्रयाला आले या भागाचा राजकीय भूगोलच बदलला लालभाईंच्या बाबूच्या पडद्याआड एव्हरेस्टच्या उत्तरेकडील भाग गडप झाला याचा थोडाफार फायदा रशियनानी १९५२ मध्ये घेतला हे आपण मागे पाहिलेच

१९५८ पासून तयारीला सुरुवात करून चिनी मोहीम एव्हरेस्ट— नव्हे, कोमोलुगमा फेंग (Quomolungma Feng) वरील चढाईची तयारी करू लागली १९६० च्या चीन–नेपाळ करारामुळे एव्हरेस्ट शिखराचा अर्धा भाग, उत्तर प्रपाती उचवटा (नॉर्थ कोल), पूर्व कडा म्हणजे कांग शुग फेस हा सारा भाग चीनच्या स्वामित्वाखाली आला होता

शिह्-चिन-तुन च्या नेतृत्वाखालील या मोहिमेत २१४ जणाचा समावेश होता माओ-त्से-तुगच्या अर्धपुतळ्यासह २५ ते २७ या वयोगटातील वाग फू चौ, कोन्बू आणि च्यू मिन् हुआ हे तरुण २५ मे १९६० रोजी उत्तरेकडून आरोहण करून प्रथमच वर चढले

'विचार करण्याचे धाडस आणि आचरणाचे धाडस' असं काहीस बोध-वाक्य असणारी मोहीम चिनी दावा म्हणून माडली जाते पूर्ण तपशीलाचा अभाव, रात्रीचे आरोहण म्हणून शिखरावरचे फोटो नाहीत ८६९९ मी / २८५४० उची-वरून घेतलेला एक फोटो पुढे केला जातो, पण त्याबद्दलही वाद आहेतच उणे चाळीस अश तपमान, तुफान वारा यामुळे दक्षिणेच्या मळवाटेने आरोहण करणारी भारतीय मोहीम परत फिरली. पण त्याच काळात चिनी मोहीम शिखर गाठू शकली हा केवळ योगायोग की अन्य काही? 'अल्पाइन जर्नल'मध्ये यावर बरीच उलटसुलट मते मांडली गेली आहेत जिज्ञासूनी ती मुळातूनच वाचलेली बरी

चिनी वर्तुळातून याबाबत जी काही थोडीफार माहिती मिळते ती अशी–

१९५८ पासून या एव्हरेस्ट मोहिमेसाठी शारीरिक शिक्षण व कसोट्या यांमधून शेकडो तरुणांना जावे लागले. फेब्रुवारी १९५९ मध्ये 'न्येनचिन टागला' मधील ईशान्य शिखरावर आरोहण, नंतर 'मुस्ताघ आटा' शिखरावरील यशस्वी चढाई– या सर्वांतून तावून सुलाखून निघालेल्या २१४ जणांची निवड एव्हरेस्ट मोहिमेसाठी केली गेली

१९ मार्च १९६० रोजी रोंगबुक हिमानीवर ५१२० मी / १६८०० फूट उंचीवर पायतळ रोवला गेला लगेचच ५४०० मी / १७६०० फूट उंचीवर पहिला तळ आणि ५९०० मी / १९४०० फूट उंचीवर दुसरा तळ उभारला गेला २७ मार्च १९६० रोजी ६४०० मी / २०,००० फूट उंचीवर तिसरा तळ उभारला गेला हुसू चिंग आणि इतर पाच सहकाऱ्यांनी ३१ मार्च ६० रोजी नॉर्थ कोल (उत्तर प्रपाती उचवटा) गाठला ही मार्गनिश्चिती करण्यामध्ये हुसू चिंग, लिऊ ता यी आणि पेंग-शु-ली यांचा महत्त्वाचा वाटा होता २९ एप्रिलनंतर उत्तर प्रपाती उचवटाच्या पुढील चढाई हाती घेण्यात आली

२ मे ६० रोजी चिंग, ल्हाकपा त्सेरींग, मिग्मा व चानचुन यांच्या तुकडीने मध्यरात्रीपर्यंत झगडून ८१०० मी / २६५७४ फूट उंचीवर तंबू ठोकून उभारण्यात यश मिळवले लगेच दुसऱ्या दिवशी वाग-फेंग-तुग, शी-चिंग, ल्हाकपा त्सेरींग, कोन्बू व चानचुन हे ८५०० मी. उंचीवर पोहोचले तेथील तळ उभारण्यासाठी तीन जणांनी प्रयत्न सुरू केले आणि फेंग-तुग व चानचुन यांनी पुढील चढाई सुरू केली यापुढील मुख्य अडथळा असणाऱ्या ८५७० ते ८६०० मीटर दरम्यान असणारी ३० मीटर उंचीची दुसरी पायरी हा खडकाळ कडा चढून जाण्यात या गिर्यारोहकांची कसोटीच लागली त्या उंचीवर, जीवघेणी थंडी व बोचऱ्या वाऱ्यात आणि जादा प्राणवायूचा वापर न करता एका हिमभेगेत बीळ करून ते रात्रभर राहिले आता एव्हरेस्ट शिखर नजरेच्या टप्प्यात आले होते इथवर रसद पुरवठा करणे, सर्व तळांची भरभक्कम उभारणी करणे आवश्यक होते त्या कामाला प्राधान्य देऊन, काम जोरात सुरू झाले

२४ मे रोजी वाग-फू-चौ, चू-यिन-हुआ, कोन्बू आणि लिऊ-लिएन-मान यांनी अखेरच्या तळावरून शिखराखालून अवघ्या ३८० मीटर उंचीवरून एव्हरेस्ट माथ्याकडे प्रस्थान ठेवले वाटेत तीन मीटर उंचीची एक कातळभिंत त्यांच्या मार्गक्रमणात एक अडथळाच ठरली तीन तास झगडून त्यांना कातळभिंतीचा माथा गाठता आला लिऊ-लिएन-मान हा गिर्यारोहक अतिशय थकून गेला आपल्यामुळे वेग मंदावायला नको म्हणून त्याने प्राणवायूचा वापर न करण्याचे ठरवले व तो तेथेच थांबला बाकीचे सहकारी पुढे गेले या तुकडीचा प्राणवायूसाठाही लवकरच संपला व ८८३० मी / २८९६९ फूट उंचीवर त्यांना पोहोचण्यास संध्याकाळ

झाली अंधाराची काजळमाया, अती उंचीवर प्राणवायू संपलेला, खूप थंडी–(तपमान–४० अंश सें), प्रचंड श्रमामुळे आलेला थकवटा, आणि मुख्य म्हणजे अंधारात आवश्यक असणाऱ्या बॅटऱ्या नव्हत्या कारण 'सकाळी निघून अंधार पडण्याच्या आत निश्चित परतता येईल' असा ठाम विश्वास त्याना होता आता काय ? या प्रश्नाला उत्तर एकच होते मिळालेली संधी वाया घालवून चालणार नव्हते प्रत्येक सेंटिमीटर उंचीशी लढत देत २५ मे ६० रोजी पेकिंग वेळेनुसार पहाटे ४ वाजून २० मिनिटांनी उत्तर कण्यावरून एव्हरेस्ट माथ्यावर आरोहण करणारी ही पहिली यशस्वी मोहीम ठरली वांग-फू-चौ, कोन्बू, चू-यिन-हुआ हे माओ त्से-तुंगच्या अर्धपुतळ्यासह शिखरमाथ्यावर पोहोचले. कोन्बू यानी नेलेला चिनी राष्ट्रध्वज एव्हरेस्टवर फडकला वांग-फू-चौ यानी तिन्ही चिनी गिर्यारोहकाची नावे, दिनांक, वेळ आपल्या रोजनिशीतील एका पानावर लिहिली ते पान फाडून एका लोकरीच्या हातमोज्यात घालून छोट्या दगडाखाली पुरून, शिखरावर आपले स्मरणचिन्ह ठेवले अंधारामुळे फोटो घेणे शक्यच नव्हते म्हणून परतीचा प्रवास सुरू झाला ८७०० मी / २७६०० फूट उंचीवर आल्यावर सूर्योदय झाला तेव्हा त्यानी फोटो घेतले ३० मे रोजी सारी मोहीम आवरती घेत घेत सारे गिर्यारोहक पायतळावर परतले होते

या मोहिमेच्या यशाच्या दाव्याला बराच काळ अधिकृत मान्यता मिळाली नव्हती अल्पाइन जर्नलमध्ये चिनी विजयकथेवर उलटसुलट अभिप्राय जागतिक कीर्तीच्या तज्ज्ञानी दिले आहेत चिनी मोहिमेच्या वृत्तातामधील विसंगती– त्रुटी–न्यूनये या वादविवादात सांगितली गेली आहेत परंतु संशयाचा फायदा चिनी लोकाना मिळतोच 'आमच्याच मुलखातल्या एका शिखरावर आम्ही प्रयत्नाची पराकाष्ठा करून चढून गेलो. या गोष्टीला परकीय लोकानी मान्यता देवो अथवा न देवो, आमचा दावा सत्य आहे व तो आम्ही मांडणारच' अशी चिनी रीती त्यानी आजवर जपली आहे कोणीही काहीही म्हणो, आजमितीला तरी हा चिनी दावा जगात मानला जाणे थोडे असंदिग्ध आहे.

खर तर हा प्रश्न सुटण्याची एक छान संधी आली होती चिनी तुकडी शिखरावरून उतरत होती आणि त्याच वेळी भारतीय मोहीम सकाळी अचानक निर्माण झालेल्या प्रतिकूल वातावरणामुळे शिखरमाथ्यापासून अवघ्या २१३ मी / ७०० फुटांखालून परतण्याचा निर्णय घेत होती यशाचा प्याला ओठांपासून हिसकावला गेला होता आणि चिनी मोहिमेची सत्यासत्यता पडताळून पाहण्याची संधीही वाया गेली हवा उत्तम असती आणि चिनी मोहीम रात्री येऊन गेल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी भारतीय गिर्यारोहक तिथे पोहोचले असते, तर त्यांच्या पाऊलखुणा, स्मरणचिन्हे आणि परतीच्या वाटेवरचे ते शिखरविजेतेदेखील दिसले

असते कदाचित दुसरी चिनी तुकडीही वर येऊन, शिखरपरिषदही झाली असती असो... हा योग नव्हता म्हणून चिनी मोहिमेचा विजय सत्य की असत्य ही गोष्ट अजून गुलदस्तातच राहिली आहे.

## भारतीय मोहिमांचे अपयश– १९६० व १९६२

पहिल्या एव्हरेस्ट विजयात एका भारतीय गिर्यारोहकाचा समावेश असण ही केवळ योगायोग अन् कौतुकाची गोष्ट नाही, हे सिद्ध करण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्नाची गरज होती दार्जिलिंग येथे हिमालयाच्या कुशीत 'हिमालयन माऊंटेनियरिंग इन्स्टिटयूट'ची स्थापना हे या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल ठरले होते. येथे अनेक उत्साही तरुण-तरुणी गिर्यारोहणाचे प्रशिक्षण खुद्द तेनसिंग नोर्गेच्या मार्गदर्शनाखाली घेऊ लागले होते

८०९७ मी /२६५६७ फूट उंचीच्या चो ओयू शिखराच्या चढाईसाठी पहिल्यांदा पूर्वपाहणीसाठी आणि नतर केकी बुन्शा या मुबईतील सॉलिसिटरच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष आरोहण मोहीम १९५८ मध्ये गेली मेजर नदू जयाल याचा त्यात मृत्यू ओढवला पण भारतीय तिरगा या मोहिमेत चो ओयूवर फडकला त्यामुळे भारतीय गिर्यारोहकाचा आत्मविश्वास वाढला होता

आता वेध लागले होते एव्हरेस्टचे इडियन माऊटेनियरिंग फाऊडेशनने त्या दिशेने पावले टाकायला सुरवातही केली नदू जयालच्या अकाली निधनाने या मोहिमेची सूत्रे सभाळणारा अन्य नेता निवडण मोठं कठीण काम होत पण ब्रिगेडीयर ग्यानसिंग यांनी ते आव्हान स्वीकारल केकी बुन्शा, तेनसिंग, एच् सी. सरीन अशा सर्वांनीच त्याना सहकार्याचा हात पुढे केला

एव्हरेस्टवरच्या या पहिल्या-वहिल्या भारतीय मोहिमेसाठी कष्टाचे डोगर उपसून आखणी केली गेली मोहिमेची आर्थिक व साधनसामग्रीविषयक आखणी केली गेली देशी-परदेशी सस्था, उत्पादक व गिरीप्रेमीनी भरपूर सहाय्य त्यासाठी केले

१९५३ नतर आल्बर्ट एग्लरच्या स्विस तुकडीने पुन यश मिळवल होत त्यानतर थोडी सामसूमच होती पण १९६० साली भारतीय तुकडी ब्रिगेडीयर ग्यानसिंहाच्या नेतृत्वाखाली एव्हरेस्ट शिखरासाठी सिद्ध झाली होती. ह्या सर्वोच्च शिखरावर सपूर्ण भारतीय तुकडी जाण्याचा प्रयत्न करणार होती

तेरा गिर्यारोहकाशिवाय डॉक्टर, हवामानशास्त्रज्ञ, तात्रिक व व्यवस्थापक तज्ज्ञ याच्यासह ही सख्या २३ च्या घरात जाऊन पोहोचली १९ टन सामग्री, ७०० पोर्टर्स असा हा प्रचड ताफा होता

या तुकडीच्या नेतृत्वाची सपूर्ण जबाबदारी सोपवली होती ब्रिगेडीयर ग्यानसिह याच्यावर त्याला लष्करात हिमालयातील कामाचा अनुभव मिळाला होता

केकी एफ्. बुन्शॉ या मुबईच्या सॉलिसीटरकडे उपनेतेपद दिले होते १९५८ मध्ये ८१८९ मी/२६८६७ फूट उचीच्या चो ओयू शिखरावरील मोहिमेचे नेतृत्व त्याने केले होते याशिवाय फ्लाइट लेफ्टनट ए के चौधरी, नवांग गोंबू, सोनाम ग्यात्सो, कॅप्टन ए बी जगलवाला, लेफ्टनट एम् एस् कोहली, कॅप्टन एन् कुमार, बी डी मिश्रा, दा नामग्याल, आर विक्रमसिंग, आग तेंबा, सी पी व्होरा, फ्लाइट लेफ्टनट एन् एस् भगवानानी, कॅप्टन डॉ एस् के दास, सी व्ही गोपाल (फोटोग्राफी), फ्लाइट लेफ्टनट ए जे एस् ग्रेवाल, लेफ्टनट एस् सी नदा, एस् यू शकरराव, सोहनसिंग, धनबीर राय, (नेपाळी लियासो ऑफिसर), नाईक बाळकृष्णन, ओम प्रकाश वेद अशी ही तुकडी होती

ऑक्टो–नोव्हें ५९ मध्ये काब्रू हिमानीवर पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण शिबीर पार पडल अन् मग १६ नोव्हें १९५९रोजी तुकडीतील सदस्याची निश्चिती झाली. २० फेब्रु १९६० ला तुकडीतील सारेजण दिल्लीत जमले

६ मार्चला जयनगरहून तुकडीने एव्हरेस्टकडे प्रस्थान ठेवले २२ मार्चला तुकडी नौचे (नामचे बझार) येथे पोहोचली ५ एप्रिल रोजी त्यानी खुबू आइसफॉलपाशी झटापट करायला सुरवात केली १० एप्रिल रोजी ५८५२ मी/१९,२०० फूट उचीवर पहिला तळ, १५ एप्रिल रोजी ६०९६ मी/२०,००० फूट उचीवर दुसरा तळ, १७ एप्रिल रोजी ६४६१ मी./२१, २०० फूट उचीवर तिसरा तळ, १९एप्रिल रोजी ६८२७ मी / २२४०० फूट उचीवर ल्होत्से कड्यावर चौथा तळ, २ मे १९६० रोजी ७३१५ मी / २४०० फूट उचीवर पाचवा तळ ठोकला गेला ही प्रगती निश्चित कौतुकास्पद होती

२३ मे रोजी नवाग गोबू, सोनाम ग्यात्सो, नरेंद्रकुमार यानी साऊथ कोल गाठला दुसऱ्याच दिवशी सातवा तळ ८४१२मी/ २७,६०० फूट उचीवर उभारला गेला २५ मे रोजीच्या प्रयत्नात वाईट हवेमुळे ८६२५ मी / २८३०० फूट उचीवर पोहोचूनही शिखराखालून अवघ्या २१३ मी/ ७०० फूट उचीवरून माघार घ्यावी लागली २६ मे च्या तुकडीत आंग तेंबा, एम् एस् कोहली, सी पी व्होरा यांच्या तुकडीलाही तशाच हवेमुळे साऊथ कोल वरूनच मागे फिरावे लागले २९ मे ६० रोजी पहिल्या एव्हरेस्ट विजयाच्या ७ व्या वर्षदिनी या मोहिमेला सपूर्ण अपयश पदरी घेऊन पायतळावरून मोर्चा मागे फिरवावा लागला

२५ मे १९६० रोजी भारतीय गिर्यारोहक शिखरावर पोहोचू शकले असते तर त्यांना उत्तरेकडून रात्रीच्या वेळी वर चढाई करुन गेलेल्या चिनी गिर्यारोहकाच्या पाऊलखुणा सापडल्या असत्या न जाणो तेथे त्याची शिखर परिषदही साकारली असती उत्तरेकडून पहिल्या यशस्वी आरोहकांच्या विजयाबद्दलच्या शका आपोआप दूर झाल्या असत्या पण अपेक्षा आणि सत्य यात थोडेतरी अतर असतेच तेच इथे

प्रकर्षाने जाणवले

या मोहिमेच्या अपयशापेक्षा सर्वांना जाणवला, आपल्या गिर्यारोहकाचा मनाचा समतोल आततायीपणा करून ते कदाचित एव्हरेस्टवर पोहोचले असते तर एव्हरेस्टच्या बळीतच भर पडली असती नसता धोका न पत्करता सत्याला सामोरे जाऊन प्रयत्न सोडून देण्याला प्रचंड धैर्य लागत ते त्या साऱ्यानी दाखवले कोणताही प्रयत्न धाडसी जरूर असावा, ती आत्महत्येच्या दिशेने टाकलेली पावले नसावीत हा गिर्यारोहणाचा मूलमंत्र या वेळी कठोररीत्या पाळण्यात त्यांना जेवढे यश मिळाले होते, तेच एव्हरेस्ट विजयापेक्षा मोठे होते

## १९६२ ची दुसरी भारतीय मोहीम–

१९६० साली भारतीय मोहिमेला अपयश आल, ते केवळ लहरी हवामानाने असहकार्य पुकारल म्हणून थोड अनुकूल हवामान असत तर यश निश्चित मिळाल असत मग पुन्हा प्रयत्न का करू नये, या विचाराने जोर धरला १९६० सालीच आपल्या चिनी भाईंनी एव्हरेस्ट विजयाचा दावा केला होता, हाही एक सल कुठे-तरी आतमध्ये बोचत होताच

भारतीय गिर्यारोहण संस्थेने (आय एम एफ) मेजर जॉन डायस याच्या नेतृत्वाखाली १९६२ साली पुन्हा प्रयत्न करण्याच ठरवल नदादेवी मोहिमेत जॉन डायसने आपले कसब दाखविले होतेच शेर्पा सरदार आग थार्के याने भारवाहकाची जबाबदारी स्वीकारली होती एम एस कोहली, सी पी व्होरा, के पी शर्मा, सुमन दुबे, गुरुदयालसिंग, सोनाम ग्यात्सो, ओ पी शर्मा, मुल्कराज, अशोक नाना-वटी, जंगलवाला, हरी डाग अशी ख्यातनाम मंडळी या चमूत सहभागी झाली होती अथक परिश्रम, प्रचंड उत्साह आणि व्यवस्थित नियोजन यांना 'एव्हरेस्ट फॅक्टर'ने सहकार्य दिले तर यश मिळण्यात काही अडचण येणार नव्हती

मठ गुफा, मंत्रभिंती, मंत्रध्वज, प्रार्थनाचक्रे या साऱ्या गराड्यातून बाहेर पडलेले गिर्यारोहक हिममनोरे, हिमवर्षाव, हिमछाया, हिमानी याच्याशी दोन हात करू लागले. दोरीचे पूल, दोरखंडाची वेटोळी, खुंट्या, हिमकुठारी याच्यासोबत होता अफाट उत्साह आणि दुर्दम्य आत्मविश्वास गेल्या वेळी झुकांडी दिलेलं यश खेचून आणण्यासाठी प्रत्येकजण आपापल्या परीने हातभार लावू लागला

मोहन कोहली, सुमन दुबे, सी पी व्होरा, के पी शर्मा यानी दुसरा तळ ठोकला त्या आधारावर गुरुदयालसिंग, सोनाम ग्यात्सो, ओ पी शर्मा आणि मुल्कराज यानी पुढे मुसंडी मारली ६४०० मी/२१,००० फुटांवर तिसरा तळ त्यानी उभारला ल्होत्से कड्यावरील चौथा तळही बसवला गेला जंगलवाला, चौधरी, हरी डाग व स्वत: जॉन डायस याच्या मदत तुकडीने १४ शेर्पांच्या सहाय्याने

सर्व तळ सुसज्ज करण्याची जबाबदारी पार पाडली ल्होत्से कड्यावरून साऊथ कोल (दक्षिण प्रपाती उचवटा) गाठण्यासाठी हिमसपथ (कुलियर) ओलांडून एका प्रचंड हिमखाईला पार करून, कोसळणाऱ्या बर्फाला तोंड देत जाणे आवश्यक होते त्याला तोंड देताना नवाग त्सेरिंग याला अपघात झाला त्याला खालच्या तळावर नेल, शुश्रूषा केली पण २८ एप्रिल रोजी पहाटे पावणेचारला त्याला दुःखद मृत्यू आला ५ मे रोजी ४ शेर्पा २०० मी/७०० फूट घसरले सोनाम ग्यात्सो व के पी शर्मा यानाही तडाखा बसला, पण प्राणहानी झाली नाही ६ मे रोजी साऱ्या अडचणीवर मात करून ७३१५ मी / २४००० फूट उचीवर पाचवा तळ ठोकला गेला यानतर लहरी हवामानाचा फेरा आला व पुढची प्रगती थडावली, पण २१ मे रोजी कोहली, गुरुदयाल, मुल्कराज व दुबे यानी ८१८३ मी/२५८५० फूट उचीवर सहावा तळ बसवला २६ मे रोजी डायस व सहा गिर्यारोहक आणि १७ शेर्पा साऊथ कोलवर पोहोचले पुढचे दोन दिवस वाईट हवामानामुळे वाया गेले तरीही २८ मे रोजी ८४२७ मी/२७६५० फूट उचीवर सातवा तळ उभारला ३० मेचा चढाईचा प्रयत्न विफल ठरला कोहली, ग्यात्सो आणि हरी डांग याना साऊथ समीटखाली ३० मी/१०० फूट एवढ्या अतरावरून परतावे लागले होते पावसाळ्याच्या नौबती वाजू लागल्या व ही मोहीम गुडाळावी लागली पुन्हा अपयशाचा तडाखा भारतीय मोहिमेला सहन करावा लागला होता

## वुड्रो विल्सन सैरेची धमाल–

१९६२ साली 'मॉरीस विल्सनच्या मोहिमेसारखेच' एक नवेच नाट्य एव्हरेस्टच्या रगमचावर अवतरले प्रा वुड्रो विल्सन सैरे, अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सनचा नातू ही मोहीम स्विस व अमेरिकन अशी समिश्र मोहीम होती एव्हाना चिन्यांनी तिबेटचा घास यथास्थित पचवला होता तृप्तीची ढेकर देत असतानाच हा मिठाचा खडा लागला

वुड्रो विल्सन सैरे महोदयानी नेपाळ सरकारकडे एव्हरेस्ट परिसरातील आलतु-फालतु शिखर चढण्यासाठी अनुमती मागितली ती त्याला मिळाली एव्हरेस्ट पायथ्याशी थोडस बागडून झाल्यावर त्या वातावरणाशी समरस होण साधून गेल एक दिवस या प्राध्यापक महाशयांनी नेपाळ शासनाचा लियासो ऑफिसर आणि शेर्पा भारवाहकाना पायतळावरच राहण्याची विनती केली आणि अनुमती मिळालेल्या शिखरावर आपण एकट्याने जात असल्याचे सागितले डोंगरातली दगदग वाचली आणि मस्तपैकी साहेब मजकूर परतेपर्यंत त्याची वाट पाहायची हे काम मिळाल मडळी खूष झाली

वुड्रो विल्सन सैरे आठवडा झाला तरी परत नाही आता मात्र चलबिचल,

काळजी, शका-कुशका, आता पुढे काय, हे प्रश्न दिवसभर शिणवू लागले सर्वांनी आणखी दोन-चार दिवस वाट पाहून गाशा गुडाळायचा निर्णय घेतला वुड्रो गेल्या-नतर बाराव्या दिवशी ही मडळी पायतळ गुडाळून परतीच्या मार्गाला लागली इकडे हा धाडसी वीर एव्हरेस्ट पर्वतावरच ठरवून ठेवल्याप्रमाणे चढाई करीत होता नेपाळच्या दक्षिण बाजूकडून उत्तरेच्या तिबेटी भागात हा पहुचा गेला उत्तर कड्यावर तब्बल ७८०२ मी /२५६०० फुटांची मजल त्याने गाठली पुढचा पल्ला आपल्या आवाक्याबाहेरचा आहे अस पाहून हा 'वीर' शहाण्यासारखा खाली उतरून परत पायतळावर आला काहींच्या मते आणखी काही अमेरिकन व एक स्विस गिर्यारोहक साथीदारही होते. ते ७६०० मी /२५००० फूट उचीपर्यंत त्याच्याच बरोबरही होते

पायतळावर कोणीच नव्हते तेव्हा हल्लागुल्ला न करता त्वरेने हालचाली करून 'रणछोडदास' मडळींना त्याने गाठले आणि मडळी कशीबशी काठमांडूत आली आपल्या एव्हरेस्ट चढाईची 'खास बात' त्याने गुलदस्तातच ठेवली तिथे आवश्यक ते औषधोपचार करून घेऊन अमेरिकेत परतल्यानतर त्याच्या घरून पत्र-कारांनी ही बातमी मिळवली व अमेरिकन पद्धतीने ही 'मर्मबधातली ठेव' उघड केली त्यामुळे चीन सरकार अस्वस्थ झाले आणि नेपाळी मडळी गडबडली ही घुसखोरी दोघांनाही आवडली नाही दोघाना अधारात ठेवून एव्हरेस्टवर एवढ्या उचीवर मजल मारण, हा गिर्यारोहणातला पराक्रम असेल, पण उभय सरकाराना ती डोकेदुखीच ठरली

याच मार्गाने काही ब्रिटिश मडळींनी तिबेटमध्ये प्रवेश मिळवला आणि खम्पा स्वातंत्र्ययोद्धयांच्या चिनी सैनिकावरील चढायाची छायाचित्रे पाश्चात्त्य प्रकाशनात जाहीर झाल्यावर चीन सरकार खवळले त्याची योग्य ती नोंद नेपाळ सरकारने घेतली शेवटी आवश्यक बदोबस्त, नवे नियम, कडक तपासण्या व चौकी पहारे निर्माण होईपर्यंत इकडच गिर्यारोहण बरच कमी केल गेल 'एव्हरेस्ट इडस्ट्रीत' थोडासा 'गो स्लो'चा काळ येऊन गेला यानतरच अशा संवेदनाशील भागातील मोहिमाची कसून तपासणी, कडक नियम-नियत्रणे आणि त्याचे लियासो ऑफिसर हे दक्ष असे सैन्यातील किंवा पोलिस अधिकारी नेमले जाऊ लागले आणि या प्रकाराची पुनरावृत्ती टाळली गेली किमान ती तशी अजून प्रकाशात आली नाही ही धमाल उडवली, वुड्रो विल्सन सैरे या अमेरिकन साहेबाने १९६२ मध्ये

## पट्टेरी ताऱ्यांची एव्हरेस्ट चढाई

१९६३ 'चद्र-मगळावरील अवकाश चढायांना हात घातलेल्या अकल सॅमचे लक्ष पृथ्वीच्या तिसऱ्या ध्रुवाकडे वळले १९५० च्या टिलमनच्या अयशस्वी

मोहिमेत ऑस्कर हॉस्टन आणि डॉ. चार्लस् हॉस्टन याचा पायरव एव्हरेस्ट परिसरात झाला त्याला तब्बल तेरा वर्षे उलटून गेली होती नॉर्मन डायहर्नफर्थ (डायरेनफुर्थ ?) यानीही १९५२ सालच्या दिवस मोहिमेत भाग घेतला होता. पण अद्याप अमेरिकन एव्हरेस्ट मोहीम काही निघाली नव्हती. पूर्वी पादाक्रांत झालेल्या शिखरावर पुन्हा जाण्यात फारसे स्वारस्य नसणे आणि गिर्यारोहणाला फार महत्त्व न देणे यामुळे हा योग पूर्वी आला नव्हता परंतु काही शास्त्रीय प्रयोगाच्या निष्कर्षांचे पडताळे घेणे, हिमशास्त्र, हवामान-शास्त्र, अती उंचीचा मानवावर होणारा परिणाम अभ्यासणे, अशा काही प्रयोगांचा आणि प्रत्यक्ष एव्हरेस्टवर चलत्चित्रण करणे अशा गोष्टींचा एव्हरेस्ट मोहिमेत अभ्यास करणे याचा अंतर्भाव झाल्याने १९६३ ची पहिली अमेरिकन मोहीम, २३ वी एव्हरेस्ट मोहीम म्हणून नोंदली गेली

२० फेब्रु १९६३ रोजी काठमांडूजवळील बनेपाहून ही १९ सदस्यांची अमेरिकन मोहीम एव्हरेस्टच्या दिशेने चालू लागली त्याच्या बरोबर ९०९ हमाल, ३२ शेर्पा भारवाहकही होते २७ टन वजनाचे सामान वाहून नेले गेले. लिखू नदीवरील साखळीचा पूल तुटून झालेला अपघात वगळता ५४२५ मी / १७८०० फूट उंचीवर खुंबू हिमनदीवर या मोहिमेने पायतळ वसविला तोपर्यंत काहीच अडचण आली नाही मेनार्ड मिलर व बॅरी प्रॉथर यांनी हिमनदीचा अभ्यास सुरू केला. हवामान विषयक नोंदींना लगेचच सुरवात झाली व सिरी यांनी अती उंचीचा रक्तप्रवाह-पुरवठा व स्थितीवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी रक्ताचे नमुने अभ्यासायला सुरवात केली या मोहिमेने शास्त्रीय संशोधनाव्यतिरिक्त दोन मार्गांनी एव्हरेस्ट चढाईचे उद्दीष्ट आपल्या डोळ्यापुढे ठेवले होते डिक पौनाल, जेक ब्राइटेनबाख, गिल रॉबर्टस, इला त्सेरींग, आंग पेमा, डेव्ह डिंगमान, शेर्पा निमा तेनसिंग, गिर्मी दोरजे, छोतारे, काल्डेन ही मंडळी आग्नेय कड्यावरून साऊथ कोलच्या दिशेने प्रयत्न करीत होती तेव्हाच बॅरी कॉर्बेट, औटेन, डिक एमर्सन आदी मंडळी पश्चिम कण्याच्या नव्या वाटेचा शोध घेत होती २३ मार्चला झालेल्या अपघातात जेक ब्राइटेन बाख बर्फाच्या ढिसाळाखाली मरण पावला तर आंग पेमाची कवटीच फुटली गिल रॉबर्टस् आणि इला त्सेरींग मात्र काहीही दुखापत न होता वाचले. डिक पौनालची बऱ्याच खटपटीनंतर बर्फाच्या ढिगाऱ्याखालून सुटका केली गेली

तरीही प्रयत्न चालूच राहिले अखेर १ मे १९६३ रोजी जेम्स व्हिटॅकर आणि नवांग गोंबू या दोघानी एव्हरेस्टचा माथा गाठला तेनसिंग नोर्के याचा नवांग गोंबू हा पुतण्या ३। मीटर उंचीच्या एका ॲल्युमिनियमच्या दांड्यावर त्यानी अमेरिकन झेंडा फडकवला परतीच्या प्रवासात एक प्रचंड बर्फखंड दोघांच्यामधून

कोसळून खाली गेला सुदैवाने दोघेही सुखरूप राहिले

यानंतरच्या काळात वातावरण फारसे अनुकूल नव्हते, म्हणून पुढचे प्रयत्न काही काळ स्थगित ठेवले गेले २१ मे रोजी ८३८० मी / २७४५० फूट उंचीवरील सहाव्या तळावर ल्यूथर जेर्स्टांड व बॅरी बिशप पोहोचले मात्र त्या उंचीला न सरावल्याने बिशपसाहेबांच्या मनावर व विचारशक्तीवर थोडा परिणाम झाला होता पहाटे पाच वाजता ल्यूथरने गरम सूप घेण्यासाठी स्टोव्ह पेटवला पण तंबूत आग भडकली. ल्यूथरने त्वरा करून तो स्टोव्हच तंबूबाहेर फेकून दिला व ते दोघे कठीण प्रसंगातून वाचले सकाळी ८ वाजता त्यांनी शिखराच्या दिशेने चालायला सुरवात केली ११ वाजता ते आग्नेय कण्याच्या माथ्यावर पोहोचले येथे पुन ते ८६८६ मी / २८५०० फूट उंचीवर प्राणवायूच्या नळकांड्याला ठेचकाळले केवळ दैव बलवत्तर म्हणून ते गडगडत शेकडो मीटर गेले नाहीत दुपारी २ वाजता ८७६३ मी / २८७५० फूट उंचीच्या साऊथसमीटवर ते पोहोचले येथे पोहोचल्यावर तर त्या दोघांचा मानसिक तोल खूपच ढासळला होता एक काय करतो हे दुसऱ्याला कळेनासे झाले त्याच वेळी बिशपसाहेब भलतीकडेच तब्बल २०--२२ मीटर खाली उतरले ल्यूथरच्या हे लक्षात येताच त्याने बिशपला वर बोलावून घेतले हिलरी स्टेप चढून गेल्यावर मात्र सारे काही सुरळीत झाले तीन आठवड्यापूर्वी व्हिटॅकर व गोंबू यांची हिमावर उमटलेली पावले व अमेरिकेचा तारकांकित पट्टेरी झेंडा शिखरावर फडकत असलेला त्यांना दिसला दुपारी ३॥ वाजता ल्यूथरने एव्हरेस्टवरचे पहिले चलत्-चित्रण केले तब्बल पाऊण तासाच्या वास्तव्यानंतर म्हणजे सव्वाचारला त्यांनी खाली उतरायला सुरवात केली ही कष्टदायक धोकेदायक उतरण उतरता उतरता त्यांना हाका ऐकू येऊ लागल्या हा भास म्हणून त्यांनी काही काळ दुर्लक्ष केले पण थोड्या वेळाने या साद घालण्याचा आवाज जवळ जवळ येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले तेव्हा अनसोल्ड आणि हॉर्नबीन ही जोडगोळी एव्हरेस्ट काबीज करून उतरत आहे, असे त्यांच्या लक्षात आले पश्चिम कण्यावरून आरोहण करून आधीच्या पावलांच्या ठशांचा मागोवा घेत ही दुक्कल आग्नेय कण्यावरून खाली उतरू लागली होती त्यांच्या विजेऱ्या हरवल्या होत्या एका छोट्या हिमभेगेत पडूनही ते वाचले होते साडेनऊ वाजता ल्यूथर-बिशप आणि अनसोल्ड-हॉर्नबीन यांची भेट झाली होती. मात्र त्यांना रात्रीचा मुक्काम उघड्यावर करावा लागला आपल्या सहकाऱ्यांचा तपास करण्यासाठी डिंगमन व दोर्जे प्राणवायू घेऊन वर आले होते ते भेटले तेव्हा त्यांच्या मदतीने दहा वाजता-सर्व जण पाचव्या तळावर सुखरूप पोहोचले अनसोल्ड व बिशपना मात्र नौचे (नामचे बझार) हून थेट दवाखान्यात हलवले

अनसोल्ड व हॉर्नबीन यांच्या आरोहणात बॅरी कॉर्बेट, ऑटेन व इमर्सन

याच्या मदतीचा भाग फार महत्त्वाचा होता ते एव्हरेस्टवर पोहोचले तेव्हा सव्वा-सहा वाजले होते सूर्यास्ताची वेळ झाली होती इतक्या उंचीवरून सूर्याला पाहणारे ते सुदैवी होते पधरा-वीस मिनिटानतर त्यानी आधीच्या जोडीच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत आग्नेय कण्यावरून खाली उतरायचे ठरवले केवळ सुदैवानेच त्याना त्यांचे सहकारी भेटले

ही मडळी अमेरिकेत परतली तेव्हा त्याचे विरोचित स्वागत झाले ८ जुलै ६३ रोजी अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ् केनेडी यानी सर्व गिर्यारोहकाचा यथोचित सन्मान केला या तेविसाव्या पथकाला विजय मिळाल्याने चार यशस्वी आरोहणा-मधून १५ एव्हरेस्ट वीराची नोंद झाली एका वाटेने वर चढून दुसऱ्या अपरिचित मार्गाने खाली उतरणे ही अवघड कामगिरी निश्चितच मानली पाहिजे. एव्हरेस्ट चढाईत ती पहिल्या प्रथम व यशस्वीरीत्या राबविणारे हे नव्या जगाचे नवे मान-करी ठरले

## भारताच्या पदरी यशाचे भरघोस माप

पहिल्या एव्हरेस्टवीरांमध्ये तेनसिंग नोर्गे हा भारतीय होता, अमेरिकन मोहिमेत एव्हरेस्टमाथा गाठणारा नवांग गोंबू हाही भारतीयच होता एव्हरेस्टच्या शोधासबधीही भारतीयाचा सहभाग ज्ञात आहे पण अद्याप पूर्ण भारतीय मोहिमेला यश मिळाले नव्हते १९६० आणि १९६२ च्या मोहिमाना अपयश पत्करावे लागले होते भारतीय जनमानसाला चिनी आक्रमणाच्या अन् लाजिरवाण्या पराभवाच्या धक्क्यापासून सावरण्यासाठी जबरदस्त कामगिरी भारतीयांनी करून दाखवण्याची आवश्यकता होती पडित नेहरूना असा देदीप्यमान विजय हिमालयात, तोही खुद्द एव्हरेस्टवर मिळाला तर हवा होता राजकीय नेतृत्वाने सहकार्याचे भरभक्कम पाठबळ दिले अन् मोहिमेची चक्रे जोरात फिरू लागली

कमाडर एम् एस् कोहली (३३) या नाविक दलातल्या तडफदार गिर्या-रोहकाकडे नेतृत्वाची धुरा सोपवली गेली ५६ साली गिर्यारोहणाचे प्रशिक्षण घेतल्यानतर सासेर कांग्री, नदाखोत, १९६० व १९६२ ची भारतीय एव्हरेस्ट मोहीम, अन्नपूर्णा–३, त्रिशूळ-नदादेवी (पूर्व) अशा मोहिमाचा जबरदस्त अनुभव पाठीशी होता उपनेतेपद लेफ्टनट कर्नल एन् कुमार (३१) ह्या कुमाऊ रेजिमेंट-मधील अधिकाऱ्याकडे दिले गेले ५९ मध्ये गिर्यारोहणाचे प्रशिक्षण घेतल्यावर लगेचच त्रिशूळ, नतर १९६० ची एव्हरेस्ट मोहीम, नीळकठ मोहीम, नदादेवी मोहीम अशा मोहिमामधील पूर्वानुभव, कामाचा उरक व दाडगा उत्साह कुमारकडे होता

गुरुदयाळ सिंग (४१), सी पी व्होरा, (३०), मेजर मुल्कराज (३२),

सोनाम ग्यात्सो (४२), एच् सी एस् रावत (३१), सोनाम वाग्याल (२३); कॅप्टन एच् जी एस् अहलुवालिया (२७), मेजर हर्ष बहुगुणा, (२६), मेजर ए एस् चीमा (२७), मेजर बी जी सिंग (२७), नवांग गोंबू (३३), आंग कामी, कॅप्टन जे सी जोशी (३०), कॅप्टन, डॉ ए के चक्रवर्ती (३४), डॉ डी. व्ही (लाला) तेलग (३०), जी एस भंगू (३२), हवालदार सी बाळकृष्णन (३९) अशा उत्साही मंडळींचा सभासद म्हणून समावेश झाला होता डॉ लाला तेलग पुण्याचे होते

२२ फेब्रु ६५ रोजी नवी दिल्लीहून हे पथक निघाले जयनगरमार्गे एव्हरेस्ट पायथ्याशी पोहोचायला त्याना मार्चचा शेवटचा आठवडा उजाडला १७८००फूट / ५४१५ मी उचीवर पायतळ ठोकला गेला व मोहिमेपुढचे पहिले आव्हान म्हणजे खुबू हिमप्रपाताला मंडळी सामोरी गेली वेस्टर्न कूमच्या हिमतसराळयातून ल्होत्से कडा व तेथून हिमसपथातून दक्षिण कोल मार्गे दक्षिण शिखर व एव्हरेस्ट माथा हा सारा नेहमीचाच खडतर मार्ग त्यातील धोक्याना टाळीत, अडचणीना तोंड देत, प्रतिकूल परिस्थितीशी झगडत चार तुकड्यामध्ये नऊजणांनी एव्हरेस्ट माथा गाठला

२० मे ६५ रोजी कॅप्टन चीमा (२७) व नवांग गोंबू (३३) शिखरावर पोहोचले दोनदा एव्हरेस्ट गाठण्याचा पराक्रम करणारा नवांग गोंबू हा पहिला मानव ठरला २२ मे ६५ रोजी ४२ वर्षांचा सोनाम ग्यात्सो आणि २३ वर्षांचा सोनाम वाग्याल या जोडीने एव्हरेस्ट आरोहण केले २४ मे ६५ रोजी सी पी व्होरा (३०) व अंगकामी यांनी शिखर गाठले २९ मे रोजी पहिल्या एव्हरेस्ट विजयाच्या १२ व्या वर्धापनदिनी तर एच् पी एस् रावत (३०) कॅप्टन एच् जी एस् अहलुवालिया (२७) आणि फू दोर्जी (नेपाळ) या तिघानी एव्हरेस्टवर पाय ठेवला एकाच मोहिमेतील नऊजणानी शिखरमाथा गाठण्याचा हा उच्चांकही पुढे अनेक वर्षे अबाधित राहिला होता

चीनबरोबरच्या लढाईत पराभूत झालेल्या आपल्या देशाला मनोधैर्य वाढवण्या-साठी तिसरा ध्रुव जिंकण्याचा पराक्रम सजीवनी ठरला विश्वकळसाच्या माथ्यावर स्वतंत्रपणे हिंदी माणूस पाय ठेवू शकतो ही कल्पनाच सुखद होती २४ एव्हरेस्ट विजेत्यांमध्ये तब्बल ९ हिंदी गिर्यारोहक (या मोहिमेतील ८ शिखरविजेते भारतीय होते व १ नेपाळी होता यापूर्वी नवांग गोंबू व तेनसिंग शिखरमाथ्यावर जाऊन आले होते पण नवांग गोंबू दोन वेळा शिखरावर गेलेला असल्याने शिखरविजेत्या भारतीयाची संख्या नऊच होते )असणे निश्चितच कौतुकास्पद होते नवांग गोंबू ह्या भारतीयाने तर दोनदा एव्हरेस्ट गाठले होते हा विक्रम पुढे बरीच वर्षे अबा-धित राहिला होता

भारतीय गिर्यारोहणाच्या इतिहासात कोहलींच्या नेतृत्वाखालील हिंदी गिर्यारोहण चमूला मिळालेला विजय हा एक ठळक टप्पा मानला जातो

## भारतीय विमानदलाची चित्रीकरण मोहीम

१९५३ सालची हवाई चित्रीकरण मोहीम सफल ठरली होती १९६५ मध्ये AN-12 या विमानातून स्थिर व चलत्‌चित्रण करून अतिशय उत्तम चित्रे मिळवण्यात या वेळच्या मोहिमेला उत्तम यश मिळाले दोनदा एव्हरेस्टचे हवाई चित्रीकरण यशस्वीरीत्या करणारा भारत हा एकमेव देश ठरला

## जपान्यांची चित्रीकरण मोहीम

१९६८ मध्ये एव्हरेस्ट आणि एव्हरेस्ट परिसरावर २० मिनिटाचा वार्तापट काढण्यासाठी ठेंगण्या-ठुसक्या व नकटचा जपान्यानी एक चित्रीकरण मोहीम काढली होती तिलाही उत्तम यश मिळाले

## जपान्याचे निरीक्षण पथक

१९६९ मध्ये योशिरो फुजिता (३०) च्या नेतृत्वाखाली एक निरीक्षण मोहीम एव्हरेस्टवर आली. पुढच्या काळात जपान्यानी एव्हरेस्टवरच्या महाभारतात महत्त्वाचे सर्ग लिहिले त्याची ही केवळ सुरवात होती. अनेक विक्रम त्यानी पुढील काळात आपल्या गाठी बाधले ही मोहीम एव्हरेस्टवरची २५ वी मोहीम होती

## पुन. एव्हरेस्ट

त्याच वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये १० जपान्याचे एक पथक एव्हरेस्टवर गेले १८ ऑक्टोबरला फू दोर्जी या एव्हरेस्ट विजेत्याचा वेस्टर्न कूममध्ये मृत्यू आणि जॉन ब्रेकेनबॅच (१९६३ ची अमेरिकन मोहीम) या गिर्यारोहकाचे प्रेत सापडणे या दोन विशेष नोंद घेण्याजोग्या गोष्टी या मोहिमेला मात्र अपयश आले

## जपान्यांना यश

पुरेशा तयारीनतर साबुओ मात्सुकाटा (७०)च्या मार्गदर्शनाखाली ३९ जणाची तुकडी मे १९७० मध्ये एव्हरेस्टवर आली हिरोमी ओहत्सुकाच्या नेतृत्वाखाली नैऋत्य कण्यावरून चढाई सुरू झाली या मोहिमेत सेत्सुको वाटानाबे ही महिला साऊथ कोलपर्यंत २६,२०० फूट/७९८५ मी उचीवर पोहोचली किमोशी नैर्ता (२८) याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू व एका शेर्पाचा मृत्यू ओढवला तरी

ए...८

टोर्नो मात्सुआरा (३५) व नाओमी उएमुरा (२८) या दोघानी ११ मे ७० रोजी एव्हरेस्ट माथा गाठला सर्व खंडांमधील सर्वोच्च ठिकाणे गाठणारा नाओमी उएमुरा हा पहिलाच मानव ठरला. दुसऱ्याच दिवशी कात्सुबोश हिराबायाशी (३५) व शेर्पा छोतारे (नेपाळ) हे दोघेजण शिखरावर पोहोचले या सहाव्या यशस्वी मोहिमेमुळे एकूण २८ मानवी पदार्पणाची नोंद झाली एव्हरेस्टवरची ही २७ वी मोहीम होती

## स्कीइंग मोहीम

१९७० मध्ये जपान्यानी एक अभिनव मोहीम एव्हरेस्ट पर्वतावर राबवली ३४ जणाच्या या तुकडीने साऊथ कोलपासून घसरगुंडी करीत खाली येण्याचे ठरवले होते एव्हरेस्ट विजय हे या तुकडीचे उद्दिष्ट नव्हतेच

युइचिरो मिऊरा ह्याने साऊथ कोलपासून स्कीइंगला सुरवात केली या घसरगुंडीत शेवटचे ५०० मीटर / १५०० फूट घसरून पडल्याने तो पाठीवर घसरत आला त्याने प्रत्यक्षात एका हवाई छत्रीचा वापर करण्याचे ठरवले होते पण त्याचा फारसा फायदा होऊ शकला नाही या मोहिमेची अतिशय उत्तम, रंगीत चित्रे असलेले सुंदर पुस्तक प्रसिद्ध झाले आहे एकूण सहा शेर्पांचा मृत्यू या मोहिमेत ओढवला

## अनिष्ट प्रथांचा उद्रेक– १९७१ ची आंतरराष्ट्रीय गिर्यारोहण मोहीम.

मल्टिनॅशनलच्या कल्पनानी भारावून जाऊन तोच प्रयोग गिर्यारोहणात एकदम एव्हरेस्टवर करण्याचा करटा विचार कोणाच्या डोक्यात आला कोण जाणे पण त्यामुळे मतभेदाचे सर्वोच्च दर्शन, हेकटपणाचा कळस, राष्ट्रीय क्षुद्रवृत्तीचे प्रदर्शन याचा जणू मेळावाच विश्वकळसावर भरवला गेला दिखाऊपणा, उथळ प्रसिद्धी, प्रचंड भपका याचे हे ओंगळवाणे प्रदर्शन ठरले

अमेरिका– इंग्लंड– नॉर्वे– पश्चिम जर्मनी– ऑस्ट्रीया– फ्रान्स– इटली– स्वित्सर्लंड– जपान– भारत व नेपाळ या ११ राष्ट्रातील ३२ गिर्यारोहकांचे पथक नॉर्मन डायहर्नफर्थ या बावन्नवर्षीय अमेरिकनाच्या व लेफ्टनंट कर्नल जेम्स ओ एम् रॉबर्टस् या इंग्लिश गिर्यारोहकाच्या हाताखाली एव्हरेस्टवर जाण्यास सिद्ध झाले

डगल हेस्टन, व डॉन व्हिल्हान्स हे इंग्लंडचे, इव्हान्स, कॉलीव्हर व पीटर्सन हे अमेरिकन, इटो व उएमुरा हे जपानी आणि टोनी हायब्लर हा पश्चिम जर्मन असे आठ गिर्यारोहक नैऋत्य कड्यावरून शिखर गाठण्यास प्रयत्नशील होते.

वुल्फगँग अॅक्स्ट हा ऑस्ट्रियन, हर्ष बहुगुणा हा भारतीय, तायग्लॅंड व एप्लियासेन हे नॉर्वेचे, मायकेल व्हाऊचर व येवेट्ट व्हाऊचर हे स्विस, कार्लो मौरी

हा इटालियन, आस्लेस हा अमेरिकन, पिअरे माझौद हा फ्रेंच आणि स्टीली हा इंग्लिश असे दहाजण आग्नेय कण्यावरून प्रयत्न करणार होते

१८ एप्रिल रोजी ६९८० मी /२२,९०० फूट उंचीवर हर्ष बहुगुणा एका भयाण हिमवादळात अडकले दोराला अडकलेल्या स्थितीत गारठून-थिजून त्याना मृत्यू आला त्याना तेथून सोडवणे इतरांना जमले नाही यानतर मात्र पुढील वाईट गोष्टींची माळच लागली १२०० कॅन्स बीयर, शिवाय व्हिस्की, रम याचेही असख्य पेटारे यामुळे मोहिमेतील तळीराम अन् सुधाकराचे फावले औषधापेक्षा सुराच जास्त झाली काही अमली पदार्थांचे सेवन केल्याची बोलवा आहेच आपल्याला एव्हरेस्ट विजयाचा परीसस्पर्श व्हावा यासाठी अँग्लो-सॅक्सन विरुद्ध इतर अशी राजकारणे रगू लागली

खासदार पिअरे माझौद– व्हाऊचर पती-पत्नी, मावरी आदी मडळी मोहीम अर्धवट सोडून परतली डायहर्नफर्थला घशाच्या विकाराने बेजार केले तोही परतला डॉलर्स–पौंड–मार्कस्–येन आणि रुपयांचा हिमालयाएवढा डोंगर करूनही ही मोहीम कोसळली आतरराष्ट्रीय बधुभावाचा उडालेला हा फज्जा अनेकाना बरेच दिवस चघळण्यास विषय म्हणून पुरला अवाढव्य नि खर्चिक मोहिमेचा डोलारा साफ कोसळला या मोहिमेचा बोलबालाच जास्त झाला होता गाढव गेले नि ब्रह्मचर्यही गेले अशीच अवस्था शेवटी झाली

## १९७१ ची अर्जेन्टीनी मोहीम

एव्हरेस्टवरील २९ वी मोहीम ले कर्नल एच् सी तोलोसाच्या नेतृत्वाखाली निघाली होती ८२२९ मी /२७००० फूट उंचीवर पोहोचूनही युलिसस व्हिटाली व जॉर्ज पेटेरिक यांना प्रतिकूल हवामानामुळे प्रयत्न सोडून द्यावा लागला

या तुकडीत ले क एच् सी तोलोसा (नेता), कार्लोस कॉमिन्सानी, कॅप्टन नेस्टर अझुएज,, जोर्गे, जुआन बॉटिस्टा बॅरी एन्टॉस, एडमुंडो बर्गोस, जुआन सर्गिओ फर्नान्डीस, जोस लुईस फॉनरीज, डॉ जोस मारिया इक्लीसीयास, ले जुआन मॅनौल लाव्हर, ओमर फेलेक्रीनी, जॉर्ज पेटेरेक, गुइलेर्मो रॉबल्स, अल्फेड रोसॉस्को, ले अल्बर्टो मारीओ सेरॅनो, जॉर्ज स्कीआर्का, गुइलेर्मो व्हिहरो, अलीसेसे व्हिटाले, जॉर्ज एडुआर्डो व्हिटान यांचा समावेश होता

१७ ऑगस्टला काठमांडूहून ही तुकडी निघाली १५ सप्टेंबरला पायतळ रोवला त्यानतर ६२०० मी वर पहिला तळ, १९ सप्टेंबर रोजी ६५०० मी उंचीवर दुसरा तळ, २१ सप्टेंबर रोजी ७००० मी उंचीवर तिसरा तळ अशी आगेकूच झाली

## ख्रिस बॉनिंग्टनचा पहिला हल्ला

गिर्यारोहण क्षेत्रातला नवा तारा म्हणून ख्रिस बॉनिंग्टनचा उदय झाला होता आग्नेयेकडील मळवाटेने एव्हरेस्ट गाठण्यात काहीच स्वारस्य नाही, काहीतरी नवेच करायला पाहिजे असे मनाशी ठरवून नैऋत्य कड्यावरून प्रयत्न केल्यास यश मिळेल अशा अपेक्षेने हा गिर्यारोहणातला 'सोबर्स' पुढे झेपावला होता अकरा जणांच्या या तुकडीला ७९२४ मी /२६००० फूट उंची गाठल्यानंतर प्रयत्न सोडून द्यावा लागला हे अपयश पदरी पडल तरी एव्हरेस्टची मोहिनी अद्याप सपलेली नाही हेच जगा-पुढे आले १९७२ सालच्या या ३० व्या मोहिमेला अपयश आले

## जर्मनांची चढाई

१९७२ च्या मे मध्येच डॉ कार्ल हेर्लिगकॉफर या पश्चिम जर्मन नेत्याच्या हाता-खाली सहा राष्ट्रांमधील काही गिर्यारोहक एव्हरेस्ट चढाईसाठी प्रयत्न करीत होते त्यांनाही ८२२९ मी /२७००० फूट एवढीच उंची गाठता आली खराब हवामाना-मुळे त्यानाही प्रयत्न सोडून यशस्वी माघार घ्यावी लागली ही एव्हरेस्टवरील ३१ वी मोहीम होती

डायहर्नफर्थच्या आतरराष्ट्रीय मोहिमेसारखीच कोती वृत्ती अन् उबग येणारी भाडण याच विद्रुप प्रदर्शन इथ घडल त्यासाठी या मोहिमेवर इतराची व मोहिमे-तील सभासदाची एकमेकावर बरीच टीका झालेली आढळते

डॉ कार्ल हेर्लिगकॉफर हा पश्चिम जर्मन नागरिक याला नगा पर्वत या शिखराच खूप आकर्षण होत एक उत्कृष्ट सघटक असल्याने बेसकॅम्पपुढे न जाता नगा पर्वतावरील मोहिमा त्याने चागल्या रीतीने पुऱ्या केल्या होत्या त्याचा सावत्र भाऊ १९३४ च्या मोहिमेत नगा पर्वतावर मृत्यू पावला तेव्हापासून त्यावर जाण्याची त्याची इच्छा होती १९५३ मध्ये त्याने आपली नगा पर्वतची मोहीम आटोपती घेतली पण हर्मन बुल्ह या ऑस्ट्रीयन गिर्यारोहकाने तो आदेश न मानता तो प्रयत्न चालू ठेवला व ह्यात त्याला यशही मिळाले हेर्लिगकॉफर आणि बुल्ह याच्यातला वाद तर न्यायालयासमोरही गेला नगा पर्वतच्या सहा मोहिमाचा अनुभव त्याच्या पाठीशी होता पुढे दायमीर कडा, रूपाल कडा, रूपाल कणा या तीन बाजूनी त्याच्या तुकडीने नगापर्वत शिखर गाठले

अशा या हट्टी गिर्यारोहकाच्या तुकडीत ख्रिस बॉनिंग्टनसह डगल हेस्टन, हॅमिश मॅकइन्स, डग स्कॉट, डॉन विल्हान्स हे ब्रिटिश, काही जर्मन व ऑस्ट्रियन यांचा समावेश होता ब्रिटिश सभासदांचे आजार, प्रो हुटल या जर्मन सभासदाचा गभीर आजार, ख्रिस बॉनिंग्टन व डगल हेस्टनचे घुमजाव, हेर्लिगकॉफरची मोहीम चालू असतानाच जर्मनी वारी, जर्मन व ब्रिटिशाची असूया व एकमेकाबद्दल अवि-

श्वास या साऱ्यामुळे अपयश स्वाभाविक होते आणि तसेच घडले

## ६४ इटालियनांच्या पथकाची विजयी सलामी

हिमालयातील गिर्यारोहणाचा पूर्वानुभव नसताना आणि कमीत कमी वेळात गुइडो मोन्झिनो (४४) याच्या नेतृत्वाखालील इटालियन तुकडीला यश संपादता आले उत्तर ध्रुवावर जाऊन आलेल्या या साहसवीराबरोबर ६४ गिर्यारोहक व ७० शेर्पा होते

रिनाल्डो कॅरेल (२१), शेर्पा ल्हापका तेनसिंग (नेपाळ), शेर्पा शभू तामाग (नेपाळ, वय अवघे १८), मिर्को मिनुझा यानी ५ मे ७३ रोजी शिखरमाथा गाठला

७ मे ७३ रोजी कॅप्टन फॅब्रिझिओ इन्नाहोरी (३०), क्लॉदिओ बेनेडिट्टी, व्हर्जिनो एपिस, शेर्पा सोनाल ग्योल्ताम (ग्यालझेन ?) हेही एव्हरेस्टवर पोहोचले आता ३२ वेळा एव्हरेस्टवर मानवाने पाऊल ठेवल्याची नोंद झाली मात्र पथकाच्या प्रचड आकारामुळे व विपुल पैशाच्या उलाढालीमुळे या मोहिमेकडे थोडे कुचेष्टेने पाहिले जात असे सामान पोहोचविण्यासाठी हेलिकॉप्टरचा केलेला वापर आणि गुइडो मोन्झिनोचा खास तबू यावरही भरपूर टीका झाली मोन्झिनोला ध्रुवीय मोहिमेत झालेल्या हिमदशापासून बचाव करण्यासाठी ते आवश्यक होते, ही बाबच फारशी विचारात घेतली गेली नव्हती

## पुन: जपानी झेंडा

१९७३ च्या ऑक्टोबरात मिचिओ युआसाच्या नेतृत्वाखाली जपान्यानी पुन एक धडक मारली. पावसाळ्यानतर लगेचच प्रयत्न केले तर यश मिळू शकते, हे यामुळे सिद्ध झाले हिसाही हशिगुरो आणि यासुओ काटो या दोघानी २६ ऑक्टो ७३ ला दुपारी साडेचार वाजता शिखरावर पदार्पण केले दुसऱ्या दिवशी सकाळी ६ पर्यंत ते तेथेच होते दहा तासांचा हा अत्युच्च मुक्काम म्हणजे एक विशेष गोष्टच ठरली या आठव्या यशस्वी मोहिमेमुळे ३८ वेळा एव्हरेस्टचा नक्षा उतरला गेला कारण ३८ वेळा तेथे मानवाची पावले उमटवली गेली होती

## १९७४ ची मोहीम

या स्पॅनिश मोहिमेचे नेतृत्व जुआन इक्ना सिओ लॉरेन्टे झुगाझा (३५) याच्याकडे होते ४ वेळा प्रयत्न करूनही त्यांना ८५०० मी पेक्षा अधिक उची गाठता आली नाही ह्या कमनशिबी मोहिमेला दैवाने साथ दिली नाही हेच खरे.

## फ्रेंचांची अयशस्वी मोहीम

१९७४ च्या उत्तरार्धात मध्ये फ्रेंचांनी पहिली एव्हरेस्ट मोहीम काढली जेरार्ड डेव्हौॲसॉक्स (३३) च्या नेतृत्वाखाली १० जणांची ही मोहीम होती पाच शेर्पा व खुद्द नेता यांच्या अपघाती मृत्यूमुळे ही मोहीम अर्धवट सोडून देण्यात आली. एव्हरेस्टवरची ही ३५ वी मोहीम होती

या मोहिमेत जेरार्ड डेव्हौॲसॉक्स शिवाय जॉर्ज पेयॉट, क्लॉड ॲन्सी, डॅनियल ऑडीबर्ट, फर्नांड ऑडीबर्ट, जीनपॉल बाल्मॅट, डेनिस डुक्रोझ, डॉ एरिक लासोरे, ख्रिस्तिअन मोलीवर आणि पियरे तैराझ हा उपनेता यांचा समावेश होता

९ सप्टेंबर रोजी तब्बल अर्धा मिनीट ढासळत असणाऱ्या हिमढिसाळाखाली या मोहिमेला हिमदिव्य करावे लागले त्याच्या धसक्यातून उरलेले सभासद स्वत:ला सावरूच शकले नाहीत

## १९७५—आंतरराष्ट्रीय महिला वर्ष

जुको ताबेई ही जपानी गृहिणी आणि फात हॉंग ही तिबेटी महिला यांच्या यशस्वी एव्हरेस्ट आरोहणामुळे 'हम भी कुछ कम नही' असे दाखवून दिले गेले.

आयको हिसाने (४२) या महिलेच्या नेतृत्वाखाली ही जपानी मोहीम निघाली होती एव्हरेस्टवरची पुरुषी मक्तेदारी मोडून काढण्यासाठी हा प्रपंच मांडला गेला होता त्या तुकडीतील साडेआठ हजार मीटर उंचीवरच्या शेवटच्या तळावरून जुको ताबेई (३५) व शेर्पा आंग त्सेरिंग १६ मे रोजी पहाटे ५ वाजता निघाले व दुपारी साडेबाराला शिखरावर पोहोचले २२ सप्टेंबर १९३९ रोजी जन्मलेल्या या चष्माधारी महिला गिर्यारोहकाने पूर्वी अन्नपूर्णा शिखर माथाही गाठला होता तिला त्या वेळी नोरीको ही तीन वर्षांची मुलगी होती पूर्वी शिक्षिकेचे काम करीत असणाऱ्या जुको ताबेईचे यजमान उद्योगपती आहेत

एव्हरेस्टवरच्या अर्ध्या तासाच्या मुक्कामात त्यांना श्रमांचे सार्थक झाल्याचे वाटले नेपाळी व जपानी राष्ट्रध्वज त्यांनी तेथे फडकावले शिखरावर कॉफीने भरलेला थर्मास व ग्लास ठेवला आणि तेथून खाली आणण्यासाठी काही दगडी खडे गोळा केले

अमेलिया एऱ्हार्टचं विमानोड्डाण, व्हॅलेंटीना तेरेश्कोव्हाचं अवकाशभ्रमण आणि जुको ताबेईचं एव्हरेस्ट आरोहण एकाच कोटीतल महिलांच्या दुर्दम्य आकांक्षांची ही प्रतीकेच आहेत

## चिनी गिर्यारोहकांची दुसरी चढाई.

१६ मे ७५ रोजी जुको ताबेई या जपानी महिलेने एव्हरेस्टवर पाय ठेवला

आणि लगेच दहा-अकरा दिवसात २७ मे १९७५ रोजी फात हॉग या तिबेटी महिलेसह आणखी सात तिबेटी पुरुष गिर्यारोहक व एक चिनी गिर्यारोहक यानीही एकाच वेळी कोमोलग्मा फेंग काबीज केले अशी बातमी प्रकाशित झाली पहिल्या चिनी विजयी दाव्याप्रमाणेच याही दाव्याबाबत आश्चर्य, औत्सुक्य, शका, हेटाळणी, खरेखोटेपणा याबाबत बराच गदारोळ उठला

केवळ शिखर जिंकण्याचे मर्यादित उद्दीष्ट या चिनी मोहिमेसमोर नव्हते तर रोंगबुक हिमानीचा म्हणजे एव्हरेस्टच्या उत्तरेकडील तिबेटी मुलखातील चारपाचशे चौरस कि मी चा सारा परिसर शास्त्रीय सशोधनासाठी पिंजून काढायचा अशी ही आगळीवेगळी मोहीम होती 'अनदर असेंट ऑफ द वर्ल्डस् हायेस्ट पीक– कोमोलगमा' या सचित्र पुस्तकात या सशोधन मोहिमेचा साद्यत वृत्तात प्रसिद्ध झाला आहे. लाल रगाचा, मिश्रधातूचा बनवलेला एक सर्व्हेइग स्टँड त्यानी एव्हरेस्टच्या माथ्यावर बसवला हे तिकाटणे त्यानी खोलवर खड्डे घेऊन इतके पक्के बसविले आहे की, पुढची काही दशके ते एव्हरेस्टवर सहज राहू शकेल मुख्य दाडयाला तीन पायांची तिवई आणि शिवाय आधारासाठी तणावाचे नायलॉनचे दोर अशी ी रचना आहे हे अवजड साधन तब्बल ३ ५ मीटर उच आणि चार किलो वजनाचे आहे यामुळे एव्हरेस्टची उची मोजण्यासाठी उत्तम वेध खालच्या सशोधकांना घेता आले त्यामुळे अत्याधुनिक निरीक्षणाद्वारे एव्हरेस्टची उची ८८४८ १३ मी ± ० ३५ मी. एवढी भरली म्हणजे ही नवी उची २९०२९ फूट ± १ १ फूट एवढी भरते भूशास्त्र, वनस्पतिशास्त्र, जीवशास्त्र, हिमशास्त्र, हवामानशास्त्र, मोजणी, मानवी शरीरावर उची व थडीचे होणारे परिणाम तपासणे अशा अनेक शास्त्रीय निरीक्षणावर या मोहिमेत भर देण्यात आला होता.

४९९८ मी/१६४०० फूट उचीवर रोंगबुक हिमनदीवर मोहिमेचा मुख्य तळ होता तेथवर मालवाहू ट्रक्स आणि ६२१८ मी/२०४०० फूट उचीपर्यंत याकच्या पाठीवरून सामानाची वाहतूक करून एक वेगळाच उच्चाक प्रस्थापित केला गेला ३ रा तळ ६२१८ मी / २०४०० फूट, ४ था तळ ७०१० मी / २३००० फूट, ५ वा तळ ७५५९ मी/२४८०० फूट, ६ वा तळ ८२२९ मी/२७००० फूट आणि ७ वा तळ ८३८२ मी/२७५०० फूट उचीवर ठोकण्यात आले होते फात हॉग (३७) ही तिबेटी महिला, सोदनाम नोर्बू, ल्होत्से, सामद्रुब, दारफुत्सो, कुग पासाग, त्सेरिंग तोब्याल, त्यापो च्येन हे सात तिबेटी तरुण गिर्यारोहक आणि हौ-शेंग-फू हा चिनी आरोहक शिखरावर पोहचण्यात यशस्वी ठरले त्यांनी प्रत्यक्ष शिखरावर सत्तर मिनिटे वास्तव्य केले होते दुपारी १२-२० ते दीड वाजेपर्यंतच्या या कालावधीत त्यानी मोजणी, तिकाटणे रोवणे व विविध शास्त्रीय नमुने गोळा करणे, शास्त्रीय प्रयोग करणे आणि चलत् चित्रण करणे यासाठी हा वेळ कारणी लावला

पासाग, बाल्झझान या महिला ७८०३ मी. /२५६०० फूट उचीवर, गुन्साग, चामकी व झासांग या महिला ८२९० मी / २७००० फूट उचीवर पोहोचल्या होत्या या मोहिमेत माऊंट एव्हरेस्टचा उल्लेख सर्वत्र Qomolangma Feng कोमोलगमा फेंग किंवा Mount Jolmlo Lungma माऊट जोल्मो लुगमा अशा नावाने केलेला आढळतो वांग-फू-चौ या चिनी एव्हरेस्ट विजेत्याचे मार्गदर्शन, शिह चान चुन हा मोहिमेचा नेता आणि सू चिंग हा उपनेता या तुकडीला लाभला होता

१७ मे ७५ रोजी एव्हरेस्टवर अखेरच्या चढाईसाठी तुकडी सिद्ध झाली या आधीचे या मोहिमेचे दोन प्रयत्न अयशस्वी ठरले होते वु त्सुग-युएह हा अनुभवी गिर्यारोहक त्यात मृत्युमुखी पडला होता प्रचड थडी, सतत बदलणारी हवा, विरळ हवामान अशा प्रतिकूलतेमध्येदेखील गिर्यारोहकांचे धैर्य शाबूत होते चार दिवस व रात्रीचा हा लढा होता २४ मे रोजी ८६८० मी /२८४७७ फूट उचीवरच्या शेवटच्या तळावर पहिली तुकडी पोहोचली तर दुसरी तुकडी पाठोपाठ २५ मे रोजी तेथे दाखल झाली आता २०० मी ची चढाई बाकी होती " आता शिखरावरील यशस्वी पदार्पणाशिवाय आम्ही माघार घेणार नाही पाऊल मागे घेण्यापेक्षा आम्ही तेथे मरण पत्करू " असं एकमुखाने म्हणून ही मडळी पुढे झेपावली– ती यशस्वी चढाई-साठीच सकाळी ८ वाजता दोन गटांत ही मडळी शिखराच्या दिशेने वर चढू लागली. वाटेत एक प्रचड मोठा प्रस्तरखड आला सोदनाम नोर्बूने आता चढाईची सूत्रे हाती घेतली २० मीटर उचीची उत्तरेकडील दुसरी पायरी हा एक मोठा अडथळा पुढे होताच साडेनऊ वाजता त्यानी येथून वर चढण्यात यश मिळवले. ३ मी लाबीची धातूची शिडी आणि एक मीटर उचीं कमी पडत असल्याने तेवढ्या भागात नायलॉनचा साधा दोरखड त्यांनी वापरला सततच्या कष्टप्रद आरोहणाने कुगा पासागला घेरी आली त्याला प्राणवायू देऊन सोदनाम नोर्बूने मदत केली सोदनाम नोरबूबरोबर कुंग पासागही शेवटपर्यंत धडपडत शिखरावर पोहोचला दुपारी १२-१० ला (पेकिंग/बिजिंग वेळ दुपारी २-३०) ते शिखरावर होते एकाच वेळी नऊजण एव्हरेस्टवर पोहोचण्याची ही पहिलीच वेळ होती हा उच्चांक अबाधितच आहे पाच तान्याचा लालभडक चिनी झेडा त्यानी एव्हरेस्टवर फडकावला

या चिनी दाव्याबद्दल जरी सर्वत्र शका व्यक्त केली गेली, तरी नतर त्यांनी काढलेले फोटो आणि प्रसिद्ध केलेले वृत्तांत यामध्ये नऊजण चिनी तिवईसह एव्हरेस्टवर दिसतात नतरच्या सर्व मोहिमाना हे चिनी तिकाटणे आढळले नव्हे, ते तर आता एव्हरेस्टचे अविभाज्य अगच बनले आहे मात्र पूर्वीच्या सर्व मोहिमानी येथे ठेवलेली स्मरणचिन्हे गायब झालेली आढळली मग ती भन्नाट वाऱ्याने भिरकावली, की कोणी बुद्धयाच हलवली, हे सागता येणे कठीण आहे

एव्हरेस्टच्या कहाणीतला चौथा टप्पा ऐन समेवर सपला पहिल्या अतुलनीय यशानतर महिला गिर्यारोहकाचा एव्हरेस्ट-शिखरावर पद-न्यास, तोही आतरराष्ट्रीय महिला वर्षात, ही मोठी योगायोगाची गोष्ट

आता एव्हरेस्टचा आवाका कळला होता पण एव्हरेस्ट विजयाची झेप ललनानाही जमू शकते, हे सिद्ध झाले महिला गिर्यारोहण क्षेत्राला यामुळे एक नवी मितीच प्राप्त झाली

एव्हरेस्ट मोहिमाचे बेत आखले जातच राहिले तिथली नवनवी आव्हाने शोधून काढून त्यावर मात करण्याचे प्रयत्न सुरू झाले हा पाचवा टप्पाही तितकाच रोमाचक आहे

# नवे धोके—नव्या जाणिवा



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. २०२८५
शाखा

# १० नवे धोके– नव्या जाणिवा

## दुर्गम मार्गाने एव्हरेस्ट चढाई

मे १९७५ ला क्रिस बॉनिंग्टनच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश पथक नैऋत्य कड्यावरून एव्हरेस्टवर आरोहण करण्यासाठी सिद्ध झाले होते. या बाजूने एव्हरेस्ट गाठणे ही अतिशय अवघड कामगिरी होती. ते शक्य झाले तर एक नवे यशस्वी साहस मानले जाणार होते.

१९६९ च्या पावसाळ्यानंतर योशिओ फुजितो या तीस वर्षीय जपानी गिर्यारोहकाच्या मार्गदर्शनाखाली एक तुकडी या नैऋत्य कण्याची पाहणी करण्यासाठी आली होती. ती एव्हरेस्टवरील २५ वी मोहीम ठरली. १९७० च्या मेमध्ये साबुको मात्सुकाटा (७०) च्या नेतृत्वाखाली निघालेल्या जपानी मोहिमेत हिरोमी ओहत्सुकाच्या नियंत्रण व मार्गदर्शनाखाली नैऋत्य कण्यावरून एव्हरेस्ट गाठण्याचा प्रयत्न झाला. तेव्हा फक्त ७९२४ मी/२६००० फूट उंची गाठता आली होती. नंतर हवा बिघडल्याने तो प्रयत्न सोडून देण्यात आला होता. मात्र त्या वेळी नेहमीच्या आग्नेय कण्याने ४ गिर्यारोहक एव्हरेस्टच्या माथ्यावर पोहोचले होते.

एव्हरेस्ट कथेमधील सर्वांत दुर्दैवी मोहीम म्हणून गाजलेल्या पहिल्या (व शेवटच्या ?) आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट मोहिमेने पश्चिम कणा, आग्नेय कणा आणि नैऋत्य कड्यावरून एव्हरेस्ट गाठण्याचे तीन प्रयत्न करण्याचे योजिले होते. त्यामध्ये डॉन विल्हान्स आणि डौगल हेस्टन यांना नैऋत्य कण्यावर ८३८२ मी/२७५०० फूट उंची गाठता आली होती.

मे १९७२ मध्ये एव्हरेस्टवरची ३० वी मोहीम क्रिस बॉनिंग्टनच्याच नेतृत्वाखाली पावसाळ्यानंतर नैऋत्य कण्यावर जाण्यास निघाली होती. त्यातही ७९२४ मी/२६००० फुटापेक्षा जास्त उंची गाठता आली नव्हती. या तुकडीत अतिशय कसलेले अकरा गिर्यारोहक होते.

खर-तर क्रिस बॉनिंग्टन याना मे १९७५ मध्ये या कड्यावर मोहीम काढण्यास परवानगी मिळालेली नव्हती एका कॅनेडीयन मोहिमेने त्या वेळी एव्हरेस्टसाठी प्रयत्न करण्याचे ठरविले होते पण आयत्यावेळी तो प्रयत्न न करण्याचे त्यानी ठरविल्यामुळे क्रिस बॉनिंग्टन याना आयत्यावेळी ही संधी मिळाली त्याच्या नेतृत्वाखाली हॅमिश मॅकइन्स (उपनेता), डगल हेस्टन, डग स्कॉट, पीटर बोर्डमन, मार्टीन बॉयसेन, पॉल ब्रेथवेट, माइक बर्क, निक ईस्टकोर्ट, अॅलान फीफे, माइक थॉम्पसन, जिम डक, माइक ऱ्होडस, डॉ चार्लस् क्लार्क, डेव्हिड क्लार्क, केथ रिचर्डसन, डड स्टडले, माइक चेनी, अॅड्रीमन गॉर्डन हे गिर्यारोहक सामील झाले होते

या धाडसी मोहिमेचे नेतृत्व क्रिस बॉनिंग्टनकडे होते हॅमिश मॅकइन्सकडे उपनेतेपद होते पीटर बोर्डमन, मार्टीन बायसन, पॉल ब्रेथवेट, माइक बर्क (याच्याकडे प्रकाशचित्रणाचीही जबाबदारी सोपवलेली होती), निक ईस्टकोर्ट (याच्याकडे खजिनदारीची सूत्रेही होती), अॅलन फिफे, डगल हौस्टन, डग स्कॉट हे मुख्य गिर्यारोहक होते डॉ चार्लस क्लार्क, डेव्हिड क्लार्क (साहित्य व्यवस्थापक), डॉ जिम डक, बरक्लेज बॅंकेचा प्रतिनिधी माइक ऱ्होडस्, माइक थॉम्पसन (स्वयपाक पथक प्रमुख), रोनी रिचर्डस् (वाहतूक व सदेश यत्रणा प्रमुख), माइक चेनी आणि अॅड्रीयन गॉर्डन (तळ प्रमुख), बॉब स्टूडले (वाहतूक व्यवस्था), सडे टाइम्सचा वार्ताहर केथ अँडरसन अशा इतर अनेकाचाही सहभाग होता पेरतेंबा या अनुभवी शेर्पा सरदाराचा वाटाही महत्त्वाचा होता आंग फू शेर्पा, फुरकिपा शेर्पा, ल्हकपा दोरजी शेर्पा असे मदतनीस होते

२४ टन सामान घेऊन २ ट्रक्स ९ एप्रिल १९७५ रोजी लडनहून निघाले ते ४ मे रोजी काठमांडूत आले काठमांडू- लुक्ला ते विमानाने व तेथून कुडेपर्यंत ते भारवाहकाच्या मदतीने नेले गेले ३० जुलै रोजी क्रिस बॉनिंग्टन काठमाडूत पोहोचला ५१८१ मी / १७००० फूट उचीवर २२ ऑगस्टला त्यांनी पायतळ उभारावयास सुरुवात केली भारवाहक शेर्पांच्या मदतीने सामान पुढील तळावर हलवायलाही सुरुवात झाली पण मिग्मा नुरू हा शेर्पा हिमखडाच्या तडाख्यात सापडून मरण पावला दोर-मेखा-शिड्या-बावटे लावून मार्ग निश्चित व सुरक्षित बनविण्यात आला होता ६२७९ मी / २०६०० फूट उचीवर २६ ऑगस्टला पहिला तळ ठोकला गेला दुसरा व तिसरा तळ अनुक्रमे नैऋत्य कड्याच्या पायथ्याशी व थोडे वर असे उभारले होते ५ सप्टेंबर रोजी पाचवा तळ, पीतपट्ट्याखाली उभारला गेला या ठिकाणाच्या थोडे पश्चिमेकडे एक अरुद अशी घळ आहे इथून वर गेलं की, निम्म काम फत्ते होणार होत

## शेवटचा हल्ला

२० सप्टेंबर रोजी निक एस्टकोर्ट आणि ब्रेथवेट यांनी ५ व्या तळापासून

शिखरावर जाण्याचा सभाव्य मार्ग शोधून काढला, पण अती उचीवर फार काळ राहिल्याने त्यांना पुढील चढाईत भाग घेता येणे शक्य होणार नव्हते

२४ सप्टेंबर रोजी डौगल हेस्टन आणि डग स्कॉट यांची निवड होणे अपेक्षित होते आणि तशी ती झाली देखील यानतरच्या तुकडीत माइक बर्क, मार्टिन बॉयसन, पीटर बोर्डमन, आणि पेरतेंबा (पिरतबर ?) याचा समावेश होता शेवटच्या तुकडीत एस्टकोर्ट, ब्रेथवेट, रोनी रिचर्डस् आणि शेर्पा अनफुर्बा यांना सधी दिली जाण्याची शक्यता होती

२४ सप्टेंबरच्या पहाटे पावणेचारला सहाव्या तळातून हेस्टन आणि स्कॉट निघाले त्या अवघड कड्यावरून जाताना कठीण बर्फामुळे त्यांचा वेग मदावला होता दक्षिण शिखरावर ते आले तेव्हा तर दुपार झाली होती सूर्यास्तापूर्वी थोडा-वेळ असताना ते शिखरावर पोहोचले अतिशय मन्नाट अशा सूर्यास्ताला साक्ष ठेवून त्यानी दुर्गम मार्गावरून एव्हरेस्ट चढाई करून आपला विजय साजरा केला तिबेट-कडची तपकिरी जांभळी शिखरे आणि नेपाळकडील श्वेतधवल व गुलाबी सूर्यप्रकाशात न्हाऊन निघालेली शिखरे त्याच्या या आनदात सहभागी झाली होती

एव्हरेस्ट शिखराचा शोध, मोजणी, नकाशांकन, पाहणी आणि असख्य एव्हरेस्ट मोहिमा ही आजवरची ब्रिटिशाची कामगिरी होती एव्हरेस्टवरील पहिला विजय ब्रिटिश मोहिमेने नोंदवला असला तरी ब्रिटिश नागरिकाचे पाय एव्हरेस्टवर रोवले जाण्याचा हा पहिलाच प्रसग होता साम्राज्यावरचा सूर्य मावळल्यानतर त्याना मावळत्या सूर्याच्या साक्षीनेच विजय मिळाला होता

आधीच्या चिनी मोहिमेने तेथे रोवलेला मोजणीस्तभ त्याना आढळला मात्र येथवर पोहोचलेल्या आधीच्या सर्व मोहिमानी ठेवलेली स्मृतिचिन्हे गायब झालेली आढळली ही लालभाईंची कामगिरी, की सुसाट वाऱ्याचा प्रताप हे सागता येणार नाही शिखर माथ्यावरून सहाव्या तळावर मुक्कामासाठी यायला त्याना खूपच रात्र झाली दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजता ते दुसऱ्या तळावर परतले

२६ सप्टेंबरला पेरतेंबा, पीटर बोर्डमन, मार्टीन बॉयसन, माइक बर्क यांची तुकडी शिखरमाथ्याकडे पावले टाकू लागली हेस्टन स्कॉटच्या विजयामुळे त्याचे नीतिधैर्य उचावलेले होते अवघड जागा व अडचणींची कल्पनाही आलेली होती त्यामुळे या तुकडीचे काम थोडे सुकर झाले होते मार्टीन बॉयसन मात्र दुर्दैवी ठरला त्याचा क्रॅम्पॉन निसटला आणि त्याच्या प्राणवायू पुरवठा यत्रणेत बिघाड झाला त्याला परत फिरावे लागले एवढ्यात हवेतील बदल जाणवू लागला थोडस धुकट येऊ लागल खालच्या दरीतून ढग वर वर येऊ लागले बॉयसन परत फिरल्याने माइक बर्कला एकट्याने पुढे जायचे की परतायचे याचा निर्णय घ्यायचा होता त्याने पुढे जाण्याचे ठरवले पीटर आणि पेरतेंबाच्या पाठोपाठ पण बरच

मागे तो होता पीटर बोर्डमन आणि पेरतेंबा दक्षिण शिखरावर पोहोचले तेव्हा बराच वेळ झाला होता त्यांनी त्वरेने शिखरमाथ्याची धार पकडली आणि दुपारी एक वाजून दहा मिनिटांनी ते शिखरावर पोहोचले आणखी एक यश पदरी पडल होत शिखरावरून ते रात्रीच्या मुक्कामासाठी तळाकडे पोहोचू लागले, तेव्हा त्या धुकटातून माइक बर्क एकटाच वर चढत असलेला दिसला त्याला त्यांनी शुभेच्छा दिल्या आणि शिखरावरून लवकर परतायला सांगितले बदलत्या हवेची दुश्चिन्हे दिसू लागली होती त्यांनी बर्कला साथ देण्यासाठी दक्षिण शिखरावर वाट पाहण्याची तयारी दाखवली जवळजवळ साडेचार वाजेपर्यंत ते तेथे थांबले आणि मग हताश होऊन अभागी बर्कला आपली सहानुभूती दाखवीत त्यांनी खाली उतरायला सुरुवात केली ते तळावर पोहोचले तेव्हा सायकाळचे साडेसात वाजले होते त्या भयाण वादळात माइक बर्कचे शिखराकडे जात असताना अपघाती निधन झाले होते एक दमदार, कसदार गिर्यारोहक एव्हरेस्टच्या कुशीत कायमचा विसावला होता

या विजयाने एक नवा इतिहास घडला होता नैऋत्य कण्याच्या मार्गाने आरोहणाचा प्रयत्न यशस्वी झाला होता

ब्रिटिशांचे एव्हरेस्टवरील पदन्यासाचे ध्येय साध्य झाले होते पट्टेरी झेंडा पुन्हा एव्हरेस्टवर फडकला तेव्हा एव्हरेस्टवीरांचे अर्धशतक ओलांडले गेले होते आजवर त्रेपन्न वेळा मानवाने तेथे पदार्पण केले होते

## इंग्लंड व नेपाळच्या शाही फौजांची संयुक्त मोहीम

मे १९७६ मध्ये लेफ्टनंट कर्नल टोनी स्ट्रीथरच्या नेतृत्वाखाली इंग्लंडची सैनिक गिर्यारोहण संस्था व शाही नेपाळसेना यांची संयुक्त मोहीम हाती घेण्यात आली होती ३५ गिर्यारोहकांचा त्यात समावेश होता ११ एप्रिल रोजी कॅप्टन टेरी थॉम्पसनचा अपघाती मृत्यू झाला नंतर नेटाने प्रयत्न करून सार्जंट ब्रूमी स्टोकस् (३०) व कॉर्पोरल ब्रॉंको लेन (३१) हे ब्रिटिश आरोहक १६ मे ७६ रोजी दुपारी ३। वाजता शिखरावर पोहोचले जुंको ताबेईच्या विजयाला या दिवशी एक वर्ष पूर्ण झाले होते या बाराव्या यशस्वी मोहिमेमुळे पचावन्न वेळा मानवी पायाखाली एव्हरेस्टचा माथा नमला होता

## अमेरिकन स्वातंत्र्याची एव्हरेस्टवर द्विशताब्दी साजरी झाली

फिल ट्रिम्बल (३८)च्या नेतृत्वाखाली अमेरिकेच्या स्वातंत्र्याची द्विशताब्दी साजरी करणारी एव्हरेस्ट मोहीम आखली गेली ८ ऑक्टो ७६ रोजी डॉ ख्रिस चॅंडलर (३०) व बॉब कॉरमॅक (२८) शिखरावर पोहोचलेदेखील दुपारी सव्वा-चार वाजता ते शिखरावर गेले तब्बल अर्धा तास ते तेथे होते, पण तेथे अमेरिकेचा

पट्टेरी-चादण्यांचा ध्वज मात्र त्याना फडकवता आला नाही.शेर्पा सरदार आंग फूरबू-जवळ झेंडा दिलेला होता, पण प्राणवायू पुरवठ्यात काहीतरी घोटाळा झाल्याने आग फूरबू शिखरावर पोहोचू शकला नाही साहजिकच द्विशताब्दी निमित्त गेलेल्या या मोहिमेला झेंडा फडकवणे शक्य झाले नाही या तुकडीत १२ सदस्याचा समावेश होता त्यात दोन महिलाही होत्या.

## न्यूझीलंडचे अपयश–

मे ७६ मध्ये कीथ वुडफोर्डच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंडच्या मोहिमेने एव्हरेस्ट आरोहणाचा कार्यक्रम आखला, पण त्यांना अपयश आले शेर्पांची मदत न घेता ही मोहीम आखली गेली होती. या तुकडीत आठजणाचा सहभाग होता त्यानी केवळ ६ तळाची योजना केली होती, पण या अल्पाइन स्टाइलच्या पहिल्यावहिल्या एव्हरेस्ट मोहिमेला जरी अपयश आल तरी त्यानी एव्हरेस्ट आरोहणाला एक नवी दिशा निश्चित प्राप्त करून दिली

## कोरियन वाघांची एव्हरेस्ट चढाई–

१५ सप्टेंबर १९७७ । को साग दो (२९) आणि शेर्पा पेम्बा नोरबू (२८) ही दुक्कल एव्हरेस्टच्या माथ्यावर पोहोचली मानवाचे ५८ वे आणि ५९ वे पदार्पण नोंदले गेले एव्हरेस्टवरील या ४२ व्या मोहिमेच्या पदरी यशाच माप पडल यश मिळवणारी ही १४ वी सुदैवी मोहीम ठरली साऊथ कोलच्या मळवाटेने वर जाण्यात त्याना यश मिळाल दुपारी १२-५० ते १-५० ते शिखरमाथ्यावर होते

को सांग दो याने तिथ एक बायबलची प्रत ठेवली त्याच्या प्रिय पत्नीन एव्हरेस्टला दिलेली ती खास भेट होती

१९ जणांच्या या मोहिमेच नेतृत्व याग दो किम या ५३ वर्षीय गिर्यारोहका-कडे होते हा अनुभवी गिर्यारोहक कोरियन अल्पाइन फेडरेशनचा चेअरमन आहे साग-युल-पार्क (३३) हा उपनेता व मून-साम-चांग (३५) हा चढाईचा प्रमुख सूत्रधार होता मोहिमेचा पायतळ रोवल्यापासून अवघ्या ३७ दिवसात शिखरावर पदार्पण असा ' झट मागनी, पट ब्याह ' चाच हा प्रकार झाला।

या मोहिमेबद्दल अधिक तपशील मात्र उपलब्ध नाही

## १९७८ एव्हरेस्ट विजयाच रौप्यमहोत्सवी वर्ष–

२९ मे १९५३ । विश्वकळसावर मानवाचा पदन्यास ।। या घटनेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने गिर्यारोहण जगात त्याचे पडसाद उमटण आणि एव्हरेस्ट विजयदिनाच स्मरण होण साहजिकच होतं कसलेल्या गिर्यारोहकाना

ए...९

झुकाड्या देणार एव्हरेस्ट ही अप्रूपाची गोष्ट राहिली नव्हती एव्हरेस्टवीराची सख्या ५९ एवढी झाली होती त्यात एकदम २५ गिर्यारोहकाची भर पडून ती सख्या ८४ वर गेल्याची घटना याच वर्षातील या वर्षी पुण्यातील महात्मा फुले वस्तुसंग्रहालयाने हिमालयाची शास्त्रीय दृष्टिकोनातून माहिती देणारी १७ व्याख्याने तसेच माऊट एव्हरेस्ट आणि गिर्यारोहण क्षेत्रासबधीचे एक प्रदर्शन आयोजित केले होते या उपक्रमाला प्रतिसादही उत्साहवर्धक मिळाला होता

आंतरराष्ट्रीय महिला वर्षात (१९७५ मध्ये) श्रीमती जुको ताबेई (जपान) आणि श्रीमती फात हॉंग (तिबेट) यांनी एव्हरेस्टवर आरोहण करून ते वर्ष साजर केल होत तस काहीतरी भव्य दिव्य– आगळवेगळ या रौप्य महोत्सवी वर्षातही घडाव, अस सर्वांनाच वाटत होत तस ते घडलदेखील

१९७८ मध्ये एव्हरेस्टवर जाणाऱ्या २५ गिर्यारोहकात सर्वांत उठून दिसला तो रेनहोल्ड मेसनर आणि पीटर हेब्लरचा दिमाखदार विजय प्राणवायूच्या नळकाड्याच्या कुबड्याशिवाय हे दोघे तेथवर जाऊन परतले यासाठी रौप्यमहोत्सवी वर्षाइतक आगळ वर्ष शोधून सापडणार नाही

अर्थात १९२४ मधील अयशस्वी मोहिमेत कर्नल इ एफ नॉर्टनने अशा जादा प्राणवायूशिवाय २८१४६ फूट/७३५९ मी पर्यंत मजल मारली होतीच जसजस उच जाव तसतस वातावरण विरळ होत जात, तिथल्या हवेचा दाब कमी व्हायला लागतो त्यामुळे अथक परिश्रम करणाऱ्या गिर्यारोहकाची प्राणवायूची गरज वाढलेली असताना त्याला मिळणाऱ्या प्राणवायूच्या प्रमाणात प्रचड घट होते यावर तोडगा म्हणजे प्राणवायूची नळकांडी घेऊन जायची व त्यांचा वापर करावयाचा हे तत्र चागल्या रीतीने विकसित होऊन एव्हरेस्टवर ५९ वेळा मानवाने पदार्पण केले होते, पण याऐवजी विरळ वातावरणाशी जमवून घेत घेत गेल तर एव्हरेस्टवर पाऊल ठेवता येईल व तेव्हा ही प्राणवायूची नळकांडी बरोबर वागवावी लागणार नाहीत अस एक मत होतं रेनहोल्ड मेसनरच्या रूपाने या मताला एक खदा पुरस्कर्ता मिळाला अर्थात चमत्काराशिवाय नमस्कार नाही हेही खर, म्हणून मेसनरने प्राणवायूच्या नळकाड्याशिवाय स्वतःच तिथवर जाण्याच ठरवल आणि त्यात त्यान यशही मिळवल ही घटना नेमकी रौप्यमहोत्सवी वर्षात घडावी हा एक दुर्मिळ योगायोगच आहे

रेनहोल्ड मेसनर (३३) हा जन्मान इटालियन वयाच्या १० व्या वर्षापासूनच पर्वताच वेड या भल्या माणसाला लागल काही काळ गणिताचा शिक्षक म्हणून नोकरी केली, पण पर्वताचा ध्यास' हा वरताण करणारा ठरला पीटर हेब्लर (३५) हा जन्मान ऑस्ट्रीयन यालाही बालपणापासूनच पर्वताची ओढ लागली. मेसनर आणि हेब्लरची गाठ पडेपर्यंत त्या दोघानी प्रामुख्याने एकेकट्यानेच पर्वता-

वरील चढाया केल्या या दोघाच पर्वताच प्रेम आणि तत्त्वज्ञान एकच अचाट पर्वतांवर जायच ते मानव म्हणून प्राणवायूची नळकाडी लावून शिखर गाठण काय आणि हेलिकॉप्टरने शिखरावर उतरण काय, त्याच्या लेखी त्याची किंमत एकच कमीतकमी साधनांचा वापर करून शिखर चढाई करण्यातच खरा पुरुषार्थ आहे, तीच खरी मर्दुमकी होय, अस त्याच मत होत

गिर्यारोहण जगातला मेसनर हा बकासुरच मानला जातो थोर थोर शिखराचा नक्षा उतरवण, तेही प्राणवायूची मदत न घेता, हा यांच्या डाव्या हातचा मळच आहे मेसनरने नगा पर्वतावर (८१२५ मी/२६६५८ फूट) १९७० साली केलेली चढाई एक उच्च कामगिरी मानली जाते वायलँड हिमानीवरील रूपाल कडा, वेल्झेनबॅक हिमप्रदेश, मेर्कल कुलियर, हे नोंदण्याजोगे पराक्रम १९७४ मध्ये अवघ्या १० तासात उत्तर कड्यावरून आयगर शिखर चढाई हेब्लरच्या मदतीने त्याने करून दाखवली या कड्यावर पूर्वी ३८ जणाना मृत्युमुखी पडावे लागले होते. काराकोरम पर्वतराजीतील ८०६८ मी/२६४६९ फूट उचीच्या हिडन पीकची हेब्लरच्या साथीने चढाई आणि मनालू (८१५६ मी/२६७६० फूट) आरोहण– तेही जादा प्राणवायूच्या मदतीशिवाय– हे अजोड पराक्रम त्यांच्या नावावर होते.

धवलगिरी ८१७१ मी/२६८१० फूट शिखरावर दक्षिण कड्यावरून केल्या गेलेल्या आरोहणात त्याच्या पदरी अपयश आलं १९७८ मध्ये एव्हरेस्टची हवाई पहाणी करताना त्यांनी प्राणवायूचा उपयोग करण टाळल होत मेसनर म्हणतो, " माझ गिर्यारोहण हे खास माझ्यासाठी आहे आणि म्हणूनच ते मला जस वाटत, तस मी करतो त्यातून मला मिळणार समाधान माझ्या जगण्यासाठी मला आवश्यक आहे "

प्राणवायूच्या मदतीशिवाय एव्हरेस्टवर यशस्वी आरोहण हे आता मात्र नावीन्य राहिलेल नाही परतु १९७८ मधील अशा तऱ्हेच हे पहिल आरोहण त्या वेळी विस्मयकारक ठरल त्याच्या सत्यतेबद्दलही शकाकुशका काढल्या गेल्या, पण मेसनर– हेब्लर यांनी तिकडे दुर्लक्षच केल

याच वर्षी पावसाळ्यानतर एका फ्रँको-जर्मन मोहिमेने इतिहासच घडवला १५ जणांनी एव्हरेस्ट शिखरावर पाय रोवला त्यामध्ये वाडा रूटकीविक्स (३५) या पोलिश महिलेचा समावेश होता मिग्मा त्सेरिंग (२४), आंग दोर्जी (२६) यांनी साऊथ कोल ते शिखर अंतर अवघ्या सहा तासात तोडले, तेही प्राणवायूच्या नळकाड्याशिवाय निकोलस जीगर आणि जीन अफनासिफ या दोन फ्रेंच एव्हरेस्ट-वीरानी ८२५० मी ते ६००० मी उंचीवरचा दुसरा तळ हे अतर स्किईंग करून तोडले युइचिरो मिऊरा या जपानी गिर्यारोहकाचा ८००० मी उचीवरून स्किईंग करण्याचा विक्रम त्यानी मोडला

एव्हरेस्ट विजयाचे रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी नेपाळसरकारने एक मोठा समारंभ योजला होता २९ मे ते ४ जून असा 'नेपाळ गिर्यारोहण– सागरमाथा सप्ताह' आखला होता त्या वेळपर्यंतच्या ६८ गिर्यारोहकांपैकी २६ जण या कार्यक्रमाला उपस्थित होते.

ऑस्ट्रियाचे वुल्फगँग नैरे (१९७८), हर्स्ट बर्गमन (१९७८), रॉबर्ट खार (१९७८), फ्रान्झ ऑपुर्ग (१९७८), भारताचे तेनसिंग नोर्गे (१९५३), एच पी एस. अहलुवालिया (१९६५), एच पी एस रावत (१९६५), ए एस चीमा (१९६५), सी पी व्होरा (१९६५), सोनाम वाग्याल (१९६५), इटलीचे फेब्रिझिओ इन्नामोराती (१९७३), जपानचे यासुओ काटो (१९७३), हिसाशी इचिगुरो (१९७३), तेरूओ मात्सुआरा (११७०), नेपाळचे छोतारे शेर्पा (१९७०), ल्हकपा तेनसिंग शेर्पा (१९७३), साम्बु तामाग (१९७३), सोनाम ग्यालझेन शेर्पा (१९७३), पेरतेंबा शेर्पा (१९७५), पेम्बा नोरबू शेर्पा (१९७७), आंग फू शेर्पा (१९७८), चीनचे चू यिंग हुस (१९६०), सोदनाम नोरबू (१९७५), फांत हॉग (१९७५), कोरियाचे सांग दॉन को (१९७७), अमेरिकेचे ल्युट जेस्टार्ड (१९६३) असे २६ जण या स्मरणीय कार्यक्रमास उपस्थित होते जुंको ताबेई आणि एडमंड हिलरी यांची अनुपस्थिती मात्र सर्वांनाच जाणवली

१९७८ या एव्हरेस्टच्या रौप्य महोत्सवी वर्षातच इंडियन माऊंटेनियरिंग फौंडेशनने इंडियन माऊंटेनियर हे अर्धवार्षिक सुरू केले

पुण्यातील भारत आऊटवर्ड बाऊंड पायोनियर्स ह्या संस्थेतर्फे 'माथा नाही तर पायथा तरी' असे म्हणून काठमांडू ते एव्हरेस्ट बेस्ट कँपपर्यंत परिसर अभ्यास मोहीम आणि जवळच्या ५६३० मी /१८४७१ फूट उंचीच्या अनामिक शिखरावर चढाई असा कार्यक्रम आखला होता या यशस्वी मोहिमेचे नेतृत्व माझ्यावर सोपविण्यात आले होते आमच्या दहाजणांच्या या तुकडीत ३ महिलांचाही समावेश होता पुणेकरांनी अशा रीतीने एव्हरेस्ट विजयाचा रौप्यमहोत्सव साजरा केला मी व मकरंद दाते या तरुण सहकाऱ्याने ७ मे (माझ्या जन्मदिनी) १९७८ रोजी एव्हरेस्टसमोरच्या ५६३० मी /१८४७१ फूट उंचीच्या अनामिक शिखरावर पाय ठेवून ही मोहीम यशस्वी केली. आमच्या मोहिमेला भारत सरकारच्या अॅडव्हेंचर प्रमोशन प्रोग्राम या योजनेखाली आर्थिक मदतही मिळाली होती

## प्राणवायूच्या कुबड्यांपासून सुटका.

१९७८ च्या मे मधील एव्हरेस्टवर गेलेली ४३ वी मोहीम, १५ वी यशस्वी मोहीम ठरली ही ऑस्ट्रीयन (ओ इ ए व्ही) मोहीम वुल्फगँग नैर्झच्या नेतृत्वाखाली निघाली होती. नेहमीच्या आग्नेय कण्यावरून जरी ही मोहीम आखली होती,

तरी प्राणवायूची नळकाडी बरोबर वागवीत एव्हरेस्ट चढण्यात काहीच पुरुषार्थ नाही अशा मताचे दोन गिर्यारोहकवीर या तुकडीत होते रेनहोल्ड मेसनर (३३) आणि पीटर हेब्लर (३५) ही त्याची नावे पैकी मेसनर आहे इटालियन, आणि हेब्लर आहे ऑस्ट्रीयाचा

नेहमीप्रमाणे, पायतळ, मग उंचावरील तळांची साखळी तयार करत या तुकडीची एव्हरेस्टच्या दिशेने आगेकूच चालू होती ३ मे १९७८ रोजी वुल्फगँग नैर्झ (३४) हा नेता, हॉर्स्ट बर्गमन (३६), रॉबर्ट शौर (२५) या तीन ऑस्ट्रीय-नानी आंग फू (२८) या नेपाळी शेर्पाबरोबर एव्हरेस्टचा माथा गाठला अतिशय सुंदर हवेचे सहकार्यही त्याना मिळाले

८ मे ७८ रोजी मात्र एव्हरेस्टवर नवा इतिहास घडला जादा प्राणवायूचा उपयोग अजिबात न करता रेनहोल्ड मेसनर (३३) व पीटर हेब्लर (३५) हे दोघे जण एव्हरेस्ट गाठण्यात यशस्वी ठरले अशा तऱ्हेचा उपक्रम करणारे ते पहिलेच एव्हरेस्ट वीर ठरले

११ मे ७८ रोजी ओसवाल्ड ओल्झ (३५) ऑस्ट्रीयन, व रेनहार्ड कार्ल (३०) पश्चिम जर्मन या गिर्यारोहकानी शिखरावर पदन्यास केला १४ मे ७८ रोजी फ्रान्झ ओपुर्ग (२८) या ऑस्ट्रीयन गिर्यारोहकाने एकट्याने चौथ्या तळा-पासून एव्हरेस्टच्या माथ्यापर्यंत जाण्यात यश मिळवले या तऱ्हेचे आरोहण करणारा हा पहिलाच वीर ठरला

काठमांडू ते लुक्ला हवाई प्रवास करून १९ मार्चला पायतळ उभारला व ३ मे रोजी म्हणजे अवघ्या ४६ दिवसांत शिखर गाठले गेले या मोहिमेनतर ६८ वेळा मानवाने एव्हरेस्टवर पाय रोवल्याची घटना नोंदली गेली

साधारणत शेवटच्या तळावरून एव्हरेस्ट शिखरावर जाऊन परत त्या तळावर येण्यासाठी सरासरी १४ तास लागतात पण या मेसनर-हेब्लर जोडगोळीला त्यासाठी अवघे ६ तास पुरले तेही प्राणवायूच्या नळकांड्यांच्या मदतीशिवाय त्यामुळे शेर्पा तेनसिंगसकट सात एव्हरेस्ट विजेत्यांनी याबाबत शका व्यक्त केली आहे त्याच्या मते एक तर वेळेची नोंद चुकलेली आहे किंवा एव्हरेस्ट विजयाच्या वेळी प्राणवायूची मदत न घेतल्याचा दावा चुकलेला आहे यावर कालांतराने मत प्रदर्शन करताना प्रत्येकाची शारीरिक कुवत, विरळ हवामानाला जमवून घेण्याचा प्रकार आणि प्राणवायू नळकांड्यांचे पाठीवर नसलेले ओझे या सर्वांमुळे इतका कमी वेळ लागणे शक्य असल्याचे अनेकांनी मान्य केले

पहिला ऑस्ट्रीयन, पहिला पश्चिम जर्मन यांनी एव्हरेस्टवर पाय ठेवला या मोहिमेत आगनुरू हा थामीचा राहणारा शेर्पा दगावला मोहिमेचा नेता शिखरावर पोहोचण्याची ही पहिलीच वेळ होती

पाचवा टप्पा सपला तो एव्हरेस्टवर प्राणवायूच्या नळकाड्या-शिवाय यशस्वी आरोहणामुळे पुरुष व महिला गिर्यारोहकानी, वेग-वेगळ्या वाटानी, वेगवेगळ्या ऋतूत एव्हरेस्ट चढायाचे सकल्प सोडले अनेकानी त्यात यशही मिळवले ती गगनचुबी उची, तिथली विरळ हवा आणि इवल्याशा मानवाची शारीरिक ताकद याच्या लढाईतली ही चकमक अखेर मानवाच्या पदरी यशाच झुकत माप टाकून सपली

आता तरी एव्हरेस्ट मोहिनीची जादू सपायला हवी होती पण तरीही प्रयत्न चालूच राहिले

# नव्या दमाचे शूर शिपाई
# एव्हरेस्टचे भय आम्हा नाही !



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २०२८६
ता. २।५।८६

# ११ नव्या दमाचे शूर शिपाई एव्हरेस्टचे भय आम्हा नाही !

## एव्हरेस्टवर एका मोहिमेत १६ आरोहक

१९७८ ऑक्टोबर मध्ये फ्रँको जर्मन मोहिमेने अनेक नवे विक्रम प्रस्थापित केले ३५ जणांच्या या तुकडीचे नेतृत्व डॉ कार्ल हेलिग्कॉफर (जर्मन) व पीअरे माझौद (फ्रेंच) यांच्याकडे होते १४ फ्रेंच, १८ जर्मन आणि ऑस्ट्रीया, स्वित्झर्लंड व पोलंड (महिला) यांचे प्रत्येकी एक जण या संयुक्त मोहिमेत सहभागी झाले होते आग्नेय कण्यावरूनच याही मोहिमेने एव्हरेस्ट सर केले १६ गिर्यारोहकांना एव्हरेस्ट गाठता आले

१४ ऑक्टो ७८ रोजी रॉबर्ट हिल मियर (३४), हॅन्स एंगल (३४) आणि जोसेफ (स्टेप ?) मॅक (२८) या पश्चिम जर्मन आरोहकानी एव्हरेस्ट गाठले पैकी हॅन्स एंगलने पाचव्या तळापासून प्राणवायूच्या नळकांड्यांचा उपयोग केला नाही

१५ ऑक्टो ७८ रोजी पिअरे माझौद (४९) या फ्रान्सच्या माजी क्रीडा मंत्र्याने एव्हरेस्ट गाठले त्याच्या बरोबरच कुर्ट डायम्बर्गर (४६) हा ऑस्ट्रियन गिर्यारोहक आणि जीन अफनासीफ (३५), निकोलस जीगर (३२) हे फ्रेंच गिर्यारोहकही होते या वेळी एव्हरेस्टवर ७५ वेळा मानवाने पाऊल रोवल्याची नोंद झाली

१६ ऑक्टोबरला तर विल्हेम क्लिमेक (३८) आणि सिग्फ्राइड हूपफौर (३७) हे दोन पश्चिम जर्मन नागरिक, रॉबर्ट ॲलेनबॅक (२८) हा स्वित्झर्लंडचा नागरिक, वांडा रूटकीविक्स (३५) ही पोलिश महिला आणि आंग दोर्जी (२६), आंग कामी (२४) व मिंग्मा (२४) हे नेपाळी शेर्पा विश्वकळसावर पोहोचले मिंग्मा त्सेरींग आणि आंग दोर्जी यांनी जादा प्राणवायूचा उपयोग न करता माथा गाठला वांडा रुटकीविक्स या महिलेने एव्हरेस्ट गाठणारी पहिली युरोपिअन महिला

हा सन्मान प्राप्त केला या दिवशी पोलंडला दोन आतर-राष्ट्रीय बहुमान मिळाले त्याच दिवशी पोलिश कार्डीनलची 'पोप' पदावर निवड झाली तर पोलिश महिलेने पृथ्वीवरील सर्वोच्च शिखर गाठले उत्कृष्ट व्हॉलीबॉलपटू असणाऱ्या या महिलेने १९७० मध्ये ७१३४ मी उचीचे पामीर पठारावरील लेनीन शिखर, १९७२ मध्ये हिंदुकुश पर्वतराजीतील ७४९२ मी उचीचे नोशाक शिखर आणि १९७५ मध्ये काराकोरम मधील गशेरब्रुम–३ हे शिखर जिंकले होते

१७ ऑक्टोबरला जॉर्ज रिटर (३१) व बर्न्ट कुलमन (२४) या दोघा पश्चिम जर्मन गिर्यारोहकानी शिखरावर आरोहण केले या १६ व्या यशस्वी मोहिमेमुळे मानवी पदन्यासांची सख्या ८४ वर पोहोचली पीअरे माझीद या फ्रेंच गिर्यारोहकाने तर शिखरावरून थेट पॅरिसशी सपर्क साधला हा माजी फ्रेंच क्रीडा-मत्री एव्हरेस्ट गाठणारा सर्वात वयस्कर मानव ठरला

## युगोस्लाव्हियाची चढाई

मे ७९ मध्ये टोन स्कार्जा या अनुभवी गिर्यारोहकाच्या मार्गदर्शनाखाली गेलेल्या युगोस्लाव्हियन मोहिमेला यश मिळाले एव्हरेस्टवर निघालेली ही ४५ वी मोहीम होती यशस्वी होणारी ही १७ वी मोहीम होय

८७०० मी उचीवरच्या ६ व्या तळावरून निघून पश्चिम कण्याने दुपारी १–१५ ला जर्नेज झाप्लोट्निक (२६) हा क्रान्जमधील शालेय शिक्षक व आन्द्रेज स्ट्रेमफेल्ज (२३) हा क्रान्ज गावातील विद्यार्थी शिखरावर पोहोचले हा विजय त्यानी १३ मे रोजी मिळवला ल्होलाकडील पश्चिम कण्याने वर जाऊन, १९६३ च्या अमेरिकन मोहिमेच्या चढाईच्या मार्गाने म्हणजे उत्तर कडा व हॉर्नबीन कुलियर मधील वाटेने ते खाली उतरले

१५ मे ७९ रोजी स्टॅन बेलॅक (३९), स्टिपबोझिक (२८) व आग फू (२९) यानी शिखर गाठले मात्र चौथ्या तळावर परतत असताना पश्चिम कण्याच्या तिबेटकडील उतारावर घसरून पडून शेर्पा आंग फू याचा मृत्यू ओढवला दोनदा एव्हरेस्ट चढणारा आंग फू हा दुसरा गिर्यारोहक होता या आधी त्याने ३ मे १९७८ रोजी ऑस्ट्रियन मोहिमेत आग्नेय कण्यावरून एव्हरेस्टचा माथा गाठला होता हा अपघात इतक्या क्षणार्धात घडला की बरोबरच्या युगोस्लाव्ह मित्राना मदतीसाठी जाताही आले नाही परतीच्या प्रवासात आंग फूचा पाय घसरला व तो पाठीवर पडला हातातली हिमकुठार दूर भिरकावली गेली आणि गडगडत तो तिबेटच्या बाजूला शेकडो मीटर खाली गेला पुढे त्याचा मृतदेह मिळविण्यात तुकडीला यश आले एव्हरेस्ट मोहिमेत बळी गेलेल्याची सख्या आता पन्नास झाली

## स्वाबिअन मोहीम १९७९

एव्हरेस्टपुरत बरच काही नव या मोहिमेन घडवल डॉ गेन्हार्ड स्माटझ् या पन्नाशी गाठलेल्या वकिलाच्या नेतृत्वाखाली पश्चिम जर्मनीची ही मोहीम अवघ्या आठ गिर्यारोहकाच्या पथकाची होती या ४६ व्या मोहिमेला यश मिळाल्याने ती १८ वी यशस्वी मोहीम ठरली मोहिमेत भाग घेतलेल्या सर्वच्या सर्व म्हणजे आठही जणानी शिखर तर गाठलेच, पण ५ शेर्पाही एव्हरेस्टवीर ठरले या मोहिमेनतर एव्हरेस्ट विजेत्याचे शतक होण्यास फक्त एकजण कमी पडला

१ ऑक्टोबर १९७९ रोजी डॉ गेन्हार्ड स्माटझ् (५०), हा तुकडीचा नेता हरमन बार्थ (३९) आपल्या पश्चिम जर्मनीच्याच गिर्यारोहकाबरोबर एव्हरेस्टवर पोहोचला त्याच्याबरोबर हॅन्स व्हॉन केनेल (३९) हा स्विस आणि लकपा ग्यालझेन (३२) व शेर्पा पेरतेंबा (३१) हे नेपाळी शेर्पा गिर्यारोहक होते दोनदा शिखरावर जाणारा पेरतेंबा हा तिसरा गिर्यारोहक ठरला

२ ऑक्टोबर ७९ रोजी रे जेनेट (४८) अमेरिकन, श्रीमती हॅनलोर स्माट्झ (नेत्याची पत्नी), डॉ टिलमन फिशबॅक (३१), गुटेर कीम्फ (४६) हे पश्चिम जर्मन, निक बॅकस् (२७)न्यूझीलंड, यांच्याशिवाय आग फूर्बा, आग जांगबू व सुदारे (२४) हे नेपाळी शेर्पा शिखरावर पोहचले आणि एव्हरेस्ट पदार्पणाचे शतक झाले डॉ गेन्हार्ड स्माटझ् व हॅनलोर स्माटझ् हे पहिले एव्हरेस्ट विजेते दापत्य ठरले मात्र हा आनद डॉ स्माटझ्ना उपभोगता आला नाही या वेळी रे जेनेटच्या जवळील प्राणवायूचा साठाही सपला होता झाबू (आग जांगबू ?) च्या हे लक्षात येताच तो त्वरेने ८३५० मी उचीवरच्या खालच्या तळावर गेला व त्याने प्राणवायूची नळकाडी परत रात्रीच्या मुक्कामाचे जागी आणली त्या वेळी सध्याकाळचे ७॥ वाजले होते त्याने या प्राणवायूचा उपयोग करून तेथील गिर्यारोहकांना तबू ठोकलेल्या मुक्कामाच्या तळावर चलण्याचा बराच आग्रह केला पण तेथे खोदलेल्या गुहेतच मुक्काम करण्याचा रे जेनेट व हॅनलोर स्माटझ्ने हट्ट धरला प्रचड थकवा, अफाट श्रम, खूप दमणूक व हिमदशाची बाधा यामुळे रे जेनेट या अलास्कात रहाणाऱ्या अमेरिकन गिर्यारोहकाचा रात्री मृत्यू झाला ३५ वेळा अलास्कातील माऊट मॅकिन्ली चढणाऱ्या या अनुभवी गिर्यारोहकाला असा मृत्यू यावा हे केवळ दुर्दैवच होय हॅनलोर स्माटझ् यांच्या सोबतीला सुदारे शेर्पा राहिला व शेर्पा आंग झाम्बू खालच्या तळावर परतला पहाटे उठून सुदारे व हॅनलोर खाली उतरू लागले थोडे अतर खाली जाताच हॅनलोर थडीने गारठून गेली ती खाली कोसळली व मृत्यू पावली त्याना तिसऱ्या तळावरून मदतीसाठी आलेल्या सहा शेर्पांची तुकडी व प्राणवायूची नळकांडी याचा काहीही उपयोग झाला नाही शेर्पा सुदारेला हिमांधत्व आणि हिमदशाचा फटका बसलाच मानवाचा १०२ वेळा या शिखराला पदस्पर्श झाला

मात्र नवाग गोंबू, आग फू आणि पेरतेंबा प्रत्येकी २ वेळा एव्हरेस्टवर गेलेले असल्याने ९९ जणांची एव्हरेस्टवीर म्हणून नोंद झाली

## एव्हरेस्ट की पर्वती?

याच काळात डग स्कॉट नेतृत्वाखाली एक ब्रिटिश मोहीम एव्हरेस्टवर चढाई करण्यास आली होती ल्हो ला (ल्हो खिंडीतून) कडून पश्चिम कण्याने किंवा दक्षिण कण्यावरून नाहीतर दक्षिण स्तभावरून दक्षिण शिखरमार्गे एव्हरेस्ट चढाईचा या मोहिमेचा मनोदय होता डग स्कॉट शिवाय माइक कॉव्हिग्टन (अमेरिकन), जॉर्ज बे टेम्बोर्ग (फ्रेंच), रॅब कॅरिंग्टन, ब्रायन हॉल, ॲलन राऊझ या सहा गिर्यारोहकांव्यतिरिक्त डग स्कॉटची पत्नी आपल्या ६ वर्षांच्या थोरल्या व ६ महिन्याच्या धाकल्या मुलीला घेऊन माइक कॅरिंग्टनची पत्नी सुसान कॅरिंग्टनसमवेत आली होती

एकतर ही मोहीम फारच उशिरा आली होती व कुटुंबकबिले बरोबर बाळगणाऱ्या या मोहिमेने मनापासून काहीच प्रयत्न केले नाहीत एव्हरेस्टच्या मोहिमेसाठी हे असं जाणं कितपत योग्य आहे, याचाही विचार त्यानी केला नाही परिणामी या मोहिमेला अपयशच आले ही सत्तेचाळीसावी मोहीम अपयशी ठरल्याने अपयशी मोहिमाची सख्या २९ झाली

## भलत्याच हंगामात एव्हरेस्टवर स्वारी

साधारणत: एप्रिल, मे आणि आता ऑक्टोबर हे महिने तिसऱ्या ध्रुवाच्या स्वारीसाठी योग्य मानले जातात पण १९८० च्या ऐन हिवाळ्यात फेब्रुवारीत एव्हरेस्टवर स्वारी करण्याचे धाडस पोलडच्या झुझार गिर्यारोहकांनी दाखवले व त्यात त्यांना यशही मिळून गेले खर तर अशा भलत्याच वेळी एव्हरेस्टला हात घालायच कोणी मनातही आणत नाही पण पोलिश लोकानी दाखविलेली चिकाटी त्याच्या उपयोगी पडली त्याच्यासाठी नियमात बदल करून नेपाळ शासनाने त्याना, अशा बिगर मोसमी काळात मोहीम हाती घ्यायला अनुमती दिली

५१ वर्षीय ॲण्ड्रेज झावाडा या वॉर्सातील भू-भौतिकी शास्त्रज्ञाच्या नेतृत्वाखाली ही मोहीम निघाली होती डिसें ७९ मध्ये २० जणांचे हे अतिशय कसलेल्या पोलिश गिर्यारोहकांचे पथक वॉर्साहून काठमांडूत अवतीर्ण झाले ५ जानेवारी ८० ला त्यांनी पायतळ उभारला आपल्यापुढील धोके व अडचणीचे डोगर यांची चांगली जाण त्याना होती पहिला तळ ६००० मी उचीवर, त्यानतरचा ६५०० मी उचीवर व तिसरा तळ ७१५० मी उचीवर चौथा तळ ८००० मी उचीवर प्रस्थापित केला तेथून मग एकदम शिखरावर चढाई मात्र १५ जानेवारी ते ११

फेब्रुवारी या काळात त्याची फक्त तिसऱ्या तळावरून चौथ्या तळावर एवढीच प्रगती होऊ शकली होती

१५ फेब्रुवारीपर्यंतच त्याना चढाईची परवानगी मिळालेली होती १३ फेब्रुवारी ८० ला ॲण्ड्रेज झावाडा आणि रिस्झार्ड स्झाफिर्स्की यांनी शेवटला तळ सुसज्ज केला दुसऱ्या दिवशी त्यांना ८१५० मी उचीवरून परतावे लागले त्यापुढे ॲण्ड्रेज झावाडा एकटाच गेला व स्झाफिर्स्की खाली परतला रात्री उशीर झाला व या नेत्याचा रस्ताच चुकला ६ तासाच्या हरवण्यानतर तो शोधपथकाला मिळाला व सकट टळले

१५ फेब्रुवारीला त्याना नेपाळ शासनाने आणखी दोन दिवस मुदतवाढ दिल्याचा सदेश आला ॲण्ड्रेज हेनरिच व पासाग नोर्बू शेर्पा यांनी पुढील चढाई सुरू केली त्यांनाही प्रचड हिमवादळापुढे मान तुकवून ८६५० मी उचीवरून परत फिरावे लागले

आता लोस्झेक सिचि आणि कुर्झी स्टॉफ वायलिकी या दमदारानी सूत्रे हाती घेतली अखेरच्या तळावर १६ व १७ फेब्रुवारीच्या रात्री तपमान शून्याखाली ४३ अश सेंटिग्रेड होते तुफानी वाऱ्याची घोडदौड चालूच होती ८ तासात ८४८ मी चढाईचा आणि २ कि मी लाबीचा स्वर्गीय मार्ग त्यानी चोखाळला. ते शिखरावर पोहोचले व तब्बल ४० मिनिटे ते तिथे होते एक नवा इतिहास त्यानी घडवला सूर्यास्त, धुकटाचे पाघरूण, घोंघावणारा वारा आणि अर्थातच प्रचड थडी यानी उतरताना भरपूर वैताग आणला पण ते मुक्कामाच्या तळावर अर्धवट मेलेल्या स्थितीत का होईना पण पोहोचले

त्याच्याबरोबर बिनतारी सदेश यत्र होते त्यानी खालच्या तळावर ॲण्ड्रेज झावाडाशी सपर्क साधला "तुम्ही कुठे आहात ?" हाच पहिला अपेक्षित प्रश्न होता त्यानी उत्तर दिली, 'ओळखा पाहू !' त्या वेळी ते शिखराच्या थोडे खाली होते मात्र यानतर तब्बल बारा तासांनी त्याना परत खालच्या तळाशी सपर्क साधता आला साडेसात तासाची चढाई, पाऊण तासाचे शिखरावरील वास्तव्य आणि सहा तासाची उतरण्याची कसोटी पार पाडून हे दोघे वीर पार थकून गेले होते तळाशी आले तेव्हा त्यांना आपला तबू शाबूत असल्याचे पाहून फार आश्चर्यच वाटले आणि अर्थातच आनदही झाला त्यांच्या तबूशेजारीच रे जेनेट आणि हॅनलोर स्माटझ् यांच्या अखेरच्या मुक्कामाचा चिधडधा झालेला तबू होता या दोघाची अभिष्टावस्था दुसऱ्या तळावर येईपर्यंत टिकली होती एक नवा पराक्रम या पोलिश गिर्यारोहकानी एव्हरेस्टच्या कहाणीत नोंदवून ठेवला होता १०४ वेळा मानवाचे आरोहण व १०१ एव्हरेस्टवीरांची नोंद आता या रोमहर्षक गाथेत झाली

## उगवत्या सूर्याच्या देशातील धाडसी जपान्यांची एव्हरेस्टवर उत्तरेकडून यशस्वी चढाई–

माऊंट एव्हरेस्टचा शोध लागला, नामकरण झाले, अन् मग त्या शिखरावर जाण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले उत्तरेकडील तिबेटमधून केलेल्या सर्वच प्रयत्नांना सतत अपयश आले दुसऱ्या महायुद्धानतर तिबेटचा घास चीनने घेतला व तो मार्ग बद झाला मात्र दक्षिणेकडून नेपाळने मार्ग खुला केला व त्या बाजूने यशही लाभले चीनने दावा केलेल्या दोन यशस्वी मोहिमानतरही उत्तरेकडील आरोहणमार्गाचा तपशील गुलदस्तातच राहिला

१९८० मध्ये चीनने एव्हरेस्टवर आरोहणाचा मार्ग मर्यादितपणे खुला केला जपानी लोकाना पहिली सधी मिळाली व त्यात त्याना यशही मिळाले त्या मोहिमेमुळे एव्हरेस्टच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले व त्या अती अवघड, जीवघेण्या मार्गाबद्दल बरीच माहिती नव्याने प्रकाशात आली

## चीनकडून हिरवा झेडा!

२६ जून १९७९! चायनीज माऊंटेनियरिंग असोसिएशनकडून जपानी गिर्यारोहकाना होकार देणारे पत्र मिळाले आणि मे १९८० मध्ये पूर्ण समतीही मिळाली जपानी मडळींनी उत्तरेकडून एव्हरेस्टवर पदार्पण केले यास अधिकृत मान्यतादेखील मिळाली ३ मे ८० रोजी ईशान्य धारेवरून यासुओ काटो याने रात्री ८–५५ ला एव्हरेस्टवर पदार्पण केले, तर शिगेहिरो आणि ओझाकी यानी ११ मे ८० रोजी सकाळी नऊच्या सुमारास एव्हरेस्टवर पाऊल ठेवले, तेही उत्तर कड्यावरून अतिशय अवघड वाटेने

१९५२ मधील रशियनाच्या अयशस्वी प्रयत्नानंतर चिनी गिर्यारोहकाच्या १९६० अन् १९६५ मधील यशस्वी आरोहणानतर परदेशातील गिर्यारोहकांना मिळालेली ही पहिलीच सधी होती आणि त्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्याचे जपानी गिर्यारोहकानी ठरविले २ ऑगस्ट १९७९ रोजी बेजिंगमध्ये याबाबतच्या मसुद्यावर सह्या झाल्या "चोमोरम्मार्नो–नातशू" (चोमोलुगमाच्या माथ्यावर) असे घोषवाक्यच जणू ठरविले गेले या साऱ्या मोहिमेवर जपानी भाषेत खूपच माहिती प्रसिद्ध केली गेली विशेषत योमिउरी' आणि 'सांगकू' मध्ये या ३०० दिवसाच्या नाट्यमय दिवसांची तपशीलवार हकीगत प्रकाशित झाली त्याची ओळख भारतीय लोकाना (अर्थात इग्रजी भाषेतून) करून देण्याचे काम जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील जपानीचे जाणकार आणि प्रेमकुमार मोटवानी यानी सयुक्तपणे केले

ब्रिटिशानी महायुद्धाआधी एकूण सात अयशस्वी चढाया केल्या ८२५० मी

एवढीच जास्तीत जास्त मजल त्याना मारता आली त्याची तपशीलवार माहिती, फोटो, नकाशे इ जरी उपलब्ध होते तरी चिनी लोकाखेरीज अन्य कुणाला तिकडून वर जाण्यात यश मिळाल नव्हत त्यामुळे तिकडची बित्तबातमी मिळत नव्हती नेपाळमधून एव्हरेस्टवर अनेकदा यशस्वी पदार्पण केल्यानतरही उत्तरेकडून चढण्याची ही अनमोल सधी होती टोकिओ या जपानच्या राजधानीमधील जपान अल्पाइन क्लब (JAC), जपान माऊटेनियरिंग असोसिएशन, योमिउरी शिबून (एक वृत्तपत्र) आणि निप्पॉन टेलिव्हिजन नेटवर्क कॉर्पोरेशन (NTV) यांनी सयुक्तपणे या नशा अर्थाने उत्तरेकडील पहिल्यावहिल्या मोहिमेस मदत केली

सप्टेंबर १९७९ मध्ये टेहेळणीसाठी आघाडीची तुकडी चीनमध्ये रोंगबुक हिमनदीच्या परिसरात दाखल देखील झाली मोहिमेची जुळवाजुळव, एकदर आखणी, वेळापत्रक यासह मुख्य तुकडी मार्च ८० मध्ये धाडण्याचे ठरविण्यात आले.

## मॅलरी–आर्यविनचा शोध– एक नवी मिती

वँग हुआग पाओ या चिनी गिर्यारोहकाने याच सुमारास एक नाट्यपूर्ण माहिती सागितली १९७५ मध्ये एव्हरेस्ट परिसरात २६,५०० फूटांवर चिनी गिर्यारोहकाना एका गोऱ्या इसमाचा मृतदेह आढळला होता एव्हरेस्ट शिखराच्या ईशान्य कण्यावर ही जागा होती या प्रेताच्या गालाला भोक पडलेले होते व त्याचे तोंड उघडलेले होते मात्र अगावरील कपडे अतिशय जीर्ण झालेले होते या प्रेताजवळच पण काही हजार फूट खाली आणखीही एक प्रेत आढळले होते ही प्रेते ब्रिटिशाची होती की रशियनाची ? कोणास ठाऊक !

जपानी मोहिमेला याबाबत पूर्ण सहकार्य देण्यास वँगने तयारी दाखविली होती "ही प्रेते मॅलरी व आर्यविन याची तर नसतील ना ?" १९२४ मध्ये शिखराच्या अगदी जवळ पोहोचल्यावर मॅलरी–आर्यविन नाहीसे झाले होते. मॅलरीची हिमकुठार पुढे सापडली, पण त्यांचे मृतदेह वा अन्य निशाणी काही गवसली नव्हती

काही जाणकाराच्या मते मॅलरी–आर्यविन तर खुद्द एव्हरेस्टवरही पोहोचले असावेत मॅलरीजवळ वा आर्यविनजवळ असलेल्या कॅमेऱ्यातील फिल्म मिळाली तर आपल्या अत्याधुनिक तत्राचा उपयोग करून कोडॅक कपनी त्या फिल्मस् डेव्हलप करू शकेल व त्यावरून पन्नास वर्षे डोके वर काढणारा प्रश्न सुटू शकेल मॅलरी व आर्यविनच्या कॅमेऱ्याला तडा जाऊन त्यात प्रकाश आत गेला नसला तरच हे जमणे शक्य होते पण हिलरी या न्यूझीलडनिवासी व तेनसिंग या भारतीय गिर्यारोहकवीरांनी हटच्या कुशल नेतृत्वाखाली मिळवलेल्या विजयापेक्षा मॅलरी व आर्यविनच्या निखालस ब्रिटीश' विजयाला इग्रजाच्या दृष्टीने अधिक भावनात्मक महत्त्व

नवकीच आहे म्हणून जपानी गिर्यारोहकानी मॅलरी–आर्यविनच्या मृतदेहाच्या शोधाला महत्त्व द्यावे असे त्याना वाटणे साहजिकच आहे त्याच्या मोहिमेस वँगने देऊ केलेल्या सहकार्याने ही संधी साधण्याचेही त्यानी ठरविले

रोंगबुक हिमनदीजवळ पायतळ रोवल्यावर मोहिमेची विभागणी करून एक तुकडी ईशान्य कण्यावरून तर दुसरी तुकडी उत्तर कड्यावरून एव्हरेस्ट गाठण्याचा प्रयत्न करणार असे ठरविण्यात आले जणू या दोन वेगळ्याच मोहिमा होत्या २६ सप्टेंबर ७९ ला रोंगबुक हिमनदीच्या जवळील पायतळावर ईशान्य कण्याच्या मार्गासाठी हृसेगावा, योकोयामा, नाकामुरा, कितागावा हे जपानी गिर्यारोहक व वँग हुआंग पाओ या चिनी गिर्यारोहकासह काही सहकारी निवडले गेले

तर उत्तर कड्यावरील मार्गासाठी ताकामी, ओझाकी, इसोनो आणि ओकाजिमा या सद्या वीराची निवड झाली

३० सप्टें रोजी मोहिमेला खरी सुरुवात झाली उत्तर कड्यावरील पहिला तळ ५५०० मी उचीवर रोवला गेला तर ३ ऑक्टो रोजी ईशान्य कण्याखाली पूर्व रोंगबुक हिमानीजवळ दुसऱ्या तुकडीने तळ ठोकला १० ऑक्टो पर्यंत ही तुकडी नॉर्थ कोल (चांग ला ७००७ मी) च्या थोडेसे खाली इतकी आगेकूच करू शकली १२ ऑक्टो रोजी एका हिमढिसाळाने योशिनोरी, हृसेगावा, पाओ आणि दोन चिनी गिर्यारोहकाना धडक दिली त्यात हृसेगावा केवळ सुदैवाने वाचला तिन्ही चिनी गिर्यारोहकाना मात्र एका हिमखाईत जिवत समाधी मिळाली पाओच्या या अचानक निधनामुळे मॅलरी–आर्यविनचे गूढ उकलणे तसेच राहून गेले गेली सहा दशके जपलेल गूढ उकलणे गिरिराज एव्हरेस्टला बहुधा अमान्य असाव

उत्तर कड्यावरील तुकडीची आगेकूच चालूच होती ६२५० मी पर्यंतची उची त्यानी गाठली आता मात्र सुल्तानढवा करण भाग होत ४० जणाची तुकडी विभागली गेली होती २ गटात बाराजण ईशान्य कण्यासाठी आणि बाराजण उत्तर कड्यासाठी याशिवाय १३ वार्ताहर, एक डॉक्टर, एक लियासो ऑफिसर आणि नेता अशीही मडळी होतीच सत्तरी गाठलेला इसाशुरो निशिबोरी हा सपूर्ण मोहिमेचा नेता होता तर योशिओ हामानो (४१) च्या मदतीने हीओरिकी वाटानाबे (६५) ईशान्य कण्यावरची चढाई आणि हिडेकी मियाशिटा (४८) उत्तर कड्यावरील चढाईची सूत्रे हलवीत होते

चीनने मदतीचा हात पुढे केला होताच त्याच्या ५६ मदतनीसांमध्ये दोन लियासो ऑफिसर, तीन दुभाषे, दोन सदेशवाहक, बावीस हाय अल्टिटयूड पोर्टर्स (मदतनीस), चार रेडिओ ऑपरेटर्स, सहा आचारी, तीन ड्रायव्हर्स, एक हिशेब-तपासनीस, तेरा याक साभाळणारे गुराखी अशी ही फौज होती

२२ फेब्रु ८० रोजी जपानमधील नरिता येथून विमानाने निघालेली ३०

जणाची तुकडी बिजिंगला पोहोचली चागडूमार्गे ल्हासा गाठायला त्याना २६ फेब्रु. ८० उजाडला दोन ४ चाकी वाहने, १ लँड क्रूझर, ३ बस, ६ ट्रकस् यामध्ये मोहिमेचे २० टन सामान लादले होते, शिवाय इंधनाचा एक टँकर होता तो वेगळाच ४ मिलीयन डॉलर्स (लाखो रुपये) खर्चाची ही आजवरची सगळ्यात खर्चिक मोहीम मानली जाते या साऱ्या मोहिमेचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येणार होते दूरदर्शनवर रोज या मोहिमेचा वृत्तात मिळण्याची सोय ईशान्य कण्या-वरील तुकडीत नेलेल्या कॅमेरामनमुळे झाली होती 'हिमवारी' या उपग्रहामुळे टोकिओहून प्रक्षेपित केलेला हवामानाचा अदाज सहज मिळणार होता

५१५० मी उंचीवरील रोंगबुक हिमानीच्या काठावर ठोकलेल्या तळाशी सारी मडळी पोहोचली, तेव्हा ५ मार्च ८० उजाडला होता जपान्यांचे ११ निळे तंबू, तर चिनी मदतनीसांचा एकच हिरवा तबू पायतळावर उभारला गेला या मर्त्य मानवाचं आगमन शिखरसम्राटाला आवडल नसाव त्यान पश्चिमी वाऱ्याच्या फुंकरीने दोन तबूच उडवून देऊन तळावर हलकल्लोळ उडवून दिला १७ मार्च ८० रोजी उरलेले गिर्यारोहक मुख्य तळावर डेरेदाखल झाले ईशान्य कण्यावरील तुकडी, उत्तर कड्यावरील तुकडी याशिवाय नॉर्थ कोलपर्यंत जाणारी ८ सभासद व २ दूरदर्शनचे चित्रीकरण करणारे अशा तीन तुकड्या सज्ज झाल्या.

## ईशान्य कण्यावरील आरोहण–

ईशान्य कण्यावर जाणाऱ्या गटात योशिओ हामानो (नेता), यासुओ काटो (आरोहणचमू प्रमुख), शोजी नाकामुरा, ताकाशी ओहारा, योशिनोरी हसेगावा, कोटारो योकोयामा, कुनिओ काइ, योशिमिचि फुरूहाटा, मात्सुजी यामाशिटा, मासायुकी कामिया, तोइचिरो मिटानी हे सारे गिर्यारोहक, शोजी निशियामा हा डॉक्टर, १४ हाय अल्टिट्यूड पोर्टर्स या तुकडीत होते. ५५०० मी उंचीवर एक आणि ६००० मी उंचीवर दुसरा असे पूर्व रोंगबुक हिमानी ओलाडल्यावर तळ ठोकले इथवर याकच्या सहाय्याने त्यानी सामान वाहून नेले

२५ मार्चला कोटारो योकोयामा (३२) आणि मात्सुजी यामाशिरा (३०) यांनी हा तळ सोडला व नॉर्थ कोलकडे वाटचाल सुरू केली ६८५० मी उंचीवर ते पोहोचले तेव्हा त्यांना प्रत्यक्ष नॉर्थ कोलखाली १५ मीटर रुंदीची हिमखाई पार करण्याचे आव्हान पार करावे लागले होते सतत वाहणारा सोसाट्याचा वारा धोंघावत होताच २९ मार्चला एका वादळी तडाख्याने हवा जरा तग झाली होतीच, पण ३० रोजी ते वादळ थडावले ५ एप्रिलला ७६०० मी उंचीवर पाचवा तळ रोवण्यात त्यांना यश मिळाले नॉर्थ कोल व ईशान्य कणा जोडणाऱ्या डोंगरसोंडेच्या

ए. १०

माथ्यावर ही जागा निवडण्यात आली होती

८ एप्रिलची काळरात्र उगवली. ७६०० मी उंचीवरील ५ व्या तळावरील तंबूत काटो आणि त्याचे चार सहकारी गाढ झोपले होते नॉर्थ कोलवरून वाहणारे झोंबरे वारे सुरू होतेच, पण आता मात्र प्रचंड वेगाने वादळ घोंघावू लागले काटो आणि त्याच्या सहकाऱ्यांना तंबू जाग्यावर ठेवण्यासाठी प्रचंड परिश्रम करावे लागत होते. तपमापकातील पारा शून्याखाली २३ अंशावर गेला होता कशीबशी पहाट उगवली वारा वाहतच होता या परिस्थितीत सुधारणा तर राहूद्याच, पण ११ एप्रिल रोजी योशिओ हामानो गंभीर आजारी पडला त्याची पोटदुखी अतिशय पराकोटीला गेली ५ व्या तळावरील शोजी नाकामुराच्या उजव्या हाताला थंडीने निकामी करून टाकले १३ एप्रिलला त्याच्या इच्छेविरुद्ध डॉक्टरी सल्ल्यानुसार अगदी खालच्या पायतळावर न्यावे लागले त्याला ड्युओडेनल अल्सर झाल्याचे निदान केले गेले होते साहजिकच मोहिमेची सारी जबाबदारी यासुओ काटोच्या शिरावर पडली. खूप दिवस अति उंचीवर सतत राहिल्याने बऱ्याच जणांना त्याचा त्रास होऊ लागला होता त्यातच चिनी भारवाहकांची बोली फक्त ७५०० मी पर्यंतच सामान वाहून नेण्याची होती म्हणून ते खाली निघून गेले १९ एप्रिलला आणखी एका वादळाचा तडाखा बसला तपमान शून्याखाली २१ अंशावर स्थिरावले, पण एव्हाना हामानोची प्रकृती सुधारली २० व २१ एप्रिल रोजी हवा ढगाळ बनली, वारा पडला तळावरील उत्साह दुणावला खालून सामान वर आणणं सुरू झालं २२ एप्रिल रोजी ब्युटेन गॅसच्या नळकांड्याने असहकार पुकारला त्या अमाप थंडीत ते काम करीनासं झालं काटोने ते दुरुस्त करण्यासाठी तंबूत नेलं तिथे स्वयंपाकासाठी स्टोव्ह पेटवलेला होता त्या उबेने नळकांड्यातून ब्युटेन वायू बाहेर पडू लागला व त्याने पेट घेतला त्याचा स्फोट झाला. तंबू उद्ध्वस्त झाला, कपडे पेटले, पण या अपघातात बळी मात्र कोणी गेलं नाही.

२३ एप्रिलला साडेबाराच्या सुमारास ८०१० मी उंचीवर सहावा तळ उभारण्यात काटो, यामाशिटा आणि मिटानी यांना यश आलं २४ एप्रिल रोजी काटो आणि त्याचे सहकारी शिखरावरील अंतिम चढाईबाबत बोलणी करण्यासाठी खाली उतरले. काटो, शोजी, तोइचिरो आणि सुसुमु यांनी ७ वा तळ उभारण्यासाठी ८५०० मीटर उंची गाठण्याचे ठरविले. हा दिवस होता २ मे प्रत्यक्षात त्यांना ८२५० मी एवढीच उंची गाठता आली. दुसऱ्या दिवशी काटो व शोजी यांनी शिखर गाठण्याचा प्रयत्न करायचा, इतरांनी त्यांना सहाय्यक म्हणून वावरायचे असं ठरविण्यात आलं

३ मे रोजी भल्या पहाटे उठून चारही गिर्यारोहकांनी २ तासात ८५१९ मी उंचीवरची पहिली पायरी गाठली आता तो कडा चढून जायचा होता तब्बल दोन

तासाच्या झटापटीनंतर त्या पायरीचा माथा गाठण त्याना शक्य झाल दुपारी ३ ला ८६०४ मी उंचीवरच्या दुसऱ्या पायरीशी ते पोहोचले आणि सायंकाळी ७ वाजता दुसऱ्या पायरीचा माथा गाठून खुद्द शिखराकडे जाणाऱ्या हिमधारेवरून ते चालू लागले या वेळी शोजी व तोइचिरो ६५०० मी वरील तळाकडे परतले सुसुमुकडे २३ किलो वजनाचे सामान होते त्यात दूरदर्शनचा कॅमेरा आणि इतर सामानाचा समावेश होता साहजिकच तो मागे पडू लागला प्रत्येक पाऊल उचलणे सुसुमुच्या आवाक्याबाहेर होते शेवटी काटोने बिनतारी सदेश यंत्रणेचा उपयोग करून हामानोशी सपर्क साधला व एकट्याने शिखरावर जाण्यास परवानगी मागितली ती तशी मिळाली आणि काटोची पावले झपाट्याने विश्वकळसाच्या माथ्याकडे पडू लागली सायकाळी बरोब्बर ८-५५ ला भर अधारात काटोने विश्वकळसाच्या माथ्यावर पदन्यास केला

काटोची पावल एव्हरेस्टवर रोवली जाण्याची ही दुसरी वेळ होती. दक्षिण व उत्तरेकडून शिखर आरोहण करणारा हा पहिला यशस्वी मानव ठरला पाचव्यांदा जपानी ध्वज एव्हरेस्टच्या माथ्यावर रोवला गेला होता आपल्या मोहिमेतील तीन चिनी सहकाऱ्याच स्मरण त्याला होण साहजिकच होत त्यांच्या बलिदानामुळेच हे आरोहण आवाक्यात आल होत त्याची प्रकाशचित्रे तिथल्या हिमराशीखाली ठेवली, त्याना नम्र अभिवादन केल, परमेश्वराच कृतज्ञतापूर्वक स्मरण केल आणि मोहिमेच्या सुरुवातीनतर अवघ्या साठाव्या दिवशी एव्हरेस्ट माथा गाठण्यात यश मिळाल म्हणून त्याला आनदही झाला चीन-जपान व नेपाळ या राष्ट्राचे झेडे त्याने तिथे फडकावले.

१९७३ च्या यशाचे वेळी काटोला आपल्या पायांची सर्व बोटे आणि उजव्या हाताची तीन बोटे गमवावी लागली होती तरीही त्यान पुन्हा इथे येण्यात रस घेतला होता आणि यश मिळवल होत शून्याखाली ४० अशावर पारा स्थिरावला होता, प्राणवायूच नळकांड रित झाल होत आणि ८६०० मी उंचीवर एकट्यान रात्र काढायची होती तेव्हा त्याने तिथ मुक्काम करण्याऐवजी थोड खाली जाण्याचा निर्णय घेतला दुसऱ्या (वरच्या) पायरीवर आल्यावर सुसुमु व काटोची भेट झाली. तिथल्या हिमःत गुहा खोदून त्यानी आसरा घेतला व सुखाने रात्र घालवली पहाटे उदयाचली सूर्य आला तेव्हा रविवार होता या सूर्यपुत्रांनी सूर्याच्या साक्षीने उतरायला सुरुवात केली तेव्हा तब्बल साडेआठ वाजायला आले होते दुपारी सव्वातीनच्या बेतात त्यांना त्याचे सहकारी भेटले काटोच्या विजयाची वार्ता एव्हाना पायतळावर पोहोचली होतीच काटोच्या प्रकृतीबद्दल शका आल्याने मोहिमेचे डॉक्टर वरच्या तळावर आले होते या एव्हरेस्ट विजयाप्रीत्यर्थ काटोला आपल्या उजव्या हाताची मध्यमा गमवावी लागणार असल्याच त्यानी निदान केल याहीवेळी काटो हिमदशाच्या तडाख्यात सापडला, पण थोडक्यात बचावला सुसुमु शिखरावर

न आल्याने आणि फाटो अंधारात शिखरावर पोहोचल्याने व्हिडीओ फिल्मिंग मात्र होऊ शकले नाही

## उत्तर कड्यावरील चढाई

जपानी मोहिमेचा अर्धा भाग उत्तर कड्यावरील आरोहणाचा होता हिडेकी मियाशिटा (नेता), ताडाओ कान्झाकी (आरोहण प्रमुख), टाकेयोशी ताकात्सुका, काझुशिगे टाकामी, त्सुने ओ शिगेहिरो, अकिरा उबे, टोशिआकी कोबायाशी, त्सुगुयासु इटामी, टाकाशी ओझाकी, शोहेइ वाडा, गोटा इसोनो आणि शिन गशू याच्याशिवाय आठ भारवाहक या तुकडीत होते

मध्य रोंगबुक हिमानीपासून २६०० मी उंचीचा कडा हे एक प्रचंड आव्हान आहे सप्टें – ऑक्टोबर १९७९ च्या पाहणीत केलेला या कड्याबाबतचा अंदाज चुकला होता हिमाच्छादित भागात विखुरलेले खडकाळ भाग नीट पाहिले गेले नव्हते त्यामुळे वरून येणारे दगड गोटे चढाईत व्यत्यय आणीत होते ८ मार्चला चढाई सुरू झाली आणि २४ मार्चला वरचा तळ सुसज्ज करण्यात यश मिळाले या उभ्या कड्यावर याकचा उपयोग करता येणार नव्हता, साहजिक वेळ लागण अपेक्षित होतच ६१५० मी उंचीवर हा तळ बसवला गेला ४ एप्रिल रोजी त्सुनेओ शिगेहिरो, टोशिआकी कोबायाशी आणि शोहेइ वाडा ६० अंशाच्या चढणीवर चढू लागले ६९०० मी वर एक बर्फिला तणाव आला तेथे त्यांनी तळ ठोकला या तळावर ६ माणस मावतील असा तंबू उभारला इथवर काझुशिगे टाकामी, अकिरा उबे आणि चिनी भारवाहकांनी सामान आणून पोहोचविले. तिसऱ्या तळावर आल्यावर वाईट हवेमुळे १० एप्रिलपर्यंतचे दिवस आगेकूच थांबली पण १० एप्रिल रोजी कोबायाशी व वाडा यांनी संधी साधली व चौथ्या तळाची जागा निश्चित केली १४ एप्रिलला तादाओ कान्झाकी या गिर्यारोहकाला हृदयविकाराचा तीव्र झटका आला पण मोहिमेची गती धीमेधीमे चालूच राहिली पुढची पावल उचलली जात होती १८ एप्रिल रोजी ७७०० मी उंचीवर चौथा तळ ठोकला लगेच दुसऱ्या दिवशी टाकामीने ७९०५ मी उंचीपर्यंत मजल मारली २० एप्रिल रोजी शिन गशू, टाकेयोशी टाकात्सुका आणि गोटा इसोनो यांनी ८००० मीटर उंची पार केली व हॉर्नबीन कुलियर गाठला पाचव्या तळाची ८२३० मी उंचीवर जागा निश्चित करण्यात आली २३ ते २८ एप्रिल प्रतिकूल हवेमुळे वर थांबणे धोक्याचे ठरले मग खाली उतरणे भाग पडले २९ एप्रिल रोजी त्सुने शिगेहिरो, टाकाशी ओझाकी, शोहेइ वाडा पुन वर जाण्यास निघाले लगेच दुसऱ्या दिवशी टोशिआकी कोबायाशी आणि अकिरा उबे यांचीही तुकडी त्याच्या पाठोपाठ निघाली १ मे

पर्यंत सारे सुरळीत पार पडले २ मे रोजी मात्र एव्हरेस्टने आपला हिसका दाखवला कोबायाशी व उबे याना घसरडच्या बर्फखडाने तडाखा दिला उबे मरण पावला कोबायाशी मात्र दुखापत न होता सुखरूप राहिला मोहीम आवरती घेतली गेली उबेच्या प्रेतावर अत्यसस्कार करून त्याची स्मरणशीला एव्हरेस्टच्या कुशीतच उभारली गेली या पीछेहाटीनतर पुनः प्रयत्न करून पाहायच ठरल १० मे रोजी शिगेहिरो आणि ओझाकी पहाटे अडीचला तयार झाले आणि त्यानी पाचव्या तळावरून पुढील मार्ग आक्रमावयाला सुरवात केली सकाळी ८–५० वाजता ओझाकी आणि त्यानतरअवघ्या वीस मिनिटांनी ९–१० वाजता शिगेहिरो शिखरावर पोहोचला उबेच्या केसाची बट व त्याचे प्रकाशचित्र एव्हरेस्टवरच्या हिमराशीत पुरून ठेवले आणि प्राणवायूच्या नळकाड्या शिवाय केलेले आपले आरोहण साजरे केले उतरताना ८७०० मी उचीवर पश्चिम कडचावर त्यानी मुक्काम केला दुसऱ्या तुकडीच्या या यशानतर उबे व तीन चिनी मदतनीसांच्या मृत्यूचे स्मरण करून १४ मे रोजी त्यानी एव्हरेस्टचा निरोप घेतला पर्वतशिखरे अढळ असतात आणि तरीही पुन पुन्हा तिथे जाण्याचे प्रयत्न करणाऱ्या माणसाचे प्रयत्न म्हणूनच स्तुत्य ठरतात हेच खरे

आजवरच्या ५२ मोहिमात यशस्वी ठरलेली ही २२ वी मोहीम मे ८० मधील या मोहिमेतील यशाने ३ एव्हरेस्ट वीराची भर पडली १०७ वेळा एव्हरेस्टच्या माथ्यावर मानवाने पाऊल ठेवले. उत्तरेकडील अजिक्य मार्गाची तपशीलवार माहिती उभ्या जगाला झाली. उत्तरेकडून एकटचाने एव्हरेस्ट गाठणे (सोलो अटेम्प्ट) यशस्वी ठरलं होत ४ लाख डॉलर्स आणि काही गिर्यारोहकाच्या मृत्यूची किमत चुकवून हा असाध्य भाग जपान्यांनी साध्य करून दाखविला होता

## स्पॅनिश आरोहकांची बास्क ( Basque ) मोहीम

बारा गिर्यारोहकांचा समावेश असणारी जुआन इग्नासिओ मोरेन्टो झुगाझा याच्या नेतृत्वाखालच्या स्पॅनिश एव्हरेस्ट मोहिमेलाही यश मिळाले मार्टीन झाबालेटा (३१) हा स्पॅनिश गिर्यारोहक आणि पासाग तेबा यानी १४ मे रोजी आग्नेय कण्यावरून आरोहण करून हे यश मिळवले पेंबा त्सेरिंगच्या नेतृत्वाखाली ३५ जणाच्या शेर्पा भारवाहकाच्या पथकामुळे हा विजय त्याना मिळाला, अस ते मानतात

## जपान्याची हिवाळचात अपयशस्वी चढाई

१९८०–८१ च्या हिवाळचात नाओमी उएमुराच्या नेतृत्वाखाली दक्षिणेकडून नेपाळमधून १४ जपानी गिर्यारोहकांच्या पथकाने एव्हरेस्ट आरोहणाचा

प्रयत्न केला होता. ११ नोव्हे. ८० रोजी पायतळ ठोकला गेला. १ डिसेंबर ८० पासून एव्हरेस्टच्या दिशेने चढाई सुरू झाली पहिला तळ उभारायला तब्बल आठ दिवस लागले तर दुसरा तळ उभारायला १७ डिसें उजाडला तिसरा तळ २६ डिसे आणि १२ जाने ८१ रोजी साऊथ कोलवर त्यानी चौथा तळ उभारायला झेप घेतली. त्याच दिवशी ७१०० मी उंचीवर असणारा (तिसऱ्या तळाखाली जेमतेम २०० मी ) नोबोरू टाकानेका (२७) याचा उजव्या पायाचा खिळ्यांचा तळवा (क्रॅम्पॉन) सैल झाला व तो २५–३० मीटर खाली घसरत गेला त्या उभ्या कड्यावर सुरक्षिततेसाठी लावलेल्या दोरामुळे टाकानेका मात्र तिथेच लटकत राहिला पण शून्याखाली ३५$^0$ सेंटिग्रेड तपमानात प्रचंड वाऱ्यात त्याला वाचविण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले या अपघाताने तुकडीच्या मनोधैर्यावर थोडा परिणाम झालाच

परंतु नेत्याने मोहीम पुढे रेटायचे ठरवले त्यानुसार १९ जानेवारी रोजी पायतळावरून दुसरा तळ गाठला गेला वाईट हवामानामुळे २२ जाने पर्यंत उणे पन्नास अंश सेंटिग्रेट तपमानात त्यांना त्यापुढे प्रगती करता आली नाही दोन शेर्पा व एका जपानी आरोहकाला हिमदंशाची बाधा झाली यामुळे तुकडीचे मनुष्यबळ खूपच उणावले २७ जानेवारी रोजी नाओमी उएमुरा, केनीची मात्सुदा (२५) आणि जुनिची मितानी (२५) ७९८५ मी उंचीच्या साऊथ कोलकडे निघाले वाऱ्याच्या प्रचंड घोंघावण्याने त्याना पाऊल पुढे टाकणेही कठीण होत होते दर सेकंदाला ५०मी असा हा झंझावात होता मितानी आणि एका शेर्पाला तर या वाऱ्याने अक्षरश: उडवून लावले. या हिवाळ्यात एकूण सात मोहिमा हिमालयात कोणत्या ना कोणत्या शिखरावर आरोहण करण्याचा प्रयत्न करीत होत्या यामध्ये एव्हरेस्टवर दक्षिणेकडून प्रयत्न करणारी जपानी तुकडी आणि उत्तरेकडून प्रयत्न करणारी ब्रिटिश तुकडी यांचा समावेश होता इटालियन तुकडी ल्होत्से (८५०१ मी ) शिखरावर प्रयत्न करीत होती फक्त होक्कैडो विद्यापीठाच्या बारून्त्से (७२२० मी ) शिखर मोहिमेलाच काय ते यश मिळाले. बाकी सर्व मोहिमाना अपयशच लाभले.

## पोलिशांचा पुन्हा हल्ला

फेब्रुवारी ८० मध्ये यश मिळालेले पोलिश पुन्हा माथा गाठण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करीत होते अॅण्ड्रेज झावाडाच्याच मार्गदर्शनाखाली दक्षिणस्तंभ (South pillar) मार्गाने वर जाण्यात अॅण्ड्रेज झेक (३२) व झेर्झी कुकुझ्का (३२) यानी यश मिळवले व १९ मे रोजी शिखर गाठले पाच तळ ठोकून ५ शर्पांच्या मदतीने हे यश त्यानी प्राप्त केले

# एकट्याची एव्हरेस्ट स्वारी

माऊंट एव्हरेस्ट ! ८८४८ मीटर्स/२९०२८ फूट !!

एव्हरेस्ट हे काही केवळ एक शिखर नाही मानवी दुर्दम्य आकांक्षांचे अन् धाडसाचे ते एक प्रतीकच आहे १९३४ मधील मॉरीस विल्सनचे जगावेगळे धाडस, १९४७ चा अर्ल डेनमानचा अयशस्वी प्रयत्न, १९५१ ची लार्सनची एकाकी लढत, १९६२ मधील वूड्रो विल्सनचा चोरटा प्रयत्न अशा अनेक अभिमन्यूची उदाहरणे डोळ्यापुढे असूनही रेनहोल्ड मेसनर एव्हरेस्टवर एकट्याने आणि तेही प्राणवायूच्या नळकांड्याशिवाय गाठण्याचं स्वप्न पाहत होता अर्थात आजवर १११ वेळा एव्हरेस्टच्या उन्नत माथ्यावर मानवी पावलं उमटली होती एव्हरेस्ट विजय हे मेसनरपुरतं नावीन्य नव्हतं मे ७८ मध्ये नेपाळमधून पीटर हेब्लरच्या साथीने जादा प्राणवायूच्या मदतीशिवाय त्याने एव्हरेस्ट गाठले होतेच

चीनने तिबेटचा घास घेतला हा घास गिळून, पचवून ढेकर दिली चिनी गिर्यारोहकाचे विजय त्या उत्तरेकडील बाजूकडून नोंदले गेले होते तेव्हा त्या बाजूकडून इतराना संधी देण्याचे चीनचे नवे धोरण जाहीर झाले होते बांबूच्या पड्याआड असणाऱ्या या तिसऱ्या ध्रुवावर जायची संधी गाठायला जगभरचे गिर्यारोहक उत्सुक होते १९७९ मध्ये चीनने पहिल्या परकीय एव्हरेस्ट मोहिमेला हिरवा झेंडा दाखवला मग मेसनरनेही तोच मार्ग निश्चित केला

जून १९८० मध्ये ल्हासामधील पोटाला राजवाड्याच्या साक्षीने त्याने एव्हरेस्टकडे कूच केले सामान नेण्यास पाच भारवाहक व काही याक प्राणी त्याने सोबत घेतले रेनहोल्ड मेसनरची कॅनेडीयन मैत्रीण नीना हॉलगुइन ही अर्थातच मदतनीस म्हणून होतीच

ऑगस्टच्या सुरवातीस ५८९० मी/१९३२५ फूट उंचीवर हाय बेस कॅम्प ठोकला १७ ऑगस्टला ६४०० मी/२१००० फूट उंचीवर त्यानी पहिला तळ उभारला या तळावर नीना एकटीच राहणार होती तिचा मित्र यापुढील सर्व चढाई एकट्याच्या हिंमतीवर करणार होता २४३८ मी/८००० फूट उंचीची ही जीवघेणी धडपड होती २० किलो/३३ पौंड वजनाची भारदस्त पाठपिशवी त्याने बरोबर घेतली त्यात छोटुकला तंबू, निद्राथैली, स्वयपाक साहित्य, अन्नपदार्थ, स्टोव्ह व त्याचं इंधन, कॅमेरा, हिमकुठार, स्की पोल, क्रॅम्पॉन्स, असं अत्यावश्यक पण हलकं-फुलकं साहित्य त्याने घेतलं

लाल लोकरीची टोपी आणि निळ्या गर्द रंगाचा क्लाईंबिंग सूट त्याने अंगावर परिधान केला होता नीनाला लांबून पाहताना हे कपडे पटकन दिसू शकतील म्हणून ही तजवीज केली होती एव्हरेस्ट मोहीम ही सध्यातरी युद्धपातळीवर हाताळली जाणारी गोष्ट आहे शेकडो टन सामान, शेकडो भारवाहक, एकापुढे एक

तळाची साखळी आणि लक्षावधी रुपयांचे अंदाजपत्रक म्हणजे एव्हरेस्ट मोहीम असं त्याचं स्वरूप बनलं आहे मेसनरला तर या साऱ्या गोष्टींचा तिटकारा त्यामुळे एकट्याने स्वतःच्या ताकदीवर अल्पाइन स्टाइलने चढाई यशस्वी करून दाखविण्याची जिद्द त्याने दाखवली

ईशान्य कण्याच्या मध्यभागातून तीन दिवसात ही चढाई करण्याची त्याची कल्पना होती त्यामध्ये २५ कि मी अंतराची पायपीट अन् ४२६७ मी/१४००० फुटाची चढउतार त्याला करायला लागणार होती

१८ ऑगस्टच्या पहाटे गुडघाभर हिमखचातून स्की पोल्सच्या मदतीने हा वीर निघाला बरीच वाटचाल केल्यावर एका हिमखाईत तो पडला थांग न लागणाऱ्या या हिमदरीत १५ मीटर खोलीवर एक बर्फखंड अडकला होता. मेसनर नेमका त्यावरच कोसळला वर आकाशाचा तुकडा, खाली पाताळावेरी गेलेली हिमखाई आणि दोन्ही बाजूला गार ठणक बर्फाच्या भिंती सुटकेसाठी कोणीही येण्याची शक्यता नाही. फार वेळ घालवला तर नव्या हिमवृष्टीमुळे दरीचे तोंड बंद झाले असते मग मात्र जिवंत समाधी घ्यायची पाळी आली असती तासाभराच्या धडपडीनंतर मेसनर महाशय मृत्यूच्या ओठावरून परत फिरले ही सुटका झाली तरी तास दोन तासाचा वेळ त्यामध्ये वाया गेला होता धीम्या चालीने सायंकाळपर्यंत आपले आरोहण चालू ठेवून त्याने आपला इटुकला तंबू उभारला तीन तास खर्चून पुरेसं टोमॅटो सूप तयार केलं घोंघावणारा वारा, बोचरी थंडी, श्रमांमुळे आलेला थकवा आणि उद्याची काळजी हे सारे साथीदार रात्रभर सोबतीला होतेच त्यामुळे फारशी झोप मिळालीच नाही

१९ ऑगस्ट रोजी पहाटेच आवरा-आवरी करून थेट ८२२९ मी/२७००० फुटावर त्याने मजल मारली तेव्हा दुपारचे चार वाजले होते आदल्या दिवशीचे श्रम, रात्रभर झालेले जागरण, एका दिवसात गाठलेली भरपूर उंची, विरळ हवा, प्रचंड दमछाक या साऱ्यामुळे त्या दिवशीची चढाई त्याने दुपारी चार वाजताच थांबवली साधा तंबू उभारायला चार तास लागले अती उंचीवरील विरळ वातावरणामुळे त्याला थोडा भ्रमही झाला आपल्या हिमकुठारीला मित्र समजून त्याने गप्पा मारल्या, हस्तांदोलन केले रात्री झोपही अपुरीच मिळाली

## २० ऑगस्ट १९८० विजयाचा दिवस !!

सुंदर पहाटेने स्वच्छ हवेची घोषणा केली यश आटोक्यात आणण्यासाठी पाठपिशवीतलं वजन कमी करणं आवश्यक होतं कॅमेरा, हिमकुठार, स्की पोल्स एवढंच सामान बरोबर घेतलं आणि सात वाजता धुक्याच्या पडद्यातून त्याने वाटचाल सुरू केली प्रचंड मानसिक दबाव आणि थकव्याने तर कधी कधी चतुष्पादच

बनाव लागल तरीही खुरडत– रागत स्वत ला धीर देत, तीन वाजून वीस मिनिटानी हा बहाद्दर विश्वकळसाच्या माथ्यावर उभा ठाकला आपल्या यशाचा पुरावा जगापुढे ठेवण्यासाठी १९७५ च्या चिनी मोहिमेने एव्हरेस्टवर ठोकलेल्या तिकाटण्यासह स्वत च प्रकाशचित्र घेण आवश्यक होत स्की पोलवर कॅमेरा लावून– ॲटोमॅटिकवर तो सेट करून त्याने ते फोटो काढून घेतले चाळीस मिनिटाच्या वास्तव्यानतर ७६२० मी /२५०० फूट खाली असणाऱ्या आपल्या तबूकडे जायला तो निघाला घसरत– ठेचकाळात थकलेला मेसनर तबूशी पोहोचला मग अर्धा लीटर गरम पाणी पिऊन तो ताजातवाना झाला दुसऱ्या दिवशी अगदी आवश्यक तेवढच सामान घेऊन तो खालच्या मुक्कामावर परतला नीना हॉलगुईन त्याची वाट पाहत होती यशाची खात्री तर तिलाही होतीच चार दिवस त्या तळावर विश्रांती घेऊन, ते दोघे खाली परतले

उत्तरेकडून एकट्याने शिखर गाठण्याचे स्वप्न साकार झाले होते २० ऑगस्ट १९८० च्या या नेपक्षाच्या मोहिमेमुळे यशस्वी मोहिमाची सख्या २३ झाली आणि एव्हरेस्टवर ११२ व्या वेळचे मानवी पदार्पण नोंदले गेले

## मेसनरची बकासूरी भूक.

८००० मीटर उचीपेक्षा जास्त उची असलेली एकूण १४ शिखरे आहेत त्यांपैकी अकरावर त्याने पाऊल ठेवले आहे एव्हरेस्टवर तर दोनदा

मकालू ८४८१ मी /२७८२४ ४ फूट, धवलगिरी ८१६७ मी /२६७९४ ३ फूट आणि अन्नपूर्णा ८०९१ मी /२६५४४ ९ फूट याची शिखरयात्रा अजून बाकी आहे.

१९८२ मध्ये हुकलेला चो ओयूचा विजयकलश त्याने ५ मे १९८३ रोजी खेचून आणला चो ओयूवर (उची ८१५३ मी ) पदार्पण केल्याने ८००० मीटरहून अधिक उचीच्या १४ पैकी १० शिखरावर जाणारा तो एकमेव मानव ठरला आहे या साऱ्या चढायांमध्ये नगा पर्वत आणि एव्हरेस्ट शिखरावर एकट्याने– उत्तरेकडून जादा प्राणवायूच्या साठ्याशिवाय केलेले आरोहण यांचे विशेष महत्त्व त्याला वाटते ऑक्टोबर ८६ मध्ये त्याने ल्होत्से शिखरमाथा गाठून १४ पैकी ११ शिखरमाथे गाठले

एव्हरेस्ट ८८४८ मी /२९०२८ फूट, के-टू ८६११ मी /२८२५३ फूट, काचनगगा ८५९७ मी /२८२०७ फूट, ल्होत्से ८५०१ मी /२७८९० फूट, मनास्लू ८१५६ मी /२६७६० फूट, चो ओयू ८१५३ मी / २६७५० फूट, नगा पर्वत ८१२५ मी./ २६६५८ फूट, गशेरब्रूम–१ किंवा हिडनपीक ८०६८ मी /२६४७० फूट, ब्रॉडपीक ८०४७ मी./२६४०० फूट, गशेरब्रूम– २-८०३५ मी /२६३५० फूट, गोसाइनथन किंवा शीश पगमा ८०१३ मी /२६२९१ फूट ह्या ११ शिखरांवर मेसनरने पाऊल

ठेवले आहे

## नेपाळ-इटली सयुक्त मोहीम.

फ्रान्सेस्को सॅन्टनच्या नेतृत्वाखाली नेपाळ आणि इटलीने एव्हरेस्ट व ल्होत्से या शिखरांची एक जोडमोहीम हाती घेतली होती त्याच्या ५२ सभासदांमध्ये ३२ इटालियन, १५ नेपाळी, १ ऑस्ट्रीयन, २ झेकोस्लोव्हाकियन आणि २ थाई गिर्यारोहक होते एव्हरेस्टवर साऊथ समीट म्हणजे ८७६३ मीटर एवढी उचीही त्यानी गाठली १९८० च्या ऑक्टोबरमधील या चोपन्नाव्या मोहिमेला अपयश आले फ्रँको पियाना व मारिया दोन यांना २५ सप्टे ८० रोजी व नवाग केरसग शेर्पाला २७ सप्टें ८६ रोजी मृत्यू आला

## पश्चिम कण्यावरून भर हिवाळयात एव्हरेस्टवर ब्रिटिशाची चढाई.

ॲलन रौझच्या नेतृत्वाखाली जानेवारी ८१ मध्ये पश्चिम कण्यावरून भर हिवाळयात एव्हरेस्ट गाठण्याचा प्रयत्न करणारी मोहीम याबवली प्रचड वारे, भयानक थडी यामुळे हा प्रयत्न अयशस्वी ठरला, तरी या पश्चिम कण्यावरून ७३१५ मी /२४००० फूट उची गाठण्यात आड्रियन बर्जेस आणि जो टस्कर यशस्वी ठरले त्यांच्या म्हणण्यानुसार या दिवसात येणाऱ्या अडचणींची पुरेशी कल्पना आल्यामुळे पुढच्या वेळी या दिवसात या बाजूने एव्हरेस्ट चढणे निश्चित जमू शकेल या मोहिमेत पायतळानतर शेर्पा भारवाहकाचा अजिबात उपयोग न करता अल्पाईन स्टाइलने आरोहण केले गेले प्राणवायूच्या नळकांड्याचाही उपयोग केला गेला नव्हता हे विशेष होय

## एव्हरेस्टवरील ५६ वी मोहीम.

शिनीची नाकाजीमा याच्या नेतृत्वाखाली मे १९८१ मध्ये ही मोहीम निघाली त्यात २० गिर्यारोहकाचा समावेश होता वेस्ट रिज म्हणजे पश्चिम कण्यावरून शिखर गाठण्याचा त्यांचा प्रयत्न होता ८७५० मी उची त्याना गाठता आली २० मे ८१ रोजी जुनीची तनाका व शिन तागुची याचा मृत्यू ओढवला

## ऑक्टो. ८१ मधील यशस्वी अमेरिकन मोहीम

पूर्वेकडील कागशुग कड्यावरून अमेरिकन मेडिकल रिसर्च असोसिएशनच्या अमेरिकन मोहिमेचे नेतृत्व रिचर्ड ब्लूमकडे सोपविले होते २१ ऑक्टोबरला क्रिस कोप्झुस्की बरोबर शेर्पा सुदारे (सगदेर) दुसऱ्यांदा वर पोहोचला २४ ऑक्टोबरला डॉ क्रिस पिझ्झो आणि यग तेनसिंग शेर्पा शिखरावर पोहोचले त्याच दिवशी डॉ

पिटर कॅकेट एकट्याने शिखरमाथ्यावर पोहोचला. १६ अमेरिकन, २ कॅनेडीयन, १ ब्रिटिश, १ भारतीय (नवांग गोंबू), १ इटालियन याचा या तुकडीत समावेश होता या सत्तावन्नाव्या एव्हरेस्ट मोहिमेला यश मिळाल्याने २४ वी यशस्वी मोहीम म्हणून तिची नोंद झाली आता ११७ वेळा मानवी पदन्यासाची नोंद एव्हरेस्ट इतिहासात नोंदली गेली

## न्यूझीलंडचे अपयश

याच काळात दक्षिणेकडून रसेल ब्राइसच्या नेतृत्वाखाली पश्चिम कण्यावरून आरोहण करण्याचा न्यूझीलंडच्या तुकडीचा बेत तडीस जाऊ शकला नाही ती अठ्ठावन्नावी एव्हरेस्ट मोहीम होती

## रशियनांची यशस्वी एव्हरेस्ट चढाई

१९७८ मध्ये नेपाळ सरकारकडून सोव्हिएट रशियाला एव्हरेस्ट शिखरावर चढण्यास अनुमती मिळाली अन् सारी चक्रे भराभर फिरू लागली १९८२ च्या मे मध्ये निघणाऱ्या मोहिमेची तयारी सुरू झाली यू एस् एस् आर फेडरेशन ऑफ क्लाइबर्सने ठिकठिकाणी संपर्क साधून ३०,००० गिर्यारोहकांतून १५० जणाची प्राथमिक यादी तयार केली त्यातून ५० जणांची निवड केली गेली हिमालयाचे रौद्र स्वरूप दाखविणारी चित्रपट मालिका, उष्णता व थंडीला दाद देण्याची क्षमता, प्राणवायूच्या कमतरतेला तोंड देण्याची क्षमता, भरपूर सामान पाठीवर घेऊन जाण्याची क्षमता यांच्या परीक्षा घेऊन त्यातून कसोटीला उतरलेल्या १६ जणाची निवड झाली प्रत्यक्ष पर्वतात त्याची तयारी करवून घेतली गेली

मार्च ८२ मध्ये ५३०० मीटर्सवर पायतळाची उभारणी झाली सर्वसाधारणपणे सगळ्या एव्हरेस्टमोहिमा याच ठिकाणाच्या आसपास आपला पायतळ उभारतात ११ टन वजनाचे साहित्य या मोहिमेसाठी काठमांडूपासून पायतळापर्यंत शेर्पांच्या पाठीवरून वाहून आणण्यात आले त्यात प्रामुख्याने अन्न, गिर्यारोहण साहित्य व औषध सामग्री याचाच समावेश होता मोहिमेच्या सर्व सदस्यांनी आवश्यक सामान पोहोचविण्यासाठी किमान ७००० मीटर उंचीपर्यंत चढउतार केली होती

चव्वेचाळीस वर्षांचा एडवर्ड मिस्लोवस्की, बॅलिबर्डीन याची पहिली शिखर तुकडी २९ एप्रिल रोजी तयार झाली कॅम्प ३ वरून ते दुसऱ्या दिवशी ८२५० मीटर उंचीवरील चौथ्या तळावर प्रत्येकी सत्तावीस किलो वजन घेऊन निघाले १ मे रोजी ८५०० मीटरवर जाण्याची पाळी आली तेव्हा मिस्लोवस्कीच्या अपघातात त्याची पाठीवरची पिशवी, दोरखंड, कॅमेरा इ. घरंगळून गेली. पण उपलब्ध सामाना-

तून बॅलिबर्डीनने पाठीवरची पिशवी तयार केली व अशा अपुऱ्या साहित्यानिशीच ३ मे रोजी त्यांनी पाचवा तळ प्रस्थापित केला येथून शिखर केवळ ३४८ मीटर उचीवर होते बॅलिबर्डीनने त्याचे बूट उतरवून ठेवले व ते दुसऱ्या दिवशी चक्क दगडासारखे टणक झाले शून्याखाली ४० डिग्री तपमान आणि जीवघेणा बोचरा वारा याना तोंड देत ही मडळी दुपारी २-३५ ला शिखरावर पोहोचली ते शिखरावर असतानाच खालच्या कॅम्पवर त्यांचा एक सहकारी अलेक्सी मोस्कल्टसेव्ह हिमखाईत पडूनही वाचला होता अर्थात त्या वेळी शिखरविजेत्याना याची कल्पनाही नव्हती शेवटी त्रिश्वकळसावरून ही पहिली यशस्वी शिखरविजेती रशियन दुक्कल खाली उतरू लागली तेव्हा दुपारचे तब्बल साडेतीन वाजले होते आणखी फार तर २ तास त्यांना प्रकाश मिळणार होता एवढयाशा वेळात ८५०० मीटर उचीवरील तळावर पोहोचणे त्याना शक्य वाटत नव्हते

त्यानी रेडिओ ट्रान्समीटरचा उपयोग करून खालच्या मडळीशी सपर्क साधायचा प्रयत्न केला व्हॅलेटीन इव्हॅनॉव्हच्या नेतृत्वाखाली सर्गी येफिमॉव्ह, सर्गी बर्शाव्ह आणि मिखिल तुर्केव्हिच यांची तुकडी ८५०० मीटरवरच्या तळावर मुक्कामाला आली होती आणि उद्याच्या शिखर विजयासबधी त्याच्या गप्पा चालू होत्या

"आमचा प्राणवायूचा साठा सपला आहे खाद्यपदार्थही नाहीत सारी रात्र आम्हाला या बोचऱ्या वाऱ्यात व थडीत काढावी लागेल शक्य असल्यास आम्हाला मदत करा" असा सदेश ऐकताच तेथे एकच खळबळ उडाली काहीतरी करणे आवश्यक होते सर्गी बर्शाव्ह आणि मिखिल तुर्केव्हिच ही जोडी ८५०० मीटर उचीवरील तळावरून गरम पेय आणि प्राणवायूची सहा नळकाडी घेऊन सायकाळी सहा वाजता निघाली

आकस्मिक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे इव्हॅनॉव्ह व येफिमॉव्ह यांना काळजीत व प्राणवायूचा साठा न सपवता रात्र काढणे भाग होते त्यांच्या मर्यादित साठ्यातील काही भाग त्यानी मिस्लोव्हस्की व बॅलिबर्डीन याचे प्राण वाचविण्यासाठी दिला होता एव्हरेस्टने बळी घेतलेल्याच्या माळेत आपले सहकारी बसू नयेत यासाठी हा प्रयत्न होता

सहा तासांत बॅलिबर्डीन अन् मिस्लेव्हस्की यांना फक्त शभर मीटर उची कमी करता आली होती प्रचड श्रम, प्राणवायू सपलेला, खायला काही नाही, बोचरी थडी अन् अधार याचा हा परिणाम होता चद्र उगवला अन् प्रकाश पडला एवढ्यात बर्शाव्ह अन् तुर्केव्हिचची जोडगोळी त्याना भेटली अक्षरश· देवदूतांसारखी ही मडळी आली, नाहीतर गाठ पडणार होती यमदूताशी येव्हजेनी इगोरेव्हिच या मोहिमेच्या नेत्याशी सपर्क साधणे जरुरीचे होते जगाच्या छपरावर पडलेल्या या घटनाची माहिती थोडक्यात देऊन अवघ्या दीड तासात तुर्केव्हिच व

बर्शाव्ह शिखरावर पोहोचू शकणार होते, चंद्राच्या साक्षीने! प्रथम मिळालेल्या नकारानंतर नेत्याकडून होकार घेऊन ते दोघे पृथ्वीच्या सर्वोच्च बिंदूकडे अन् पहिले शिखरविजेते खालच्या तळाकडे निघाले अवघ्या तासाभरात त्यांनी चंद्रप्रकाशात शिखर गाठलेदेखील बोचरे वारे, खूप उतरलेले तपमान आणि नुकताच सुरू झालेला हिमवर्षाव याच्या धास्तीने त्यांनी विश्वकळसावर थांबण्याचा बेत आटोपता घेतला नव्याने झालेल्या हिमवर्षावाने घसरड्या झालेल्या उतारावरून खाली जाताना धोका वाढलेला होता बॅलिबर्डीन एका खडकावर बसलेला आणि मिस्लो-व्हस्की एका कड्याच्या माथ्यावर जाताना दिसला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आल्याबरोबर त्यांनी ओरडूनच आहे त्या जागी थांबायला सांगितले काही क्षणांचा उशीर होता तर मिस्लोव्हस्की कड्यावरून कोसळून अपघात झाला असता आता हे चारही जण एकमेकांना सांभाळीत खाली उतरू लागले एकाएकी मिस्लोव्हस्की खाली बसला व त्याने खाली उतरण्याचे नाकारले बर्शाव्हच्या ही परिस्थिती लक्षात आली त्याने मिस्लोव्हस्कीच्या प्राणवायूच्या नळकांड्याची तपासणी केली तेव्हा ते रिकामे झालेले आढळले बर्शाव्हने आपले नळकांडे मिस्लोव्हस्कीला दिले एव्हाना चंद्र अस्ताला गेला तुर्केव्हिचजवळची विजेरी एवढाच त्याचा प्रकाशाचा आधार होता एवढ्यात शेकडो विजेऱ्या पेटल्यासारखे भासले पाहतात तो सूर्य उगवला होता अखेरीस हे चार रशियन एव्हरेस्ट विजेते साडेआठ हजार मीटर उंचीवरल्या समीट कॅम्पकडे सुखरूप आले तेथे येताच बर्शाव्ह आणि तुर्केव्हिचने पायतळावरील ओर्लोव्हकीशी– मोहिमेच्या डॉक्टरशी संपर्क साधला कारण मिस्लो-व्हकी आता झुंज देत होता हिमदंशाशी! त्याच्या हाताला हिमदंशाची (फ्रॉस्ट-बाइटची) बाधा झाली होती (पुढे मॉस्कोत पोहोचल्यावर त्याच्या चार बोटांची टोके कापून टाकावी लागली) ही मंडळी स्थिरस्थावर झाल्यावर तब्बल तासाभराने इव्हॅनॉव्ह आणि येफिमॉव्हनी शिखराकडे प्रयाण केले ते शिखरावर जाऊन परतले तेव्हा मात्र त्यांना त्या आदल्या जीवघेण्या रात्रीची पुनरावृत्ती करावी लागली कारण आजही प्राणवायूचा साठा नव्हता दोन रात्रीत फरक एवढाच की एव्हरेस्ट विजयाचा परीसस्पर्श त्यांना झाला होता

यारबॅन्ड इलिस्कीच्या दुसऱ्या तुकडीची आता शिखराकडे जाण्याची पाळी होती खरं तर फारशी काही अडचण नव्हती पण तिसऱ्या तळावर एव्हरेस्टवरून खाली येणाऱ्यांनी जागा व्यापली होती अन् आता या दुसऱ्या तुकडीतल्या गिर्या-रोहकांना तेथे मुक्काम करण्याची अडचण झाली होती

काझबेक व्हॅलीयेव्ह अन् व्हॅलेरी खिरस्चॅटी यांनी चौथ्या तळावरून पाचव्या तळाकडे कूच केली तेव्हा ६ मे ची पहाट होती तर इलिस्की अन् चेपचेव्ह चौथ्या तळाकडे निघाले होते त्या दिवशी अफाट वाऱ्याने व्हॅलियेव्ह अन् खिरसचॅटीला

थोपविले खालून आलेल्या सदेशाप्रमाणे ८ व ९ मे या दोन दिवशी हवा आणखी बिघडणार होती म्हणून 'जमल तर आजच' अशी परिस्थती होती सायकाळी ५ वाजता व्हॅलियेव्ह अन् ख्रिसचॅटी शिखराकडे निघाले थोडयाच वेळात त्या तळावर इलिस्की अन् चेपचेव्ह येऊन पोहोचले त्यांनी १५ तास वाट पाहिली आणि सकाळी ८।। वाजता बेसकॅम्पवरून सदेश आला इलिस्की अन् चेपचेव्हला, व्हॅलीयेव्ह अन् ख्रिसचॅटीच्या शोधाला जाण्याचा हा आदेश होता एवढ्यात तबूबाहेर काही आवाज ऐकू आला अन् त्यांनी परत अर्ध्या तासाने सपर्क साधण्याचे आश्वासन दिले व बाहेर काय आहे तिकडे लक्ष दिले

चेपचेव्हने बाहेर पाहिले तेव्हा पूर्ण दमलेला व्हॅलीयेव्ह परिस्थितीशी झगडत असलेला दिसला त्याला तंबूत घेतात न घेतात तो ख्रिसचॅटीही तेथे अवतीर्ण झाला त्याचे रात्रीचे एव्हरेस्ट आरोहण त्याना भलतेच महाग पडलेले होते हे थकलेले जीव तोंडातून शब्दही काढू शकत नव्हते ते अफाट दमले होते बऱ्याच विश्रांती-नतर विश्वकळसाच्या माथ्यावरून पाहिलेल्या अफलातून सूर्योदयाचे त्यांनी वर्णन ऐकवले जाभळट, सोनेरी अन् श्वेत रगाची सूर्योदयाच्या वेळची उधळण एव्हरेस्ट-वरून पाहणारे ते, केवळ तेच होते ७ मे ची ही सकाळ होती खर तर हवा स्वच्छ होती पण टॅमकडून आलेला सदेश चेपचेव्ह अन् इलिस्कीच्या स्वप्नांचा चक्काचूर करणारा होता तळावर पोहोचलेल्या मिस्लोव्हस्कीच्या हिमदशाच्या अनुभवावरून ख्रिसचॅटी अन् व्हॅलियेव्हच्या ब्लिस्टर्सकडे दुर्लक्ष करणे कदाचित न परवडणारे ठरू शकले असते जगाचा माथा केवळ तीनशे मीटर्सवर राहिलेला असताना केवळ नेत्याची आज्ञा अन् सहकाऱ्याचा जीव याकडे पाहून इलिस्की अन् चेपचेव्ह हे देखील ख्रिसचॅटी अन् व्हॅलियेव्ह बरोबर खाली उतरू लागले खाली आल्यावर ख्रिसचॅटीच्या पायाची अवस्था पाहिल्यावर हा निर्णय योग्य होता याची सर्वांना कल्पना आली

८ मे । मॉस्कोहून आलेल्या सदेशानुसार टॅमला मोहीम आवरती घेण्याची सूचना मिळाली हवामानाच्या अदाजानुसार हवा आणखी बिघडणार होती एव्हाना हॅलेरी खोमुटॉव्ह चौथ्या कॅम्पवर पोहोचला होता व्हॅडिमीर पुचकोव्ह आणि युरी गोलोडोव्ह तेथवर आल्यावर त्यानी मिळून योग्य तो निर्णय घेण्याची त्याना मुभा दिली गेली त्यानी एकाच दिवसात तिसऱ्या कॅम्पवरून पाचव्या कॅम्पपर्यंत मजल मारली तेव्हा रात्रीचे नऊ वाजत आले होते

९ मे रोजी सकाळी ८।। वाजता बेसकॅम्पने त्याच्याशी सपर्क साधला सर्व काळजी घेण्याची सूचना दिली गेली केवळ तीन तासांत ही तुकडी शिखर गाठू शकणार होती आणि खरंच साडेअकरा वाजता ते शिखरावर पोहोचले देखील

टॅमला मात्र मॉस्कोशी सपर्क साधून, तुमचा सदेश मिळायला वेळ लागला म्हणून हे तिघे शिखरावर गेले, असे सागून सारवासारव करावी लागली होती

मॉस्को इन्स्टिटयूटमधील इन्स्ट्रक्टर १)एडवर्ड मिस्लोव्हस्कीव २)व्ह्लॅडिमीर बॅलिबर्डीन हा लेनिनग्राडमधील इंजिनीयर ४ मे ८२ रोजी, ३)व्हॅलेंटीन इव्हॅनोव्ह हा मॉस्कोमधील इंजिनीयर आणि ४)सर्गी येव्हिमॉफ हे ५ मे ८२ रोजी, ५) सर्गी बर्शोव्ह हा खारकोव्हमधील घरे रंगवणारा रंगारी, ६)मिखिल तुर्केव्हिच हा डोनटस्क माऊंटन क्लाइंबिंग क्लबमधील इन्स्ट्रक्टर हे दोघे ४व५मे च्या मध्यरात्री, ७)काझबेक व्हॅलिएव्ह आणि ८) व्हि एस ख्रिसचॅटी ७ व ८ मे च्या रात्री पोहोचले व ८ मे ८२ चा सूर्योदय त्यानी तेथून पाहिला ९)व्हॅलेरी खोमुटॉव्ह हा मॉस्कोमधील शास्त्रज्ञ १०)व्हॅलिडीमीर पुच्कॉव्ह हा मॉस्कोमधील शास्त्रज्ञ आणि ११)युरी गोलोडोव्ह हा अल्मा आटा मधील शास्त्रज्ञ असे ९ मे रोजी शिखरावर पोहोचले अशा रीतीने एकंदर अकरा जण एव्हरेस्ट शिखरावर पोहोचले

एव्हरेस्टवरची ही ५९ वी मोहीम होती तर यशाचा तुरा मिळवणारी ही २५ वी मोहीम ठरली ११७ एव्हरेस्ट विजेत्या गिर्यारोहकामध्ये अकरा जणांची भर पडली आणि १२८ वेळा मानवाने तिथवर पोहोचल्याची नोंद केली गेली

## क्रूर एव्हरेस्टचे आणखी बळी

१७ मार्च १९८२ ' ईशान्य धारेवरून एव्हरेस्ट गाठण्याचा मनसुबा रचणारे ब्रिटिश पथक तिबेटमध्ये दाखल झाले त्यांनी पायतळाची जागा निश्चित केली पण ती जागा दीर्घ मुक्कामाच्या पायतळासाठी आदर्श नव्हती हा तर एखाद्या विस्तीर्ण कचरापेटीचाच भाग वाटत होता भारवाहक याकच्या शेणाचे पो, बियर अन् अन्य पेयांच्या बाटल्या, खाद्यपदार्थांची वेष्टने, ग्लास व इतर काचकामाचे तुकडे, गॅस सिलींडर्स, कापडी चिंध्या अन् अशाच वस्तू जिकडे तिकडे विखुरलेल्या होत्या त्याला कारण साहजिकच आहे एक तर एव्हरेस्टवरून येणाऱ्या गिर्यारोहकाना विजयाच्या धुंदीची नशा चढलेली असते, नाहीतर पराभवाच दारुण दु:ख त्याना वेढून टाकीत असत मग पायतळावरचा कचरा साफ होणारच कसा ? तर ते असो हा गिर्यारोहण चमू एव्हरेस्टवर ईशान्य धारेवर प्रयत्न करण्यासाठी आला होता

गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवानी एव्हरेस्टसारख्या विश्वकळसाला गवसणी घालण्याची दोन तंत्रे विकसित झाली आहेत पहिले म्हणजे एक तळ उभारला की, त्यातील वरच्या तळासाठी आवश्यक सामान हलवून वरचा तळ उभारावयाचा. त्यात आणखी वरच्या तळासाठीच्या सामानाची जमवाजमव करायची मग आणखी वरचा तळ असे करण्यात भारवाहकांचे भरपूर सहाय्य घ्यावे तर लागतेच पण त्यासाठी प्रचंड वेळ, पैसा आणि श्रम यांची आवश्यकता भासते शेवटच्या तळा-वरून शिखरावर जाऊन परतायचे तोवर आणखी एका तुकडीने शेवटच्या तळावर मुक्काम ठोकायचा याची परत परत पुनरावृत्ती होत राहते याला पारंपरिक

पद्धत म्हणतात

दुसऱ्या पद्धतीला ' अल्पाइन स्टाइल ' म्हणतात छोटा तबू, आठ-दहा दिवसाचा शिधा आणि अत्यावश्यक साधनसामग्री घेऊन २–४ जणांची छोटी तुकडी जागजागी तळ ठोकत व दुसऱ्या दिवशी हे सारे बिऱ्हाड आवरून पाठीवर घेऊन वरवर चढत राहतात. शास्त्रीय प्रगतीमुळे अतिशय हलके पण भरपूर दणकट साहित्य, तबू, कपडे याची निर्मिती साध्य झाली आहे या पद्धतीत त्यामानाने कमी खर्च होतो अलीकडे मात्र तबूऐवजी हिमगुहा निर्माण करून त्यात मुक्काम ठोकणे अधिक सोयीचे ठरत असल्याचे दिसून आले आहे ही गुहा खोदण्यासाठी थोडा वेळ व श्रम खर्च होतात हे खरे, पण तबूचे अनावश्यक ओझे टाळता येते अर्थात या तत्राच्या वापराचे काही तोटेही आहेत रात्रीच्या मुक्कामापुरती ही गुहा असल्याने ती फार छोटी असते मोठी गुहा खोदायची तर जास्त वेळ व श्रम पडतात त्यामुळे गुहेत वावरणे अडचणीचे ठरते रात्री थोडीशी हालचाल केली तर सहकाऱ्यांची झोपमोड होऊ शकते रात्री हिमवर्षाव झाला तर तो आत येणार नाही याची तजवीजही करावी लागते हे सार तत्र जमल तर मात्र उष्णतावाहक नसलेले हिम नि बर्फात खोदलेली अरुद तोंडाची गुहा रात्रभर उबदार वातावरण मिळवून देऊ शकते याच तत्राचा वापर करीत पीटर बोर्डमन, जो टस्कर, डिक रेनशॉ आणि क्रिस बॉनिंग्टन यानी ईशान्य कण्यावरचा मार्ग चोखळायचे ठरविले या धारेवर एव्हरेस्टच्या खाली दोन टप्पे किंवा सुळके आहेत आघाडीचा तळ (अॅडव्हान्स बेसकॅम्प) आणि पहिला किंवा खालचा सुळका या दरम्यान तीन गुहा खोदून, हे पर्वतपुत्र मार्ग ठरवून त्यावर ये-जा करीत होते त्यामुळे ताज्या हिमवृष्टीने खुणा बुजून गेल्या तरी सरावाने गुहेच्या जागा ओळखता येत असत

एकदा मात्र त्या सततच्या कष्टाने आणि अती उंचीवर सतत वास्तव्य केल्याने पीटर बोर्डमनलाही मानसिक थकवा आला तर एका अपघातात केवळ सुदैवानेच पीटरचे प्राण वाचले ज्या खिळ्याच्या आधारावर दोरखडाचे वेटोळे बांधले होते, त्या खिळ्याची अन् कड्याची कट्टी फूऽऽ झाली. पण केवळ नशीब जोरावर म्हणून पीटर वाचला

डिक रेनशॉ याला पहिल्या सुळक्यावर चढता चढताच पक्षाघाताचा झटका आला तोही नशीब बलवत्तर म्हणून वाचला त्याला पायतळावर असणाऱ्या डॉ चार्ल्स क्लार्कने तपासले व पुढील उपचारासाठी मायदेशी पाठवून दिले आता फक्त पन्नाशीकडे झुकलेला क्रिस बॉनिंग्टन, पीटर बोर्डमन आणि जो टस्कर एवढेच खदे वीर राहिले पहिल्या सुळक्यानतर क्रिस बॉनिंग्टनचा आत्मविश्वासच मपला तेव्हा पीटर व जो एवढेच दोघे राहिले. १५ मे १९८२ रोजी अंतिम शिखर चढाईसाठी त्यानी आघाडीचा पायतळ (अॅडव्हान्स बेसकॅम्प) सोडला १६ मे रोजी ते दोघे

तिसऱ्या हिमगुहेशी पोहोचल्याचे बिनतारी संदेशावरून कळले १७ मे रोजी १५ किलो वजनाचे प्रत्येकी सामान घेऊन पुढील वाटचाल त्यांनी सुरू केली पूर्वी ठरल्याप्रमाणे दुपारी तीन वाजता आणि सायकाळी सहा वाजता त्याच्याशी क्रिस बॉनिंग्टनने संपर्क साधला पण काहीच प्रतिसाद मिळाला नाही मात्र दुर्बिणीतून ते दोघे दुसऱ्या सुळक्याच्या पायथ्याशी चढत असताना दिसत तरी होते सूर्यास्तापर्यंत त्यांची चढाईच चालू होती रात्रीच्या मुक्कामाची त्यांना फिकीर कशी वाटली नाही, हेच उलगडत नाही त्यांना भ्रम झाल्याने ते कुठेतरी भरकटले, की कोठून घसरून खाली पडले, की ईशान्य कण्यावरून तीव्र वाऱ्याने ते फेकले गेले, का थंडीने गोठून मृत्यू आला हे एक गूढच राहिले

२१ मे ८२ रोजी क्रिस बॉनिंग्टन आणि ॲड्रियन व चार्ल्स क्लार्क यांनी नॉर्थ कोलपर्यंत जाऊन शोध घेतला पण मधल्या चार दिवसांत ह्या बेपत्ता गिर्यारोहकाचे जे काही बरेवाईट व्हायचे ते होऊन गेले होते पीटरने पूर्वी एकदा एव्हरेस्ट माथा गाठला होता पण जो टस्करला मात्र प्रत्येक वेळी अपयशच सामोरे आले त्याच्या 'एव्हरेस्ट द क्रुएल वे' या पुस्तकात एव्हरेस्टचे क्रौर्य व आपले दुःख त्याने उलगडून दाखवले होते

क्रिस बॉनिंग्टनचे सहकारी माइक बर्क, निक एस्टकोर्ट, पीटर बोर्डमन, जो टस्कर एकामागून एक हिमशिखरावर विश्रांती घेत राहिले डिक रेनशॉ तर कामातूनच गेला होता एव्हरेस्टच्या पराभवापेक्षा मित्राचे हे असे जाणे क्रिसच्या अंतःकरणाला जाळत राहिले

## अमेरिकनांचा उत्तरेकडून प्रयत्न

मे १९८२ मध्येच अमेरिकन तुकडी जेम्स लो व्हिटेकरच्या नेतृत्वाखाली एव्हरेस्टच्या नॉर्टन हिमपथ किंवा ग्रेट कुलियर वरून एव्हरेस्ट आरोहणासाठी गेली होती या तुकडीत दोनदा एव्हरेस्ट गाठणारा पहिला गिर्यारोहक ठरलेला नवांग गोंबू याचा समावेश होता मध्य रोंगबुक हिमानीतून पुढे जाऊन तिसरा तळ ६८६० मी चौथा तळ ७२२० मी, पाचवा तळ ७६२० मी उंचीवर उभारले गेले हवामानाची फारशी अनुकूलता नसताना देखील १५ मे रोजी लॅरी नेल्सन आणि डेव्ह माहरे पुढच्या तळाच्या टेहेळणीसाठी पुढे गेले त्या वेळी मार्टी होय (३१) आणि जिम विकवायर ८०१५ मी उंचीवर एका प्रस्तरखडाजवळ बसले होते त्यांच्या बरोबर होय ही महिला गिर्यारोहकही होती विकवायरला पुढे जाण्यास वाट देण्यासाठी ती जरा बाजूला सरकली तेवढ्यात तिच्या कमरेच्या पट्ट्याचे तोंड उघडले गेले, तिचा तोल गेला व ती कड्यावरून १९०० मी खाली कोसळली.

ए...११

त्यातच तिला मृत्यू आला त्यानंतर तीन दिवसांनी नेल्सन, एरिक सिमॉन्सन आणि जॉर्ज डून यांनी एव्हरेस्ट शिखराकडे मुसंडी मारली त्यात मात्र त्यांना फक्त८५०० मी उंचीवर पीतपट्टयापर्यंतच मजल मारता आली यानंतर मोहीम आवरती घेण्यात आली मार्टी होयचा जन्म न्यूयॉर्क शहरात झाला वयाच्या पंधराव्या वर्षीच तिला पर्वतांचे वेड लागले होते माउंट रेनियर, माऊंट मॅकिन्ली, पिक लेनीन (७१९६ मी./२३४०६फूट), अॅकॉन्कागुआ (६९६० २ मी २२८३५ फूट) हे अर्जेन्टिनामधील शिखर, या यशस्वी चढाया तिच्या नावावर मौजूद होत्या पहिल्या पाच उत्कृष्ट अमेरिकन गिर्यारोहकात तिचा समावेश केला जात असे तिच्या दु:खद निधनाने अमेरिकेने एक उत्कृष्ट महिला गिर्यारोहक गमावल्याची हळहळ सर्वांनाच वाटली

## कॅनडाची एव्हरेस्ट चढाई

विल्यम जे मार्च (नेता), डेव्हिड रीड (उपनेता), लॉईड गॅलॅघर, अॅलन बर्जेस, गॉर्डन स्मिथ, ड्वायने कॉग्डन, लॉरी स्क्रेस्लेट, पॅट्रीक मॉरो अशा आठ जणांची तुकडी ऑक्टोबर ८२ मध्ये एव्हरेस्ट आरोहणास सिद्ध झाली होती

लॉरी स्क्रेस्लेट (३२), शेर्पा सुदारे आणि ल्हकपा डोर्जे ४ ऑक्टो रोजी सकाळी ९॥ वाजता एव्हरेस्टचा माथा गाठण्यात यशस्वी झाले. १९५५ मध्ये एव्हरेस्टजवळच जन्मलेला शेर्पा सुदारे ऊर्फ सगदेर हा याआधी दोन वेळा एव्हरेस्टवर गेला होता (२ ऑक्टो ७९, २१ ऑक्टो. ८१) हिमदंशाने पायाची सहा बोटे गमावलेला सुदारे अतिशय गरिबीतून वर आला तीन वेळा एव्हरेस्ट गाठणारा हा पहिलाच मानव ठरला

पॅट्रीक मॉरो, पेमा दोर्जी, ल्हकपा त्सेरिंग असे आणखी तीन जण ७ ऑक्टो ८२ रोजी एव्हरेस्टवर पोहोचले या बासष्टाव्या मोहिमेला यश मिळाल्याने यशस्वी मोहिमांची संख्या २८ झाली. एव्हरेस्टवरचे १३४ वे आरोहण या वेळी नोंदले गेले

जॉर्ज ब्लेअर ग्रिफीथ आणि तीन शेर्पांचा मृत्यू आणि एव्हरेस्टवरून उपग्रहाच्या सहाय्याने चढाईचे थेट दूरदर्शन प्रक्षेपण ही या मोहिमेची आणखी काही वैशिष्ट्ये

## ६३ वी एव्हरेस्ट मोहीम

ऑक्टोबर १९८२ मध्ये लुइस बेल्व्हिस्च्या नेतृत्वाखाली पश्चिम कण्यावरून आरोहण करणाऱ्या या तुकडीला फक्त ८५०० मी उंची गाठता आली २७ सप्टें- ८२ रोजी शेर्पा गाइड निमा दोर्जी याला अपघाती मृत्यू झाला याच स्पॅनिश कॅटलाना मोहिमेत पोटदुखी व उलट्या झाल्यामुळे लकपा त्सेरींग या शेर्पाचाही

मृत्यू झाला व ही स्पॅनिश मोहीम अयशस्वी ठरली

## भर थंडीत एव्हरेस्टच्या माथ्यावर

डिसेंबर ८२ ची जपानी एव्हरेस्ट मोहीम यशस्वी ठरली खरी, पण 'गड जिंकला आणि सिंह गमावला' अशीच परिस्थिती निर्माण झाली

५ डिसेंबर ८२ रोजी ५४०० मी उंचीवर पायतळ उभारल्यावर अवघ्या २४ दिवसात, तेही भर हिवाळ्यात, एव्हरेस्टचा माथा गाठण्यात या तुकडीतील यासुओ काटो या पोलादी पुरुषाला यश मिळाले काटोची एव्हरेस्ट गाठण्याची ही तिसरी वेळ या आधी २६ ऑक्टो १९७३ रोजी हिसाशी इशिगुरूबरोबर पहिल्यांदा एव्हरेस्ट गाठले त्या वेळी हिमदशामुळे त्याला पायाची सर्व आणि उजव्या हाताची तीन बोटं गमवावी लागली होती ३ मे १९८० रोजी तिबेटकडून त्याने एकट्याने रात्री ८–५५ ला एव्हरेस्टचा माथा गाठला होता

४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ ५० च्या सुमारास यासुओ काटोने खालच्या तिसऱ्या व दुसऱ्या तळाशी संपर्क साधून ८७६३ मी उंचीवर तोशिआकी कोबायाशी या सहकाऱ्यासह रात्री मुक्काम करणार असल्याचे कळविले होते दुसऱ्या दिवशी शिखरावर जाताना हिमदशामुळे आजारलेल्या कोबायाशीविना एकट्याने प्रयत्न करणार असल्याची कल्पनाही त्याने दिली होती या आधीचा २३ डिसेंबरचा सुलतानढवा अयशस्वी ठरला होता तेव्हा २६ डिसेंबर रोजीचा निकराचा हल्ला यशस्वी करण्याची जिद्द हा एव्हरेस्टवीर बाळगून होता शेवटच्या मुक्कामाच्या ठिकाणाहून दुपारी एव्हरेस्टवर काटो पोहोचला, तेव्हा त्याचा सहकारी कोबायाशी केवळ शभर मीटर खाली होता त्याला शिखर गाठणे शक्य झाले नाही.

एव्हरेस्टवीर यासुको काटो (३३) आणि त्याचा सहकारी तोशिआकी कोबायाशी (३३) यांचे निधन झोंबरे वारे, कडाक्याची थंडी, अतिश्रम यामुळे प्राणवायूच्या अपुऱ्या पुरवठ्यात थंडीने गारठून जाण्यामुळे झाले असावे असा अंदाज व्यक्त केला जातो मात्र त्याबद्दल खात्रीशीर माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही त्याच्या शोधार्थ गेलेल्या पथकाला त्यांचा ठावठिकाणा लागू शकलेला नाही

यासुओ काटो या विक्रमवीराने आपल्या शाळकरी दिवसातच पर्वताशी मैत्री वाढवली. त्याचा मोठा भाऊ ताकिओ याचे त्याला सहकार्य मिळाले अवघ्या विसाव्या वर्षी आपल्या भावाबरोबर यासुओने युरोपीअन आल्पसवर स्वारी केली आयगर नॉर्थ वॉल चढून जाण्यात त्याला यश मिळाले दोनच वर्षांत त्याने मॅटर हॉर्न नॉर्थ वॉल चढून जाण्याचा यशस्वी प्रयत्न केला पुढच्याच वर्षी ग्रॅण्ड जोरासेस नॉर्थ वॉलवरही त्याने यश मिळवले १९७३ च्या ऑक्टोबरमध्ये त्याने दक्षिणेकडून एव्हरेस्टवर जाणाऱ्या जपानी तुकडीत स्थान मिळवले व तो एव्हरेस्टवीर ठरला १९७६

मधील इंडो-जपानीज नदादेवी ट्रॅव्हर्सी एक्सपीडीशनमध्ये तो सहभागी झाला व नदादेवीच्या मुख्य शिखरावर तो पोहोचू शकला १९८० मध्ये तो गिरिशिखराचा राजा असणाऱ्या एव्हरेस्टवर उत्तरेकडून चढून गेला १९८१ मध्ये मनास्लू ८१५६ मी या शिखरावर त्याने प्राणवायूच्या जादा मदतीशिवाय आरोहण केले आता १९८२ मध्ये त्याने एव्हरेस्टवर पुन्हा झेप घेतली आणि यश मिळूनही नियतीने दावा साधला एव्हरेस्टवर दक्षिण व उत्तरेकडून यशस्वी आरोहण करणारा तो पहिला गिर्यारोहक ठरला

तोशिआको कोबायाशी हाही एक उत्तम दर्जाचा जपानी गिर्यारोहक ठरला एका कंपनीत तो रोखपाल (कॅशियर) म्हणून नोकरी करीत असे ८७६३ मी उंचीच्या शेवटच्या तळापुढे तो गेला नाही एव्हरेस्टवर तिसऱ्यादा यशस्वी आरोहण करून परतताना काटो व त्याची भेट झाली पुढे नक्की काय व कसे झाले ते अज्ञातच राहिले धवलगिरी (८१६७ मी), केटू/कोगीर (८६११ मी), धवलगिरी दक्षिण-बाजू, अन्नपूर्णा (८०९० मी) दक्षिण कडा, अशा त्याच्या यशस्वी आरोहणामुळे एक उत्तम दर्जाचा गिर्यारोहक म्हणून त्याला मान्यता मिळाली होती काटो व तोशि-आकीच्या मृत्यूने केवळ १९८२ या वर्षात एव्हरेस्टने तब्बल अकरा बळी घेतले

ही ६४ वी मोहीम होती ती २७ वी यशस्वी मोहीम ठरली या७ जणाच्या तुकडीत फक्त यासुओ काटोला एव्हरेस्ट गाठता आले त्यामुळे १२५ वेळा मानवी पदस्पर्श एव्हरेस्टच्या माथ्याला घडला

## एव्हरेस्टवरची ६५ वी मोहीम

डिसें ८२– जाने ८३ या काळात मायकेल मेत्झगरच्या नेतृत्वाखालील फ्रेंच तुकडीने प्रयत्न केला ७ फ्रेंच, २ स्विस, १ इटालियन, १ बेल्जियन अशा ११ जणांचा त्यात समावेश होता या मोहिमेतील एक सदस्य अती उंचीवरील पर्वतीय विकाराने खाली परतत असताना नाहीसा झाला बरेच दिवस झाले तरी तो खालच्या तळावर परतला नव्हता तेव्हा तो अपघाती निधन पावला असे ठरवले गेले या मोहिमेला ७७०० मी एवढीच उंची गाठता आली होती ही मोहीम या अपघातामुळे अर्धवट सोडून दिली गेली पण १४ जानेवारी ८३ ला मोहीम काठ-माडूत परतली तेव्हा हे महाभाग त्यांना 'जिते जागते वन पीस' परत आलेले आढळले उत्तरेकडील उतारावरून घसरल्यानंतर या गिर्यारोहकाला मृत्यू आला नाही तो खाली उतरला व रोंगबुक धर्ममठाच्या बाजूने तो सपाटीवर आला व तेथून तो नेपाळात परतला त्याचे मृत्यूच्या ओठावरून परतणे हे गिर्यारोहणात घडलेले एक आश्चर्यच मानले जाते या चमत्काराला योगायोगाखेरीज अन्य काही म्हणता येणार नाही

## मे ८३- यशस्वी अमेरिकन मोहीम

७ मे १९८३ रोजी लॅरी नेल्सन (३६), जेराल रोच (३७), डेव्हिड ब्रिशीअर्स, पीटर जेमिसन, आंग रिटा (नेपाळ) हे आग्नेय कण्याने एव्हरेस्टवर पोहोचले.

तर १४ मे १९८३ रोजी गॅरी नेपच्यून, जिम स्टेटस्, लकपा दोर्जी हेही आग्नेय कण्यावरून एव्हरेस्टचा माथा गाठण्यात यशस्वी ठरले.

## १९८३- एव्हरेस्टवर पाच हल्ले

### १) जर्मन मोहीम

जेऱ्हार्ड लेन्सर हा पश्चिम जर्मनीचा गिर्यारोहक या मोहिमेचा नेता होता म्हणून या मोहिमेला जर्मन मोहीम म्हणायच एवढच बाकी सर्व अकरा गिर्यारोहक सभासद अमेरिकन होते एक नेपाळी शेर्पा, २८ भारवाहक मदतनीस आणि एक चित्रीकरणाची जबाबदारी सभाळणारा अशी ही मोहीम होती

जेरी रोच, डेव्हीड ब्रीशीअर्स, पीटर जइसन, लॅरी नील्सन आणि आगरीटा ७ मे ८३ रोजी शिखरावर पोहोचण्यात यशस्वी ठरले तर गॅरी नेपच्यून आणि जिम स्टेटस् यांच्याबरोबर शेर्पा ल्हकपा दोर्जी १४ मे ८३ रोजी शिखरावर पोहोचले लॅरी निल्सन आणि आंग रीटा हे जरी बाकी गिर्यारोहकांबरोबर होते तरी त्यानी या सबध मोहिमेत जादा प्राणवायू नळकाड्याचा कधीही वापर (अगदी) पायथ्यापासून माथ्यापर्यंत केव्हाही) केला नव्हता पायतळानतर ४ तळ ठोकून नेहमीच्या आग्नेय कण्यावरून ही मोहीम यशस्वी ठरली जेऱ्हार्ड लेन्सर हा नेता पायतळाच्यावर कधीही गेला नाही अमेरिकन दूरदर्शन चित्रीकरणाच्या सहकारी सभासदापैकी तिघेही दुसऱ्या तळापर्यंत आणि डेव्हिड ब्रीशीअर्स तर थेट शिखरावर गेला हे या मोहिमेचे वैशिष्टच मानता येईल ही ६७ वी मोहीम होती ती २९ वी यशस्वी मोहीम ठरली

### २) संगाकुदोशिकाई क्लब- जपानची १९८३ मधील एव्हरेस्ट मोहीम

अलीकडे एखाद्या राष्ट्राने एव्हरेस्ट मोहीम काढण हा प्रकार कमी होऊ लागला आहे वेगवेगळ्या राष्ट्रातील काही परिचित गिर्यारोहक एकत्र येऊन त्यांनी मोहीम काढण हा प्रकार आता रुळू लागला आहे त्यामुळे नोंदी ठेवण थोड गैर-सोयीच होऊ लागलं आहे

सगाकुदोशिकाई हे जपानमधील एक गिर्यारोहण मडळ हारूइचि कावा-मुराच्या नेतृत्वाखालील हे ५ जणाच पथक होत या मोहिमेतील सभासदांनी जादा प्राणवायू नळकांड्याचा वापर केला नव्हता

८ ऑक्टोबरला दुपारी हारूइचि कावामुरा आणि शोमी सुझुकी शिखरावर पोहोचले त्याच्याबरोबर निघालेला पासांग टेंबा हा शेर्पा मधूनच परत फिरला आणि वाटेतच मृत्यूमुखी पडला

याच मोहीमेतील दुसरी तुकडी म्हणजे एक जपानी गिर्यारोहक आणि एक शेर्पा एवढीच होती त्यानी ९ ऑक्टोबरला प्रयत्न केला पण शिखर त्याच्या आवाक्याबाहेरच राहिले त्यानी ८५०० मी /२७८८६ फूट उचीवर मुक्काम केला आणि दुसऱ्या दिवशी सुखरूप खाली परतले

मूळच्या योजनेप्रमाणे नैऋत्य कण्यावरून दक्षिणस्तभी मार्गाने वर जाण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले होते काठमाडूत मोडलेल्या वेळेची भरपाई करण्यासाठी त्यांनी दक्षिणस्तभी भाग आणि जिनीव्हास्पर यामधील नैऋत्य कड्या-वरून आरोहण केले १९८१ च्या अमेरिकन मोहिमेने हाच मार्ग योजला होता

**३) यती दोजिन मोहीम–जपान १९८३**

बुटक्या जपान्याच उत्तुग एव्हरेस्टवर प्रचड प्रेम ! यश-अपयशाच्या झुल्यावर डुलणाऱ्या अनेक मोहिमा जपान्याच्या खाती रूजू आहेत

हारुयुकी एडोच्या नेतृत्वाखाली अवघ्या तीन सभासदाचा समावेश असलेली ही इटुकली मोहीम होती पैकी हारुयुकी एडो ८ ऑक्टो ८३ रोजी दुपारी ४ ला शिखरावर पोहोचला हिरोशी योशिनो आणि हिरोनोबु कामुरो दुपारी ५ ला वर पोहोचले एंडोने दक्षिण शिखराशी तर योशिनो आणि कामुरोने हिलरी स्टेपशी रात्री मुक्काम केला ९ ऑक्टोबरला सकाळी एडोने योशिनोला हिलरी स्टेपखाली पाहिले होते त्यानतर ते दोघे खाली परतले नाहीत नतरच्या शोधपथकाला योशिनोचा मृतदेह ६५०० मी उचीवर नैऋत्य कण्यावर सापडला कामुरोचे बूट दुसऱ्या तळाशी पश्चिम कड्याखाली सापडले

या मोहिमेतील सभासदांनीही जादा प्राणवायू नळकांड्याचा उपयोग केला नाही पण एडो अती श्रमाने दमल्यामुळे परतताना दुसऱ्या तळावर, दुसऱ्या मोहिमे-तील सभासदाकडून प्राणवायू नळकाडे उसने घेऊन त्याचा वापर त्यांनी केला

**४) अमेरिकन मोहीम–१९८३ ऑक्टोबर**

१४ गिर्यारोहक सभासद, १ पायतळ प्रमुख, १ डॉक्टर आणि २ पत्रकारांचा या मोहिमेत भरणा होता ल्होलाकडून पश्चिम कड्याने वर चढण्याचा हा प्रयत्न होता सरदार पेरतेंबाशिवाय ४ एव्हरेस्ट वीरांचा समावेश असणाऱ्या १९ हाय अल्टिट्यूड पोर्टर्सचा ताफा याच्या दिमतीला होता

१४ ऑक्टो ८३ रोजी रेनी जॅकसन आणि ॲनी व्हाइट हाऊस यांना ८५३४ मीटर एवढी उची गाठता आली प्रत्यक्ष शिखरावर जाण्यात कोणालाही यश मिळाले नाही

## जपान्यांची अभिनव कल्पना आणि एव्हरेस्टचा नकार

जपानी स्त्री आणि पुरुष गिर्यारोहकांनी एव्हरेस्ट इतिहासातील बऱ्यात पाना-वर आपल्या नोंदी केल्या आहेत पण काझुयुकी ताकाबाशी आणि त्याची पत्नी मिकहिगो यांनी एक अभिनव प्रयत्न केला काझुयुकीने आग्नेय कण्यावरून चढाई करायची आणि मिकहिगो या त्याच्या अर्धांगीने तिबेट बाजूने चढाई करायची

काझुयुकीला दुसऱ्या तळापुढे जाण्यास मोहिमेच्या डॉक्टरानी मना केले त्याचे हृदय हा ताण सहन करू शकले नसते पण त्याच्या बरोबरचे तीन जपानी गिर्या-रोहक आणि एक शेर्पा शिखरावर पोहोचू शकले नोबोरू यामाडा, ताकाशी ओझाकी, काझुमारी मुराकामी आणि नवाग योंडेन ही त्याची नावे १६ डिसेंबर १९८३ रोजी त्यांनी शिखर गाठले

ताकाबाशी पति-पत्नींना जरी यश मिळाले नाही, तरी हा आगळा प्रयत्न नोंद घेण्याजोगा होता होता, हे निश्चित

## ८ ऑक्टोबर १९८३

एव्हरेस्टच्या इतिहासातील एक अजोड दिवस तीन वेगवेगळ्या मोहिमा-मधील ८ गिर्यारोहक या सुवर्णदिनी शिखरावर पोहोचण्यात यशस्वी ठरले

हारूइचिनो कावामुराची सागकुदोशाई क्लबची जपानी मोहीम नैऋत्य कण्यावरून चढाई करीत होती पुढे त्यांनी आग्नेय दिशेकडून अंतिम चढाई करण्याचा निर्णय घेतला त्याच वेळी हिरोशी योशिनोच्या नेतृत्वाखाली यती दोजीन क्लबची जपानी मोहीम आग्नेय कण्यावरून वर चढत होतीच डॉ जेम्स मॉरीसीचा गटपूर्वे-कडील कागशुग कड्यावरून आरोहण करीत होता

साधारणत: ८१०० मी उचींवर आग्नेय कण्यावर दोन्ही जपानी तुकड्या एकमेकाना भेटल्या तेव्हा पहाटेचे साडेतीन वाजले होते सूर्योदय झाला तेव्हा त्याना ८५०० मी उचीवर तीन गिर्यारोहक दिसले लौ रिचर्ड, कार्लोस बूहलर आणि किम मोम्ब या तिघानी आत्तापर्यंत अपराजित अशा कागशुग या पूर्वेकडील कण्या-वरून तिबेटच्या बाजूने शिखराकडे प्रस्थान ठेवले होते.

दुपारी पावणेचारच्या सुमारास अमेरिकन आरोहक शिखरावर पोहोचले तर शोमी सुझुकी आणि हारूइचि कावामुरा (सागकुदोशाई क्लब) चार वाजून वीस मिनिटानी वर पोहोचले हारुयुकी एंडो त्यानतर दहाच मिनिटांत शिखरावर पोहो-चला हीरोनोबु कामुरो आणि हिरोशी योशिनो (यती दोजिन मोहीम) त्यानतर चाळीस मिनिटानी वर पोहोचले नोर्बू स्वागामी आणि शेर्पा पासांग तेंबा हे दोघे मात्र शिखर गाठू शकले नाहीत त्याचा हा मान थोडक्यात हुकला

स्वागामी साऊथ कोलकडे आणि तेंबा साऊथ पीक/दक्षिण शिखराकडे उतरल

असताना ८६०० मी उंचीवरून अमेरिकन गिर्यारोहक घसरले आणि अज्ञातात हरवून गेले कावामुरा आणि सुझुकी ८४०० मी उंचीवर पोहोचले तेथे त्यांनी स्टोव्ह, खाद्यपदार्थ आणि रात्रीच्या मुक्कामाची तयारी हिमात गाडून ठेवली होती एडो मात्र ८७५० मी वरच थांबला योशिनो आणि कामुरो यांनी आपली मुक्कामाची तजवीज ८५०० मी वर केली होती पण ते तिथवर पोहोचू न शकले नाहीत त्यांना उघड्यावर ८८०० मी उंचीवर मुक्काम करावा लागला एडो या गिर्यारोहकाने योशिनोला दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता पाहिले त्याने खाली उतरायला सुरवात केली योशिनो आणि कामुरा काही खाली आलेच नाहीत दुसऱ्या दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर ८३ रोजी योशिनोचा मृतदेह आणि कामुरोचे बूट आग्नेय कड्याच्या खाली सापडले

गिर्यारोहकांच्या या शिखरपरिषदेने साध्य झालेल्या विजयाची अशी वाताहत झाली पण तरीही एक आगळी घटना म्हणून या विजयाचे स्मरण नेहमी ठेवले जाईल

योशिनो आणि कामुरोची थोडी अधिक ओळख इथे करून घ्यायला हरकत नाही या दोघांचे एव्हरेस्टवर प्राणवायूच्या नळकांड्यांविना आरोहण शेवटचे ठरले त्या आधी त्यांनी केटू शिखरावर १९८२ मध्ये जादा प्राणवायूच्या मदतीशिवाय मोहीम काढली होती त्या वेळी ते ८६११ मी उंचीवर पोहोचले देखील परंतु तेथे त्यांना हिमदंशाची बाधा झाल्याने परत फिरावे लागले होते तब्बल ५० दिवसांचा हॉस्पिटलमधील पाहुणचार त्यांना भोगावा लागला होता

हिरोशी योशिनो याने एक गिर्यारोहण मंडळ काढले होते जपानी तरुणांना पर्वतांची ओळख त्याद्वारे करून देण्याचे काम तो करीत होता १९८१ मध्ये त्याने अन्नपूर्णा शिखर मोहीम काढली होती, त्यात तो यशस्वी देखील झाला होता त्याच मोहिमेत सुझुकी अत्सुको ही महिला गिर्यारोहकही सहभागी झाली होती १९८२ मध्ये त्याने पुढे तिच्याशी विवाहही केला

हिरोनाबू कामुरा हा एका धर्मोपदेशकाचा थोरला मुलगा परंपरागत धर्मगुरूपण सांभाळण्याआधी हा जेव्हा क्योटोला उच्च शिक्षणासाठी आला तेव्हा त्याला गिर्यारोहणाचा विंचू चावला अलास्कामधील माऊंट हंटरच्या उत्तर कड्यावरून आरोहण करण्याच्या मोहिमेत १९७७ साली तो यशस्वी ठरला हौसकरनचे दक्षिण शिखर हे अँडीज पर्वतराजीतील शिखर त्याने १९७९ मध्ये एका दिवसात काबीज केले नंतर १९८० मध्ये अलास्कातल्या माऊंट मॅककिनलीवर अवघ्या नऊ तासांत यशस्वी आरोहण करून त्याने सर्वांना आश्चर्यचकित केले त्या वेळी झालेल्या हिमदंशाचा त्रास त्याला पुढच्या वर्षीच्या नेपाळ हिमालयात त्रासदायक ठरला १९८१ मध्ये कॅंकानकागुआवरील चढाईत त्याने यश मिळवले त्याच वर्षी त्याने धवलगिरी–१

हे शिखरही पादाक्रांत केले ते त्याने एकट्याने चढले होते


हिरोशी योशिनो आणि हिरोनोबु कामुरा या दोघाकडून आणखी बऱ्याच अपेक्षा होत्या पण त्याच्या अचानक मृत्यूने ती सारी स्वप्ने विरून गेली आहेत

**जपान्यांना पुन्हा यश**

१६ डिसेंबर ८३ रोजी नोबोरू यामाडा, ताकाशी ओझाकी, काझुमारी मुराकामी, हे तीन जपानी आणि नवाग योंडेन हा नेपाळी आग्नेय कण्यावरून एव्हरेस्टवर पोहोचले ही ७२ वी एव्हरेस्ट मोहीम होती व यशस्वी ठरणारी ती ३२ वी मोहीम ठरली

एव्हरेस्ट विजयाचा सहावा टप्पा संपतो तो एव्हरेस्ट विजयी क्षणांच दीड शतक झाल्यावर एव्हरेस्टच नावीन्य संपलेलं आहे वेगवेगळी, नवनवी आव्हान शोधून त्यावर यश मिळवल आहे पुरुष-महिला, जोडप, एकाच वेळी अनेकजण, एका तुकडीतील जास्तीत जास्त, एव्हरेस्टवर अनेक वेळा पदार्पण अस सार साध्य झाल आहे पण तरीही आता एव्हरेस्ट विजेत्याच्या द्विशतकाकडे घोडदौड सुरू झाली आहे हा सातवा टप्पा आणखी काय काय साध्य करेल ? किती नव आपल्यापुढे आणून ठेवील ? हे काही आजच सांगता येणार नाही एव्हरेस्ट विजयाचा परिसस्पर्श आपल्यालाही व्हावा हे मात्र प्रत्येक गिर्यारोहकाच स्वप्न असतच.

# एव्हरेस्ट विजेत्यांच्या
# द्विशतकाकडे घोडदौड



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०२८९
२१५८६

# १२ एव्हरेस्ट विजेत्यांच्या शतकाकडे घोडदौड

## बल्गेरीयाची एव्हरेस्ट चढाई

भारतीय महिला एव्हरेस्ट विजयासाठी प्रयत्न करीत असतानाच पश्चिम कण्याशी बल्गेरीयन मोहीम झटचा घेत होती २४ गिर्यारोहकापैकी ख्रिस्तो इव्हनॉव्ह प्रोदोनोव्ह (४१) याने जादा प्राणवायूच्या मदतीशिवाय शिखर सर केले २० एप्रिलच्या या विजयात ३३ तासाची अवघड चढाई, तीही प्राणवायूच्या नळकांड्याशिवाय आणि पश्चिम कण्यावरून, ही मोठी कौतुकास्पद गोष्ट होती इव्हनॉव्ह प्रोदोनोव्हला शिखरावरून ८१०० मी उचीवरील ४ थ्या तळावर परतता आले नाही बिनतारी संदेशावरून कळले की, त्याच्या हातावरून वारे गेले या पक्षाघाताच्या झटक्याने ८३०० मी उंचीवरील या एव्हरेस्ट विजेत्याला त्या खतरनाक हवामानाशी सामना करणे जमले नाही कदाचित प्राणवायूची कमतरता हे देखील कारण असू शकेल योग्य वेळेत त्याच्यापर्यंत आवश्यक मदतही पोहोचविता आली नाही व त्यातच त्याचा मृत्यू ओढवला यशाच्या रूपेरी ढगाची ही काळी कडच म्हणावी लागेल ही ७३ वी मोहीम ३३ वी यशाची मोहीम ठरली

२२ एप्रिलच्या वादळात बल्गेरीयन मोहिमेच्या ४ थ्या व ५ व्या तळाची खूप नासधूस झाली तरीही मोहीम अर्धवट न सोडता ८ मे रोजी ३, आणि ९ मे रोजी २ असे चार बल्गेरीयन गिर्यारोहक पश्चिम कण्यावरून वर चढले आणि भारतीय मोहीम ज्या आग्नेय कण्यावर होती तिकडून खाली उतरले. मेतोडी सव्होव्ह या शिखरविजेत्याला मात्र हिमदंश झाला त्याला विमानाने काठमांडूला हलवले गेले मग तो नवी दिल्ली मार्गे सोफियाला परतला बल्गेरीयन गिर्यारोहकाना शिखरावरून खाली परतीच्या प्रवासात भारतीय मोहिमेचे सहाय्य झाले या बल्गेरीयन मोहिमेतील विजयी वीरांची नावे पुढीलप्रमाणे– २० एप्रिल ८४– ख्रिस्तो प्रोदोनोव्ह ९ मे ८४– मेतोडी स्टीफॅनो व इव्हान व्हॉलचेव्ह, १० मे ८४– किरील डिमिट्रॉव्ह आणि निकोलाय पेटकॉव्ह

# १९८४ ची चौथी भारतीय एव्हरेस्ट मोहीम

'भारतीय महिलेचा एव्हरेस्टवर पदन्यास' हे ध्येय असलेली ही मोहीम अनेक दृष्टींनी संस्मरणीय ठरली ५ मार्चला राजीव गांधी, वैजयंतीमाला, डॉ बाली यांची भेट व शुभेच्छांची देवाण-घेवाण, ६ मार्चला पंतप्रधान इंदिरा गांधींनी आयोजित केलेला निरोप समारंभ, त्या वेळी क्रीडामंत्री बुटासिंग, दिल्लीचे नायब राज्यपाल जगमोहन यांची उपस्थिती, त्याच दिवशी शास्त्री भवनात कॅ एम् एस् कोहली– आय् एम एफ चे उपाध्यक्ष– यांनी आखलेली पत्रकारपरिषद, ७ मार्चला पालम विमानतळावरून प्रत्यक्ष प्रयाण– या साऱ्या गोष्टींमुळे प्रसिद्धीच्या झोतात ही मोहीम राहिली प्रचंड औत्सुक्य आणि अपेक्षांच्या निर्मितीचे काम वृत्तपत्रसृष्टीने मोहीम संपेपर्यंत सुरू ठेवले खुद्द काठमांडूतही भारताचे नेपाळमधील वकील व आय एम एफ चे अध्यक्ष एच सी सरीन यांनी जंगी पत्रकारपरिषद आयोजित केली होती

लेफ्टनंट कर्नल प्रेमचंद, फू दोर्जी, दोर्जी, ल्हातू, एन डी शेर्पा, डॉ मिनू मेहता हे पाचजण त्या आधीच, म्हणजे २२ फेब्रु ८५ ला दिल्लीहून निघाले होते ते १६ मार्चला मोहिमेचा पायतळ उभारण्याच्या कामात मग्न झाले होते ११ मार्चला मोहिमेचे नेते कर्नल डी के खुल्लर, चंद्रप्रभा ऐतवाल, हर्षवंती बिश्त, रिटा गोंबू, बचेंद्रीपाल, शरावती प्रभू, रेखा शर्मा, डॉ मीना आगरवाल, मेजर किरण इंद्रकुमार, मेजर जय बहुगुणा, मगन बिस्सा, सोनाम पाल्झोर, रतनसिंग, लोपसांग त्सेरींग, फ्लाइट लेफ्टनंट टी श्रीधरन असे सारेजण काठमांडूहून सोलोखुंबूकडे निघाले जिरीपर्यंत बसने व तेथून पायी असा हा प्रवास होता किरते छाप, यार्सा, थोसे, चागमा, सेटे, जुनबेसी, तेंगपोचे (थँगबोचे), फेरिचे, लोबुजे, गोरखशेप, पायतळ असे टप्पे घेत हे सारे गिर्यारोहक ३१ मार्चला ५४००मी / १७, ८०० फूट उंचीवर पोहोचले

नेपाळनिवासी शेर्पा सरदार आंग तेंबा आणि त्याचे सहाय्यक आंग दोर्जी व पासांग तेंबा (हे सारे एव्हरेस्ट शिखरविजेते) यांच्या हाताखाली अती उंचीवर सामान वाहून नेणारे ४० भारवाहक (हाय अल्टिट्यूड पोर्टर्स) आपल्या मोहिमेच्या मदतीला होतेच आजपर्यंतच्या १९६०, ६२, ६५ मधील एव्हरेस्ट मोहिमा प्रत्येकी ६-७ लाख रुपयांत झाल्या होत्या १५ टन सामान बाळगणाऱ्या १९८५ च्या मोहिमेचा खर्च मात्र ४० लाख रुपयांच्या आसपास झाला भारवाहक व स्थानिक जेवणे यासाठी १९ लाख रुपये, आयात केलेली गिर्यारोहण सामग्री १८ लाख रुपये, भारतात घेतलेले व आयात केलेले खाद्यपदार्थ २ लाख रुपये यातील ३५ लाखांचा भार भारतीय क्रीडाखात्याने उचलला होता अनेक छोट्या-मोठ्या कंपन्यांनी थोडी फार मदत केली होतीच त्याशिवाय टोमको (Tomco) ने चार जणांचा खर्च

सोसला त्याबदल्यात त्यांना एव्हरेस्टबद्दलची एक आणि या मोहिमेवर एक अशा दोन चित्रीकरणाची परवानगी मिळाली सिद्धार्थ काक, दीपक हळदणकर, संजीव सेंत, नदकुमार अशा चार जणांचा समावेश या चित्रीकरण तुकडीत होता

२६ मार्चला पहिल्या तळावर सामान वाहून नेत असताना शेर्पा आग रोंग झिंग व इतर चार जणावर एक बर्फखड आदळला आंग रोग झिंगला मृत्यू आला इतर चार जण गभीर जखमी झाले, पण बचावले २९ मार्चला जगबीर राय हा स्वयंपाकी अती उचीवरील पर्वतीय विकाराने मृत्यू पावला २४ मार्चला ६०५० मी· १९८४९ फूट उचीवर पहिला तळ, ९ एप्रिलला ६४६० मी / २११९३ फूट उचीवर दुसरा तळ, १५ एप्रिलला ७३२० मी / २४०१५ फूट उचीवर तिसरा तळ, ठोकण्यात यश मिळाले नतर मात्र वातावरण बिघडल्याने सर्वच कारभार थडावला शेवटी ४ था तळ साऊथ कोलवर ठोकला तो दिवस होता २९ एप्रिल

८५४० मी उचीवर शेवटचा तळ ठोकून तेथून शिखर चढाईचा पहिला प्रयत्न केला गेला वातावरण बिघडले, सोसाट्याचा वारा नुसत उभ राहण अशक्य करीत होता थकलेल्या रीटा गोंबूला दक्षिण शिखराखालून १०० मी व एव्हरेस्ट-खालून अवघ्या १८३ मी उचीवरून म्हणजे ८६६५ मीटर/२२४२८ फूट उचीवरून माघारी फिरावे लागले

शिखराखाली ३७० मी उचीवर एका बर्फाच्या गुहेत फू दोरजी, आग दोरजी आणि रीटा गोंबू यानी रात्र काढली तर लेफ्टनट प्रेमचद आणि चद्रप्रभा ऐतवाल यांना दक्षिण कोलवरच्या ४ थ्या छावणीत परतावे लागले ताशी १०० कि मी जोराचा वारा वाहत होता वातावरण अनुकूल नव्हतेच ८०६३ मी उची गाठल्यावर प्राणवायूची नळकाडी नादुरुस्त झाल्याने आग दोरजी आणि रीटा गोंबू यांना माघार घ्यावी लागली फू दोरजीचे प्राणवायू पुरवठा यत्र काम करीनासे झाले पण त्याने जिद्दीने आपली चढाई चालूच ठेवली हिलरीचे धुराडे (हिलरी चिमणी) पार केले होते आता हिलरीची पायरी (हिलरी स्टेप) पार करताना एकट्याने– प्राणवायूचा जादा पुरवठा नसताना आणि प्रतिकूल वातावरणात फू दोरजीने केवळ मनोबळावर एव्हरेस्टच्या माथ्यावर पाऊल ठेवले व तिरगा फडकवला चढाईत त्याला बल्गेरीयन एव्हरेस्टवीर भेटले मूळचा सिक्कीमचा रहिवासी असणारा फू दोर्जी गगटोकच्या सोनामशित्सो गिर्यारोहण प्रशिक्षण शाळेत मार्गदर्शक म्हणून काम करतो

फू दोर्जीचे हे प्राणवायूच्या नळकाड्याशिवायचे आरोहण भारताच्या कानाकोपऱ्यापर्यंत लगेचच दूरदर्शन–आकाशवाणी व वृत्तपत्रानी पोहोचविले तब्बल १९ वर्षांनतर भारताचा तिरगा एव्हरेस्टवर फडकला राष्ट्रपती– पतप्रधान– राज्यसभा सदस्य अशा साऱ्यानी या यशाची नोंद घेऊन पुढील प्रयत्नासाठी भारतीय तुकडीला

शुभेच्छा दिल्या

१५–१६ मेच्या रात्री ४ थ्या तळावर रेखा शर्मा, ल्हातू दोरजी, रतनसिंग होते तर त्याखाली तिसऱ्या तळावर बचेंद्रीपाल, लोपसाग त्सेरींग एन डी शेर्पा व दोन शेर्पा मदतनीस होते रात्री एकाएकी एक हिमढिसाळ कोसळला व त्याने तिसरा तळ गाडला गेला सारे गिर्यारोहक तबूत निद्राधीन असताना हिमाच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले त्यांच्यापैकी काहींनी जीवाच्या आकांताने गुदमरलेल्या स्थितीतच चाकूने तबू फाडून बाहेर पडण्यात यश मिळविले त्यानी इतरानाही बाहेर पडण्यास मदत केली एन डी शेर्पा व शेर्पा मदतनीसांना बरीच दुखापत झाली होती बचेंद्रीपाल व लोपसाग त्सेरींग आश्चर्यकारकरीत्या बचावले होते एका शेर्पाच्या पायातील हाड मोडल्याने त्याला हेलिकॉप्टरने काठमाडूत नेले गेले तो महिना सव्वामहिना दवाखान्यातच होता या अपघातामुळे रेखा शर्माचा एव्हरेस्ट योग हुकला ४ थ्या तळावरील मडळींना खाली बोलावण्यात आले

आता तिसरा प्रयत्न अखेरचा म्हणून करण्याचे ठरले या सुलतानढव्यात बचेंद्रीपाल, ल्हातू दोर्जी, सोनाम पाल्झोर, शेर्पा सरदार आग दोर्जी याची निवड झाली २३ मे ८५ रोजी या चौघांनी एव्हरेस्टचा माथा गाठला

भारतीय महिलेचे एव्हरेस्टवर यशस्वी पदार्पण प्रत्यक्षात अवतरले होते गिर्यारोहण जगतात भारतीय वीरानी आपले स्थान महत्त्वपूर्ण विजयाने सिद्ध केले पाऊण तास एव्हरेस्टच्या माथ्यावर काढणाऱ्या बचेंद्रीपालने दुर्गा देवीची सुबक मूर्ती शिखरावर ठेवून भक्तिभावाने तिला वदन केले बचेंद्रीपालला नंतर आय् एम् एफ् चे सुवर्णपदक देण्यात आले

मीरतच्या नॅशनल ॲडव्हेंचर फाऊडेशनच्या ब्रिगेडीयर ग्यानसिंग यांनी बचेंद्रीपाल याच्या संदर्भात एक आठवण नमूद केली आहे ती अशी– १९८३ मध्ये उत्तर काशीच्या नेहरू गिर्यारोहण सस्थेतील प्राथमिक शिबीरासाठी एक मुलगी आली पण इतर सर्व पुरुष मडळी असल्याने तिला तेथे प्रशिक्षण मिळू शकणार नाही असे सागण्यात आले ती जेव्हा अगदी हट्टाला पेटली तेव्हा आणखी काही मुली असतील तर आम्ही प्रवेश देऊ, असे सागून तिची समजूत घातली गेली आता ही मुलगी परत येणार नाही अशी सगळ्यांची ठाम समजूत झाली पण काही आठवड्याच्या आतच बरोबर आणखी सहा मुलींना घेऊन ती मुलगी परत आली तेव्हा ‘ सेव्हन सिस्टर्स क्लब ’ काढून त्यांना प्रशिक्षण दिले गेले आता अनेक महिलाना तेथे प्रशिक्षण मिळत आहे ही निश्चयी मुलगी म्हणजेच बचेंद्रीपाल !

एव्हरेस्टवर गेलेली ही ७४ वी मोहीम ठरली यश मिळवणारी ती ३४ वी मोहीम ठरली

## ऑस्ट्रेलियनांचे एव्हरेस्टवर आरोहण

चिनी सत्ताधीशांनी उत्तर बाजू खुली केल्यावर अनेक मोहिमा तिकडूनही एव्हरेस्ट गाठण्यात यशस्वी ठरल्या तिमोथी मॅकॉर्टनी (२४) आणि ग्रेगरी मॉटिमर (३१) यानी ३ ऑक्टो ८४ रोजी सायकाळी एव्हरेस्टवर आरोहण करण्यात यश मिळवले ही ७५ वी एव्हरेस्ट मोहीम होती यशस्वी होणारी ती ३५ वी मोहीम ठरली

## झेकोस्लोव्हाकियाची धडक-- ऑक्टो. ८४

७६ वी एव्हरेस्ट मोहीम झेकोस्लोव्हाकियाच्या नावावर नोंदली गेली ती ३६ वी यशस्वी मोहीम ठरली आणि १५ ऑक्टो ८५ रोजी तीन जणानी एव्हरेस्ट गाठले या वेळी त्यानी प्राणवायूच्या नळकाड्याचा वापर केला नव्हता जोसेफ सोतका (४०) आणि झोल्टान डेमजेन (२९) यानी ८३०० मी उचीवरील ७व्या तळावरून साडेआठ तासात एव्हरेस्ट गाठले त्या वेळी दुपारचे अडीच वाजले होते तेव्हा त्याच्याबरोबर आंगरिटा शेर्पा (३६) हाही होता अर्ध्या तासाच्या मुक्का-मात त्यांनी झेकोस्लोव्हाकियाचे व नेपाळचे राष्ट्रध्वज फडकावले दुपारी बोचरे वारे व किंचित ढगाळ हवामान असतानाही ते वर पोहोचण्यात यशस्वी ठरले मात्र जोसेफ सोतकाचा या मोहिमेत मृत्यू ओढवला ब्राटिस्लाव्हा येथील हा गिर्यारोहक इंजि-नियर होता १७ ऑक्टो ८४ रोजी त्याचा मृतदेह सापडवण्यात यश मिळाले

## पीटर हिलरीचे अपयश

एव्हरेस्टवीर एडमड हिलरीचा मुलगा पीटर हिलरी त्यालाही गोडी पर्वता-चीच वयाच्या २९ व्या वर्षी म्हणजे सप्टें--ऑक्टो ८४ मध्ये एव्हरेस्ट चढाईचा प्रयत्न केला त्याआधी १९७९ मध्ये त्याच्या हिमालयातील पहिल्या गिर्यारोहण मोहिमेस अपयश तर आलेच, पण पीटर हिलरीचा त्या मोहिमेत मृत्यू ओढवला अशी बातमीही प्रसिद्ध झाली होती सुदैवाने ती वार्ता खोटी ठरली

६ जणाच्या या न्यूझीलडच्या गिर्यारोहण पथकाचे नेतृत्व पीटर हिलरीकडे होते त्या तुकडीत आणखी एक न्यूझीलंडचा व ४ ऑस्ट्रेलियन गिर्यारोहकांचा समावेश होता मात्र या तुकडीला शिखर गाठण्यात अपयश आले

९ ऑक्टोबर रोजी ७९०० मी उचीवरून ही मडळी पुढे निघाली ८१४० मी उचीवर पीटर हिलरी, क्रेग नॉटल, आणि जॉन म्युर यांनी मागे फिरण्याचा निर्णय घेतला त्या वेळी प्रचड वारा आणि भयानक गारठा यांनी त्यांना सतावले पण

ए...१२

डॉ फ्रेड फ्रॉम व किम लोगन यानी त्याही परिस्थितीत पुढे जाण्याचा निर्णय घेतला व ते ८२०० मी पर्यंत पोहोचले त्या वेळी खाली गडगडत जाणारे काहीतरी त्यांना दिसले म्हणून आपल्या खाली असणाऱ्या सहकाऱ्याना मदत करण्यास ते खाली येऊ लागले

क्रेग नॉटल या ऑस्ट्रेलियन गिर्यारोहकाचा पाय घसरला व तो ५०० मीटर खाली कोसळला. त्यातच त्याचा मृत्यू ओढवला हीच घटना वरच्या गिर्यारोहकांनी नेमकी पाहिली जेथून नॉटल घसरला त्या जागी, वरून मदतीस आलेल्यांपैकी डॉ फ्रॉम याचाही पाय घसरला व तोही कोसळून मरण पावला या मोहिमेने पायतळाच्या वर शेर्पा गिर्यारोहकाची मदत घेतली नव्हती

एव्हरेस्टच्या इतिहासातील ती ७७ वी मोहीम ठरली

## नेपाळ-अमेरिकेची स्वच्छता मोहीम

याच काळात १८ नेपाळी व ४–५ अमेरिकन यानी 'माऊंट एव्हरेस्ट' स्वच्छता मोहीम आखली होती नेपाळी इन्स्पेक्टर योगेंद्र थापा याने ह्या मोहिमेचे नेतृत्व केले होते अमेरिकन चमूचे नेतृत्व डल्लासचा रहिवासी रिचर्ड बॉस याने केले होते सात शिखरे पादाक्रांत करण्यासाठी 'सेव्हन समिटस् ओडीसी' मोहीम आखूनही बॉसच्या तडाख्यातून एव्हरेस्ट वाचले होते या वेळच्या एव्हरेस्ट स्वच्छतेच्या मोहिमेत सहभागी होऊन एव्हरेस्टवर पाय रोवता आला तर पाहावे म्हणून बॉस व इतर गिर्यारोहक त्यात सहभागी झाले होते

डच गिर्यारोहकाचा प्रयत्न यश मिळाल्याने १५ ऑक्टोबर ८४ रोजी सपला त्यानतर इन्स्पेक्टर थापा याने दुसऱ्या क्रमांकाच्या तळावरून चौथ्या तळावर १४ ऑक्टोबरपर्यंत मजल मारली त्याच्याबरोबर आग दोर्जी शेर्पा होता १९७९ च्या जर्मन मोहिमेतील श्रीमती हॅनलोर स्माटझ् हिच्या मृतदेहाचा तपास लावण्यासाठी ही मुसडी मारली गेली होती असे त्याबाबत सांगितले जाते साऊथकोलशी आग दोर्जी शेर्पाने तंबू उभारला होता वॉकीटॉकीवरून त्या दोघांशी शेवटचा संपर्क साधला तेव्हा ते ८२४० मीटर उंचीवर होते त्यानतर मात्र त्याचा काहीही पत्ता लागला नाही दुसऱ्या दिवशी गेलेल्या शोधपथकाला त्यांची प्रेते सापडली अशी वदता आहे त्याला दुजोरा मात्र मिळू शकला नाही त्याच्या मृत्यूचे कारणही अद्याप कळू शकले नाही ते शिखरावर पोहोचले की नाही हेही कळले नाही.

त्यांच्याबरोबरच्या अमेरिकन सभासदांना मात्र तिसऱ्या तळाच्यावर जाता आले नाही कारण २४ ऑक्टोबरलाच ही मोहीम अधिकृतरीत्या गुडाळली गेली आणि अमेरिकनांना त्यानंतर वर कधी जाऊ दिले गेले नाही अशी ही ७८ वी मोहीम अपयशीच ठरली

## बार्ट व्हासचे शंकित यश

ऑक्टोबर ८४ मध्येच एक डच मोहीम एव्हरेस्टवर हॅन टीमर्सच्या नेतृत्वाखाली गेली होती आग्नेय कण्यावरून प्रयत्न करणाऱ्या या मोहिमेतील बार्ट व्हास याने शिखरावर पदार्पण केल्याचा दावा मांडला गेला. या ८ सभासदांच्या तुकडीचे नेतृत्व हर्मन प्लग याने केले होते

त्याप्रमाणे ८ ऑक्टोबर रोजी साऊथ समीटवर त्याने आपला बाडबिस्तरा प्राणवायूच्या नळकांड्यासह टाकला व तेथून पुढे तो एकटाच विनासामान पुढे गेला हिलरी स्टेपवर त्याला दोरखंड बांधलेला आढळला पण प्रत्यक्ष शिखरावर त्याला काहीही आढळले नाही असे तो म्हणतो

१५ ऑक्टोबर रोजी तेथवर गेलेल्या मोहिमेतील सदस्यांना मात्र साऊथ समीटच्या थोडेसे पुढे इतकेच बुटाचे ठसे आढळले त्यापुढे नाही हिलरी स्टेपवर त्यांना रोप आढळला नाही आणि प्रत्यक्ष शिखरावर प्राणवायूचे निळे नळकांडे अमेरिकन गिर्यारोहकांनी टाकून दिलेले आढळले म्हणून बार्ट व्हास या डच गिर्यारोहकाच्या दाव्याबद्दल शंका व्यक्त करण्यात येते मात्र प्राणवायूच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे घटनाबद्दल व गोष्टी लक्षात ठेवण्याबाबत गोंधळ होऊ शकतो, हेही लक्षात ठेवले पाहिजे

हा दावा खरा मानला तर ती ७९ वी मोहीम ३७ वी यशस्वी मोहीम ठरेल

## एकट्या अमेरिकनाचे सुयश

२० ऑक्टोबर ८४ रोजी फिल एर्शलर याने उत्तरेकडून पण ईशान्य कण्यावरून आरोहण करून एव्हरेस्ट माथा गाठला ही ८० वी मोहीम आणि यश मिळालेली ही ३८ वी यशस्वी मोहीम

## जानेवारी ८५– फ्रेंचांची अपयशी मोहीम

८ जणांच्या फ्रेंच मोहिमेचे सूत्रचालन एरिक डोसीनकडे होते ७५०० मीटर उंचीच फक्त ते गाठू शकले तो दिवस होता, १६ जानेवारी १९८५ ! बेनोइट चॅम्पॉक्स, व्हिन्सेंट फाइन व सुदारे शेर्पा तेथे पोहोचू शकले होते. हिवाळ्यात ल्होलामधून पश्चिम कण्यावर अपयशाची परंपरा ह्या मोहिमेने चालूच ठेवली. अशी ही चौथी फ्रेंच तुकडी अपयशी ठरली ही ८१ वी एव्हरेस्ट मोहीम ठरली

## नॉर्वेजियनांची विजयी सलामी

एप्रिल ८५ मध्ये एव्हरेस्टवरची ८२ वी आणि नॉर्वेची पहिली मोहीम निघाली. तब्बल १६ जणानी एव्हरेस्टचा माथा गाठून एक नवाच उच्चांक प्रस्थापित केला. या ३९ व्या यशस्वी मोहिमेमुळे १८९ वेळा एव्हरेस्टवर मानवी पदन्यासाची नोंद झाली

२१ एप्रिल रोजी १ ब्रिटीश (क्रिस बॉनिंग्टन), १९ नॉर्वेजियन्स व ३ नेपाळी गिर्यारोहक नेहमीच्या आग्नेय कण्यावरून शिखरावर पोहोचले बिजॉर्न मिरेरलुड (३२), ऑड एलिस्सेन (४०) याच्याबरोबर क्रिस बॉनिंग्टन (५०) हा प्रख्यात ब्रिटिश गिर्यारोहक होता त्याच्याबरोबर अग ल्हाकपा (२८), दा नुरू आणि शेर्पा पेरतेंबा (३६) (हे शेर्पाही होते तिसऱ्यांदा एव्हरेस्ट गाठणारा हा तिसरा मानव ठरला २६ सप्टें ७५ रोजी ब्रिटिश तुकडीबरोबर, आणि १ ऑक्टो ७९ रोजी प जर्मन तुकडीबरोबर पेरतेंबा एव्हरेस्टवर पोहोचला होता.) २८ एप्रिल रोजी आर्नेनीस (४७), हावर्ड नेशीम (३८), अशीम स्टेन (३३), राल्फ हाइपॅक (४७) या चौघांबरोबर आणखी चार नेपाळी शेर्पा आग रिटा, पेम्बा, दोर्जी, चोवाग रिंजिन व सुदारे शेर्पा एव्हरेस्टवर गेले. सुदारे शेर्पाचा हा चौथा एव्हरेस्टवर पदन्यास होता. आग रिटाने एव्हरेस्टवर तिसरे पदार्पण केले होते तीनही वेळा त्याने जादा प्राणवायूची मदत घेतली नव्हती

२९ एप्रिल रोजी डिक बास आणि डेव्ह ब्रीशस, आंग फूर्बाबरोबर एव्हरेस्टवर पोहोचले म्हणजे या मोहिमेत १७ जणानी यश मिळवले पैकी पेरतेंबा तिसऱ्या वेळी, आग रिटा तिसऱ्या वेळी आणि शेर्पा सुदारे तिसऱ्या व चौथ्या वेळी गेला म्हणून एव्हरेस्टविजेत्याची सख्या कमी भरते डिक बास हा ५५ वर्षांचा अमेरिकन एव्हरेस्ट गाठणारा सर्वांत वयस्कर मानव ठरला सर्व खडांतील सर्वोच्च शिखरमाथे गाठणाराही तोच गिर्यारोहक ठरतो यापूर्वी हाच पराक्रम नाओमी उएमुराच्या खात्यावर नोंदला गेला होता डिक बासच्या नावावर आणखी एक विक्रम नोंदला गेला होता तो असा– १९८३ या एका वर्षात त्याने अनेक शिखरमाथे गाठले होते अटार्क्टिकामधील सर्वोच्च शिखर व्हिन्सन मॅसिफ (५१४० २ मी । १६८६४ फूट) जानेवारी महिन्यात, फेब्रुवारीत अॅकान्का गुआ (६९५८ ९ मी । २२८३१ फूट) हे अर्जेन्टिनामधील, माऊट मॅककिन्ली (६१९३ ६ मी । २०३२० फूट) हे अलास्कामधील शिखर जुलै महिन्यात, ऑगस्टमध्ये किलीमाजारो (५८९४ ९ मी । १९३४० फूट) हे आफ्रिकेतील, माऊट एल्ब्रूझ (५६४१ ९ मी । १८५१० फूट) हे युरोपियन रशियातील शिखर सप्टेंबरमध्ये, कॉस्कीयुस्को (२२१९ ९ मी । ७३१६ फूट) हे ऑस्ट्रेलियातील अशी त्या त्या भागातील सर्वोच्च शिखरे गाठून

१९८३ च्या एप्रिल–मेमध्ये त्याने एव्हरेस्ट गाठण्याचा प्रयत्न केला होता पण त्या वेळी आलेले अपयश १९८४ च्या मोहिमेतील यशामुळे त्याने खेचून आणले व हा ' ग्रॅन्ड स्लॅम ' त्याने पूर्ण केला

## ५ व्या भारतीय मोहिमेची शोकांतिका

आधीच्या भारतीय मोहिमेच्या पदरी पुरेपूर यश पडल होतं. ठरवलेली उद्दिष्टे साध्य झाली होती पण तरीही काही पात्र व्यक्तीना एव्हरेस्ट विजयाचा परीसस्पर्श होऊ शकला नव्हता ताजा अनुभव, थोडीफार तयारी अन् मुख्य म्हणजे प्रचड आत्मविश्वास या बळावर लगेचच ऑक्टोबर नोव्हेंबर ८५ मध्ये एव्हरेस्टवर पुन्हा स्वारीचा बेत आखला गेला पूर्वीच्या चार मोहिमांपैकी दोन मोहिमांत यश आणि दोन मोहिमात अपयश पदरी पडल होत तेव्हा या मोहिमेकडून फारच अवाजवी अपेक्षाही नव्हत्या लेफ्टनट कर्नल प्रेमचद याच्या नेतृत्वाखालील मोहिमेत ३८ सदस्याचा समावेश होता या सेनादलाच्या मोहिमेचे उपनेतेपद मेजर इदरकुमार होते मेजर जयबहुगुणा, नायब सुभेदार एन डी शेर्पा, नायब सुभेदार मगन बिस्सा अशा अनुभवी गिर्यारोहकाचा समावेश या तुकडीत होता दक्षिण बाजूने वर चढण्यासाठी मेजर कुमार आणि नैऋत्येकडून जाण्यासाठी मेजर बहुगुणा याच्यावर जबाबदारी सोपवली गेली होती तुकडीत चार प्रकाशचित्रकार आणि एक वार्ताहर याचाही समावेश होता पावसाळ्यानतरच्या कालखडात प्रयत्न करणारी ही पहिलीच भारतीय तुकडी होती ती ८३ वी मोहीम ठरली

सुरवातीलाच सप्टेंबरमध्ये लेफ्टनट प्रेमप्रकाश यांचा अपघात व त्यातून लेफ्टनट कर्नल पुष्करचद यांनी केलेल्या जलद हालचालींमुळे सुटका ही सुरवात खेदजनक होती ऑक्टोबरमध्ये मात्र किरण इंदरकुमार यांना अपघाती मृत्यू आला. लगेचच एका हिमप्रपातात दोन गिर्यारोहक व पाच शेर्पा यांना अपघात झाला पण सुदैवाने त बचावले त्यापाठोपाठ मेजर जय बहुगुणा (३५), कॅप्टन विजयपालसिंग नेगी (२८), लेफ्टनट रणजितसिंग बक्षी (३५) आणि लेफ्टनट एम यू बी राव (२४) याना अपघाती मृत्यू आला या अपघात सापडलेमुळे जगजितसिंग याच्याकडून नेतृत्व काढून घेऊन लेफ्टनट कर्नल प्रेमचद याच्यावर सोपवले गेले पण पाच सहकाऱ्यांच्या ओढवलेल्या मृत्यूमुळे सर्वांना मानसिक धक्क्यातून सावरणे कठीण होते. ही भारतीय एव्हरेस्ट मोहीम म्हणजे एक शोकांतिकाच ठरली आणि मुख्य म्हणजे अपुरे अन्न आणि प्रमाणाबाहेर श्रम झाल्याने आलेला अफाट थकवा यामुळे चार गिर्यारोहक मृत्युमुखी पडल्याचा निष्कर्ष धक्कादायक ठरला रणजितसिंग बक्षीचा विवाह दोन महिन्यानी होणार होता. तर कॅप्टन विजयपालसिंग यानीही आपला विवाह, मोहिमेनतर लगेचच करण्यास मुहूर्त धरला होता रणजितसिंगला तर

एव्हरेस्ट चढाईदरम्यानच मृत्यू आला आपल्या धाडसी मुलाला भेट म्हणून रणजितच्या वडिलानी मोटार देण्याचे ठरवले होते ती मोटार त्यांच्या दारात येऊन दाखल झाली होती. तर विजयने नव्याकोऱ्या मारुती मोटारसाठी नोंदणी करून ठेवली होती.

या मोहिमेचे नेते कर्नल प्रेमचद याना मोहीम सुरू होण्याअगोदर हात मोडल्याने सारी जबाबदारी पेलणे शक्य नव्हते म्हणून ब्रिगेडीयर जगजितसिंग याच्याकडे नेतृत्व सोपवले गेले होते हर्ष बहुगुणाना १९७१ मे च्या आतरराष्ट्रीय एव्हरेस्ट मोहिमेत मृत्यू आला होता त्याचा भाऊ असणाऱ्या जय बहुगुणाची निवड या तुकडीत झाली होती मोहिमेआधी केवळ एकच महिना विवाहबद्ध झालेला हा गिर्यारोहक एव्हरेस्टच आव्हान पेलू शकला नसावा मात्र पूर्वी १९७७ मध्ये कांचनगगा आणि १९८२–८३ च्या अटार्क्टिका मोहिमेत त्याचा सहभाग व त्याचे यश डोळ्यात भरण्याजोगे होते प्रतिकूल हवामान, अत्यावश्यक असे हाय अल्टिट्यूड तबू न मिळणे, यामुळे नैऋत्य बाजूकडे ७७७२ मीटर उचीवर पाचवा तळ ठोकलेल्या तुकडीतून बहुगुणाने माघार घेतली व तो दक्षिण मार्गावरील तुकडीत सहभागी झाला कॅप्टन डी बी थापा याच्याकडे नैऋत्य आरोहण मार्गाची जबाबदारी सोपवली गेली

दक्षिण आरोहण मार्गाची जबाबदारी मेजर किरण इदरकुमारकडे होती ७९८६ मी उचीवरील साऊथ कोल कॅम्पवर १५ जणांना तीन दिवस पुरेल एवढा इंधन, प्राणवायू, खाद्यपदार्थ याचा साठा ठेवला गेला होता पहिल्या तुकडीत कुमार नायब सुभेदार एन डी शेर्पा, लेफ्टनट रणजितसिंग बक्षी याचा समावेश होता तर दुसऱ्या तुकडीत बहुगुणा व इतर ६ सदस्याचा समावेश होता ७ ऑक्टो रोजी सकाळी १०॥ पर्यंत शिखराखाली ३०० मीटर एवढी उची एन डी शेर्पा व ५ सदस्यानी गाठली कुमार व बक्षी मागोमाग होतेच. दुपारी २॥ पर्यंत प्रयत्न केले पण प्रतिकूल हवामानामुळे काही तरी गडबड घोटाळा झाला बर्फावरून घसरून कोसळल्याने कुमारला मृत्यू आला सासेर काग्री, नदादेवी, काचनगगा, काब्रूडोम, लिओ पारगियाल, किन्नर कैलास, चांगबांग अशी अवघड शिखर जिकणाऱ्या अनुभवी गिर्यारोहकाला एव्हरेस्टवर मृत्यू आला १९६० मध्ये त्याचाच भाऊ कर्नल नरेंद्रकुमारही अपयशीच ठरला होता

८ ऑक्टोबरला बहुगुणाने पुढाकार घेऊन वर जाण्याचे ठरवले हवालदार रिगझिम नामगियाल व नायक एल के नेगी आजारी पडले एन डी शेर्पा व त्याची तुकडी माघारी फिरली तर बहुगुणा, बक्षी, विजय नेगी, भास्करराव याची तुकडी साऊथ कोलवरच थांबली ९ ऑक्टोबर रोजीही प्रतिकूल हवामान होतेच. तेव्हा नामगियाल व एल. के. नेगी याना खाली जाण्यास सांगून स्वत अनुकूल

परिस्थितीची वाट पाहत थांबण्याचे ठरवले. १० ऑक्टोबर रोजी थोडी वाट पाहून खाली परतण्याचे बहुगुणाने सकाळी ८ वाजता ब्रिगेडीयर जगजितसिंगला कळवले पण झंझावाती वारा, प्रचंड धुके या प्रतिकूल वातावरणाने तीव्र स्वरूप धारण केले ११ ऑक्टोबरच्या पहाटेपर्यंत वादळ चालू राहिले त्यातच साऊथकोलवरचा तंबू पूर्ण उखडला गेला होता कॅप्टन प्रेमप्रकाशच्या सहाय्यक तुकडीने प्रयत्न करूनही हाती लागली, विजय नेगी व बक्षीची प्रेते । बहुगुणाच्या शरीरात थोडी धुगधुगी होती आणि राव अर्धवट बेशुद्ध होता त्यांना बरोबर नेलेला प्राणवायू देऊनही काही फायदा झाला नाही अखेर या मोहिमेची पहिल्यापासून झालेली फरफट व शेवटी झालेली वाताहत, यामुळे ही मोहीम एव्हरेस्ट आरोहण इतिहासातील सर्वांत मोठी शोकांतिकाच ठरली

यानंतर २८ ऑक्टोबर रोजी मगनलाल बिस्सा (३१) व शेरिंग आंगयोक (२७) यांनी पुन: एक प्रयत्न केला त्यात मगनलाल २–२। शे मीटर खाली दरीत कोसळला, पण केवळ नशिबामुळेच तो बचावला

निकृष्ट प्रतीची प्राणवायू नळकांडी, फाजील आत्मविश्वास, विनाकारण धाडस यामुळे भारतीय गिर्यारोहण क्षेत्राला मागे खेचणारी ही मोहीम ठरली अपघाताची मालिकाच या मोहिमेत पाहायला मिळाली.

## मे १९८६ ची अयशस्वी जपानी मोहीम

ही एव्हरेस्टवरची ८४ वी मोहीम होती जपानी तुकडीचा नेता जादा प्राण-वायूची मदत न घेता शिखरावर जाण्यास उत्सुक होता. तर त्याचे दोन जपानी सहकारी व दोन शेर्पा यांनी अशी प्राणवायूच्या नळकांड्यांची मदत घेतली होती परंतु ऐनवेळी घोंघावणारे वारे आणि तुफानी हिमवर्षाव यामुळे ह्या मोहिमेला शिखराखालून अवघ्या २४८ मीटर इतक्या उंचीवरून माघारी फिरावे लागले.

## मे ८६ मधील यशस्वी कॅनेडियन मोहीम (?)

याच काळात कॅनडाची एव्हरेस्ट मोहीमही गेली होती. या ८५ व्या मोहि-मेला यश मिळाले ही ४० वी यशस्वी मोहीम. आणि २८ वर्षांची शॅरन वुड व २९ वर्षांची वेन काँगडन या दोन महिला एव्हरेस्टवर पोहोचल्या असं काहीसं वृत्त काही वृत्तपत्रांमधून झिरपलं परंतु त्याबद्दल खात्रीशीर दुजोरा मिळालेला नाही या दोन एव्हरेस्ट विजेत्या महिलांचं वृत्त खरं असेल तर ती ४० वी यशस्वी मोहीम ठरेल व एव्हरेस्टवरील पदन्यासाची संख्या १९४ होईल या दोघींखेरीज या तुकडी-तील अन्य कोणीच शिखर गाठलं नसेल तर एकूण शिखर आरोहक व्यक्तींची संख्या

१८० भरेल मात्र याबाबत अधिक माहिती मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत कारण एव्हरेस्ट विजेत्याच द्विशतक यामुळे जवळ आल आहे आणि एव्हरेस्टवरील मानवी पदन्यासाच द्विशतकही जवळ आल आहे नेपाळ व चीन यांनी मार्ग खुले केल्याने हा द्विशतकी क्षण अधिक जवळ आला आहे एव्हरेस्टची मोहिनी चिरतन आहे हेच खरे.

## पुढील घडामोडी

१९८६ मध्ये प्राणवायूची मदत न घेता आणि स्थानिक शेर्पा मार्गदर्शक न घेता, एव्हरेस्टवर जाण्यास न्यूझीलडच्या गिर्यारोहक पथकाला अनुमती मिळाली आहे ३ न्यूझीलडनिवासी, एक अमेरिकन व एक ऑस्ट्रेलियन गिर्यारोहक यांचा या तुकडीत समावेश होणार आहे ही ८६ वी एव्हरेस्ट मोहीम ठरेल

## एव्हरेस्टवीराना मानाचा मुजरा !

म्हणजे आजवर २४ राष्ट्रामधील १८० जणानी ४० मोहिमांमध्ये एव्हरेस्ट माथा गाठण्यात यश मिळवले

नेपाळचा सुपुत्र शेर्पा सुंदारे याने तर ४ वेळा एव्हरेस्टच्या माथ्यावर आपला पाय रोवला आहे २ ऑक्टो ७९, २१ ऑक्टो ८१, ५ ऑक्टो, ८२, २८ एप्रिल ८५ या दिवशी त्याने विश्वकळसावर पदन्यास केला

आगरिटा (७ मे ८३, ५ ऑक्टो ८४, २८ एप्रिल ८५) आणि पेरतेंबा (२६ सप्टें ७५, १ ऑक्टो ७९, २२ एप्रिल ८५) या नेपाळी गिर्यारोहकांनी व यासुओ काटो ( १६ ऑक्टो ७३, ३ मे ८०, १७ डिसें ८१) या जपानी गिर्यारोहकाने प्रत्येकी ३ वेळा एव्हरेस्टचा माथा गाठला आहे

नवाग गोंबू (१ मे ६३, २० मे ६५) या भारतीय गिर्यारोहकाने, आग फू (३ मे ७८, १५ मे ७९), आंग दोर्जी (१६ ऑक्टो ७८, २३ मे ८४), आग फूर्बा (१ ऑक्टो ७९, १९ एप्रिल ८५) या नेपाळी गिर्यारोहकानी, तसेच रेनहोल्ड मेसनर (८ मे ७८, २० ऑगस्ट ८०) या इटालियन गिर्यारोहकाने एव्हरेस्टचा माथा गाठण्यात यश मिळवले आहे

त्यामुळे १९४ वेळा मानवी पदन्यास होऊनही एव्हरेस्टवीराची सख्या १८० एवढीच राहिली आहे

## एव्हरेस्टवीरांना मानाचा मुजरा !



तेनसिंग नोर्गे

## एव्हरेस्ट वीर

| यशस्वी मोहीम क्रमांक | यशस्वी मोहीम राष्ट्र | दिनांक | क्रमांक | नाव | वय | राष्ट्रीयत्व | मार्ग | वैशिष्टच |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इंग्लंड | २९ मे १९५३ | १ | तेनसिंग नोर्गे | ३९ | भारत | आग्नेय कणा | पहिले ज्ञात एव्हरेस्टवीर |
| | | | २ | एडमंड पी हिलरी | ३३ | न्यूझीलंड | ,, | |
| २ | स्वित्झर्लंड | २३ मे १९५६ | ३ | जुर्ग मार्मेट | २९ | स्वित्झर्लंड | ,, | पहिली ब्रिटिशेतर यशस्वी एव्हरेस्ट मोहीम |
| | | ,, | ४ | अर्न्स्ट श्मीड | ३२ | ,, | ,, | |
| | | २४ मे १९५६ | ५ | ॲडाल्फ रीस्ट | ३५ | ,, | ,, | |
| | | ,, | ६ | हॅन्स रूडॉल्फ व्हॉन गुटेन | २८ | ,, | ,, | |
| ३ | चीन | २५ मे १९६० | ७ | वांग–फू–चौ | २५ | चीन | ईशान्य कणा | उत्तरेकडून पहिले यश पण काहीजण या दाव्याबद्दल शंका घेतात |
| | | ,, | ८ | चू-यिन-हुआ | २५ | ,, | ,, | |
| | | ,, | ९ | कोन्बू | २७ | तिबेट | ,, | |
| ४ | अमेरिका | १ मे १९६३ | १० | जेम्स व्हिटॅकर | ३४ | अमेरिका | ,, | |
| | | ,, | ११ | नवांग गोंबू (१) | ३२ | भारत | ,, | |
| | | २२ मे १९६३ | १२ | बॅरी सी बिशप | ३२ | अमेरिका | ,, | |
| | | ,, | १३ | ल्यूट जेस्टॉड | २६ | ,, | ,, | |
| | | ,, | १४ | डॉ विल्यम अनसोल्ड | ३६ | ,, | प कण्यावरून वर | |
| | | ,, | १५ | डॉ थॉमस हॉर्नबीन | ३२ | ,, | चढलेव व आग्नेय कण्यावरून उतरले | |

| यशस्वी मोहीम क्रमांक | यशस्वी मोहीम राष्ट्र | दिनांक | क्रमांक | नाव | वय | राष्ट्रीयत्व | मार्ग | वैशिष्ट्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | भारत | २० मे १९६५ | १६ | कॅ ए एस् चीमा | २६ | भारत | आग्नेय कणा | |
| | | ,, | १७ | नवांग गोंबू (२) | ३३ | ,, | ,, | दोन वेळा एव्हरेस्ट गाठणारा पहिला मानव |
| | | २२ मे १९६५ | १८ | सोनाम ग्यात्सो | ४२ | ,, | ,, | |
| | | ,, | १९ | सोनाम वाग्याल | २३ | ,, | ,, | |
| | | २४ मे १९६५ | २० | सी पी व्होरा | ३१ | ,, | ,, | |
| | | ,, | २१ | अंग कामी | २४ | ,, | ,, | |
| | | २९ मे १९६५ | २२ | कॅ. एच पी. एस अहलुवालिया | २७ | ,, | ,, | |
| | | ,, | २३ | एच सी एस रावत | ३१ | ,, | ,, | |
| | | | २४ | फू दोर्जी | ... | नेपाळ | ,, | |
| ६ | जपान | ११ मे १९७० | २५ | नाओमी उएमुरा | २८ | जपान | ,, | सर्व खडांतील सर्वोच्च शिखरांवर पाय ठेवणारा एकमेव मानव |
| | | ,, | २६ | तेरूओ मात्सामुरा | ३५ | ,, | ,, | |
| | | १२ मे १९७० | २७ | कात्सुतोशी हिराबेयाशी | ३५ | ,, | ,, | |
| | | ,, | २८ | छोतारे शेर्पा | ३७ | नेपाळ | ,, | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | इटली | ५ मे १९७३ | २९ | रिनाल्डो कॅरेल | २१ | इटली | ,, | |
| | | ,, | ३० | मिर्को मिनुझो | २६ | ,, | ,, | |
| | | ,, | ३१ | ल्हकपा तेनसिंग | ... | नेपाळ | ,, | |
| | | ५ मे १९७३ | ३२ | साम्बू तामाग | १८ | नेपाळ | आग्नेय कणा | एव्हरेस्ट गाठणारा सर्वांत तरुण वयाचा गिर्यारोहक खर वय १७ ५ वर्षे |
| | | ७ मे १९७३ | ३३ | कॅ फॅब्रिझिओ इन्नामोराती | ... | इटली | ,, | |
| | | ,, | ३४ | व्हर्जिनिओ एपिस | ... | ,, | ,, | |
| | | ,, | ३५ | क्लाऊडिओ बेनेडेट्टी | ... | ,, | ,, | |
| | | ,, | ३६ | सोनाम ग्याल्झेन | ... | नेपाळ | ,, | |
| ८ | जपान | २६ ऑक्टो. १९७३ | ३७ | हिसाशी इशिगुरो | २८ | जपान | ,, | पावसाळ्यानंतर यशस्वी एव्हरेस्ट आरोहण साधणारी पहिली मोहीम |
| | | ,, | ३८ | यासुओ काटो (१) | २४ | ,, | ,, | |
| ९ | जपान | १६ मे १९७५ | ३९ | जुको ताबेई | ३५ | जपान | ,, | एव्हरेस्टवर पदन्यास करणारी पहिली महिला |
| | | ,, | ४० | आग त्शेरींग | २६ | नेपाळ | ,, | |
| १० | चीन | २७ मे १९७५ | ४१ | फात हॉंग | ३७ | तिबेट | ईशान्य कणा | उत्तरेकडून एव्हरेस्ट गाठणारी पहिली महिला आणि एकाच |
| | | ,, | ४२ | सोदनाम नोर्बू | २९ | ,, | ,, | |

| यशस्वी मोहीम क्रमांक | यशस्वी मोहीम राष्ट्र | दिनांक | क्रमांक | नाव | वय | राष्ट्रीयत्व | मार्ग | वैशिष्टय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २७ मे १९७५ | ४३ | ल्होत्से | ३७ | ,, | ,, | वेळी नऊजण शिखरावर |
| | | ,, | ४४ | हाऊ-शेंग-फू | ३६ | चीन | ,, | जाण्याचा आगळा |
| | | ,, | ४५ | सामद्रुप | २३ | तिबेट | ईशान्य कणा | विक्रम |
| | | ,, | ४६ | दारफुन्त्सो | ३० | ,, | ,, | |
| | | ,, | ४७ | कुग पासाग | २९ | ,, | ,, | |
| | | ,, | ४८ | त्सेरींग तोबग्याल | २९ | ,, | ,, | |
| | | ,, | ४९ | नगपो खियेन | २१ | ,, | ,, | |
| ११ | इग्लंड | २४ सप्टें १९७५ | ५० | डगल हेस्टन | ३२ | इग्लंड | नैऋत्य कणा | नैऋत्य कण्यावरून पहिले |
| | | ,, | ५१ | डग स्कॉट | ३३ | ,, | ,, | यशस्वी आरोहण |
| | | २६ सप्टें १९७५ | ५२ | पीटर बोर्डमन | २४ | ,, | ,, | |
| | | ,, | ५३ | पेरतेंबा (१) | २७ | नेपाळ | ,, | |
| १२ | इग्लंड | १६ मे १९७६ | ५४ | सार्जन्ट जॉन एच् स्टोकस् | ... | इग्लंड | आग्नेय कणा | |
| | | ,, | ५५ | कॉर्पोरल मायकेल पी लेन | ... | ,, | ,, | |
| १३ | अमेरिका | ८ ऑक्टो १९७६ | ५६ | रॉबर्ट कारमॅक | ३० | अमेरिका | ,, | अमेरिकन स्वातंत्र्याची |
| | | ,, | ५७ | क्रिस चॅण्डलर | २८ | ,, | ,, | द्विशताब्दी |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | दक्षिण-कोरिया | १५ सप्टे १९७७ | ५८ | सांग-दॉन-की | २९ | दक्षिण कोरिया | ,, | अवघ्या ३७ व्या दिवशी शिखरावर आरोहण करण्याचा विक्रम |
| | | ,, | ५९ | पेम्बा नोर्बू | ... | नेपाळ | ,, | |
| १५ | ऑस्ट्रिया | ३ मे १९७८ | ६० | वुलफॅग नैर्झ | ३४ | ऑस्ट्रिया | आग्नेय कणा | |
| | | ,, | ६१ | हॉर्स्ट बर्गमन | ३६ | ,, | ,, | |
| | | ,, | ६२ | रॉबर्ट शौर | २५ | ,, | ,, | |
| | | ,, | ६३ | आंग फू (१) | २८ | नेपाळ | | |
| | | ८ मे १९७८ | ६४ | रेनहोल्ड मेसनर (१) | ३४ | इटली | आग्नेय कणा | प्राणवायूच्या नळकांड्यांच्या वापराशिवाय एव्हरेस्टवर यशस्वी चढाई |
| | | ,, | ६५ | पीटर हेब्लर | ३५ | ऑस्ट्रिया | ,, | |
| | | ११ मे १९७८ | ६६ | ओसवाल्ड ओल्झ | ३५ | | ,, | |
| | | ,, | ६७ | रेनहार्ड कार्ल | ३० | पश्चिम जर्मनी | ,, | |
| | | १४ मे १९७८ | ६८ | फ्रान्झ ऑपुर्ग | २८ | ऑस्ट्रिया | ,, | |
| १६ | फ्रँको-जर्मन | १४ ऑक्टो १९६८ | ६९ | हॅन्स एग्ल | ३४ | पश्चिम जर्मनी | ,, | एकाच मोहिमेत १६ जण एव्हरेस्टवर जाणारी मोहीम |
| | | ,, | ७० | जोसेफ मॅक | २८ | ,, | ,, | |
| | | ,, | ७१ | ह्युबर्ट हिलमायर | ३४ | ,, | ,, | |
| | | १५ ऑक्टो. १९७८ | ७२ | पीयरे माझौद | ४९ | फ्रान्स | ,, | |
| | | ,, | ७३ | जीन अफनासीफ | ३५ | ,, | ,, | |
| | | ,, | ७४ | निकोल्डास जीगर | ३२ | ,, | ,, | |
| | | ,, | ७५ | कुर्ट डायम्बर्गर | ४६ | ऑस्ट्रिया | ,, | |

| यशस्वी मोहीम क्रमाक | यशस्वी मोहीम राष्ट्र | दिनांक | क्रमांक | नाव | वय | राष्ट्रीयत्व | मार्ग | वैशिष्ट्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | फ्रँको-जर्मन | १६ ओक्टो ११७८ | ७६ | वाण्डा रूटकीविक्स | ३५ | पोलड | आग्नेय कणा | पहिली युरोपियन एव्हरेस्ट विजेती |
| | | ,, | ७७ | रॉबर्ट अलेनबॅच | २८ | स्वित्झलंड | ,, | |
| | | ,, | ७८ | सिग्फाइड हूपफौर | ३७ | पश्चिम जर्मनी | ,, | |
| | | ,, | ७९ | विल्हेम क्लिमेक | ३८ | ,, | ,, | |
| | | ,, | ८० | मिग्मा त्शेरींग | २४ | नेपाळ | ,, | |
| | | ,, | ८१ | आंग दोर्जी (१) | २६ | ,, | ,, | |
| | | ,, | ८२ | आग कामी | २४ | ,, | ,, | |
| | | १७ ऑक्टो १९७८ | ८३ | जॉर्ज रिटर | ३१ | पश्चिम जर्मनी | ,, | |
| | | ,, | ८४ | बर्न्ट कुलमन | २४ | ,, | ,, | |
| १७ | युगोस्लाव्हिया | १३ मे १९७९ | ८५ | आन्द्रेज स्ट्रेम फेल्ज | २३ | युगोस्लाव्हिया | पश्चिम कणा | |
| | | ,, | ८६ | जर्नेज झाप्लोट्निक | २७ | ,, | ,, | |
| | | १५ मे १९७९ | ८७ | स्टॅन बेलॅक | ३९ | ,, | , | |
| | | ,, | ८८ | स्टिप बोझिक | २८ | ,, | ,, | |
| | | ,, | ८९ | आंग फू (२) | २९ | नेपाळ | ,, | |
| १८ | प जर्मनी | १ ऑक्टो १९७९ | ९० | डॉ गेऱ्हार्ड स्माटझ् ¤ | ५० | पश्चिम जर्मनी | आग्नेय कणा | एव्हरेस्टवर आरोहण ¤ करणारे पहिले जोडपे |
| | | ,, | ९१ | हरमन वार्थ | ३९ | ,, | ,, | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ,, | ९२ | हॅन्स व्हॉन केनेल | ३९ | स्वित्झर्लंड | ,, | |
| | | ,, | ९३ | पेरतेंबा (२) | ३१ | नेपाळ | ,, | |
| | | ,, | ९४ | लकपा ग्यालझेन | ३२ | ,, | ,, | |
| | | २ ऑक्टो १९७९ | ९५ | रे जेनेट | ४८ | अमेरिका | आग्नेय कणा | |
| | | ,, | ९६ | हॅनलोर स्माटझ् * | | पश्चिम जर्मनी | ,, | अवघ्या ३१ दिवसांत यशस्वी चढाई करून कमीत कमी दिवसांत एव्हरेस्ट गाठले |
| | | ,, | ९७ | डॉ. टिलमन फिशबॅक | ३१ | ,, | ,, | * एव्हरेस्ट गाठणारा वयस्कर |
| | | ,, | ९८ | गुटेर कीम्फ | ४६ | ,, | ,, | गिर्यारोहक डॉ गेन्हार्ड |
| | | ,, | ९९ | निक बँकस् | २७ | न्यूझीलंड | ,, | स्माटझ् वय पन्नास वर्षे पूर्ण |
| | | ,, | १०० | आग फूर्वा (१) | ... | नेपाळ | ,, | |
| | | ,, | १०१ | आग जांगबू/झाबू(?) | ... | नेपाळ | ,, | |
| | | ,, | १०२ | सुदारे (१) | २४ | ,, | ,, | |
| १९ | पोलंड | १७ फेब्रु.१९८० | १०३ | लेस्झेक सिचि | २९ | पोलंड | ,, | |
| | | ,, | १०४ | कुर्झी स्टॉक वायलिकी | ३० | ,, | ,, | |
| २० | जपान | ३ मे १९८० | १०५ | यासुओ काटो (२) | ३१ | जपान | ईशान्य कणा | |
| | | १० मे १९८० | १०६ | ताकाशी शिगेहिरो | ३२ | ,, | उत्तर कडा | |
| | | ,, | १०७ | त्सुनेओ ओझाकी | २७ | ,, | ,, | |
| २१ | स्पेन | १४ मे १९८० | १०८ | मार्टीन झाबाले टा | ३१ | स्पेन | आग्नेय कणा | |
| | | ,, | १०९ | पासांग तेंबा | ... | नेपाळ | ,, | |

| यशस्वी मोहीम क्रमांक | यशस्वी मोहीम राष्ट्र | दिनांक | क्रमांक | नाव | वय | राष्ट्रीयत्व | मार्ग | वैशिष्टय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | पोलंड | १९ मे १९८० | ११० | ॲण्ड्रेज झेक | ३२ | पोलंड | दक्षिण स्तंभ | |
| | | ” | १११ | झेर्झी कुकुझ्का | ३२ | ” | ” | |
| २३ | इटली | २० ऑगस्ट १९८० | ११२ | रेनहोल्ड मेसनर (२) | ३५ | इटली | ईशान्य कणा | एकटयाची पहिली यशस्वी एव्हरेस्ट मोहीम |
| २४ | अमेरिका | २१ ऑक्टो १९८१ | ११३ | क्रीस कोप झीन्स्की | ३३ | अमेरिका | दक्षिण स्तंभ | |
| | | ” | ११४ | सुदारे (२) | . | नेपाळ | व आग्नेय कणा | |
| | | २४ ऑक्टो १९८१ | ११५ | क्रीस पिझ्झो | ३२ | अमेरिका | ” | |
| | | ” | ११६ | यग तेनसिंग | ... | नेपाळ | ” | |
| | | ” | ११७ | डॉ पीटर कॅकेट | ... | अमेरिका | ” | |
| २५ | रशिया | ४ मे १९८२ | ११८ | एडवर्ड मायस्लोव्हस्की | ४५ | रशिया | नैऋत्य स्तंभ | |
| | | ” | ११९ | व्ल्हॅडिमिर बॅरीबर्डीन | ३३ | ” | ” | |
| | | ४ मे १९८२ | १२० | सर्गी बर्शोव्ह | ३४ | ” | ” | |
| | | ” | १२१ | मिखाएल तुर्कॅव्हिच | २९ | ” | ” | |
| | | ५ मे १९८२ | १२२ | व्हलॅंटिन इव्हॅनोव्ह | ४१ | ” | ” | |
| | | ” | १२३ | सर्गी एफिमॉव्ह | ३७ | ” | ” | |
| | | ८ मे १९८२ | १२४ | काझबेक व्हॅलियेम | ३० | ” | ” | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ” | १२५ | व्हॅलेरी ख्रिसचॅटी | ३१ | ” | ” | |
| | | ९ मे १९८२ | १२६ | युरी गोलोडॉव्ह | ३० | ” | ” | |
| | | ” | १२७ | व्लॅडिमीर पुचकॉव्ह | ४१ | ” | ” | |
| | रशिया | ९ मे १९८२ | १२८ | व्हॅलेरी खोमुटॉव्ह | ४० | रशिया | नैऋत्य स्तंभ | |
| २६ | कॅनडा | ५ ऑक्टो | १२९ | लॉरी स्केस्लेट | ३२ | कॅनडा | आग्नेय कणा | एव्हरेस्टवरून दूरदर्शन-वर थेट प्रक्षेपण करणारी पहिली मोहीम |
| | | ” | १३० | सुदाने (२) | २७ | नेपाळ | ” | |
| | | ” | १३१ | ल्हकपा दोर्जी | २५ | ” | ” | |
| | | ७ ऑक्टो १९८२ | १३२ | पॅट मॉरो | २९ | कॅनडा | ” | |
| | | ” | १३३ | पेम्बा दोर्जी | २५ | नेपाळ | ” | |
| | | ” | १३४ | ल्हकपा त्शेरींग | .. | ” | ” | |
| २७ | जपान | २७ डिसें १९८२ | १३५ | यासुओ काटो (३) | ३३ | जपान | ” | |
| २८ | अमेरिका | ७ मे १९८३ | १३६ | लॅरी नेल्सन | ३६ | अमेरिका | ” | |
| | | ” | १३७ | जेराल रोच | ३७ | ” | ” | |
| | | ” | १३८ | डेव्हिड ब्रीशीअर्स | . | ” | ” | |
| | | ” | १३९ | पीटर जेमिसन | .. | ” | ” | |
| | | ७ मे १९८३ | १४० | आग रिटा (१) | .. | नेपाळ | ” | |
| | | १४ मे १९८३ | १४१ | गॅरी नेपच्यून | . | अमेरिका | ” | |
| | | ” | १४२ | जिम स्टेटस | .. | ” | ” | |
| | | ” | १४३ | लक्पा दोर्जी | . | नेपाळ | ” | |

| यशस्वी मोहीम क्रमाक | यशस्वी मोहीम राष्ट्र | दिनांक | क्रमांक | नाव | वय | राष्ट्रीयत्व | मार्ग | वैशिष्ट्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | जर्मन | ८ ऑक्टो १९८१ | १४४ | लुई रिचर्ड | ... | अमेरिका | पूर्व कडा | |
| | | " | १४५ | कार्लोस ब्युहलर | ... | " | " | |
| | | | १४६ | किम मॉब | ... | " | " | |
| | | ८ ऑक्टो १९८१ | १४७ | दान रिन | ... | " | आग्नेय कणा | |
| | | " | १४८ | जॉर्ज लोव | ... | " | " | |
| | | " | १४९ | जॅ कॅसेल | ... | " | " | |
| ३० | जपान | ८ ऑक्टो १९८१ | १५० | हारूइचि कावामुरा | .. | जपान | " | |
| | | " | १५१ | शोमो सुझुकी | ... | " | " | |
| ३१ | जपान | " | १५२ | हारूयुकी एण्डो | ... | " | " | |
| | | " | १५३ | हिरोशी योशिनो | ... | " | " | |
| | | " | १५४ | हिरोनोबु कामुरो | ... | " | " | |
| ३२ | जपान | १६ डिसें १९८१ | १५५ | नोबोरू यामाडा | ... | " | " | |
| | | " | १५६ | ताकाशी ओझाकी | ... | " | " | |
| | | " | १५७ | काझुमारी मूराकामी | ... | " | " | |
| | | " | १५८ | नवाग योंडेन | ... | नेपाळ | " | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३३ | बल्गेरिया | २० एप्रिल १९८४ | १५९ | ख्रिस्तो प्रोदोनोव्ह | ... | बल्गेरिया | पश्चिम कणा | परतीच्या प्रवासात ८३०० मी वर मृत्यू. |
| | बल्गेरिया | ९ मे १९८४ | १६० | मेतोडी स्टीफॅनो | .. | बल्गेरिया | प कण्याने वर | |
| | | " | १६१ | इव्हान व्हॅलचेव्ह | ... | " | आग्नेय कण्या- | |
| | | १० मे १९८४ | १६२ | किरील डिमिट्रॉव्ह | ... | " | वरून खाली | |
| | | " | १६३ | निकोलाय पेटकॉव्ह | ... | " | " | |
| ३४ | भारत | ९ मे १९८४ | १६४ | फू दोर्जी | .. | भारत | आग्नेय कणा | |
| | | २३ मे १९८४ | १६५ | बचेंद्री पाल | ... | " | " | पहिली भारतीय एव्ह-रेस्टवीर महिला. |
| | | " | १६६ | ल्हातू दोर्जी | ... | " | " | |
| | | " | १६७ | सोनाम पाल्जोर | ... | " | " | |
| | | " | १६८ | आंग दोर्जी (२) | ... | नेपाळ | " | |
| ३५ | ऑस्ट्रेलि | ३ ऑक्टो. १९८४ | १६९ | टिम मॅकार्टिनी स्नॅप | ... | ऑस्ट्रेलिया | ग्रेट कुलियर | |
| | | " | १७० | ग्रेग मॉर्टिमर | ... | " | वरून उत्तरकडा | |
| ३६ | झेकोस्लोव्हा-किया | ५ ऑक्टो १९८४ | १७१ | जोसेफ प्सोट्का | ५० | झेकोस्लो- | दक्षिण स्तंभ | |
| | | " | १७२ | झोल्टान डेमजान | २९ | व्हाकिया | " | |
| | | " | १७३ | आंग रिटा शेर्पा (२) | ३६ | नेपाळ | " | |

| यशस्वी मोहीम क्रमांक | यशस्वी मोहीम राष्ट्र | दिनांक | क्रमांक | नाव | वय | राष्ट्रीयत्व | मार्ग | वैशिष्ट्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | जर्मन | ८ ऑक्टो १९८१ | १४४ | लुई रिचर्ड | ... | अमेरिका | पूर्व कडा | |
| | | " | १४५ | कार्लोस ब्युह्लर | ... | " | " | |
| | | | १४६ | किम मॉब | ... | " | " | |
| | | ८ ऑक्टो १९८१ | १४७ | दान रिन | ... | " | आग्नेय कणा | |
| | | " | १४८ | जॉर्ज लोव | ... | " | " | |
| | | " | १४९ | जॅ कॅसेल | ... | " | " | |
| ३० | जपान | ८ ऑक्टो १९८१ | १५० | हारूइचि कावामुरा | ... | जपान | " | |
| | | " | १५१ | शोमो सुझुकी | ... | " | " | |
| ३१ | जपान | " | १५२ | हारूयुकी एण्डो | ... | " | " | |
| | | " | १५३ | हिरोशी योशिनो | ... | " | " | |
| | | " | १५४ | हिरोनोबु कामुरो | ... | " | " | |
| ३२ | जपान | १६ डिसें १९८१ | १५५ | नोबोरू यामाडा | ... | " | " | |
| | | " | १५६ | ताकाशी ओझाकी | .. | " | " | |
| | | " | १५७ | काझुमारी मूराकामी | ... | " | " | |
| | | " | १५८ | नवांग योंडेन | ... | नेपाळ | " | |

| यशस्वी मोहीम क्रमांक | यशस्वी मोहीम राष्ट्र | दिनांक | क्रमांक | नाव | वय | राष्ट्रीयत्व | मार्ग | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | ईशान्य कणा | |
| ३९ | नॉर्वे | २२ एप्रिल १९८५ | १७६ | क्रिस बॉनिंग्टन | ५० | इंग्लंड | आग्नेय कणा | |
| | | ” | १७७ | बीयॉर्न मायरर लुड | ३२ | नॉर्वे | ” | |
| | | ” | १७८ | ओडड एलियॉसेन | ४० | ” | ” | |
| | | ” | १७९ | पेरतेंबा (३) | ३६ | नेपाळ | ” | पेरतेंबाचे ३ रे आरोहण |
| | | ” | १८० | अग ल्हकपा | २८ | ” | ” | |
| | | ” | १८१ | दां नुरू | ... | नेपाळ | ” | |
| | | २८ एप्रिल १९८५ | १८२ | आर्ने नीस | ४७ | नॉर्वे | ” | |
| | | ” | १८३ | हावर्ड नेशीम | ३८ | ” | ” | |
| | | ” | १८४ | अर्शीम स्टेन | ३३ | ” | ” | एकाच मोहिमेत १७ जणाचा एव्हरेस्टवर पदन्यास |
| | | | १८५ | राल्फ हाइपॅक | ४७ | ” | ” | |
| | | ” | १८६ | शेर्पा सुदारे (४) | ... | ” | ” | ४ वेळा एव्हरेस्ट गाठणारा एकमेव मानव –शेर्पा सुदारे |
| | | ” | १८७ | आग रिटा (३) | ... | ” | ” | |
| | | ” | १८८ | पेम्बा दोर्जे | ... | ” | ” | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३७ | डच–हॉलंड | ८ ऑक्टो १९८४ | १७४ | वार्ट व्हॉस | ... | डच/हॉलंड | आग्नेय कणा | शंकित यश |
| ३८ | अमेरिका | २० ऑक्टो १९८४ | १७५ | फिल एरश्लर | ... | अमेरिका | नॉर्थ खोल | |
| ३९ | नॉर्वे | २८ एप्रिल १९८५ | १८९ | चोवाग रिगिन | ... | नेपाळ | आग्नेय कणा | |
| | | २९ एप्रिल १९८५ | १९० | डिक बास | ... | नॉर्वे | " | |
| | | " | १९१ | डेव्ह ब्रीशर्स | ... | " | " | |
| | | " | १९२ | आग फूर्बा (२) | ... | नेपाळ | " | |
| ४० | कॅनडा | १ मे ८६ | १९३ | शॅरन वुड | ... | कॅनडा | " | २ कॅनेडियन महिलांचे |
| | | " | १९४ | वेन कॉंगडन | .. | " | " | यशस्वी आरोहण |

## एव्हरेस्ट विजेत्यांचे वर्गीकरण

| क्र. | देशाचे नाव | एव्हरेस्टवीराची संख्या | त्यासाठी किती मोहिमात सहभाग |
|---|---|---|---|
| १ | नेपाळ | ३८ | १८ |
| २ | अमेरिका | २४ | ८ |
| ३ | जपान | १८ | ७ |
| ४ | हिंदुस्थान (भारत) | १४ | ४ |
| ५ | पश्चिम जर्मनी | १३ | ३ |
| ६ | रशिया | ११ | १ |
| ७ | तिबेट | ९ | २ |
| ८ | नॉर्वे | ८ | १ |
| ९ | ऑस्ट्रिया | ७ | २ |
| १० | इटली | ७ | ३ |
| ११ | स्वित्झर्लंड | ६ | २ |
| १२ | इंग्लंड | ६ | ३ |
| १३ | बल्गेरिया | ५ | १ |
| १४ | पोलंड | ५ | ३ |
| १५ | युगोस्लाव्हिया | ४ | १ |
| १६ | कॅनडा | ४ | २ |
| १७ | फ्रान्स | ३ | १ |
| १८ | चीन | ३ | २ |
| १९ | झेकोस्लोव्हाकिया | २ | १ |
| २० | ऑस्ट्रेलिया | २ | १ |
| २१ | न्यूझीलंड | २ | २ |
| २२ | दक्षिण कोरिया | १ | १ |
| २३ | स्पेन | १ | १ |
| २४ | हॉलंड/नेदर्लंड | १ | १ |



हाऊ शेग फू




मॉरिस विल्सन




फू दोर्जी



सोनाम वाग्याल



ह्यूज रटलज.



सी पी व्होरा



रेनहोल्ड मेसनर.



यासुओ काटो.



नवाग गोंबू



एरिक शिप्टन



सोनाम ग्यात्सो



ब्रिगेडीयर जनरल
चार्लस ब्रूस



वाडा रूटकीविक्स



सोदनाम नोर्बू.



ल्होत्से



त्सेरींग तोग्याल.



सामद्रुब



दारफुत्सो



फात हॉग



ल्हादू दोर्जी



जुको ताबोई.



आग दोर्जी शेर्पा



गापो खिएन




कुगा पासांग.



बचेंद्री पाल



सोनाम पालझोर



एडमंड हिलरी

# असंच, काहीबाही.



# १४ असंच, काहीबाही.

## एव्हरेस्टच्या माथ्यावरून हवाई चक्कर !

तुम्हा आम्हाला एव्हरेस्ट गाठण कसं जमणार ? पण विमानात बसून एव्हरेस्टच्या डोक्यावरून उड्डाण करून परत यायला तुम्हाला निश्चित आवडेल एखाद्या सुट्टीत नेपाळची राजधानी काठमाडू गाठावी तेथील रॉयल नेपाळ एअरवेज कॉर्पोरेशन ( आर एन ए सी ) च्या कार्यालयात संपर्क साधून ' एव्हरेस्ट फ्लाइट ' ची तिकीटे काढावीत आणि एव्हरेस्टच्या माथ्यावरून उड्डाण करणाऱ्या छोट्या विमानातून ही रोमांचकारी हवाई सफर करून यावी यासाठी आधी पत्रव्यवहार करणे सोयीचे शक्यतो एप्रिलअखेर व मे चा पहिला पंधरवडा, नाहीतर सप्टेंबर-ऑक्टोबर हा कालावधी स्पष्ट दर्शन घडण्यास सोयीचा ठरतो काही प्रवासी कंपन्या आपल्या पर्यटनात या हवाई सफरीचा समावेश करतात पण आपले आपण प्रयत्न करून या तासाभराच्या हवाई चक्कराची मौज लुटणे अधिक स्वस्त पडते

## एव्हरेस्ट खरोखरच सर्वोच्च शिखर आहे का ?

एव्हरेस्टचे नकाशांकन, मोजणी, शोध व नामकरण होईपर्यंत कांचनगंगा या सिक्कीममधील शिखराला सर्वोच्च शिखर समजत असत

परंतु निकोल्सनच्या नव्या धडपडीतून ज्या नोंदी करण्यात आल्या त्यांचा अभ्यास- विश्लेषण व वर्गवारी केल्यानंतर राधानाथ सिकदर (काहींच्या मते हेन्नेसी) याच्या एक गोष्ट लक्षात आली, ती अशी की पूर्वी 'h' अक्षराने व त्यावेळी XV क्रमांकाने नोंदलेल्या, नेपाळ-तिबेटच्या सरहद्दीवरील शिखरांची उंची जगातील सर्व ज्ञात शिखरांपेक्षा खूपच जास्त भरत आहे, ही गोष्ट तत्कालीन सर्व्हेअर जनरल ऑफ इंडिया असणाऱ्या ॲण्ड्रयू वॉघ याच्या निदर्शनास आणली गेल्यावर आपले माजी वरिष्ठ व पहिले भारतीय सर्व्हेअर जनरल असणाऱ्या जॉर्ज एव्ह-

रेस्ट याच्या सन्मानार्थ त्या शिखराला 'माऊट एव्हरेस्ट' म्हणावे ही त्याची सूचना मान्य झाली 'विश्वकळस' किंवा 'तिसरा ध्रुव' मानल्या गेलेल्या या शिखराचे साधे दर्शनही त्या एव्हरेस्ट साहेबाने घेतलेले नव्हते

एव्हरेस्ट नाव देण्याचे वेळी तिबेटी नाव चोमोलुगमा, नेपाळी नाव सागरमाथा किंवा अन्य कोणत्याही नावाची परपरा व सयुक्तिकता शोधण्याचा प्रयत्न झालेला आढळत नाही सध्या मात्र काही नवी सशोधने पुढे येऊ पाहत आहेत त्यांचा फारसा गाभीर्याने कोणी विचार करत नाही. तसेच ही कागदपत्रे तुम्हा-आम्हाला पाहण्यास सहजासहजी मिळणे शक्य नसते तेव्हा बाहेर झिरपणाऱ्या गोष्टीवरून काही अदाज बाधणे शक्य होते त्यावर आपण विश्वास किती ठेवायचा हा आपला प्रश्न असतो एव्हरेस्ट शिखर खरोखर सर्वोच्च आहे का ? या प्रश्नाशी यातील कित्येक गोष्टी निगडीत आहेत हे सारे केवळ लोकापवाद आहेत, त्याना तसा काहीही अर्थ नाही, हे पुराव्यांनिशी सिद्ध होईस्तोवर मात्र ह्या शका अधून-मधून वेगवेगळ्या तऱ्हानी पुढे येत राहतील आपल्याला त्याबद्दल थोडीशी कल्पना असावी एवढेच त्याची सत्यासत्यता पडताळून पहायला सध्या तरी मार्ग नाही—

## शिखर १६ ?

१५ व्या शिखराचे 'माऊट एव्हरेस्ट' असे नामकरण झाल्यानतर १६ व्या शिखराची उची माऊट एव्हरेस्टहून थोडी जास्त भरत आहे, असे आकडेमोड करणाऱ्याना आढळून आले त्याबाबत त्यानी आपल्या वरिष्ठाना तपशीलवार कळवले भारतातून ही बाब लडनमधील वरिष्ठाना कळविण्यात आली हा सारा पत्रव्यवहार नेहमीप्रमाणे एका फायलीत वर्ग करण्यात आला होता त्यामुळे जुने-नवे सदर्भ शोधणे सोपे होते

परतु एके दिवशी अचानकपणे ही सर्व फाइलच गायब झाली आणि एव्हरेस्ट हेच जगातील सर्वोच्च शिखर असल्याचे निर्विवादपणे खरे आहे असे कळवण्यात आले ही फाइल ऐकीव माहितीच्या आधारे सध्या टॉवर ऑफ लडन मध्ये ब्रिटिश राजघराण्याच्या अती गुप्त, महत्त्वाच्या वस्तू, जडजवाहीर इ बरोबर खूप बदोबस्तात ठेवण्यात आली आहे

१६ वे शिखर खरोखरच अधिक उच असेलही पण मग त्यामुळे ब्रिटिशाच्या विश्वासार्हतेला तडाही जाऊ शकला असता सर्वोच्च शिखराला दुसरे नावही दिले गेले असते ब्रिटिश अभिमान मग डिवचला गेला असता म्हणून तर ही गोष्ट झाकली गेली नसेल ना ? शिखरावरून उडणाऱ्या हिमतुऱ्यामुळे मोजणीत ही फसगत झाली असे कारण १६ व्या शिखराची उची अचूक मोजली न गेल्याचे प्रमुख कारण म्हणून दिले गेले

हे १६ वे शिखर कोणते ? त्याची पुनर्मोजणी अद्याप का केली गेली नाही ? आणि खरं सांगायचं तर नेपाळमधून तरी एव्हरेस्ट हे अती उच्च भासत नाही. आणि सर्वजण त्यालाच एव्हरेस्ट म्हणत असल्यामुळे आपण तेच शिखर सर्वोच्च असल्याचे मानतो या लोकप्रवादात तथ्य नसेलही, पण तसा स्पष्ट इन्कार उच्च वर्तुळातून केला जात नाही

## मॅलरी– आर्यविनचे रहस्यमय वर्तन

७ जून १९२४ रोजी इ. एफ नॉर्टनच्या नेतृत्वाखालील तुकडीच्या मॅलरी आणि आर्यविनने ६ वा तळ ८६८६ १ मी / २८५०० फूट उचीवर ठोकला त्या वेळी एव्हरेस्टची उंची ८८३९ मी / २९००२ फूट मानली जात असे मॅलरी-आयर्विनच्या जोडीला सहाय्यक तुकडीत असणाऱ्या नॉर्टन– ओडेल याना मध्येच विरळ झालेल्या धुकटातून ही जोडी थोडावेळ दिसली तेव्हा ते उत्तेजित होऊन काहीतरी हातवारे करून दाखवत होते असे वाटले एव्हरेस्ट एवढे आटोक्यात आल्यावर त्यांचे आविर्भाव काही तरी विस्मयजनक गोष्ट पाहिल्यासारखे होत होते परंतु हे त्यांचे दर्शन फारच थोडावेळ झाले त्यानतर ते जे धुक्याआड नाहीसे झाले ते कायमचेच. त्यांची ना प्रेते सापडली ना अन्य काही खाणाखुणा एक हिमकुठार सापडली ती मॅलरीची असण्याचा सभव आहे ते जिवंत खाली येते तर त्यांच्या या विस्मयजनक वर्तनाचा सदर्भ लागला असता आणि एव्हरेस्टवर ते पोहोचले किंवा नाही हेही कळले असते त्यांना १६ व्या शिखराचे दर्शन तर झाले नव्हते ना ?

## आम्ने माचिनचे गूढ–

रॉबर्ट ली हा एक नामवंत सेनानी. सिक्कीममधील कालींपाँग येथे त्याची नेमणूक केली होती. मॅकमोहन साहेब त्याचा साथीदार होता तिबेटमधून थेट रशियन कास्पियन समुद्राकडे जाणाऱ्या मार्गाचे नकाशांकन करण्याची कामगिरी त्या दोघांवर सोपवली गेली होती त्या मोहिमेत आम्ने माचिनबद्दल काही गोष्टी त्यांच्या कानावर पडल्या पण त्यासबधी जास्ती काही विचारले तर तिबेटी सहाय्यक अबोल बनत. कसल्यातरी गूढ रम्य गोष्टींचे वलय त्याच्यामागे होते शेवटी रॉबर्ट लीने आपल्या मोहिमेचे उद्दीष्टच बदलले 'आम्ने माचिन' बद्दल अधिक माहिती तो गोळा करू लागला

खैम-पा (Khiam-Pa) आणि नियाग-ला (Neayang-La) या प्रदेशात चीन-तिबेटच्या सरहद्दीवर हे अज्ञात गूढ शिखर होते त्या बर्फाळ डोंगरी भागात त्यांची वाटचाल सुरू होती प्रतिकूल निसर्ग जणू परीक्षाच पाहत होता २३ सप्टें १९२५ रोजी तर कहरच झाला अफाट हिमवर्षाव, हिमदंशाची बाधा आणि असंच

काहातरी प्रतिकूल त्याचा पिच्छा सोडत नव्हते. अशातच पुढचा दिवस उजाडला. रॉबर्ट ली आश्चर्याने दिग्मूढ झाला त्याच्या समोर धुक्याच्या पटलाआड झाकले गेलेले एक शिखर आता स्वच्छ दिसू लागले ते महाकाय शिखर पाहून तो थक्क झाला एखाद्या दगडी पुतळ्यासारखा तो निश्चल उभा राहिला या दैवी शिखराचे दर्शन, नव्हे, साक्षात्कार पाहून आपण हे गोऱ्या साहेबाला दाखविल्याचे पाप केले असे तिबेटी मदतनीसाना वाटू लागले ते वारवार साष्टांग नमस्कार घालीत क्षमा-याचना करू लागले

रॉबर्ट ली हा जग पाहिलेला माणूस होता अँण्डीज आल्पस् आणि हिमालयही त्याने हिंडून फिरून पाहिला होता पण नुसत्या दर्शनाने अवाक् झालेल्या रॉबर्टने आपल्याच मनाशी एक निर्णय घेतला सारी मोहीम गुडाळून ठेवून तो तातडीने इंग्लडला रवाना झाला आम्ने माचिनची शोधकथा त्याने सर्वांना ऐकवली आपला लेखी रिपोर्ट सादर केला पण तोही फाइलच्या कराल दाढामागे बदिस्त झाला

ही कुणकुण नॅशनल जिओग्राफिकच्या हुशार मडळींना लागली त्याचा प्रति-निधी एम् ज्यूलस फावरे, रॉबर्ट लीच्या भेटीला आला ही सारी कथा ऐकून फावरेने लगेच तिकडची शोधमोहीम हाती घ्यायच ठरवलं नॅशनल जिओग्राफिक सोसायटीने साऱ्या खर्चाची व्यवस्था व जबाबदारी स्वीकारली एवढ्यातच डिसें १९२५ मध्ये जनरल लीला हृदयविकाराचा झटका आल्याने मृत्यू आला तरीही फावरेने ही मोहीम पुढे रेटायचे ठरवले आम्ने माचिनच्या दक्षिण भागातून त्याने हा शिखरराजा न्याहाळायचा प्रयत्न केला त्या ६०९६ मी /२०००० फूट उंची-वरील प्रदेशात भल्या थोरल्या बुंधाचा शिखराचा भाग त्याला दिसू शकला वरचा भाग धुकटामागे अदृश्यच झाला होता त्याच भागात पर्ण पाढरे अन मानवी चेहऱ्याचे वटवाघूळ त्याने पाहिले. त्याचा फोटोही त्याने मिळवला हीच त्या मोहि-मेची फलश्रुती. या मोहिमेचा अहवाल त्याने नॅशनल जिओग्राफिक सोसायटीला सादर केला

सध्या मात्र आम्ने माचिनची उंची एव्हरेस्टपेक्षा कमी आहे असे मत सर्व-मान्य होऊ पाहात आहे

दुसऱ्या महायुद्धानतर राष्ट्रीय चीनच्या चँग-कै-शेकच्या शासनाला मदत करण्यासाठी पॅसिफिक सागरावरील नाविक तळावरून उड्डाण केलेल्या फॉक्स या अमेरिकन वैमानिकाने एक अतर्क्य सदेश पाठविला तिबेट-चीनच्या सरहद्दीवर उडत असताना त्याचे उंचीदर्शक यत्र ९३५३ ७ मी /३२००० फूट उंची दाखवीत होते. आणि त्याची समोरच्या शिखराशी टक्कर थोडक्यात हुकली होती यानतरही एव्हरेस्टहून तीनशे मीटर /१००० फूट अधिक उंच असलेल्या शिखराच्या दर्शनाची नोंद, आणखी सहा अमेरिकन वैमानिकांनी केल्याची नोंद मिळते पैकी एका वैमा-

निकाने पाठविलेल्या संदेशात 'आपल्या पुढ्यात एक हिमधवल शिखर आहे व मी ३० हजार ३०० फूट (अंदाजे ९२३५ मी) उंचीवर आहे' असे सांगितले त्याचे विमान त्याच पर्वतशृंगावर आपटले व त्या अपघातात त्याचा मृत्यू ओढवला मात्र या अज्ञात शिखराबद्दल पुढे काहीही माहिती मिळू शकली नाही

## स्मिथसोनियन इन्स्टिटय़ूटची चलाखी

इक्वेडोरमधील चिंबोराझो या निद्रिस्त ज्वालामुखीच्या विवरावरील बर्फाच्छादित शिखर पृथ्वीच्या केंद्रबिंदूपासून सर्वोच्च ठिकाण स्मिथसोनियन इन्स्टिटय़ूटने जाहीर केले आहे

सर्वसाधारणपणे शिखराची उंची समुद्रसपाटीपासून मोजली जाते त्याऐवजी ही उंची पृथ्वीच्या पोटातील केंद्रबिंदूपासून मोजावी व तेथपासून सर्वांत लांब असणारी जागा पृथ्वीवरील सर्वोच्च बिंदू मानावा या तत्त्वाचा पुरस्कार वॉशिंग्टनमधील या संस्थेच्या शास्त्रज्ञांनी केला आहे पृथ्वीचा आकार काहीसा चेंडूसारखा पूर्ण गोल नाही ती ध्रुवाशी थोडा चपटका व विषुववृत्ताशी थोडा अधिक फुगीर आहे याचाच फायदा चिंबोराझोला मिळतो आहे त्यामुळे एव्हरेस्टचा नवा प्रतिस्पर्धी शास्त्रीय पायावर उभा राहून सर्वोच्च स्थानाचा मान हिरावून घ्यायला सिद्ध झाला आहे

## मानकऱ्यांची क्रमवारी

| क्र | नाव | मीटर्स | फूट | विभाग | प्रथम आरोहण |
|---|---|---|---|---|---|
| १ | एव्हरेस्ट | ८८४८ | २९०२८ | नेपाळ | १९५३ ब्रिटिश |
| २ | के-टू | ८६११ | २८२५३ | काराकोरम | १९५४ इटालियन |
| ३ | कांचनगंगा | ८५९७ | २८२०७ | सिक्कीम | १९५५ ब्रिटिश |
| ४ | ल्होत्से | ८५०१ | २७८९० | नेपाळ | १९५६ स्विस |
| ५ | मकालू | ८४८१ | २७८२४ | नेपाळ | १९५५ फ्रेंच |
| ६ | धवल-गिरी-१ | ८१७२ | २६८११ | नेपाळ | १९६० स्विस |
| ७ | मनास्लू | ८१५६ | २६७६० | नेपाळ | १९५६ जपान |
| ८ | चो-ओयू | ८१५३ | २६७५० | नेपाळ | १९५४ ऑस्ट्रीयन |
| ९ | नंगा पर्वत | ८१२५ | २६६५८ | पंजाब | १९५३ ऑस्ट्रो-जर्मन |
| १० | अन्नपूर्णा-१ | ८०७८ | २६५०४ | नेपाळ | १९५० फ्रेंच |

| क्र | नाव | मीटर्स | फूट | विभाग | प्रथम आरोहण |
|---|---|---|---|---|---|
| ११ | गशेरब्रूम /हिडनपीक | ८०६८ | २६४७० | काराकोरम | १९५८ अमेरिकन |
| १२ | ब्रॉडपीक | ८०४७ | २६४०० | काराकोरम | १९५७ ऑस्ट्रीयन |
| १३ | गशेरब्रूम-२ | ८०३५ | २६३५० | काराकोरम | १९५६ ऑस्ट्रीयन |
| १४ | शीशपग्मा /गोसाइनथन | ८०१३ | २६२९१ | नेपाळ | १९६४ चीन |

याशिवाय कांचनगंगा-२ ह्या ८४७४ मी./२७८०३ फूट उंचीच्या शिखराचा गिर्यारोहणाचे दृष्टीने वेगळे शिखर म्हणूनही विचार केलेला आढळतो


## एव्हरेस्ट वीरांचा पोषाख व साधने

एव्हरेस्ट किंवा असंच एखादं उंच शिखर चढायला जायचं म्हणजे तिथली थंडी, बोचरे वारे, विरळ अन् शुष्क वातावरण अशा साऱ्या गोष्टींचा विचार करावा लागतो नेहमीच्या पेहरावापेक्षा वेगळा जामानिमा त्यासाठी लागतो हा पेहराव जल व वात प्रतिबंधक तर हवाच, पण तो उबदार आणि हलकाफुलकाही हवा तो वेष सुटसुटीत व चिवट हवा बर्फाळ प्रदेशात उठून दिसण्याचे दृष्टीने सोयीचे जावे असा तो भडक रंगाचाही हवा शिरस्त्राणापासून पादत्राणापर्यंत सर्वच गोष्टी विचारात घेणे आवश्यक ठरते.

पायात हलके व उबदार असे मोजे (सॉक्स्) किंवा स्टॉकिंग्ज् घालून त्यावर अधिक उबदार असे इनर शूज चढवले जातात त्यावर क्लाइंबिंग शूज घातले की खडकाळ व बर्फाळ प्रदेशात वावरणे सोयीचे ठरते या क्लाइंबिंग शूजना खालच्या बाजूला खिळ्यांचे तळवे (क्रॅम्पॉन्स) बांधले की, हिम वा बर्फाच्छादित प्रदेशात वावरणे सुलभ जाते

अंगात लोकरी किंवा कृत्रिम धाग्याचा उबदार अंगरखा व पॅन्ट चढवली जाते. त्यावर वात व जलप्रतिबंधक (विंडप्रूफ सूट) अंगरखा व पँट घालतात शिवाय पिसाचा किंवा कृत्रिम धाग्याचा गुबगुबीत पोशाख चढवतात वरच्या डगल्याला काही बटणांसह खिसे असणे सोयीस्कर ठरते तसेच तो सर्वसाधारणपणे भडक रंगाचा असतो

डोक्याला माकडटोपी/कानटोपी/बॅलाक्लाव्हा आणि त्यावर आवश्यकतेनुसार हेल्मेट घातले जाते हातांत उबदार हातमोजे असतात शिवाय त्यावर मिटॉन्स (ॲसबेसटॉस असणारे तळवावाले मोजे) चढवले जातात. आता अलीकडे हातमोजे व पायमोजे बॅटरीच्या सहाय्याने उबदार ठेवले जाण्याची सोय झालेली आहे




गिर्यारोहकाच्या वेषात उठून दिसणाऱ्या व्यक्तीच्या तोंडावर प्राणवायूचा मुखवटा व पाठीवर प्राणवायूची नळकांडी असतात काहीजण मात्र या जादा प्राण-वायूचा उपयोग करणे टाळतात पूर्वी ही प्राणवायूची नळकांडी खूपच जड असत आता खूपच हलकी नळकांडी निघाल्याने ती वापरणे सोयीस्कर ठरते

डोळ्याला गर्द हिरवी छटा असणारा गॉगल असणे अत्यावश्यक ठरते बर्फाळ डोंगरदऱ्यात पडणारे ऊन अनेक ठिकाणाहून परावर्तित होऊन येत असते त्या दीप्तीला डोळे फार काळ तग धरू शकत नाहीत. काही वेळा हिमांधत्व– तात्पुरते अंधत्व येऊ शकते व ते फारच त्रासदायक ठरते

गिर्यारोहकाच्या पाठीवर रकसॅक/मोठी पाठपिशवी लटकवलेली असते.






गिर्यारोहकांचा मोहिमेसाठी
घालावयाचा पोशाख

लागणारे सारे सामान त्यातच भरलेले असते दोन्ही हात मोकळे असण्याच्या दृष्टीने अशी पाठपिशवीच योग्य असते हिमकुठार, दोरखडाचे वेटोळे आदी वस्तू त्यामुळे विनासायास हातात धरता येतात हातोडी, बर्फ व खडकात ठोकण्याचे खिळे, हार्नेस, कॅरॅबिनर, स्लिग इ गोष्टी बहुदा अगावर– विशेषत कमरेवर– लटकवलेल्या असतात

गिर्यारोहकाबरोबर कॅमेरा, द्विनेत्री (बायोनॉक्युलर), उचीदर्शक यत्र, होकायत्र, बिनतारी सदेश यत्रणा आदी गोष्टी असतात शिवाय तबू, कॅरीमॅट किंवा एअर मॅट्रेस, गॅस सिलीडर व छोटा स्टोव्ह, थोडीशी भांडीकुडी, थर्मास, जादा इधन, मार्किंग फ्लॅगस्, दोराच्या किंवा हलक्या धातूच्या शिडया, निद्राथैली, विजेरी, इ आवश्यक गोष्टी असतात अर्थात यातल्या किती, कोणत्या घ्यावयाच्या हे ज्याच्या त्याच्यावर अवलबून असते

गिर्यारोहकाच्या आहाराचा विचार केला, तर तो आहार सकस, प्रथिन व खूप कॅलरीयुक्त असावा लागतो खाद्यपदार्थांबरोबरच पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी पेये किंवा पातळ पदार्थांचा समावेश आहारात असणे जरुरीचे असते. अती उचीवर खाण्यावरची वासनाच नष्ट होते म्हणून त्यात चघळचोथा कमी असणारा व खूप पौष्टिक आहार गिर्यारोहक घेतात.

गिर्यारोहणातील आजार, अपघात, औषधयोजना आदी गोष्टीवर वेगवेगळी पुस्तके लिहिता येतील. या छोट्याशा पुस्तकात सगळ्या गोष्टींचा समावेश होणे कठीण आहे

## मोहीम पहावी आखून

एव्हरेस्ट किंवा अन्य शिखरावर मोहीम काढायची असेल तर त्या त्या देशातील गिर्यारोहणाचा कारभार पाहणाऱ्या सस्थेकडे ठराविक नमुन्यात अर्ज करावा लागतो ते शिखर सीमाभागात असेल तर प्रकाशचित्रण, चलत्चित्रण इ साठी वेगळी परवानगी मागावी लागते पहिला येईल त्यास प्राधान्य याप्रमाणे अर्ज विचारात घेतला जातो अर्ज मजूर झाल्यावर राजस्व (रॉयल्टी) म्हणून काही रक्कम त्या देशाला द्यावी लागते मग मोहिमेस अतिम मजुरी मिळते परदेशी गिर्यारोहण मोहिमेला शासनातर्फे एक सपर्काधिकारी (लियासो ऑफिसर) दिला जातो मोहिमेने कोठल्या प्रदेशात काय करावे, काय करू नये याबाबत तो मार्गदर्शन करतो ते बधनकारक असते गिर्यारोहण मोहिमेसाठी विशिष्ट कालावधी मजूर झालेला असतो हा सपर्काधिकारी ते वेळापत्रक कसोशीने पाळले जाईल या बाबत दक्ष असतो परवानगी मिळालेल्या शिखराशिवाय अन्य शिखरावर व मजूर झालेल्या मार्गाशिवाय अन्य मार्गाने मोहिमेला प्रयत्न करता येत नाही याबाबत

संपर्क अधिकारी जागरूक असतो

मोहीम यशस्वी होवो वा अयशस्वी, त्या मोहिमेचा पूर्ण व खरा वृत्तांत फोटों-सह सादर करण्याची जबाबदारी नेत्यावर असते

मोहिमेबरोबर नेलेले एच् ए टी (हाय अल्टिटयूड पोर्टर्स) म्हणजे जास्त उंचीवर नेले जाणारे भारवाहक याना थंडी व अती उंचीपासून बचाव होईल असे कपडे-अन्न व मजुरी योग्य तऱ्हेने दिली जात आहे, हे पाहण्याचे कामही संपर्का-धिकारी करतो भारवाहकांचे नेतृत्व करणारे अनुभवी व बहुदा मोहिमेत वापरली जाणारी भाषा येणारे 'शेर्पा सरदार' गिर्यारोहण तुकडीचे सभासद असतात संपर्काधिकारी व शेर्पा सरदार यांचा पोशाख, गिर्यारोहण साहित्य, खर्च, वैद्यकीय सोयीसवलती, प्रवास हा सारा भार मोहिमेच्या इतर सदस्याप्रमाणेच करावा लागतो

मात्र अलीकडे काही शिखरे शिखर मोहिमेसाठी व काही भाग ट्रेकिंगसाठी खुला करण्याची प्रथा पडली आहे त्यामुळे दुसऱ्या प्रकारासाठी केवळ औपचारिक मजुरी घेणे आवश्यक असते राजस्व रक्कम भरावी लागत नाही

एव्हरेस्टपुरते बोलायचे झाले तर नेपाळचे परराष्ट्रखाते दक्षिणेकडून नेपा-ळच्या हद्दीतून एव्हरेस्ट शिखर मोहिमेच्या मजुरीचे काम पाहते तर चीनव्याप्त तिबेटमधून चढाई करावयाची झाली तर चीनच्या गिर्यारोहण मंडळाकडे अर्ज करावा लागतो भारतातील हिमालयीन शिखरासाठी इंडियन माऊंटेनियरिंग फौंडे-शनकडे अर्ज करावा लागतो

सध्याच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे एकेका एव्हरेस्ट मोहिमेला लक्षावधी रुपये खर्च येतो अशा मोहिमांना खाजगी देणग्या, गिर्यारोहण मंडळाकडून काही आर्थिक सहभाग व वस्तूरूपाने मदत मिळू शकते

मोहीम यशस्वी झाली हे मोहिमेच्या सदस्यांना शिखरावरून घेतलेल्या फोटों-वरून सिद्ध करावे लागते शिखरावर उभे राहून ३६० अंशातून (चारही बाजूनी) काढलेले फोटो पूर्वीच्या फोटोंशी ताडून पाहिले जातात व मगच विजयाचा दावा मान्य केला जातो एव्हरेस्टवर चिनी गिर्यारोहकानी रोवलेल्या तिकाटण्याचा समावेश गिर्यारोहकाच्या समवेत झालेला असेल तर हा दावा मान्य होण्यात काहीच अडचण येत नाही एव्हरेस्टवर उभे राहून चीनव्याप्त तिबेटमधील रोंगबुक हिमानीचा काढलेला फोटो आवश्यक मानला जातो

एव्हरेस्ट मोहीम ही प्रचंड तयारीची, वेळखाऊ, प्रचंड खर्च, श्रम आणि साहसपूर्ण गोष्ट असते लहरी हवामान व सुदैव याची जोड मिळाली तर एव्हरेस्ट माथा गाठणे जमू शकते गिर्यारोहणातील कौशल्य एव्हरेस्टपेक्षा चढाईला खूप अवघड अशा शिखरांवर जास्त उपयुक्त ठरते कारण एव्हरेस्ट सर्वोच्च आहे आरोहणास अति अवघड नाही

यती ( हिममानव )



# १५ यती (हिममानव)

## यतीचे मती गुंग करणारे रहस्य

यती म्हणजे हिममानव ! ॲबॉमिनेबल स्नो मॅन म्हणून ओळखला जाणारा प्राणी आणि एव्हरेस्ट याचा संबंधच काय ? हा प्रश्न तुमच्या मनात नक्कीच आला असेल. या पुस्तकात हे प्रकरण घालण्याची तीन उद्दिष्टे आहेत. एव्हरेस्ट परिसरात कोणी जाऊन आला की त्याला यती, जादा (कृत्रिम ?) प्राणवायू यासंबंधी प्रश्न विचारले जातातच. गिर्यारोहण– हिमालय व त्यातही एव्हरेस्टविषयीच्या पुस्तकात यती (हिममानव)चे उल्लेख हटकून आढळतात. यतीचे तथाकथित अवशेष पाहण्यासाठी एव्हरेस्ट परिसरातील पांगबोचे येथील धर्ममठातच काय ते उपलब्ध आहेत.

माझं वैयक्तिक मत विचारलं तर, यती किंवा हिममानव असण्याची दाट शक्यता आहे, असं मला वाटतं. Homo niveus disgustans किंवा odiosus म्हणजे यती हिमालयाच्या अंतर्भागात कुठेतरी निश्चित आढळेल, किंबहुना आढळावा, असं मला वाटतं.

हिमालयात हिंडताना स्थानिक लोकांशी चर्चा केली, तर 'यती'च्या अस्तित्वावर सगळेच विश्वास ठेवतात. त्याचं वर्णन वेगवेगळ्या जाती–जमाती–प्रदेशातील अडाणी– अशिक्षित मंडळी बरचसं एकसारखंच करतात. आणि या यतीचा उपयोग आयाबायांना आपली रडणारी मुलं शांत करण्यासाठी बागुलबुवासारखा निश्चित होतो.

एरिक शिप्टन हा नामवंत गिर्यारोहक या ब्रिटिश गिर्यारोहकाने १९५१ मध्ये आपल्या तळावर ठोकलेल्या तंबूच्या परिसरात उमटलेल्या काही पावलांचे फोटो घेतले. मेन्लुंग ग्लेशियर या भागात नोव्हेंबर १९५१ मध्ये हे ठसे त्याला आढळले होते. त्याच्या बरोबर असणाऱ्या शेर्पाने हे ठसे यतीचे असल्याचे ठासून सांगितले. यतीच्या अस्तित्वास बळकटी देणारे ह्या ठशांचे फोटो कालांतराने सर्वत्र

प्रकाशितही करण्यात आले शिप्टनने या अनोख्या पाऊलखुणाचा जवळ जवळ तीन कि मी पर्यंत मागोवा घेतला. पुढे एका अरुंद दरीत ते पुसट होत गेले व नाहीसे झालेले आढळले अर्थात पाश्चात्त्यांनी यतीचे ठसे पाहण्याची ही काही पहिलीच वेळ नव्हती

१९२१ सप्टेंबर मध्ये हॉवर्डबरीच्या नेतृत्वाखालील तुकडीला ६०९६ मी / २०,००० फूट उंचीवर ल्हाकपाला या भागात असेच ठसे दिसले होते अशी नोंद मिळते

१९२८ साली सैबेरियातील तुरुंगातून पळालेल्या पाच पोलिश कैद्यांनी खडतर प्रवास करीत चीन-तिबेट मार्गे हिमालयातून भारतात प्रवेश केला तेव्हा हिमालयात सव्वा दोन मीटर उंचीच्या किंचित चौकोनी चेहरा असणाऱ्या प्राण्याशी त्यांची गाठ पडली होती.

१९४८ मध्ये दोन नॉर्वेजियन संशोधक हिमालयात झेमुला या भागात हिंडत असताना त्यांना दोन वा–नरासारख्या (एप सारख्या) आकृत्या दिसल्या (शेपूट असले की माकड किंवा मर्की आणि नरासारखा म्हणजे माणसासारखा भासतो तो वा-नर म्हणजे एप होय )

नंतर फ्रॉस्टीस व थॉर्नबर्न यांची अशाच यतीसदृश्य प्राण्याची भेट झाली तेव्हा त्यांनी दोराचा फास टाकून त्याला पकडण्याचा प्रयत्न केला त्या बळकट आडदांड–शक्तिमान प्राण्याने सुटका करून घेताना फ्रॉस्टीसला जखमी केले

अलेक्झांडर प्रोनीन या रशियन शास्त्रज्ञाला पामीरच्या पठारी भागात हिंडताना दोन पायांवर चालणारा, सामान्य माणसाच्या दीडपट उंची असणारा, गुडघ्यापर्यंत लांब हात असणारा, अंगभर काळसर करडे केस असणारा प्राणी दिसला यानंतर काही दिवसांनी प्रोनीन साहेबांच्या तळावरून त्यांची रबरी होडी नाहीशी झाली ती काही दिवसांनी ४–५ कि मी दूरवर पडलेली आढळली होडीची मोडतोड झालेली नव्हती

एव्हरेस्ट विजेत्या एडमंड हिलरींचा मात्र यतीच्या अस्तित्वावर फारसा विश्वास नाही अठराव्या शतकात बेंजिंग (पेकिंग) येथील नॅचरल हिस्टरी या ग्रंथात यतीचे एक चित्र दाखविले आहे ह्या प्राण्याची शिकार केली जात असे काही यती माणसाळवून त्यांच्याकडून काही कामेही करवून घेतली जात होती असा एक उल्लेख आढळतो

यतीचे डोके बैलाच्या पाठीवरील वशिंडासारखे वर निमुळते आणि दोन्ही बाजूने चपटके आहे असे उल्लेख मिळतात डोक्यासह सर्वांगावर दाट तपकिरी–करडे–काळसर–लालसर असे केस असतात याचा चेहरा माणसापेक्षा अधिक सपाट आहे चालताना तो ताठ पण डुलत डुलत चालतो दोन पावलातील अंतर थोडे

जास्तच असते, असे सांगितले जाते

श्री जानुस टेमॅसझिकझुक या अठ्ठावीस वर्षांच्या तरुण पोलिश पुरातत्त्व शास्त्रज्ञाने पच्याहत्तर साली एव्हरेस्ट परिसरात यती पाहिल्याची नोंद केली आहे


२० डिसेंबर ७२ रोजी नेपाळमध्ये मॅक्निली या शास्त्रज्ञाला यतीच्या पायांच्या ठशाचा एक कि मी पर्यंत मागोवा घेता आला त्यातील ३ ठशांचे त्याने प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा उपयोग करून साचे करून घेतले या अमेरिकन शास्त्रज्ञाने २२ सें मी लांब व १२ सें मी रुंद ठशांचा खूप अभ्यास केला

१९८१ साली उत्तर कॉकेशस व पामीर पठाराच्या भागात डॉ झाना कॉफमन याना निर्जन पर्वतराजीत यती आढळला त्याआधी त्याच भागात १९७८ मध्ये एक क्रीडाशिक्षक रस्लान शामानोव्ह यालाही यतीची आकृती व त्याचे हिमात उठलेले ठसे आढळले होते पचवीस ठशापैकी तेरा ठसे उत्तम अवस्थेत होते २५ सें मी लांब, १२–१३ सें मी रुंद व दीड-दोन सें मी खोलवर उमटलेले हे ठसे एकमेकापासून १२०–१३० सें मी अंतरावर होते ते सरळ रेषेत होते

डॉन व्हिलान्स याने १९७० मध्ये अन्नपूर्णा साऊथ फेस मोहिमेच्या वेळी रात्रीच्या चांदण्यात यतीचे दर्शन घडल्याची व नतर दुसरे दिवशी यतीच्या पावलाचे ठसे उमटल्याची गोष्ट, आपल्या वृत्तातात नमूद केली आहे

जॉन नेपियरच्या 'बिगफूट' या ग्रथात यतीबद्दलच्या कथा एकत्रित केलेल्या आढळतात या प्रायमॅटॉलॉजिस्ट (वानर-माकडाचा संशोधक) ने आपला यतीच्या अस्तित्वावर विश्वास नाही, असे सांगितले आहे शेर्पांच्या यती पाहण्याच्या घटना विश्वासार्ह नाहीत आणि पाश्चात्यानी यती पाहिल्याच्या घटना अतीउंचीवर येणाऱ्या संभ्रमावस्थेमुळे किंवा दूरवर काहीतरी आकृती दिसल्याच्या आहेत, असे काही तज्ज्ञ मानतात पावलांचे ठसे बर्फाळ प्रदेशात वावरणाऱ्या अस्वलांचे असण्याची शक्यता आहे, असे त्यांचे मत आहे परंतु शिप्टनने नोंदलेले फोटो हे काहीतरी वेगळेच व अनुत्तरित आहेत असेही नोंदलेले आढळते

# माथा नाही, तर पायथा तरी !



# १६ माथा नाही, तर पायथा तरी !

## चला एव्हरेस्टच्या पायथ्याशी

एव्हरेस्ट विजेत्याच शतक केव्हाच होऊन गेल द्विशतक केव्हाही होईल, पण एव्हरेस्टची मोहिनी अद्याप तशीच आहे एव्हरेस्ट शिखरावरची एकेक मोहीम म्हणजे प्रचड तयारी, अफाट मेहनत, भरपूर पैसा व अमाप वेळ खाणार काम पुढील कित्येक वर्षे नेपाळमधून एव्हरेस्टवर होणाऱ्या चढायाच बुकिंग झाल आहे आणि एव्हरेस्टवर चढाई हे सर्वांना जमणार व झेपणार नाही कबड्डी, क्रिकेट किंवा मॅरेथॉनला जसे हजारो प्रेक्षक खेळाडूना उत्तेजन देण्यासाठी उपस्थित राहतात व विजयाच्या अतिम क्षणी टाळयाचा कडकडाट करतात, ते भाग्य गिर्यारोहकाच्या नशिबी कधीच नसत शिखरावर पाय ठेवताना केलेल्या चढाईत आलेल्या सर्व अडीअडचणी तशाच असतात अन् विजयाच्या धुदीपेक्षा परतायची काळजीच मन व्यापून टाकते शिखरावर पाय ठेवण्यापेक्षा तुकडीतील सर्व सुखरूप असण व राहणं अधिक महत्त्वाच नेहमीच मानल जात.

## माथा नाही, तरी किमान पायथा तरी !

"There is Everest, in everybody's life,
but everybody's Everest is different !"

अस क्रिस बॉनिग्टन ह्या प्रख्यात गिर्यारोहकान म्हटल आहे म्हणजे, प्रत्येकाच काहीतरी ध्येय असत, पण प्रत्येकाच ध्येय वेगळ असत, एवढाच त्यातला मथितार्थ आपल्यासारख्यांना एव्हरेस्ट शिखराचा माथा गाठण अवघड असल तरी पायथ्यापर्यंत जाऊन, याची देही– याची डोळा विश्वकळस पाहायला काय हरकत आहे ? दुसर अस की, हे कोणालाही जमू शकेल त्यासाठी कोणत्याही प्रशिक्षणाची आवश्यकता नाही अर्थात असं प्रशिक्षण घेतलेल असल, तर फारच चांगल

दरवर्षी काठमाडू ते एव्हरेस्ट पायतळ हा पायी प्रवास असख्य गिरिप्रेमी करीत असतात इग्लड, अमेरिका, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, इटली, पेरू, ब्राझील या देशांतून येणाऱ्या गोऱ्याव्यतिरिक्त जपानमधून येतात तेवढेच आशियाई लोक इकडे फिरकतात खर तर नेपाळला जाण्यासाठी भारतीयाना पासपोर्ट– व्हिसा– ट्रेकिंग परमिट या व अशा कटकटी नाहीत आपल्या इतक्या जवळचा हा शेजारी आपल्याच धर्माचा, परपराचा अभिमानी भाषेचाही फारसा प्रश्न आपल्याला येत नाही आपल्यापेक्षा थोडी स्वस्ताईदेखील आहे एका भारतीय रुपयाला साधारणत नेपाळी दीड रुपया मिळतो नेपाळमध्ये पर्यटन व त्यातही प्रामुख्याने ट्रेकिंग हा उद्योग राष्ट्रीय थरावर असणाऱ्या पहिल्या पाच उद्योगधद्यात जमा होतो अनेकजण यालाच गमतीने एव्हरेस्ट इडस्ट्री असेही म्हणतात हजारो परकीय नागरिक 'पृथ्वीचा तिसरा ध्रुव' म्हणून गौरविलेल्या 'एव्हरेस्ट' ('सागरमाथा' किंवा 'चोमोलुगमा') शिखराच अधिक जवळून दर्शन घेण्यास गेली अनेक वर्षे जात आहेत आपण भारतीय व त्यातल्या त्यात महाराष्ट्राचे सह्यपुत्रच इकडे फारसे फिरकत नाहीत एव्हरेस्टवर चढाई करणाऱ्या धाडसी वीराना पाठराखण करायला जायला काय हरकत आहे ? अर्थात इतक्या दूर कस जायच, तिथे काय सोयी आहेत, कोणत्या अडचणी येतात, तयारी काय करावी लागते या गोष्टीबाबत फारशी माहिती मिळू शकत नाही हेही तितकच खर आहे म्हणून मुद्दामच हा लेखनप्रपंच मांडला आहे माझ्यासारखच बऱ्याच जणांना एव्हरेस्ट जवळून पाहता याव ही इच्छा.

## एव्हरेस्ट ट्रेक– पूर्वतयारी

एव्हरेस्ट किंवा अशाच दुर्गम जागी जाण्यासाठी रेल्वे, रस्ता, जलमार्ग, हवाईमार्ग अशा कोणत्याही सोयी नसताना (किंवा असूनही त्याचा वापर न करता) पायगाडीचे प्रवासी व्हावे लागते ह्या अनगड पगडडीत भोवतालचा निसर्ग, लोकजीवन व सस्कृतीचा अधिक परिचय होतो डोळे उघडे ठेवून, शक्यतो स्वावलबनाचा स्वीकार करून येणाऱ्या अडचणींना तोंड देत केलेला प्रवास म्हणजे ट्रेक मराठीत यालाच 'पदभ्रमण' म्हणतात गिर्यारोहणातील रॉक क्लाइंबिंग म्हणजे प्रस्तरारोहण, स्नोक्राफ्ट म्हणजे हिमक्रीडा किंवा हिमसचार, कॅम्पिंग म्हणजे तबूजीवन, नेचर स्टडीज म्हणजे निसर्ग निरीक्षण आणि ट्रेकिंग म्हणजे गिरिभ्रमण, गिरिसचार किंवा गिरिविहार, अशा अनेक उपांगातील सर्वांना जमणारा प्रकार म्हणून 'ट्रेकिंग'चा आवर्जून उल्लेख करावा लागेल 'ट्रेक' (TREK) हा शब्द मूळचा दक्षिण आफ्रिकन ! 'हाइक' हा त्याच अर्थाचा पण किंचित वेगळी छटा असणारा शब्द साधारणत हाइकमध्ये वाहन प्रवास अतर्भूत असतो तसेच हाइक एक किंवा दोन

दिवसांचीच असते. मोठी हाइक म्हणजे ट्रेक, किंवा खूप छोटा ट्रेक म्हणजे हाइक असं मानलं तरी पुरे Trek– ट्रेक ह्या शब्दाचे ट्रॅक, ट्रक असे गमतीदार किंवा हास्यास्पद उच्चार अनेकजण करतात आणि ते चुकीच आहे हे सांगितलं तरी तिकडे लक्ष दिले जात नाही असो

एव्हरेस्टच्या अंगणात किंवा तिथल्याच एका १८४७१ फूट म्हणजे ५६३० मीटर उंचीच्या अनामिक शिखरावर जाऊन तेथून एव्हरेस्ट पाहणं, हा एक कष्ट-साध्य पण आनंददायी प्रकार आहे अर्थात ३०–३५–४० दिवसांचा वेळखाऊ प्रकार किंवा १०–१२ दिवसात जमणारा 'इन्स्टंट एव्हरेस्ट ट्रेक' असे दोन प्रकार यात पडतात तसेच स्वतः सर्व आखणी करून तो स्वस्त व मनाप्रमाणे करणे किंवा ट्रेकिंग कंपनीच्या मदतीने तो खूप महागडा बनविणे हे सारे आपल्यावर अवलंबून असते मनापासून इच्छा, थोडेफार पैसे, वेळ आणि उत्तम 'कंपनी' हे जमलं तर 'एव्हरेस्ट ट्रेक' सहज शक्य आहे तो सुदृढ प्रकृतीच्या कोणाही स्त्री-पुरुषास सहज जमू शकेल

हिमालयात इतक्या उंचीवर जायचं म्हणजे लागणारे उबदार कपडे, गिर्या-रोहण साधन आणि मुख्य म्हणजे कृत्रिम प्राणवायू किंवा ऑक्सिजनची नळकांडी यापैकी काय काय व किती लागेल, हा प्रश्न मनात निश्चितच चमकून जातो १९७८ मध्ये रेनहोल्ड मेसनर (इटालियन) व पीटर हेब्लर (ऑस्ट्रीयन) या जोडगोळीने असा प्राणवायूचा उपयोग न करता एव्हरेस्टचा माथाही गाठला होता. आणि सर्वसामान्याना विरळ हवेमुळे प्राणवायूचा तुटवडा २२–२५ हजार फुटा-नंतरच प्रामुख्याने जाणवतो तेव्हा या ट्रेकसाठी अशा जादा प्राणवायू-नळकांड्याची आवश्यकता अजिबात नसते

एखाद्या रजिस्टर्ड गिर्यारोहण मंडळाने इंडियन माऊंटेनियरिंग फाऊंडेशनकडे एव्हरेस्ट परिसरातील १८४७१ फूट उंचीच्या म्हणजेच ५६३० मीटर उंचीच्या अनामिक शिखर मोहिमेसाठी अर्ज केला तर त्याच्याकडून अधिकृत मान्यता, थोडे-फार आर्थिक सहाय्य व मुख्यतः बऱ्याच जणांना आवश्यक असणारी स्पेशल कॅज्यु-अल लीव्ह देखील मिळू शकते अर्थात या साऱ्या खटाटोपात दोन-चार महिने सहज जातात त्यामुळे त्यासाठी वेळीच तयारीला लागलं पाहिजे किमान पाच-सहा महिने आधी त्यासाठी तयारीला लागावे याशिवाय महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार यांच्या 'अॅडव्हेंचर प्रमोशन प्रोग्राम' खाली भरपूर आर्थिक सहाय्यदेखील मिळू शकतं त्यासाठी पुण्याच्या सेंट्रल बिल्डिंगमधील क्रीडासंचालकांकडे किंवा आपआपल्या जिल्ह्यातील डिस्ट्रीक्ट स्पोर्टस् ऑफिसर (डी एस ओ) कडे अॅड-व्हेंचर प्रमोशन स्कीमसाठी योग्य ते अर्ज व माहिती मिळू शकते दोन्ही बाबतीत (म्हणजे आय् एम् एफ् किंवा अॅडव्हेंचर प्रमोशन स्कीम साठी) जाण्याआधी अर्ज

१ १२६,७२० या प्रमाणातील नकाशा इंटरनॅशनल ग्राफिक आर्ट, जो छेन काठमांडू यानी तयार केलेला नकाशा आठ रुपयांना मिळतो

५) खुंबू–माऊंट एव्हरेस्ट, ट्रेकिंग मॅप हा १"=१ ५८ मैल म्हणजे १ १००,००० या प्रमाणातील नकाशा जोरे गणेश प्रेस प्रा लि काठमाडू याचा नकाशा दहा रुपयांत मिळू शकतो

अर्थात याखेरीजही अनेक नकाशे काठमाडूमध्ये सहजपणे उपलब्ध असतात

## मुक्काम काठमांडू.

बिहारची राजधानी पाटणा येथून काठमाडूला जाणे सोयीचे पडते पाटण्याहून काठमांडू हा विमान प्रवास अवघ्या तासाचा तिकीटही अवघे रु २८२ रु + १०० टॅक्स एअरपोर्ट (संदर्भ १९८४–८५ अर्थात हे दर बदलू शकतात ) दिसायला ही रक्कम थोडी जास्त वाटली, तरी पाटण्याहून खुष्कीच्या मार्गाने जाताना लागणारे दिवस, प्रत्येक ठिकाणी सामानाची चढउतार, त्या दिवसांना लागणारे राहण्या-जेवण्याचे दर या सर्वांचा विचार केला तर हवाई प्रवासातील सुटसुटीतपणा व वेळेची बचत सोयीस्कर ठरते. मात्र पाटणा ते काठमाडू ही विमान प्रवासाची तिकीटे बरीच आधी काढून ठेवणे चांगले शक्यतो आर एन ए सी म्हणजे रॉयल नेपाळ एअरलाईन्स कॉर्पोरेशनची सेवा घ्यावी ती तिकीटे मिळालीच नाही, तर मग इंडियन एअर लाइन्सची काढावीत याचे कारण दोन सेवांमध्ये मिळणाऱ्या सोयी-सवलतींमधील फरक विमानप्रवासाऐवजी गाडीरस्त्याने जायचे असेल तर–

पाटण्याहून गंगा ओलांडण्यासाठी महेंद्रू घाटावर यावे लागते तेथून इंजिनचलित बोटीने पलीकडच्या तीरावर पलेझा घाटावर उतरावे तेथून रक्सौलपर्यंत जाणारी रेल्वे पकडून रक्सौल गाठावे भारत-नेपाळ सरहद्दीवरील रक्सौल हे शेवटचे गाव नदीपलीकडेच बीरगंज हे नेपाळ हद्दीतील गाव वाटेत कस्टम्सचे सोपस्कार करीत भरपूर सामान असल्यास टांग्याने पुलावरून पलीकडे नेपाळी हद्दीत जाता येते रात्रीचा मुक्काम बीरगंजला परिवहनाच्या अड्ड्याजवळील म्हणजे गाडीतळाजवळील हॉटेलात करणे चांगले अगदी पहाटे जाणाऱ्या बसची तिकीटे रिझर्व्ह करून ठेवावीत व भारताने नेपाळला बांधून दिलेल्या त्रिभुवन राजपथाने नेपाळची राजधानी काठमांडू गाठावी या बीरगंज ते काठमांडू प्रवासास दहा तास लागतात पण पाटणा ते काठमाडू प्रवासास दोन पूर्ण दिवस मोडतात पाटणा स्टेशन, महेंद्रू घाट, पलेझा घाट, रेल्वे स्टेशन, रक्सौल, बीरगंज, काठमांडू एवढ्या ठिकाणी चढउतार, सामानाची हलवाहलव, त्याशिवाय बोट, रेल्वे, टांगा, रिक्षा अशा अनेक प्रवाससाधनांचा वापर करावा लागतो, ते वेगळेच

काठमाडू विमानतळावरून बाहेर आले की, जपानी बनावटीच्या टोयाटो-सारख्या गाड्या टॅक्सी म्हणून सर्रास वापरलेल्या दिसतात नेपाळ 'फ्री लँड' असल्याने परदेशी वस्तूचाच सर्वत्र सुळसुळाट आढळतो. 'नेपाळ मा बनेकू' म्हणजे 'मेड इन नेपाळ' जवळजवळ काहीच नाही औद्योगीकरणाचा पूर्ण अभाव आणि परदेशी वस्तू स्वस्त व मुबलक मिळाल्याने स्थानिक वस्तू उत्पादित करणे परवडतच नाही युद्ध किंवा अशाच कठीण प्रसंगी मात्र परदेशातून आयात थांबली की या देशाचे हाल कसे होतील याची कल्पनाही करवत नाही विमानतळावरून 'न्यू मार्केट' ह्या भारतीय मदतीने उभारलेल्या मध्यवर्ती भागात आल की हॉटेल्स, लॉजेस, बाजारपेठ, चित्रपटगृहे, दुकाने हे सर्व सोयीचे ठरते काठमांडूत यूथ होस्टेलही आहेच स्थानिक खरेदी, पोस्टातून तिकीटे, पाकिटे खरेदी, कॅमेऱ्यासाठी रोल्स (हे नेपाळात स्वस्त पडतात) भारतीय वकिला-तीस भेट, काठमांडू–पाटणा परतीच्या प्रवासाची तिकीटे इ गोष्टी उरकल्या की काठमांडूपासून चिनी मदतीने बांधलेल्या काठमाडू-कोदारी रस्त्यावरील लामसांगू (लांब पूल असा नेपाळी भाषेत अर्थ) या गावी बसने जाण्यास ४–५ तास लाग-तात आता तर जिरीपर्यंतही जाता येते या सर्व रस्त्यावर बॉटलब्रश म्हटले कॅलि-स्टेमॉनची झुडुपे कडेने लावली आहेत त्याचे तांबडे झुपके अतिशय सुंदर दिसतात

काहीजण मात्र लामसांगू ऐवजी दोलालघाट (२०८०'/६३४ मी) येथे उतरून प्रवासास सुरवात करतात यात बराच चढ वाचला तरी एक दिवस जास्त लागतो लामसांगू (२४३०'/७४१ मी) येथून नामचे बझार (नौचे) हे २०० मैल/३२० कि मी चे ३५२००/१०७२४ मी चढणीचे अन् २६१००/७९५४ मी उतरणीचे अंतर, रोजी ७–८ तास अंतर चालून जाण्यास १४–१५ दिवस लाग-तातच नामचे बझार (नौचे) (११३००'/३४४६ मी) येथून पुढे गोरखशेप (१७०६०'/५१८४ मी) किंवा काला पठार (१८१९२'/५५४५मी) किंवा १८४७१'/५६३० मी उंचीचे अनामिक शिखर किंवा त्या वर्षीच्या एव्हरेस्ट मोहि-मेचा पायतळ/बेसकॅम्प येथे जाऊन यावयास ११ ते १२ दिवस लागतात म्हणजे हा सर्व प्रवासही २८ ते ३० दिवसात एकूण १६० तासांत ४५० मैल/७०० कि मी इतका होतोच त्याचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणे–

## १ ला दिवस

काठमाडू (४५००', १३७० मी) हून बसने लामसांगू (२४३०'/७४१ मी येथे जाणे या बसप्रवासास ४–५ तास लागतात लामसांगूला ३० पौंड/१५ किलो वजनाला एक भारवाहक याप्रमाणे माणसे मिळू शकतात आपल्याजवळ त्यासाठी एक स्प्रिंग बॅलन्स हवा त्यांचा दर घासाघीस करून ठरवावा लागतो

त्याच्या जेवणाचे घोंगडे आपल्या गळ्यात घेऊ नये. जे ठरवाल ते उक्ते पैसेच ठरवावेत परतीच्या रिकाम्या प्रवासापोटी लागणारे पैसेही आधीच ठरवावे लागतात नेहमी दोन दिवसाचे पैसे अगावर ठेवून उरलेले पैसे वेळच्या वेळी देत जाणे सोयीचे ठरते नाहीतर ते लोक हिशेबात गोंधळ करतात येथील बहुतेक हमाल अतिशय विश्वासू व प्रामाणिक असतात वेळेच्या बाबतीत मात्र थोडे ढिलेच असतात. काठमांडूतील ट्रेकिंग कपन्यातूनही पोर्टर्स मिळू शकतात ते थोडे महाग पडतात पण सामान घेऊन पोर्टर पळून गेला किंवा काही नुकसान झाले तर ती नुकसानी सबधित कपनी भरून देते अर्थात योग्य ते ज्याने त्याने ठरवावे साधारणत दर पाच जणामागे जादा सामानास एक भारवाहक पुरतो म्हणजे प्रत्येकाचे सामान १०–१२ किलो किंवा २०–२५ पौंड प्रत्येकाने घ्यावे व जादा होणाऱ्या सामानासाठी भारवाहक घ्यावा काठमाडू ते लोबुचे या सर्व प्रवासात मुक्कामाचे ठिकाणी रात्री झोपण्याची व जेवणाची सोय होते चहा देखील मिळतो भात, फुलके, बटाटयाची भाजी, क्वचित उसळ, अंडी व आम्लेट, हे पदार्थ सर्वत्र मिळतात चवीला लोणचे, मिरच्या, पापड आपण न्यावेत फ्राइड राइस हा फोडणीच्या भातासारखा किंवा फडफडीत पुलावासारखा पदार्थ एका प्लेटला चौदा रुपये या दरात मिळतो ५ ते ७ रुपयाना शेर्पा स्ट्यू हा एक चागला खाद्यपदार्थ उपलब्ध असतो नुसते उकडलेले बटाटे (मिठाशिवाय) दहा रुपये प्लेट व कादे रुपयाला एक असे मिळतात बेचव असा लुक्ला ब्रेड तीस रुपयांना एक, तांदुळाचा पाव १० रु ला मिळतो. बनपावासारखा पाव १० रु त्याला तिबेटी ब्रेड म्हणतात अर्थात नेपाळी चलनातील दर आहेत एक भारतीय रुपया म्हणजे दीड नेपाळी रुपये असा सर्वसाधारण दर लक्षात ठेवावा म्हणजे या वस्तूची भारतीय चलनातील किंमत लक्षात येईल


भारतातून नेलेले किंवा काठमांडूत खरेदी केलेले टीनड् फूड, प्रीकूकड् फूड, नूडल्स, तयार सार (सूप), इन्स्टंट शिरा या गोष्टीही बदल म्हणून बऱ्या वाटतात. गूळपोळी, गुळपापडीच्या वड्या, गुडदाणी, खाकरे, शकरपाळे, चिवडा-लाडू या वस्तूही नेणे सोयीस्कर पडते

अर्थात स्थानिक उपलब्ध अन्न घेतले तर किंमत जास्त पडते आणि भांडीकुंडी, धान्य–धुन्य, स्टोव्ह त्याचे इधन, गॅस सिलींडर इ गोष्टी वाहून न्यायला भारवाहक घ्यावा लागला तर त्याचा मेहनताना व दरवेळी स्वयपाक करण्यास घालविलेला वेळ व श्रम यामुळे पैशाची बचत फारशी कोठेच होत नाही

नामचे बझार म्हणजे नौचे गावात मात्र तबू, फेदर जॅकेट, आइस ॲक्स, क्रॅम्पॉन्स इ वस्तू भाड्याने मिळू शकतात हे दर वस्तूचा दर्जा, एकूण दिवस, आपली गरज यावर अवलंबून असतात. ते दर घासाघीस करून ठरवावे लागतात डिपॉझीट ठेवून या वस्तू नेता येतात. डिपॉझीट म्हणून ट्रॅव्हलर्स चेक्स् किंवा कधी–

कधी लुक्ला–काठमाडू विमानाचे तिकीटही ठेवून घेतात

या आवश्यक वस्तू काठमाडूत खरेदी करता येतात पण त्या इथवर वाहून आणणे आणि इथे भाड्याने घेणे दोन्ही सारखेच पडते आर् एन् ए सी ही विमानसेवा नौचेच्या पुढ लागणारे सामान विवक्षित दिवशी लुक्ला किंवा शागबोचे येथे पोहोचविण्यास थोडे भाडे घेऊन ती जबाबदारी स्वीकारते




नौचे/नामचे बझार पुढील मुक्कामात वर सांगितलेले अन्नपदार्थ व आपापले आवश्यक सामान बरोबर असणे सोयीस्कर ठरते


## २ रा दिवस– (५ तास)

लामसागू (२४३०'/७४१ मी ) ते थुलोपाखर/पेर्को (५४५०'/१६६१ मी ) हा पूर्णपणे चढणीचा व बरीच दमणूक करणारा ट्रेक आहे पदभ्रमण कार्यक्रमातील हा पहिलाच दिवस असल्याने ही दमणूक अंगी रुळेपर्यंत नको वाटते विमानानेच गेलो असतो तर बरे असे वाटते पण शरीराला थोडे कष्ट व हळूहळू बदलणाऱ्या हवामानाला रुळवून घेणे सोयीस्कर ठरते ह्या पहिल्याच दिवशीची ही भटकती ४–५ तास प्रवास करूनही आपण थकून जातो स्वीडन देशाने या गावात एक शाळा उभारून दिली आहे स्वीडनच्याच मदतीने काठमाडू ते जिरी हा रस्ताही बांधला जात आहे तो पुढे थोडुगला असणाऱ्या चीज फॅक्टरीपर्यंत जाणार आहे. थुलोपाखर येथे न थांबता थोडे पुढे शेरडुगा येथेही मुक्काम करणे शक्य आहे अर्थात सर्व मुक्कामांची बोली आधी केल्याने असे मुक्काम मागे-पुढे केल्यास त्यासाठी भारवाहकांना जादा पैसे द्यावे लागतात

## ३ रा दिवस (७ तास)

थुलोपाखर (५४५०'/१६६१ मी ) ते शेरा (४७५०'/१४३० मी ) वाटेत

शेरडुगा, सारे डा डा, मुडे, चौरीखरका, निगाले इ. गावे लागतात शेरा येथे पोस्टाची पेटी आहे पण पोस्ट ऑफिस नाही वाटेत दुतर्फा–होडोडेंड्रॉन ऊर्फ गुरासची झाडे विपुल आहेत गावाजवळच शेराखोला ही नदी आहे खोला म्हणजे लहान नदी व कोसी किंवा कोसे म्हणजे मोठी नदी अजूनही आपण तराई म्हणजे हिमालयाच्या पायथ्याचे भागात असल्याने थंडी, बर्फाळ मुलुख, विरळ हवा यांचा पूर्ण अभाव आहे साधारणत ८–१० हजार फूट / २॥–३ हजार मीटर उंचीनंतर या साऱ्याचे अस्तित्व जाणवू लागते.





## ४ था दिवस (६ तास)

**शेरा (४७५०'/१४३० मी.) ते बुस्ती (२९५०'/१२८० मी)** हा प्रथम शेरा-खोल्याच्या काठाकाठाने जाणारा रस्ता पिसान टोल, माडीडाडा मार्गे किरतेछाप या गावी पोहोचतो काठमांडू-जिरी-विमानतळ जोडणारा रस्ता अधूनमधून आपली साथसगत करीत असतोच किरतेछाप येथे हा रस्ता सोडून देऊन देवदार म्हणजे पायनसच्या दाट झाडीतून उतरणाऱ्या पाऊलवाटेने तामा कोसीवरील झुलता पूल ओलांडून आपण बुस्ती गावात पोहोचतो या गावात श्रीराम-सीता पाऊ रोटी हा पावाचा कारखाना आहे गावाचे आसपास दाट जगल आहे अनेक दुर्मीळ वनस्पती विशेषत ऑर्कीडस् या भागात असंख्य सापडतात मात्र त्या न तोडता कॅमेऱ्यात बंदिस्त कराव्यात उगाचच अशा वनस्पती तोडल्याने अनेक वनस्पती अती दुर्मिळ होऊन नामशेष व्हावयाच्या पथावर लागल्या आहेत तामा कोसीलाच भोते कोसी देखील म्हणतात भोते म्हणजे तिबेटी किंवा तिबेटमध्ये उगम पावलेली व कोसी

म्हणजे नदी बुस्ती येथे नैसर्गिकरीत्या अतिशय सुदर असे डोह तयार झाले आहेत मात्र चालून चालून पाय थकलेले असतात त्यातच गार पाण्यात पोहोल्याने पायात वाम किंवा वळ म्हणजे क्रॅम्पस् येण्याचे भय असते पाण्याला असणारी ओढ, भोवरे, पाण्याखालील प्रस्तर याची आपल्याला पुरेशी माहिती नसते म्हणून पोहोण्याच्या भरीस पडू नये नदीकाठी डुबणे हे सर्वांत बिनधोक लामसागूनतरचा मुक्काम शेरडुगा व त्यानतरचा मुक्काम पिसानटोल वा माडीडाडा येथे केल्यास बुस्तीऐवजी नामडू या गावी मुक्काम करता येईल अर्थात बुस्ती ते नामडू पूर्ण चढ आहे तो चढ चढण्यास २–३ तास लागतात

## ५ वा दिवस (७ तास)

**बुस्ती (२९५०'/१२८० मी.) ते यार्सा (६४७५'/२००० मी) आधीच्या**




दिवसासारखीच भरपूर पायपीट व चढउतार असले तरी नामडू येथील द्वैतेश्वर किंवा बैतेश्वर महादेव मदिर आणि गौरीशंकर व मेलुगेत्से या बर्फाळ शिखराचे प्रथमदर्शन मन प्रसन्न करते शिवाय कान्ने येथील आधुनिक नेपाळच्या पाऊल-खुणा बनलेली बीजगुणन प्रक्षेत्र, बांबूची लागवड इ. गोष्टी वेगळ्याच विश्वात घेऊन जातात कान्ने ते यार्साखोला ही उतरण व त्यानतर यार्सा गावापर्यंत असलेली चढण वैताग आणते या सर्व भागात हिमालयाचे वैशिष्ट्य असणारी पायऱ्याची शेती प्रामुख्याने दिसते गहू, तांदूळ, बटाटे ही येथील प्रमुख उत्पन्ने आहेत वाटेचे दुतर्फा ओक, चीड व, होडोडेंड्रॉनची झाडी आहे

## ६ वा दिवस (६ तास)

**यार्सा (६४७५'/२००० मी) ते थोसे (५९००'/१७९९ मी)** हा प्रवास चिसापानी गावातून होणाऱ्या गौरी (७१४६ मी), शकर (७०१० मी), कार्योलग


(२१९२० मी ) चोबाभांमरे, मेलुगेत्से, नंबर (२२८१६ मी ) आदी शिखराच्या दर्शनाने आकर्षक ठरतो सेलोगाइन ऊर्फ बल्बोफिलम हे ऑर्कीड या भागात सापडते एव्हरेस्ट विजयावर 'आज जिंकला गौरी शंकर ' अशी एक मराठी काव्यरचना आहे वस्तुत ८२५०'/२५१० मी उंचीच्या चिसापानी खिंडीतून दिसणारे गौरी (७१४६ मी ) व शंकर (७०१० मी ) हे जोडशिखर एव्हरेस्ट-पेक्षा बऱ्याच कमी उंचीचे आहे विश्वकळस एव्हरेस्ट म्हणजे XV वे शिखर किंवा चोमोलुंगमा अथवा सागरमाथा यांचा गौरी शंकर नावाशी काहीही संबंध नाही पण अपुऱ्या माहितीवर स्वतःच्या कल्पना लढवून कवी, कथाकार व कादंबरीकार काही तरी भावनेच्या भरात लिहून जातात व जनमानसावर त्याचाच जास्त परिणाम राहतो

थोसे हे बऱ्यापैकी मोठे गाव आहे माध्यमिक शाळा, पोस्ट ऑफिस, तार घर, किराणामालाची दुकाने, बरी हॉटेल्स इ असणारे हे गाव आहे काठमांडू ते नौंचे दरम्यान साधारणत मध्यावर हे गाव येते या परिसरात सापडणाऱ्या खनिजापासून लोखंड तयार करण्याचा उद्योग स्थानिक पातळीवर गेली अनेक वर्षे येथे चालू आहे कुकरी हे नेपाळी गुरख्यांचे शस्त्र येथे मोठ्या प्रमाणावर निर्माण केले जाते छांग आणि अरक या दोन गावठी दारूचे उत्पादनही या गावात मोठ्या प्रमाणात होते या गावात नेवारी लोकांचे प्रमाण बरेच आहे हिंदू देवतांची मंदिरेही अनेक आहेत काठमांडू ते जिरी विमानाने आल्यास जिरीहून थोसे किंवा शिवालय येथे येता येते जिरी येथील सरकारी शेतकी सुधारणा केंद्र पाहण्यासारखे तर आहेच, पण तेथे उत्तम दर्जाचे व तरीही स्वस्त जेवणही मिळते जिरीमध्ये एक सुसज्ज इस्पितळही आहे जिरीची समुद्रसपाटीपासून उंची ६४००'/१८७० मी आहे

## ७ वा दिवस (८ तास)

**थोसे (५९००'/१७९९ मी ) ते चांगमा उर्फ भंडार (७२००'/२१९४ मी )** खर तर चांगमा ऐवजी देवराली खिंडीच्या (८८५०'/२७०५ मी ) वर डाव्या हाताला असणाऱ्या थोडुंग चीज फॅक्टरीतच मुक्कामाला जाणे अधिक सोयीचे तेथे उत्तम जेवण, राहायला चांगली जागा तर आहेच, पण ऱ्होडोडेंड्रॉनच्या झाडांची अतिशय दाट झाडी असल्याने रंगांची मुक्त उधळणही पहायला मिळते याक व गाय याच्या संकरातून निर्माण झालेली चावरी उर्फ झब्बू ही जात आणि याक याच्या दुधापासून चीज तयार करण्याचा उद्योग येथे मोठ्या प्रमाणावर चालतो चीज आम्लेट हा अत्यंत चविष्ट पदार्थ तसेच पुढील ट्रेकसाठी चीजही येथे मिळू शकते याक व झब्बूचे कळपही येथे पाहता येतात थोसे ते चांगमा ट्रेकवर प्रथम खिम्ती खोल्याचे काठावरील शिवालय हे गाव लागते अतिशय सुंदर ठिकाणी येथे एक

शिवमंदिर आहे देवराली खिंडीतून उतरल्यावर लागणाऱ्या चांगमा किंवा भंडार या गावी हस्तकौशल्याच्या लाकडी वस्तू खूप चांगल्या व स्वस्त मिळतात अर्थात त्या पुढच्या पूर्ण ट्रेकभर वागवणे शक्य नसते, ही गोष्ट वेगळी या ट्रेकभर विशेषत. देवराली खिंडीत 'ओम् मणि पद्मेहुम' म्हणजे हृदयरूपी कमळात परमेश्वर रूपी रत्न असते असा बौद्धांचा मंत्र कोरलेले दगड विपुल आढळतात.





## ८ वा दिवस (६ तास)

भंडार उर्फ चांगमा (७२००/२१९४ मी ) ते सेटे (८४००'/२५७५ मी ) लिखुखोल्याच्या कडेकडेने जाताना गुडेंडा, खिंजे, डुबोक अशा वस्त्या लागतात. सेटे गाव अत्यंत सुंदर जागी वसले आहे परंतु येथे वस्ती बरीच कमी आहे व पाण्याची थोडी अडचण भासते आपण तेथे असायला आणि नेमके खूप ट्रेकिंग ग्रुप्स तेथे यायला एकच गाठ पडली, तर मात्र अडचण होईल म्हणून आपल्या गटातील पुढे जाणाऱ्याने सर्वांना पुरेशी जागा मिळवून ठेवणे किमान या ठिकाणी तरी अत्यावश्यक ठरते या भागात हरणे, सिव्हेट, गरूड व इतर अनेक पक्षी दिसतात अर्थात त्यासाठी या ठिकाणी एखादा मुक्काम वाढवून आसपासच्या डोंगर-रांगावर जायला हवं सेटे गावातील बौद्ध मठही अत्यंत रमणीय जागी आहे

ए ... १६

# ९ वा दिवस (६ तास)

सेटे (८४००'/२२७५ मी) ते जुनबेसी (८७७५'/२६७५ मी) पूर्ण ट्रेक-मध्ये सर्वांत उंच असणारी लामजुरा खिंड (११५८०'/३५३० मी) या दिवशी ओलांडावयाची असते सेटेनतर दागचो या निर्मनुष्य जागी पाण्याची सोय असल्याने तेथे पोटपूजा उरकून मग लामजुरा खिंडीअलीकडील फुलांच्या प्रदेशातून चालणे ही एक आनंदयात्राच ठरते फुलझाडांनी किती फुलावे याची मर्यादा सोडून ही झाडं इतकी अतोनात फुलतात की बस्स! देखते रहना!! खाली पिवळ्या फुलांचे ताटवे अन् चहूबाजूला पांढरी, गुलाबी अन् लालभडक फुलांची गुरास उर्फ ऱ्होडोडेंड्रॉनची झाडी! जर स्वर्ग असेल तर तो येथेच असे म्हणावे लागते मात्र खुद्द लामजुरा खिंड म्हणजे ट्रेकवरचा सर्वांत खतरनाक भाग येथे येई-पर्यंत दुपार होते अन् दुपारी या खिंडीत हमखास पाऊस किंवा हिमवृष्टी होते रस्ताही न दिसण्याइतकी अधुकताही निर्माण होते खिंडीनतर त्रांग डोबुक गाव लागते या गावाचं खर नाव थॅक-टो-बुक त्याचा अर्थ दगडी गुहा ह्या गावात कितीही थांबावस वाटल तरी थांबू नये अक्षरश अर्ध्या तासावर जुनबेसी हे मोठे, पवित्र व जुने गाव लागते तुप्तेन चोलिंग मठ व इतर जवळच्या गावांमधील सात मठ मिळून बौद्धांचे एक केंद्रच या ठिकाणी आहे जुनबेसी बौद्ध मठातील रंगकाम प्रेक्षणीय आहे जुनबेसीजवळच सालेरी (७७००'/२३४६ मी) हे मोठे गाव आहे नेपाळच्या सरकारी सेवेतील अनेक अधिकारी व सरकारी कार्यालये यामुळे हे गाव सतत गजबजलेले असते येथे चांगली हॉटेल्सही आहेत सर एडमंड हिलरी यांनी बांधलेली उत्तम शाळाही या गावात आहे येथील शाळांमध्ये जपानी, फ्रेंच, इंग्लिश, जर्मन, हिंदी अशा भाषा प्रामुख्याने शिकवतात येथे शिकून शहाणी झालेली मुले पुढे या भागात येणाऱ्या असंख्य परदेशी गिर्यारोहण मोहिमांत सरदार, दुभाषे,



मदतनीस अशा उच्च दर्जाच्या कामावर आपली उपजीविका करू शकतात

## १० वा दिवस (६ तास)

जुनबेसी (८८७५'/२६७५ मी) ते मणिडिंग्मा (७२००'/२१९४ मी) हा तर्कसिधू खिंडीतून (१०५००'/३२०० मी) जाणारा प्रवासमार्ग मात्र तो कायम लक्षात राहतो सालुग रिजवरून (९८००'/२९०० मी) होणाऱ्या शिखर सम्राटाच्या प्रथमदर्शनाने तिबेटचाची जगन्माता, नेपाळचांचा सागरमाथा, पाश्चात्याच एव्हरेस्ट अन् जगातील सर्वोच्च बिंदू (२९०२८'/८८४८ मी) विश्वकळस असणार ते ठिकाण जुनबेसीनतर लागणारी सालुग राग ओलाडली की स्पष्ट दिसते अर्थात हवा स्वच्छ हवीच आपण फारच नशीबवान असलो, तर एव्हरेस्टचा हिमतुरा म्हणजे स्नोफ्लूटदेखील नुसत्या डोळ्यानी दिसतो एव्हरेस्ट पर्वत जरी हिम व बर्फाच्छादित असला तरी खुद्द शिखरावर इतका प्रचड वारा आहे की, तेथे पडणारे हिम सतत उडून जाते हा 'हिमतुरा' या शिखरसम्राटाला खरोखर शोभून दिसतो या एव्हरेस्ट दर्शनानतर रिंगमो, तर्कसिधू ही गावे सोडून आपण मणिडिंग्माला येऊन पोहोचतो या गावात एक शाळा आहे व येथील लोकाना हिंदी व इग्रजी या दोन्ही भाषा समजू शकतात वाटेतील तर्कसिधू खिंडीतही चीजचा कारखाना आहे पण तेथे असणारे कुत्रे महाभयकर आहेत


## ११ वा दिवस (६ तास)

मणिडिंग्मा (७२००'/२१९४ मी.) ते खारीखोला (६८००'/२०७२ मी) मणिडिंग्मा ते दूधकोसीचा प्रवाह इथवर सगळी उतरणच आहे अर्थात त्यात काही नकोस होत नाही आणि खर सांगायच तर ट्रेकिंग हाच एक विक्षिप्तपणा आहे चागल घरी पडून रहाव दूरदर्शन किंवा चित्रपटात होतं तेवढ निसर्गदर्शन कराव आणि आपल्या काँक्रीटच्या खुराड्यात जन्म घालवावा हे उत्तम कारण डोंगर चढताना दम लागतो सपाटीवर चालताना कटाळा येतो, उतरणीवर गुडघे दुखतात, निसर्गाच्या एकाही अगातल कळत नाही, मुक्कामासाठी तबू ठोकताना कटकटच जास्त होते, मुक्कामी गेल्यावर लाकडफाट्यावर स्वयपाक जमत नाही, वारवार जागा बदलल्याने झोपेचही खोबर होतं अर्थात प्रत्येक ट्रेकरच हेच मत असल तरी जुगारी माणसासारख 'हा ट्रेक शेवटचा फिरून या फदात पडायच नाही' ही भीष्मप्रतिज्ञा दरवेळी केली जाते दूधकोसीवरचा पूल ओलांडला की परत चढण मग मात्र खारीखोला गाव येते इथे पोस्टाची पेटी, बाधलेले शौचकूप अन् आजूबाजूच्या डोगरात असलेली पाढऱ्या फुलाची अन् उत्तम चवीची पाढरट फुलाची लालचुटुक स्ट्रॉबेरीची फळे, पायऱ्याची शेती, हे सार चेंज म्हणून बर वाटतं साधारणत. बरेच ट्रेकर्स खारीखोला किंवा नामचेबझारला पोर्टर्स बदलतात कारण

लामसागूपासून आलेले पोर्टर्स पुढच्या उंचीवरील वातावरणास सुसज्ज नसतात मात्र पोर्टर्सची बोली येथवरच आधी करणे त्यासाठी आवश्यक आहे

## १२ वा दिवस (६ तास)


खारीखोला (६८००'/२०७२ मी) ते पुय्यन (९३००'/२८३५ मी) सुरुवातीलाच ३–३॥ हजार फूटाची चढण, मग खार्ते नावाच छोटुकल गाव मग थामडाडा नावाच एकच घराच गाव सपूर्ण ट्रेकभर लागणार सर्वांत गैरसोयीच गाव म्हणजे पुय्यन घर विखुरलेली अन् ८–१० जणाची एकत्र सोय होईल अशी जागा तर शोधावीच लागते बर्ड वॉचर्सचा हा स्वर्गच. यलोबिल्ड ब्ल्यू मॅगपाय, चफ, व्हाईट कॅप्ड रेडस्टार्ट, गरुड, तिबेटन स्नो कॉक, अशी कितीतरी मंडळी इथ भेटतात पतकरी म्हणजे मॅग्नोलिया अन् चिगलपम हे पांढऱ्या फुलांच झाड, सेलोगाइन ऑर्कीड आदींचही दर्शन सुखावून जात आणखी २–२॥ तास चालायची तयारी असेल तर पुय्यनऐवजी सुरक्या गाव गाठाव अन् नंतरच्या दिवशीचा फार्कडिंगचा मुक्काम टाळून थेट नामचेबझार म्हणजे नीचे गाव गाठाव हे बर दोन दिवस प्रचंड दमणूक होईल, पण एक दिवस वाचेल तेही नको असेल तर चौरीखरका गावानंतर फार्कडिंग येथे जाण्याऐवजी लुक्ला येथील विमानतळ (९२००' / २८०० मी) पाहायला जाऊन येण्यासाठी चौरीखरकात मुक्काम ठोकावा अन् रिकाम लुक्लाला जाऊन परत याव




## १३ वा दिवस (७ तास)

पुय्यन (९३००' / २८३५ मी) ते फार्कडिंग (८७००' / २६५२ मी.) सुरक्या, चौरीखरका, मुसेघाट या क्रमाने गेल्यावर मग फार्कडिंग गाव लागत

गावात शिरतानाच डाव्या हाताला जरा बरी मुक्कामाची सोय आहे बाकी गावात अस्वच्छता फार वाटते. म्हणून पुढचा मुक्काम मोंजोला केला तरी चालू शकत. या वाटेत मात्र ओढ्यावर लाकडाच्या ओंडक्याऐवजी किंवा रिफाडाच्याऐवजी खूप चागले असे लाकडी पूल सर्वत्र आढळतात कारण ' इन्स्टट एव्हरेस्ट ट्रेक ' करणारे बहुसख्य पाश्चात्य ट्रेकर्स चौरीखरकाजवळील लुक्ला येथे विमानाने येऊन एव्हरेस्ट बेस कॅम्पला भेट देऊन तिथूनच परततात या प्रवासात सुदर धबधबेही पाहायला मिळतात




## १४ वा दिवस (६ तास)

**फाकडिंग (८७००' / २६५२ मी ) ते नामचेबझार ऊर्फ नौचे (११३००' / ३४८६ मी )** या दिवशी आपण अगदी एव्हरेस्टच्या अगणात प्रवेशतो सागरमाथा नॅशनल पार्क म्हणजे ' सागरमाथा राष्ट्रीय निकुञ्ज ' नेपाळ सरकारने तयार केले आहे या प्रदेशात जाण्यासाठी साठ रुपये प्रवेशशुल्क पडते ते जोरसाले या गावात भरावे लागते न्यूझीलडमधील मधुमक्षिका पालन व्यवसाय करणारा एडमड हिलरी २९ मे १९५३ रोजी एव्हरेस्ट विजेता ठरला पुढे त्याने या शेर्पाभूमीसाठी आपले भावी जीवन समर्पित केले या भागात विमानतळ, ट्रेकर्सना सोयी, शेर्पांसाठी शाळा-दवाखाने या गोष्टी करता करता, इथल्या ढासळणाऱ्या पर्यावरणाने तो अस्वस्थ झाला कालचा ' शांग्रीला ' असणारा हा प्रदेश उद्या वाळवट होईल अशी भयसूचक चिन्हे त्याला दिसू लागली. सागरमाथा राष्ट्रीय उद्यानाची कल्पना धनिकांच्या, नेपाळ शासनाच्या गळी उतरवणे त्याला जमले पण तिथले नागरिक त्याला विरोध करू लागले. येथे येणारे असख्य ट्रेकर्स, मोहिमा इ मधून मिळणारे आर्थिक स्वास्थ्य

व सपत्तीचा त्याना मोह पडला आहे उद्याची फिकीर ते करेनासे झाले आहेत तब्बल पावणेदोनशे ते दोनशे कि मी ची पायी भटकती करीत ५ ते ७ हजार ट्रेकर्स व पर्यटक या प्रदेशात येतात जेमतेम २॥–३ हजार लोकवस्तीच्या या प्रदेशात सर्वात ताण पडतो तो तिथल्या इंधन पुरवणाऱ्या वृक्षसपत्तीवर गेली अनेक वर्षे झालेल्या अनिर्बंध वृक्षतोडीने इथला तोलच ढासळला गेला आहे इंधन म्हणून लाकूड जाळण्यावर निर्बंध, पर्यायी इंधनाची व्यवस्था आणि नवीन वृक्षांची लागवड ही प्राथमिक उद्दिष्टे ठेवून ही वाटचाल सुरू झाली आहे अर्थात यासाठी लागणारा पैसा येणाऱ्या प्रवाशांकडून घेण्यात काहीच वावगे नाही

फाकडिंगनतर लागणाऱ्या मोंजो गावात जपानी लोकांच्या प्रेरणेने भाजीचे मळे निर्माण झाले आहेत टिन्डफूड अन् प्रीकूकड् फूड कितीही चविष्ट व सोयीचे वाटले तरी ताज्या भाज्याची सर त्याना नाहीच कोबी, फ्लॉवर, गाजरे, कांदा-मोहरी, मिरच्या अशा तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी या मळयात विकत मिळतात येथून घेतलेल्या भाज्यामध्ये कांदेही मिळतात तेव्हा कांद्याची भजी हा खास महाराष्ट्रीय बेत एव्हरेस्टच्या अंगणात पदार्पण केल्याप्रीत्यर्थ ठेवायला काहीच हरकत नाही असो


खुद्द नामचेबझारच्या आधी असणारी २-३ सिंहगडाएवढी नकोशी वाटणारी चढण वैताग आणते आणि नौचे जवळ आल्याची जाणीव मिळते आयरिस या इरिडेसी कुलातील आकर्षक निळया रंगाच्या फुलामुळे ही फुले १०॥–११ हजार फूट उंचीनंतरच आढळतात अशा उंचीदर्शक वनस्पती म्हणजे नैसर्गिक बॅरोमीटरच आहेत त्याचा आपण अशा भटकतीत परिचय करून घ्यावा

मिंग्मा नोर्बू या गिर्यारोहक, सुशिक्षित, सुजाण माणसाच्या हाती या सागरमाथा नॅशनल पार्कची व्यवस्था सोपविलेली आहे. नामचेबझारला त्याने एक म्युझियम बनवले आहे तिकडे जाणाऱ्या प्रत्येकाने ते बघितलेच पाहिजे ते खूपच उपयुक्त आहे.

नामचे बझारला हाय अल्टिटयूड पोर्टर्स मिळवणे, शनिवारच्या बाजारात खरेदी करणे, पत्रे टाकणे, आत्तापर्यंतच्या मुक्कामाची व्यवस्था घरातून होऊ शकत होती यापुढे मात्र तबू हवेतच, ते भाड्याने मिळविणे, काठमांडूहून जादा सामान शांगबोचेला पाठविले असेल तर ते घेणे, खुमजुंग व त्याजवळील या भागात असणारा सर्वात मोठा दवाखाना असणारे कुंडे गाव पाहण्यास जाऊन येणे, जगातील सर्वात उंचीवरील अन् तसेच महागडे असणारे 'हॉटेल एव्हरेस्ट व्ह्यू' येथे जाणे या सर्व गोष्टीसाठी नामचे बझार म्हणजे नौचे या ठिकाणी एखाद दोन दिवस ठेवायलाच हवेत किंवा नौचेत एक दिवस व खुमजुंगला एक दिवस अशी व्यवस्थाही ठरविता येते

## १५ व १६ हे दिवस

यासाठी राखून ठेवावेत मात्र इन्स्टट एव्हरेस्ट ट्रेकर्सनाही हे वगळून चालणार नाहीत उंचीवरील वातावरणाशी जमवून घ्यायला इथे वावरणे महत्त्वाचे हे जरी रेस्ट डेज म्हणजे विश्रांतीचे दिवस म्हटले तरी तबूत पडून राहून ॲक्लमटायझेशन होणार नाही, वातावरणाशी जुळवून घेता येणार नाही, याची जाणीव हवी या भागात मीठ अतिशय मौल्यवान इथले भारवाहक विड्या किंवा सिगरेट आणि मीठ दिले तर प्रचड खूष होतात अर्थात रोजची मजुरीही हवीच हॉटेल एव्हरेस्ट व्ह्यूमधील ग्रथालय आणि एव्हरेस्ट परिसराचे मॉडेल या गोष्टी सर्वांनी बघायलाच हव्यात अशाच आहेत




## १७ वा दिवस (६ तास)


खुमजुग (११८००'/ ३५९७ मी ) ते तेंगपोचे म्हणजे थेंगबोचे (१२७१५'/ ३८७६ मी ) हा टप्पा छोटा, पण विरळ वातावरणाशी जुळवून घ्यायला चागला ल्हासा या तिबेटच्या राजधानीतील दलाई लामाच्या 'पोटाला' राजवाड्यातील धर्मपीठाखालोखाल तिबेटमधील रोंगबुक धर्ममठ हा उत्तरेकडचा अन् तेंगपोचेमधील धर्ममठ हा दक्षिणेकडील नेपाळमधला, सर्व तिबेटी बौद्धाना महत्त्वाचा ह्या प्राचीन व श्रीमत धर्मपीठातील धर्मग्रथ, लामाची खास वाद्ये, त्याची पारपरिक भित्ती चित्रे हे सर्व पाहायचे तर थोडा वेळ हवाच तेंगपोचेच्या आसपास मोनाल पीझट हा सरक्षित पक्षी व कस्तुरीमृग दिसू शकतात, नजर मात्र तयार हवी.

## १८ वा दिवस (६ तास)

तेंगपोचे (१२७१५' / ३८७६ मी) ते फेरिचे (१४०००' /४२६७ मी) खुमजुगपासून खुणावणाऱ्या अतिशय सुंदर दिसणाऱ्या आमाई दाब्लाग किंवा आमा दाब्लाम ह्या (२२४९४' / ६८५६ मी उंचीच्या) शिखराच्या सान्निध्यात नेणाऱ्या ट्रेकचे दुसरे आकर्षण म्हणजे १२८००' / ३९०१ मी उंचीवरचे पागबोचे गाव येथील धर्ममठात यतीचे अवशेष पहायला मिळतात यती असो वा नसो त्याचे ज्ञात असे अवशेष फक्त येथेच पाहायला मिळतात डोक्याच्या कवटीवरील निमुळते होत गेलेले तांबड्या-तपकिरी रंगाच्या केसाचे कातडे व उजव्या हाताचा पंजा हे ते अवशेष ते हातात घेऊनही बघता येतात मात्र त्यासाठी थोडी दक्षिणा लामाच्या हातावर ठेवायला लागते फेरिचेमध्ये हिमालयन रेस्क्यू असोसिएशनतर्फे एक मदतकेंद्र चालविले जाते त्याला अवश्य भेट देऊन यावे

## १९ वा दिवस (५ तास)

फेरिचे (१४०००' / ४२६७ मी) ते लोबुचे (१६१७५' / ४९३० मी) हा सगळा प्रवास उत्कंठा वाढविणारा आहे पण आता आपण 'ट्री लाइन' म्हणजे मोठ्या वनस्पती उगवू शकणारी मर्यादा ओलांडलेली असते निर्जन, निर्जल, वनस्पतीरहित, अती थंड प्रदेशातून आपण जात असतो ६-७ तास सतत चढणीच्या ह्या ट्रेकवर एका झोपडीचे थुक्ला ऊर्फ दुग्ला हे गाव लागते 'हॉटेल कालो पठार' असणाऱ्या या झोपडीत चहा मिळू शकतो काही जणांना १५ हजार फूट / ४५०० मी उंचीवर 'हाय अल्टिट्यूड सिकनेस' म्हणजे अती उंचीवर शरीर जुळवून घेऊ न शकल्याने होणारा विकार जाणवतो डोके गरगरणे, भूक न लागणे, उलट्या होणे, क्वचित जुलाब होणे, हलू नये असे वाटणे ही याची लक्षणे त्या विरळ हवामानात आपले शरीर रुळले नसल्याची ही लक्षणे थोडे खालच्या उंचीवर मुक्काम केल्यास १-२ दिवसांत आपण परत वरची उंची गाठू शकतो. समुद्रसपाटीच्या साधारण निम्मा दाब या ठिकाणी हवेचा असतो डीहायड्रेशनचा त्रास होऊ नये म्हणून साखर मीठ-लिंबू-पाणी किंवा इलेक्ट्राल पावडर किंवा तत्सम काहीतरी पाण्यात टाकून सतत घेणे सोयीचे या व पुढील कॅम्पसवर निसर्गत भूक कमी लागते खर तर खाण्यावरची वासनाच जाते म्हणून हाय प्रोटीन फूड, चॉकोलेट, सुका मेवा, चीज, पूर्णान्न बिस्कीटे, खाकरे, गुळाची पोळी, डिंकाचे लाडू, गुळ-पापडीच्या वड्या, हवाबंद फळे आदी गोष्टी येथे आहारात असतील तर थकवा जाणवत नाही व कमी खाऊन शरीराची गरज बऱ्याच प्रमाणात भागू शकते अती




पुमोरी शिखराच्या दक्षिण कण्यावरील
५६०० मी./१८३८० उंचीवरून "खुम्बु हिमाल"
मधील गगनचुंबी शिखरांचे होणारे विराट दर्शन

उंचीवर स्वभाव चिडचिडा बनतो, पटकन राग येतो याबाबत थोडा संयम गटातील सर्वांनीच दाखवायला हवा फिंच पक्षी, क्वचित चफ म्हणजे कावळ्यासारखा पक्षी व उंदीर हे प्राणी या भागात पाहायला मिळतात लोबुचे हा चहा-आम्लेट-भात मिळण्याचा शेवटचा टप्पा मात्र मुक्कामासाठी येथे व यापुढे तंबू हवाच तंबू घेताना वॉटरप्रूफ, विंडप्रूफ व टू प्लाय म्हणजे दोन थराचा हवा त्याच्या मेखा घट्ट ठोकून त्यावर दगड ठेवावेत येथे वारा फार तेव्हा योग्य जागा निवडूनच तंबू ठोकायला हवा, नाहीतर इथला मुक्काम तापदायक ठरेल

## २० वा दिवस (८ तास)

**लोबुचे (१६१७५'/४९३०मी) ते गोरखशेप (१७०६०'/५१८४मी)** आजचा दिवस ट्रेकमधील सर्वांत उत्कंठापूर्ण व महत्त्वाचा दिवस पृथ्वीचा तिसरा ध्रुव, विश्वकळस, जगातील सर्वोच्च बिंदू मानला गेलेल, 'एव्हरेस्ट', 'चोमोलुंगमा', 'सागरमाथा'— या नावांनी ओळखलं जाणार शिखर आपण जवळात जवळून पाहणार असतो मात्र त्यासाठी थोडी तरी निसर्गकृपा हवीच ढगाळ हवा, व्हाइट आऊट होणे, व्हिजिबिलिटी नसणे हा प्रकार दिवसभरात केव्हा ना केव्हा तरी होत असतोच त्यामुळे कॅमेरा सतत गळ्यात अडकवून ठेवण महत्त्वाचं एव्हरेस्टचा हिमतुरा पाहायला मिळण हे आणखी सद्भाग्य।

या मार्गात ना माणूस ना वर्दळ सर्व प्रदेश हिमोढामुळे (मोरेनमुळे) खडकाळ बनलेला त्यामुळे जागजागी दगडांच्या उतरंडी म्हणजे केर्नस् केलेल्या आढळतात त्या न पाडता, त्या अनुरोधाने गेले की वाट बरोबर सापडते अगदी शेवटी चांगली तीनशे फुटी/शभर मीटर उंचीची डोंगरी चढण पार करावी लागते मग थोड पुढे गेल की तिथ असणार इटर मोरेनिक तऱ्हेच तळं लागत बऱ्याच पुस्तकात गोरखशेपचा उल्लेख 'लेक कॅम्प' असाच आढळतो १९५२ च्या स्विस एव्हरेस्ट मोहिमेचा बेसकॅम्प या तलावाच्या काठावर गोरखशेपलाच होता आपण जाऊ तेव्हा थोडी अधिक थंडी असेल तर या तळ्यातील वरच पाणी गोठत आणि बर्फाची साय तयार होते तेव्हा पाणी प्यायला जाताना एका हातात मग अन् दुसऱ्या हातात आइस अॅक्स किंवा हातोडी घेऊन जाव लागत इतक्या उंचीवर, विरळ वातावरणात, खूप थंडीत देखील स्नो पार्ट्रीज नावाचा कोंबडीहून थोडा मोठा पक्षी इथ दिसतो याच मांस अतिशय रुचकर तेव्हा याची फार मोठ्या प्रमाणावर हत्या झाली नेपाळ सरकारने आता याच्या हत्येला पूर्ण बंदी केली आहे जर त्याची हत्या केल्याच लक्षात आलं तर कैक महिने कैद अन् काहीशे रुपये दंड अशी शिक्षा ठेवली आहे ती शिक्षा प्रत्यक्ष होतेही कोठेही 'जमवून घेतले' जात नाही गोरखशेपचा मुक्काम अत्यंत थ्रिलिंग असतो मात्र येथे काही शिजवायचे वा चहा करा-

यचा तर स्टोव्ह हवाच कारण लाकूड जाळण्यावर घातले गेलेले नवे निर्बंध

सकाळी लवकर लोबुचे सोडल तर गोरखशेपला तंबू ठोकून, बरोबरच्या भारवाहकाना तेथेच थांबायला सांगून प्रथम काला पठार (१८१९२'/५५४५ मी ) व नतर त्याच्या वरचे १८४७१'/५६३० मी उंचीचे खडकाळ ' रॉकी पिक ' किंवा अनामिक शिखरावर गेल की ट्रेकच इप्सित साध्य होत इथून एव्हरेस्ट, (२९०२८'/८८४८ मी ), ल्होत्से (२७८९०'/८५०१ मी ), नुप्त्से (२५८५०'/७८७९ मी ) जिनिव्हा स्पर, खुबू हिमनदी, एव्हरेस्टचा वेस्ट शोल्डर, पुमोरी (२३४४२'/७१४५ मी ) शिखर, लोबुचे ईस्ट (२००७६'/६११९ मी ) अन् लोबुचे वेस्ट (१९५६४'/५९६३ मी ), खुम्बिला (१९३००'/५८८३ मी ), कांगेतेगा (२२३४०'/६८०९ मी ), त्रामसेरकू (२१७३०'/६६२३ मी ), आमा दाब्लाम (२२४९४'/६८५६ मी ), आयलंड पिक (२०३०५'/६१८९ मी ) आदी बडीबडी मंडळी दिसतात. या शिखरावर पोहोचताना कोणतेही खास गिर्यारोहण साहित्य लागत नाही मात्र हे शिखर खडकाळ असल्याने ताजी हिमवृष्टी (फ्रेश स्नो फॉल) अती गैरसोयीचा व प्रसंगी धोकादायक ठरू शकतो

गोरखशेपवरून अनामिक शिखरावर जाण्याऐवजी खुबू हिमनदीकडे खाली उतरले तर त्या वर्षी आलेल्या एव्हरेस्ट मोहिमेच्या बेसकॅम्पवर जाता येते गोरखशेपहून तेथवर जायला तीन तास तरी लागतात खूपच वाटले तर पुमोरीचा बेसकॅम्पही गाठता येतो या सर्व भागातून खुबू हिमनदीतील आइस टॉवर्स, क्रिव्हासेस, छोटी तळी इ पाहता येतात मात्र खुद्द एव्हरेस्ट शिखर येथून दिसू शकत नाही

शक्य असेल तर गोरखशेपला १-२ दिवस मिळतील असा बेत ठरवावा म्हणजे किमान एकदा तरी लाजाळू एव्हरेस्टवरचा ढगाचा झिरझिरीत बुरखा दूर झालेला दिसेल कारण परत परत इथे येणे हे काही सर्वांना जमणारे नाही

१९७५ मधील ब्रिटिश एव्हरेस्ट मोहिमेचे सदस्य श्री माइक बर्क याचे एव्हरेस्ट पर्वतावर अपघाती निधन झाले होते त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारलेली स्मृतीशिळा गोरखशेपवरील कॅम्पसाइट जवळच आहे तेथे जाऊन आजवरच्या सर्व मोहिमामधील ज्ञात अज्ञात सर्व धाडसी वीराना आदरांजली अर्पण करावी आणि कष्टप्रद जबो ट्रेकच्या उत्तरार्धाला सुरवात करावी

## २१ व २२ वा दिवस

मुक्काम गोरखशेप– अर्थात जरुरीप्रमाणे यात कमी-जास्त करता येईलच

## २३ वा दिवस (७ तास)

गोरखशेप ते फेरिचे लोबुजे मार्गे

## २४ वा दिवस (६ तास)

फेरिचे ते पुगी तैंगा. पागबोचे, तेंग पोचे मार्गे

## २५ वा दिवस (७ तास)

पुगी तैंगा ते नौचे खुमजुग-कुगे व शागबोचे मार्गे आपली जादा औषधे कुंडे येथील दवाखान्यास देऊन टाकावीत तसेच नौचेमध्ये भाड्याने घेतलेले सामान परत करणे

## २६ वा दिवस (७ तास)

नौचे (नामचे बझार) ते चौरीखरका मार्गे लुक्ला

## २७–२८–२९ वा दिवस

हवा चांगली असेल तरच विमान येथे उतरू शकते तेव्हा कधी कधी १-२ दिवस ही हवाई वाहतूक पूर्ण बंद असते त्यामुळे हे तीन दिवस वाया जाणारे जादा दिवस धरूनच चालावेत काठमांडूहून निघतानाच साधारणत २८ व्या दिवशीचे लुक्ला-काठमांडू रिझर्व्हेशन करून ठेवावे काठमांडू लुक्ला हे विमान प्रवासाचे दर रु २५२+१०० एअरपोर्ट चार्ज असे आहेत

मात्र भरपूर दिवस असतील तर हा सर्व ट्रेक उलटा पूर्ण करता येईल आणखी दहा ते बारा दिवस त्यास लागतील या परतीच्या प्रवासात नावीन्य काहीच नाही व रोजचा जेवणाचा खर्च होतोच तेव्हा विमानप्रवास करून २९–३० व्या दिवशी काठमांडूत परतावे काठमांडूतील स्थळ दर्शन, पशुपतीनाथ, स्यांगबोनाथ, पाटण उर्फ भक्तपूर, पोखरा आदी ठिकाणे पाहाता येतात खुद्द काठमांडूतील थापा-थैली भागात नानासाहेब पेशवे याच्या पत्नीने बांधलेले थेट पुणेरी पद्धतीचे श्री लक्ष्मीनारायणाचे मंदिर व तेथील शिलालेख आपण महाराष्ट्रीयांनी जरूर पाहिला पाहिजे

याशिवाय रॉयल नेपाळ एअरवेज कॉर्पोरेशनने 'एव्हरेस्ट फ्लाइट' ही खास विमानसेवा सुरू केली आहे रु ३।। ते ४ शेच्या दरम्यान आपण एव्हरेस्ट पर्वतराजीचे वरून दर्शन घेऊ शकतो आवर्जून त्याचा लाभ घ्यावा ३५ ते ४० हजार फूट उंचीवर जाऊन जगातील सर्वोच्च बिंदू पाहणे हा निश्चित आगळा अनुभव आहे मात्र यासंबंधीची माहिती तेथे गेल्यावर आधी मिळवून ठेवावी जमल्यास आधी रिझर्व्हेशन्सही करून ठेवता येतील त्यासाठी रॉयल नेपाळ एअरलाइन्स कॉर्पोरेशनच्या न्यू मार्केटमधील ऑफिसात जायला हवे, किंवा पोस्टाने आधी संपर्क साधावा.

## ' एव्हरेस्ट ट्रेक 'साठी खास सूचना

फार मोठ्या व दगदगीच्या ट्रेकसाठी मोठा गट असू नये चार ते आठ या संख्येपेक्षा अधिकजण असतील तर उपगट पडतात, मतमतांतरे वाढतात, सर्वांच्या खाण्यापिण्याचे सामान एकत्रित वाढते, आडगावातून बऱ्याच लोकांची राहण्याची वा झोपण्याची सोय होणे कठीण जाते टॅक्सी, टांगा, रिक्षा अशा वाहनात वा तंबूत विभागून जाण्याच्या दृष्टीने ४-६-८ असणारा गट सोयीस्कर ठरतो


शक्यतो अशा बऱ्याच मोठ्या व अती उंचीवरील भटकंतीमध्ये एखादा डॉक्टर असावाच. एखादा पक्षी वा वनस्पती वा निसर्ग अभ्यासक असावा म्हणजे आपण ज्या प्रदेशातून जातो तेथील निसर्गवैशिष्टचे जाणून घेता येतात ट्रेकवर आपण स्वयंपाक करून खाणार असलो तर एखाद्यास चार रुचकर पदार्थ तयार करता येणे आवश्यक आहे गटातील शक्यतो प्रत्येकाने किंवा किमान एकाने तरी ' ट्रेक-डायरी' ठेवली पाहिजे वाटेत दिसलेल्या गोष्टी, लागलेली गावे-नद्या-शिखरे-खिंडी यांची व्यवस्थित नोंद त्यात केली पाहिजे प्रत्येक वेळी लागलेला वेळ नोंदला पाहिजे खर्चाचा तपशीलही नोंदवून ठेवायला हवा घेतलेले पैसे एकाकडेच वा एकाच ठिकाणी न ठेवता सर्वांकडे थोडेथोडे द्यावेत म्हणजे हरवणे-विसरणे-चोरीला जाणे हे प्रसंग घडले तरी अनवस्था प्रसंग येत नाही

या व अशा मोठ्या ट्रेकमध्ये बायनॉक्युलर, कॅमेरा या गोष्टी असणे चांगले पण ट्रान्झीस्टर शक्यतो नेऊ नये अगदी आवश्यक सामान तेवढेच घ्यावे प्रत्येका-जवळ बूट, जादा मोज्यांचे जोड, टोपी, वॉटरबॉटल, टॉर्च, चाकू व पुरेशा प्लॅस्टिक पिशव्या असल्याच पाहिजेत थोड्या सेफ्टीपिनाही हव्यातच

एव्हरेस्ट ट्रेक किंवा इतर हिमालयीन पदभ्रमणात थंडीपासून संरक्षणासाठी गरम कपडे, लोकरीचे हातमोजे व पायमोजे, माकड टोपी, स्लीपिंगबॅग, स्नोगॉगल या गोष्टी आवर्जून घ्याव्यात हिमालयातील पाऊस वा हिमवर्षावास नुसती छत्री वा रेनकोट गैरसोयीचा ठरतो परंतु प्लॅस्टिकचे पोत्याचा तळ डोके त्यातून जाईल इतका कापून अशी मोठी पिशवी जवळ ठेवावी मोठ्या कडाची हॅट असेल तर पाऊस आणि हिमवर्षावापासून पुरेसे संरक्षण मिळते पँट गुडघ्यापर्यंत दुमडून घेतली की सर्व कपडेही कोरडे राखता येतात अशा प्लॅस्टिकच्या आवरणाने हातापायाची हालचाल सुलभ होऊ शकते शक्य असेल तर फोल्डिंग छत्रीचाही याशिवाय उपयोग करावा रकसॅकमधील कपडे, पुस्तके, इतर सामान वेगवेगळ्या प्लॅस्टिक पिशव्या-मधून गुंडाळून ठेवीत जावे

हिमालयात फोटो काढताना कॅमेऱ्याच्या भिंगास अल्ट्रा व्हायोलेट फिल्टर बसविणे अत्यावश्यक आहे रंगीत फोटो वा स्लाइडस्‌साठी ६४ ए एस् ए चा रोल

वापरावा तसेच कृष्णधवलसाठी १२५ किंवा १६० ए एस् ए चा रोल वापरावा म्हणजे सोयीचे ठरते भल्या पहाटे सूर्योदय, सकाळी सिल्होटी व दुपारी वारकाव्या-सह चांगले फोटो येतात



## एव्हरेस्ट ट्रेक नव्या सुधारणा

दरवर्षी होणाऱ्या सुधारणामुळे काही नव्या गोष्टी आता तेथे जाणाऱ्या ट्रेकर्संना माहिती असाव्यात १९८६ मध्ये एका भारतीय रुपयाला नेपाळी चलनात एक रुपया सत्तर पैसे मिळत होते यापुढील सर्व रकमा नेपाळी चलनात लिहिल्या आहेत काठमांडू ते लुक्ला ही विमान वाहतूक रॉयल नेपाळ एअर कॉर्पोरेशनच्या टूरिस्ट फ्लाइट या विभागातर्फे चालविली जाते विमानात १५ किलोपर्यंत सामान वेगळा आकार न देता नेता येते याशिवाय फक्त ५ किलो जादा सामान ९ रु प्रतिकिलो असा जादा आकार देऊन नेता येते मात्र दरडोई २० किलोपेक्षा जास्त सामान नेण्यास अनुमती मिळत नाही नेपाळी व भारतीयाना ५५० रुपये तर इतरांना १२०० रुपये असे तिकीट काठमांडू लुक्ला विमान प्रवासास पडते १३ माणसाच्या गटासाठी १४ हजार रुपये घेऊन खास विमानही उपलब्ध करून दिले

जाते.

काठमाडू-जिरी विमान सेवा रॉयल नेपाळ एअर कॉर्पोरेशनच्या डोमेस्टिक-फ्लाइट तर्फे फक्त दर बुधवारी असते व त्यासाठी २५० रुपये तिकीट आहे

काठमाडूहून निघणाऱ्या एव्हरेस्ट फ्लाइटला ६८० रुपये पडतात

काठमाडू ते तेंगपोचे (थँगबोचे) पर्यंत सर्व मुक्कामाच्या जागी वीस रुपये घेऊन आंघोळीचे एक बादली पाणी मिळू शकते रात्रीच्या मुक्कामास ४ रु व जेवणासह मुक्कामास वीस रुपये पडतात

मुंबई ते दिल्ली साडेनऊशे रुपये व दिल्ली ते काठमांडू सोळाशे रुपये तिकीट आहे. मुंबई-दिल्ली प्रवासास १॥ तास पुरतो व २ तासात दिल्ली-काठमांडू प्रवास होतो तसेच मुंबई-कलकत्ता दोन तासाच्या प्रवासासाठी पधराशे रुपये आणि कलकत्ता-काठमाडू दोन तासाच्या प्रवासासाठी अकराशे रुपये पडतात हे तिकीट एकाच विमान कपनीचे घेतले तर दोन प्रवासाच्यामधील मुक्कामाची व्यवस्था ती कपनी मोफत करते

काठमांडू-जिरी बस सकाळी ५॥ ला निघते व ती जिरी मुक्कामी सायकाळी ५ वाजता पोहोचते त्रेपन्न रुपये तिकीट त्यासाठी आहे १२ जणांच्या जीपसाठी अडीच हजार रुपये पडतात ती थोडी लवकर पोहोचते

१९८६ मध्ये जिरी ते नामचे प्रवासात भारवाहक खालील दराने उपलब्ध होतात. त्या भारवाहकांना उक्ते पचेचाळीस रुपये दर दिवशी द्यावे लागतात किंवा पस्तीस रुपये दर दिवशी शिवाय त्यांच्या जेवणाचा खर्च आपल्याला द्यावा लागतो नामचे ते पुढील प्रवास व नामचेला परत ह्या ट्रेकवर उक्ते पचावन्न रुपये किंवा त्यांचे जेवणखाण अधिक चाळीस रुपये दर दिवशी द्यावे लागतात

भारवाहकाचे अनरजिस्टर्ड व रजिस्टर्ड असे दोन प्रकार आहेत रजिस्टर्ड भारवाहक घेणे सोयीचे त्याचा रजिस्ट्रेशन नबर टिपून ठेवावा एखाद्या शेर्पा एजन्सीतर्फे भारवाहक घेतला तर त्याना सव्वाशे रुपये दर दिवशी द्यावे लागतात

नामचे बझारला खारीक खोबरे काजू असलेले पाकीट बारा रुपयांना तर लाल तिखट शेंगदाणे बदाम या नावाने सहा रुपयांना मिळतात

ट्रेकवर सर्व वस्ती असलेल्या ठिकाणी बिन दूध साखरेचा चहा एक रुपया कप, बिनदुधाचा पण साखर घातलेला चहा दोन रुपया कप आणि साखर दूध घातलेला चहा तीन रुपये कपप्रमाणे मिळतो लेमनही तीन रुपये कपप्रमाणे मिळतो काळी कॉफी ३ रुपये कप तर नेसकॉफी ४ रुपये कपप्रमाणे मिळते कॅडबरी चॉकलेट ४५ रुपयाना तर बिस्कीटाचा पुडा ६ रुपयांना पडतो उत्तम तऱ्हेची वाडगाभर लापशी ६ रुपयांना मिळते

एव्हरेस्ट समोरच्या अनामिक शिखरावरून एव्हरेस्ट परिसराचा घेतलेला

अती उत्तम फोटो १२० रुपयाना मिळतो तो घेऊन फ्रेम करून घरात लावण्याजोगा आहे 'टॉप ऑफ वर्ल्ड' या नावाने तो विकत मिळतो

काठमांडू-जिरी-बसने (त्यामुळे ६-७ दिवस वाचतात) १ ला दिवस

जिरी-भडार-२ रा दिवस

भडार-सेटे-३ रा दिवस

सेटे-जुनबेसी-४ था दिवस

जुनबेसी मणिडिंगमा-५ वा दिवस

मणिडिंगमा खारीखोला-६ वा दिवस

खारीखोला-सुरक्या-७ वा दिवस

सुरक्या-मोंजो-८ वा दिवस

मोंजो-नामचे-९ वा दिवस

नामचे मुक्काम एव्हरेस्ट म्युझिअम १०॥ ते ४ वेळात पाहणे विश्रांती, स्थानिक खरेदी इ १० वा दिवस

नामचे- पुगीतँगा (शागबोचे खुमजुगला न जाता परस्पर) मार्गे तेंगपोचे (थँगबोचे)-११ वा दिवस

तेंगपोचे-पांगबोचेमार्गे फेरिचे-१२ वा दिवस

फेरिचेला हिमालयीन रेस्क्यू असोसिएशनतर्फे ब्रिटिश डॉक्टरकडून अँक्यूट माऊटन सिकनेस-अती उंचीवरील पर्वतीय विकार-याविषयी उत्तम माहिती दररोज सायकाळी तास दोन तासात दिली जाते ती मुद्दाम ऐकावी

फेरिचे- थुक्लामार्गे-लोबुजे-१३ वा दिवस

लोबुजे-गोरखशेप-कालापठार-अनामिक शिखर करून मुक्काम गोरखशेप-१४ वा दिवस

गोरखशेप-एव्हरेस्ट बेसकॅम्प पाहून येऊन मुक्कामास लोबुजे-१५ वा दिवस

लोबुजेहून-तेंगपोचे-१६ वा दिवस

तेंगपोचे-नामचे-१७ वा दिवस

नामचे-लुक्ला-१८ वा दिवस

लुक्ला-काठमांडू-१९-२० वा दिवस

असा कार्यक्रम करणे सर्वांत सोयीस्कर ठरते ही सर्व माहिती पुण्याच्या यूथ होस्टेलचे अनुभवी गिर्यारोहक-कार्यकर्ते श्री शाम लंके यानी उपलब्ध करून दिली याबद्दल मी व्यक्तिश त्यांचा अत्यंत आभारी आहे

## इन्स्टंट एव्हरेस्ट ट्रेक

काठमांडूहून विमानाने थेट लुक्ला गाठायचे लुक्ला येथे पोहोचण्याचा व दुसरा दिवस अँक्लमटायझेशनसाठी तिसऱ्या दिवशी लुक्ला ते नौचे, चौथ्या दिवशी

नौचे ते तेंगपोचे, पाचव्या दिवशी तेंगपोचे ते फेरिचे, सहाव्या दिवशी फेरिचे ते लोबुचे, सातव्या दिवशी लोबुचे ते गोरखशेप, आठव्या दिवशी गोरखशेप ते फेरिचे, नवव्या दिवशी फेरिचे ते पुगीतैंगा, दहाव्या दिवशी पुगीतैंगा ते लुक्ला, अकराव्या किंवा बाराव्या दिवशी लुक्ला ते काठमांडू विमानाने परत. यातील बाकी तपशील वरच्या एव्हरेस्ट ट्रेक प्रमाणेच

## एव्हरेस्टवर ट्रेकमध्ये काही जादा ठिकाणे

१) फेरिचेहून दिंम्बोचे (१४५००'/४४१२ मी.) हे जगातील सर्वांत उचावरचे कुरण पाहून येणे, एक दिवस पुरतो

२) खुमजुगहून अतिशय नयनरम्य असे गोक्यो लेक (१५६००'/४७५० मी) पाहाण्यास खुमजुग (१२४३५'/३७९० मी) ते फोर्त्से अथवा फोर्चा (१२६१७ फूट ३८४२ मी) ४ तास, त्यापुढे ५ तासात ल्हाबर्मा अथवा लापर्मा (१४१७२'/४३१९ मी) हा एक दिवसाचा प्रवास लापर्मा ते मच्छेर्मो (१४४६६'/४४०९ मी) हा दुसऱ्या दिवसाचा टप्पा मछेर्मा ते गोक्यो लेक पाहून परत मुक्काम मछेर्मा. मछेर्मा ते लापर्मा– हा चौथ्या दिवसाचा प्रवास लापर्मा ते खुमजुग ५ वा दिवस.

३) मिनी एक्सपिडीशन म्हणून नेपाळच्या परवानगीने एव्हरेस्ट (२९०२८'/८८४८ मी) व खुबुत्से (२१७८५'/६६४० मी) या शिखरामधील ल्होला ह्या १९७०५/६००६ मी उचीच्या खिडीत जाऊन येता येईल

## ट्रेकिंग

नुसत पाठीवर सामान घेऊन दुर्गम भागात पायपीट केली तर त्याला ट्रेकिंग म्हणता येणं कठीण आहे या पायगाडीच्या प्रवासात दिसणारा निसर्ग व परिसराच निरीक्षण करण, काही टिपण करण, कॅम्पिंग, कॅम्पफायर, कॅम्पवरील स्वयपाक यामध्ये सहभागी होण हे खर ट्रेकिंग जिवाच्या करारावर धाडस करण म्हणजे मर्दुमकी असू शकेल, पण ट्रेकिंग हे समाधानासाठी, निसर्गाच्या जवळ जाण्यासाठी अन् शहरी गजबजाट व प्रदूषणापासून दूर जाण्यासाठी केलेली अनगड पगडडीच आहे TREK = ट्रेक हा दक्षिण आफ्रिकन शब्द आहे HIKE हाइक असाही एक शब्द प्रचलित आहे.

## केव्हा, कुठं अन् कस ?

आपल्याजवळ उपलब्ध असणारा वेळ, पैसा, शारीरिक ताकद, सवगडी, अन् मुख्य म्हणजे इच्छा असण सर्वांत महत्त्वाच उत्तरदिशीचा देवतात्मा हिमालय

ए.. १७

बर्फाळ शिखराच्या टोप्या घालून बसलाय तर पश्चिम दिशी वीरात्मा सह्याद्री लेणी-किल्ले अन् गिरी-मंदिरानी सजलाय. हिमालयात भटकायला सप्टें–ऑक्टो ते मे–जून हा मोसम सर्वांत उत्कृष्ट तर ऑगस्ट-सप्टें ते डिसें-जाने हा सह्याद्रीतील सुखद काळ हिमालयात अतीउंचीमुळे व सुखद गारव्यामुळे दमायला होत नाही तिथे पाण्याचही वैपुल्य आहे सह्याद्रीत मात्र गरम हवामानामुळे माणूस लवकर दमतो आणि बऱ्याच प्रमाणात पाण्याचाही तुटवडाच भासतो हिमालयातील पदभ्रमणात तंबू व स्लिपिंग बॅग (निद्राथैली) असण सोयीच तर सह्याद्रीत त्याची फारशी गरज नाही

कोणत्याही ट्रेकवर सकाळची वेळ अतिशय सोयीस्कर भल्या पहाटे उठून सर्व आवरून चालू लागाव, ते अगदी सूर्य डोक्यावर येईस्तोवर दुपारच्या जेवण व विश्रांतीत चांगले २–३ तास घालवून सेकंड इनिंग चालू करावी ती ४॥–५ पर्यंत एका दिवसात ८–१० तास चालणं अन् काही हजार फुटाची चढ-उतार करताना सरासरी १० ते १५ मैल / १५ ते २५ कि मी एवढा टप्पा हिमालयात गाठता येतो मात्र ट्रेकिंगचा कार्यक्रम फार दमणूक होईल असा आखू नये कारण त्यामुळे ट्रेकिंगमधील गमतच निघून जाते आपली आवड, आपले वय व आपला गट यावर रोज किती पायपीट करायची हे ठरवायला हव

बऱ्याच जणांच्या बाबतीत ९००० फूट / २५०० मीटर नतर पर्वतीय विकाराची (हाय अल्टिट्यूड सिकनेसची) बाधा झालेली आढळते तर काहीजणाना १८००० फूट /५००० मीटर नंतर तसा त्रास जाणवतो श्वसनाला त्रास होणे हा फुफ्फुसाचा विकार, तर निळसर ओठ होण्याच्या लक्षणावरून हालचालीत मदत्व येण, शुद्ध जाणे आदी मेंदूजन्य किंवा मज्जासंस्थेचे विकार हे दोन प्रमुख प्रकार आढळतात पर्वतीय विकारात नेहमीपेक्षा लघवीला फार कमी होते (पर्वतीय विकाराचा त्रास न होणाऱ्याना लघवी जास्त होते) डोकेदुखी, अन्नावरील वासना कमी होणे वा पूर्ण जाणे, अपचन, उलट्या होणे, श्वासोच्छ्वासास त्रास होणे, झोप अपुरी लागणे वा अजिबात न लागणे, प्रचंड थकवा जाणवणे, सारखी चक्कर येणे, छाती भरून आल्यासारखे वाटणे, ओठ, जिभेचे अग्र, चेहरा निळसर होणे इ लक्षणांवरून पर्वतीय विकाराची बाधा झाल्याचे ओळखता येते त्वरीत खाली जाणे व त्या उंचीचा सराव झाल्यावर हळूहळू वर जाणे, तसेच डॉक्टरचा सल्ला घेऊन औषधोपचार करणे हे योग्य

पण पर्वतीय विकाराची बाधाच होऊ नये म्हणून ९००० फुटानतर २५०० मी / नतर पुढील प्रत्येक ३००० फूटासाठी/१००० मीटरसाठी ४–६ दिवस लावणे श्रेयस्कर कमी वेळामुळे यापेक्षा अधिक उंची गाठणे अत्यावश्यकच असेल, तर ॲसिटाझोलमाइड (Acetazolamide) किंवा डायमॉक्स (Diamox) २५ मि. ग्रॅ ची एक

गोळी अशा एकूण तीन गोळ्या दिवसात घ्याव्यात किंवा फ्युरिसोमाइड (लॅसिक्स) (Furisomide lasix) ८० मि ग्रॅ ची एक गोळी अशा एकूण दोन गोळ्या दिवसात घेतल्यास त्रास होत नाही मात्र कोणत्याही परिस्थितीत सातत्याने एक आठवड्यापेक्षा जास्त काळ या गोळ्या घेऊ नयेत या गोळ्या घेतल्याने लघवीच्या प्रमाणात जाणवण्याइतकी खूप वाढ होते त्यामुळे जादा पाणी व क्षाराचे प्रमाण पोटात जाणे अत्यावश्यक आहे मात्र ही सर्व औषधयोजना बरोबर असणाऱ्या डॉक्टरच्याच सल्ल्याने करावी

जागच्याजागी बरेच पळणे, मैदानात पळणे, दीर्घ श्वासोच्छ्वास किंवा प्राणायाम याचा सराव अशा हिमालयन ट्रेकिंगच्या आधी केल्यास त्याचा लक्षणीय फायदा जाणवतो ट्रेकिंगचा किंवा खूप सामान वाहून नेण्याचा सराव असेल तर उत्तमच

हिमदंश म्हणजे फ्रॉस्टबाइट हा प्रकार गिर्यारोहण मोहिमाबाबतच घडण्याची शक्यता असते ट्रेकवर हिमदंशाची बाधा होण्याची शक्यता जवळजवळ नसतेच

हिमांधत्व म्हणजे स्नोब्लाइंडनेस मात्र बर्फाळ प्रदेशात भटकती करताना होण्याची थोडीफार शक्यता असते अती उंचीवर मुळातच अल्ट्रा व्हायोलेट किरणाचे प्रमाण जास्त असते बर्फाळ परिसरात ते किरण परावर्तित झाल्याचे दृश्यप्रकाश व अतीनील किरण डोळ्यांस इजा करू शकतात शेकडो सुया आणून टोचल्यासारख्या वेदना होणे, डोळ्यातून पाणी येत राहणे, न दिसणे, डोळेही न उघडवणे हा त्रास होतो त्यासाठी स्नो गॉगल म्हणजे गॉगल घातल्यावर बाहेरून डोळ्यातील बाहुल्या (बुबुळे) न दिसण्याइतक्या गडद काचा असणारा, शक्यतो हिरव्यागार काचांचा गॉगल (निळ्या मात्र नकोच नको) अशा ठिकाणी वापरल्यास हे तात्पुरते येणारं हिमांधत्व टाळता येते.

वैद्यकीय सहाय्यासाठी उपयुक्त औषधे

(एव्हरेस्ट ट्रेकसाठी शक्यतो आपल्या गटात एकतरी डॉक्टर घ्यावा व त्याच्याच सल्ल्याने औषधे वापरावीत )

ॲस्पिरिन – डोकेदुखी, अंगदुखी

(Boots) (5 gm)

मेक्झाफार्म – जुलाब प्रतिबंधक

(Ciba)

बेलफळाचा मुरबा – जुलाब, आव झाल्यास घेणे

स्ट्रेप्टोपॅराक्सिन – तीव्र जुलाबांवर उपयुक्त

(Knoll)

इलेक्ट्राल पावडर – जुलाब होत असल्यास पाण्यात विरघळवून घेणे

स्टेमॅटिल - उलटी होऊ नये म्हणून

(MUB 5 mgm)

लॅरगॅक्टील – उलट्या थांबण्यासाठी
(MUB)
पेनिट्रायड – सौम्य इन्फेक्शनवर उपयुक्त.
(MUB)
(मात्र पेनिसिलीनची ॲलर्जी नसावी.)
टेरामायसिन SF – तीव्र इन्फेक्शनसाठी
(Pfizer) (250 mgm)
Baralgan – Colicky pains वर उपयुक्त
(Hoechst)
NE–BA–SULF पावडर – सर्व प्रकारच्या जखमावर उपयुक्त
(Dumex)
बँडेज व कापूस – जखमांवर बांधण्यासाठी
बेन्झीन – जखमांवर लावण्यास
बॅर्नाल – भाजणे, कापणे, खरचटणे यांवर उपयुक्त.
लॉक्युला सोल्युशन – डोळे लाल होणे, डोळ्याची आग होणे इ साठी
क्लोरोमायसेटिल ॲप्लीकॅप्स – नेत्रविकारांवर
(PUD)
क्लोरोमायसेटिन टॉपीकल – कर्ण विकारावर
(PUD)
क्रेप बँडेज – हात-पाय लचकणे, मुरगळणे, मुडपणे इ वर
(६ इंच रुंदीचे)
आयोडेक्स मलम – हात-पाय मुरगळ्यावर
रिलॅक्सिस ऑइंटमेंट – कातडीवरून लावण्यासाठी स्प्रेन, स्नायू दुखावणे इ वर
स्टिकिंग प्लॅस्टर – बूट चावणे, (ब्लिस्टर) जखमांवर लावणे इ साठी
बारीक कात्री, बॉटल ओपनर, नेलकटर, नाचकण अथवा टोकदार फोरसेप, सेफ्टिपिना

अर्थात ट्रेकवर आवश्यक ठरणारी औषध योजना हा वेगळ्या लेखाचा विषय होऊ शकेल अनुभवानंतर आपण यात काही कमीजास्त करू शकतो

# नेपाळ हिमालयातील आणखी काही ट्रेक्स

## हेलंबू व्हॅली

काठमांडूच्या उत्तरेस ४५ मैलावर असणाऱ्या हेलंबूकडे जाणारा ट्रेक त्या

भागातील अप्रतिम सौंदर्य व सोयीस्कर वातावरण यामुळे नावाजला जातो मेलेम्ची खोला या नदीच्या खोऱ्यातील हा ट्रेक जुगाल हिमाल परिसरात आहे

## लांगटांग व्हॅली

लांगटाग लिरूग शिखराच्या परिसरातील भटकती, याला चीज फॅक्टरी (१५,८००'/४८१५ मी ) त्याजवळील नैसर्गिक तलाव, क्यांगजिन गुफा, लागसिसा कुरण ही या ट्रेकची आकर्षणे आहेत

## जोमसोम ट्रेक

मुक्तिनाथ मंदिर, मत्स्यपुच्छरे, अन्नपूर्णा, धवलगिरी, निलगिरी इ शिखरांचे रम्य दर्शन, ततोपाणी (तप्तपाणी) येथील गरम पाण्याचे झरे, रूप्से छहारा धबधबा ही या भागातील प्रेक्षणीय ठिकाणे आहेत

## अन्नपूर्णा हिमाल

घाचोककडे नेणारा हा ट्रेक मोडी, मार्डी आणि सेटी खोऱ्यांमधून अन्नपूर्णा रागेचे विलोभनीय दर्शन घडवितो

## घनद्रुग ट्रेक

अन्नपूर्णा व मत्स्यपुच्छरे शिखराचे दर्शन घडविणारा हा ट्रेक गुरूग वस्तीतून जातो पोखरा परिसरातील सौंदर्य अतुलनीय आहे

## रारा तलाव

गूढ निळाईने भरलेला रारा तलाव ९७८० फूट उचीवर आहे ५ चौरस मैल क्षेत्रफळाचा हा तलाव ३। मैल लाब व १। मैल रुद आहे घुर्ची लगा शिखर, चखेलीदडा शिखर, जुम्लाचा विमानतळ इ ही येथील आकर्षणे आहेत

## मानांग ट्रेक

अन्नपूर्णाच्या उत्तरेकडील भागात जाताना १२००० फूट उचीची खिड ओलाडावी लागते तिबेटी प्रभाव जाणवणारा हा प्रदेश आहे अन्नपूर्णा, गगपूर्णा, लामजुग हिमाल, मानांग भोट जवळील तलाव, १७००० फूटी थोरोंग ला खिड, मुक्तिनाथ मदिर, काळी गडकी इ ठिकाणे या ट्रेकमध्ये बघता येतात

अर्थातच एव्हरेस्ट ट्रेक तो एव्हरेस्ट ट्रेकच त्याची सर अन्य कोणत्याही ट्रेकला नाही. परतु वर उल्लेखलेल्या इतर ट्रेकची मजा लुटायलाही काही हरकत नाही

# भारतीय गिर्यारोहण

# १७ भारतीय गिर्यारोहण

## भारतीय गिर्यारोहण

उत्तरदिशी देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजा।

बद्रीनारायण, केदारनाथ, अमरनाथ, हेमकुड-लोकपाल, गगोत्री, गोमुख, यमुनोत्री, कैलास-मानस, वैष्णोदेवी, पशुपतीनाथ, मुक्तिनाथ अशी एक ना दोन हजारो तीर्थक्षेत्रे आपल्या हिमालयात विखुरलेली आहेत हिंदी उपखडाच्या उत्तरेस असणारा हिमालय आता बदललेल्या राजकीय नकाशामुळे अफगाणिस्थान, थोडचा प्रमाणात रशिया, पाकिस्तान, चीन, तिबेट, हिंदुस्थान, नेपाळ, भूतान, ब्रह्मदेश अशा देशांमध्ये हिमालयाच्या रागा- उपरागा- फाटे- उपफाटे पसरले आहेत भारतीय उपखडाच्या प्राणवाहिनी ठरलेल्या सिंधु-गगा-यमुना- ब्रह्मपुत्रा आणि कितीतरी उपनद्या हिमालयातून उगम पावून भारतीय प्रदेश सुजलाम सुफलाम करीत आल्या आहेत.

या उपकारकर्त्या हिमालयाचा ' आँखो देखा हाल ' सर्वांच्या मनावर ठसविण्याच्या उद्देशाने बहुदा अनादिकालापासून हिंदू धर्मवेत्त्यांनी भारतीय जनमानसात हिमालयीन तीर्थक्षेत्राच्या यात्रा करण्याचा प्रघात रुजवला असावा काश्मीर ते कन्याकुमारी अन् कच्छ ते कामरूप पसरलेल्या हिंदुस्थानातील भाविकांचा पायरव गेली कित्येक शतके हिमालयात अखडपणे सुरू आहे भाविकांच्या या झुडी अफाट श्रद्धेने तिथ जात आहेत तिथल्या हिमशिखरावर पदन्यास करताना असणारी विजयाची धुंदी त्यात नाही विराट विश्वाच्या साक्षात्कारामुळे दबून गेलेल्या सामान्य माणसाची लीनता तिथे प्रकटते

आता मात्र मनू साफ बदलला आहे निष्पाप भाविक जीवाची वर्दळ कमी होऊन आता तिथे रक्ताची तहान लागलेले सेनानी हिंडू फिरू लागले आहेत

'हिमालयाचे तट', आता पेटून उठले आहेत पण याच काळात तारुण्यानं मुसमुसलेली अन् उत्साहान रसरसलेली हिंदी युवापिढी निसर्गदर्शनासाठी, जीवनातला थरार अनुभवण्यासाठी, उल्लंघिण्या हिमशिखरावर चढण्यासाठी मोहिमा काढीत आहे

भारतीय गिर्यारोहणाची पहाट फुटली ती केवळ पाश्चात्त्यांच्या इथल्या आगमनाने जिथे इतर पर्वतराजी संपतात, त्या उंचीवर कोठे हिमालयाची सुरुवात होते आल्पस्, अँडीज्, रॉकीज अशा पर्वतांची मोहिनी पाश्चात्त्यांना पडली होती पण पृथ्वीचा मानदंड असलेल्या हिमालयो नाम नगाधिराजाने त्यांना घातलेली भुरळ अतुलनीय आहे

हिमालयात जायचं तर तिथली डोंगरशिखरं, हिमनद्या, खिंडी, पायवाटा, गाव, अडीअडचणी, नद्या– ओढे अशा साऱ्यांची माहिती [illegible]
सत्ताधीश इंग्रजांनी हिमालयाचीही पाहणी, आखणी, मोजणी, नोंदणी करण्याचं ठरवलं त्यांना एतद्देशीय जाणत्यांचं मार्गदर्शन व मदतही लाभली

१८६० साली या मोजणीकार्यात गुंतलेल्या एका भारतीयाने (खलासी असा त्याचा उल्लेख आढळतो) ७०१०४ मी / २३००० फूट उंचीचं 'शिला' हे शिखर गाठलं ही झेप घेणाऱ्या 'खलासी'ला त्या शिखराची उंची माहिती नव्हती आणि आपणा करंट्या भारतीयांना तर त्या वीराचं नावही माहिती नाही इतक्या उंचीचं भारतीय उपखंडातलं पादाक्रांत झालेलं हे पहिलंच शिखर होतं मात्र या शिखरावरील पदन्यासाचं उद्दिष्ट होतं नकाशा बनवण्यासाठी सर्वेक्षण करणं केवळ गिर्यारोहण नव्हे

पुढे १८६५ ते १८८५ या प्रदीर्घ कालखंडात 'पंडित ब्रदर्स' नावाने ओळखले जाणारे नैनसिंग व किशनसिंग म्हणजे नकाशा नोंदणी शास्त्रातील एक चमत्कारच मानला जातो १८६५ ते १८६७ या काळात नैनसिंगाने लडाख ते ल्हासा आणि १८७८ ते १८८२ या काळात किशनसिंग याने तर दार्जिलिंग ते मंगोलिया असा प्रवास तर केलाच, पण या साऱ्या परिसराचा नकाशा लिहायलाही मदत केली त्यांची निरीक्षणे व नोंदी आजही उत्कृष्ट समजल्या जातात याच काळात एव्हरेस्टला प्रदक्षिणा घालण्याचा मान हरिराम याने मिळविला

१८८३ मध्ये डब्ल्यू डब्ल्यू ग्रॅहॅम हिमालयात उतरला तो गिर्यारोहणासाठी तोपर्यंत व्यापार, धर्मप्रचार, सर्वेक्षण, शिकारी, निसर्गदर्शन, थंड हवा खाण्यासाठी येणारे [illegible]
[illegible] हिमालयात येऊन गेले होते ह्या पाश्चात्त्य गिर्यारोहकाने सिक्कीममधील कांचनगंगेची पाहणी केली– ते आव्हान जोखले नंतर नंदादेवीच्या दुर्लंघ्य परिसरात शिरकाव करून घेतला आणि मग दुनागिरी व चांगभांग या शिखरांवर चढाईचे प्रयत्न केले ते दुर्दैवाने अयशस्वी ठरले भारतीय गिर्यारोहणाची

ही सुरवात मानली जाते पण प्रत्यक्षात १९२८ मध्ये हिमालयन क्लब १२७ सभासदांसह सुरू झाला त्याच वर्षी एरिक शिप्टन व बिल टिलमन या 'टेरिबल टिवन्स्' म्हणून प्रख्यात असलेल्या जोडगोळीने नदादेवी शिखर परिसरातील कामेट (७७०० २५ मी /२५२६३ फूट) हे शिखर जिंकले इतक्या उंचीचे गाठले गेलेले हे पहिलेच शिखर ठरले

पुढे १९५१ मध्ये डून स्कूल मधील गुरुदयाल सिंग या भारतीय शिक्षकाने त्रिशूळ शिखर(७१२० मी / २३३६० फूट) मोहीम आखली व यशस्वी केली आर एल होल्डस्वर्थ आणि जे टी एम गिब्सन या युरोपीयनांची मदत या मोहिमेसाठी झाली होती

१९५३ मधील पहिल्या एव्हरेस्ट विजयात एडमड हिलरीबरोबर तेनसिंग नोर्गे हा भारतीयही सहभागी झाला होता कर्नल हटच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश तुकडीने सर्वोच्च शिखर सर करण्यात यश मिळवले भारतीय गिर्यारोहकाना त्यामुळे जागतिक पातळीवर मान्यता मिळाली पडित जवाहरलाल नेहरू या दूरदृष्टीच्या पतप्रधानानी दार्जिलिंग (बगाल) येथे गिर्यारोहण प्रशिक्षण सस्था सुरू करण्याचा व त्यात तेनसिंग नोर्गे याना मुख्य कामगिरी देण्याचा उत्तम निर्णय घेतला दार्जिलिंगच्या हिमालयीन माऊटेनिअरिंग इन्स्टिटयूटशिवाय, उत्तरकाशीची नेहरू इन्स्टिटयूट ऑफ माऊटेनिअरिंग, मनाली येथील वेस्टर्न हिमालयन माऊंटेनिअरिंग या सस्थामधून गिर्यारोहणाचे प्राथमिक व प्रगत अभ्यासक्रमाचे शिक्षण मिळते

हिमालय- एव्हरेस्ट आणि गिर्यारोहण क्षेत्रात हिंदुस्थानचे स्थान आघाडीवरचे आहे पण तरीही अनेक त्रुटीचे लाजीरवाणे प्रदर्शन आपल्याकडे प्रत्यही घडते डझनभर एव्हरेस्टवीर, राष्ट्रीय पातळीवर गिर्यारोहणाचे प्रशिक्षण देणाऱ्या प्राथमिक व प्रगत अभ्यासक्रम राबविणाऱ्या ३-४ सस्था, शेकडो गिर्यारोहण मडळे, इडियन माऊटेनियर- हिमालयन माऊटेनियरिंग जर्नल, हिमालयन जर्नल- हिमवत अशी नामवत नियतकालिके, इडियन माऊटेनियरिंग फौंडेशन सारखी आतरराष्ट्रीय दबदबा असलेली विख्यात सस्था हा डोलारा पोकळ तर नाही ना, अशी शका मनात येते

गिर्यारोहणास लागणारी साधी हॅवरसॅक/ बॅकपॅक किंवा रकसॅक भारतात सहजासहजी उपलब्ध होऊ शकत नाही याचा अर्थ काय समजावयाचा ? मनाली- उत्तर काशी- दार्जिलिंग येथे प्रशिक्षणार्थ गेलेल्या युवक-युवतीना येणारे अनुभव भयानक आहेत तेथील कारभार मनाला उद्विग्न करणारा असतो भारतसरकार व राज्य शासनाच्या ॲडव्हेंचर प्रमोशन प्रोग्राम या कागदोपत्री गोंडस भासणाऱ्या योजनेचे कसे धिडवडे नोकरशाहीने काढले आहेत, याचा तपास करण्यासाठी खास सशोधनही करावे लागत नाही चागल्या दर्जाचे गिर्यारोहण साहित्य देशात तयार

होत नाही, परदेशातून ते आणता येत नाही आणि मुख्य म्हणजे गिर्यारोहण हा धाडसी खेळ आहे हीच कल्पना अनेकांना मान्य होत नाही या साहसी क्रीडा-प्रकाराला म्हणावी तशी मानमान्यता मिळालेली नाही. एव्हरेस्टप्रमाणेच इतर शिखरे चढणे तितकेच महत्त्वाचे, क्वचित थोडेफार अवघडही आहे, याची जाणीवच आढळत नाही महाराष्ट्रात अनेक नामवंत गिर्यारोहक असताना गिर्यारोहणासाठी असणारे महाराष्ट्र राज्य शासनाचे 'छत्रपती शिवाजी क्रीडा पारितोषिक' अद्याप कोणालाच का दिले गेले नाही ?

गिर्यारोहणात अत्यावश्यक ठरणारे टोपो शीटस् म्हणजे अती अचूक नकाशे मिळवण्यात येणाऱ्या अडीअडचणी आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या लाडघा-लबाड्या या गोष्टींवर कोणी फारशी चर्चाही करत नाही. पाश्चात्त्य राष्ट्रात असे प्रमाणबद्ध नकाशे सहजासहजी उपलब्ध होतात त्यांच्याकडे हे नकाशे मिळणे अव-घड नसते नकाशामुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येत असेल तर हेरगिरी करणाऱ्या उपग्रहांनी साऱ्या जगातील इचन् इच न्याहाळता येतो ही वस्तुस्थिती कशी नाकारणार ?

एव्हरेस्टवर विजयाचे झेंडे फडकविताना ताठ झालेली भारतीयाची मान हा दिव्याखालील अंधार पाहताना ओशाळून खाली जाते. हे औदासीन्य दूर होणार असेल, ही लाजीरवाणी परिस्थिती सुधारणार असेल तरच या भारतीय हिमालयीन आणि एव्हरेस्ट मोहिमांना अर्थ आहे अन्यथा–'नाव मोठं–लक्षण खोटं' ही परि-स्थितीच उरेल

हिमालयापासून दूर असूनही महाराष्ट्रातील, त्यातल्या त्यात पुणे-मुंबईतील, अक्षरश: शेकड्यांनी, नव्हे, हजारांच्या घरात तरुण-तरुणी हिमालयात दर वर्षी जातात त्यातही धंदेवाईकपणा शिरू पाहतो आहे, हे मात्र चांगले चिन्ह नाही ट्रेकिंग, यात्रा, स्थलदर्शन आणि प्रत्यक्ष शिखर मोहिमा यासाठी ही तरुण पिढी त्या दुर्गम डोंगरदऱ्यात जात आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे गिर्यारोहणाचे नवे अध्याय लिहिले जात असतानाच काही अपघात–दुर्दैवी घटनाही घडत आहेत अर्थात हे धोके गिर्यारोहणात अभिप्रेत आहेतच पण तरीही उत्तुंग हिमशिखरांवर जाऊन आलेले सर्वजणच म्हणतात . हिमालया, आम्ही पुन्हा येणार आहोत.

## आय् एम्. एफ्.–भारतीय पर्वतारोहण संस्थान

१९५७ साली केकी बुन्शाच्या नेतृत्वाखाली चो-ओयू शिखरावर जाण्यासाठी एक भारतीय मोहीम सज्ज झाली होती त्यासाठी 'स्पॉन्सरिंग कमिटी ऑफ द चो ओयू एक्सपीडीशन' या नावाने एक समिती स्थापन झाली १५ मे १९५८ रोजी या मोहिमेने स्पृहणीय यश मिळवले पुढे आघाडीवरील गिर्यारोहकांच्या

शिफारसीवरून तिचे नाव १९५९ मध्ये ' स्पॉन्सरिंग कमिटी ऑफ एव्हरेस्ट एक्सपीडीशन ' असे करण्यात आले नतर मात्र पुन्हा हे नाव बदलून ' स्पॉन्सरिंग कमिटी फॉर माऊंटेनियरिंग एक्सपीडीशन्स ' असे केले गेले १५ जानेवारी १९६१ रोजी इडियन माऊंटेनियरिंग फाऊंडेशन (आय् एम् एफ् )' अथवा ' भारतीय पर्वतारोहण सस्था ' म्हणून तिचे नामांतर करण्यात आले ३ नोव्हेंबर १९६१ रोजी सरकारदरबारी नव्या नावाने या सस्थेची नोंदणी करण्यात आली आता बेनिटो जुआरेस रोड, नवी दिल्ली ११००२१ येथे प्रशस्त जागेत टुमदार इमारतीत या सस्थेचे कार्यालय आहे

सुसज्ज ग्रथालय, सग्रहालय, सभागृह, भाडारगृह आणि छोटेसे निवासस्थानही या वास्तूत सामावलेले आहे एका नव्या कृत्रिम कातळभितीची योजनाही त्या परिसरात साकारणार आहे भारताच्या उत्कर्षाला, धाडसी बाण्याला व भवितव्यावरील विश्वासाला अर्पण केलेली ही वास्तू व ही सस्था एक अभिमानस्थान आहे शिखरामागून शिखरे सर करण्यास प्रेरणा देणारी भारतीय पर्वतारोहण संस्था स्वत च एक कीर्तिशिखर आहे असे म्हटले तर ते योग्यच ठरेल

चो ओयू, अन्नपूर्णा-३, नीळकठ, नदादेवी—मुख्य व पूर्व, एव्हरेस्ट, चोमोल्हारी, सासेर कांग्री, ब्रह्मा-१, चागभाग, कामेट, रतबन, शिवलिंग आणि हिमालयन ट्रॅव्हर्स ह्या मोहिमा म्हणजे सस्थेच्या इतिहासातील मानाचे तुरे आहेत

भारतीय गिर्यारोहण मोहिमाना अर्थसहाय्य मजूर करणे, त्याना गिर्यारोहण साहित्य उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणे, परदेशी मोहिमांना भारतीय शिखरांवरील चढाईस प्रोत्साहन देणे व मदत करणे, गिर्यारोहण मोहिमांना हवामान अहवाल पुरवणे, भारतीय हिमालयातील पर्यावरणाकडे लक्ष देणे, अपघात व गभीर आजार प्रसगी भारतीय सेनादलाच्या सहाय्याने मदत पथके पाठवणे, इडियन माऊंटेनियर हे अर्धवार्षिक प्रकाशित करणे, थोर कामगिरी केलेल्या भारतीय गिर्यारोहकांना सुवर्णपदक देऊन त्याचा सन्मान करणे, गिर्यारोहण क्रीडाप्रकाराचा सर्वांगीण विकास घडवणे अशा अनेक जबाबदाऱ्या या सस्थेकडे सोपविण्यात आल्या आहेत अलीकडेच गिर्यारोहणातील आजार—अपघात व मृत्यू यासाठी काही मदतनिधी आय् एम् एफ् ने निर्माण केला आहे गिर्यारोहण प्रशिक्षणासाठी काही शिष्यवृत्याही सस्थेने ठेवल्या आहेत

गिर्यारोहण मोहिमांमध्ये भाग घेणाऱ्या सभासदाना खास जादा रजा (स्पेशल कॅज्युअल लीव्ह) मिळवून देण्यासाठी आय् एम् एफ् ची अशा मोहिमांना मान्यता असणे आवश्यक असते

भारतीय गिर्यारोहणाची साद्यत माहिती जमा करणे, ती प्रकाशित करणे, त्यासाठी प्रदर्शने, चर्चासत्रे, सभा-समेलनांचे आयोजन करणे याकडेही सस्थेचे लक्ष

असते

इंडियन मौन्टेनियर ह्या अर्धवार्षिकाचे प्रकाशनही या संस्थेतर्फे करण्यात येते १९७८ पासून सुरू झालेल्या या अर्धवार्षिकाचे आजवर सोळा अंक प्रकाशित झाले आहेत शिवाय हे करा–हे करू नका, नंदादेवी शिखर मोहीम, आय् एम् एफ् संस्था परिचय आणि १९८४ ची गिर्यारोहण व पर्यटन परिषद अशी प्रासंगिक प्रकाशनेही संस्थेने प्रकाशित केली आहेत

## गिर्यारोहण विषयक लघुपट–

गिर्यारोहण करणं सगळ्यांना जमेलच असं नाही पण या धाडसी खेळातील रोमहर्षक नाट्य व थरार चित्रपटातून अनुभवणं आपल्या सगळ्यांना निश्चितच आवडेल गिर्यारोहणावरची पुस्तकं वाचणं, त्यासंबंधी चर्चा करणं, त्यासंबंधीचे फोटो पहाणं किंवा स्लाइडशो आयोजित करणं हे आपण करतोच पण गिर्यारोहकांनी पर्वताच्या क्रीडामंचावर ही धाडसे चित्रित केली आहेत परदेशात खाजगी-रीत्या असे चित्रपट चित्रण केले जाते आपल्याकडे मात्र त्यासाठी आपण सरकारच्या तोंडाकडे पाहतो हे काही खरे नाही

यातील काही फिल्मस् दूरदर्शनवरून दाखविल्या गेल्या आहेत तर काही भारत सरकारच्या 'फिल्ड पब्लिसिटी ऑफिस/क्षेत्रीय प्रसारण केंद्र' यांच्याकडे उपलब्ध होऊ शकतात

**एव्हरेस्ट मोहीम १९८४**

आय्. एम् एफ् व टाटा ऑईल मिल्स कं लि यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही ३५ मि मी ची ५० मिनिटांची रंगीत फिल्म तयार झाली आहे सिद्धार्थ काक यांचे मार्गदर्शन, दीपक हळदणकर यांचे चित्रीकरण, संजीव सैथ यांची मदत यामुळे ही फिल्म तयार झाली आहे नसिरुद्दीन शाह यांचे प्रभावी निवेदन आणि भास्कर चंदावरकरांचे पार्श्वसंगीत यामुळे हा लघुपट अधिक प्रभावशाली झाला आहे

**बचेंद्री पाल–एव्हरेस्ट पादाक्रांत करणारी १ ली भारतीय महिला गिर्यारोहक**

उत्तर काशीची ही पर्वतकन्या एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व बनले, ते तिच्या एव्हरेस्ट विजयामुळे तिच्या यशामागील प्रेरणा, तिच्या जीवनाची रूपरेषा यांचे यथार्थ चित्रण या ३५ मि मी च्या रंगीत ११ ५ मिनिटांच्या लघुपटात पहायला मिळते

**मीट द इंडियन एव्हरेस्ट टीम**

ही दोन भागातली ३५ मि मी ची साडेअकरा मिनिटांची रंगीत फिल्म आहे लडाख, गढवाल, सिक्कीम ते कर्नाटक अशा विविध भागातून आलेल्या तरुण भारतीय गिर्यारोहकांचा मागोवा घेणारा हा लघुपट आहे ४ पुरुष व १ महिला

गिर्यारोहकांना शिखरमाथ्यावर पोहोचविणाऱ्या या यशस्वी भारतीय मोहिमेची साद्यंत माहिती यामुळे मिळू शकते

**व्हेटेरन्स ऑफ एव्हरेस्ट–**

हीदेखील ३५ मि मी ची साडेअकरा मिनिटाची रंगीत फिल्म आहे कॅप्टन एम् एस् कोहली, मेजर एच् पी एस् अहलुवालिया, एच् सी सरीन, २००० वेळा एव्हरेस्ट माथ्यावरून उड्डाण केलेला कॅप्टन एमिलविच, वाडा रुटकीविक्स सोबत १९७८ मध्ये आणि १९८४ मध्ये बचेंद्रीपालबरोबर एव्हरेस्ट माथा गाठणारा आंग दोर्जी अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांची ओळख या लघुपटाद्वारे होते

**तेनसिंग दुडे**

३५ मि मी चा साडेअकरा मिनिटाचा हा लघुपट तेनसिंग नोर्गे या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नामवंताच्या एव्हरेस्ट विजयोत्तर जीवनाचा परिचय करून देतो एक्काहत्तराव्या वर्षीही हा वृद्धयुवा काय करतो याचे औत्सुक्य आपणाला असतेच या थोर गिर्यारोहकाचा रसीला परिचय या लघुपटाद्वारे होतो

**सर एडमंड हिलरी– १९८४**

तेनसिंगबरोबरच एव्हरेस्ट माथा गाठणारा हा गिर्यारोहक त्याचे जीवन, त्याची यशापयशे, मानसन्मान याबाबतची तपशीलवार माहिती आपल्याला मिळते हा न्यूझीलंडचा सुपुत्र पण शेर्पांच्या उन्नतीसाठी त्याने केलेल्या प्रयत्नांची भगीरथ गाथा आपल्याला अपरिचित आहे त्यावर या लघुपटातून अधिक प्रकाश टाकला आहे त्याने उभारलेल्या शाळा, पूल आणि दवाखाने यामुळे या शेर्पाभूमीचा चेहरामोहराच कसा बदलून गेला आहे हे आपणास कळते हा लघुपट रंगीत, ३५ मि मी चा व साडेअकरा मिनिटांचा आहे

**एव्हरेस्ट बेस कॅम्प**

नेपाळची 'एव्हरेस्ट इंडस्ट्री' म्हणजे काठमांडू ते एव्हरेस्ट पायथा, केली जाणारी पायी भटकंती या ३५ मि मी च्या साडेअकरा मिनिटांच्या रंगीत लघुपटात यथार्थपणे दाखवली आहे या पदभ्रमणात अनुभवता येणारे समृद्ध वन्यजीवन, खेडवळ नेपाळी मंडळींचे मनोगत आणि नव्या सुधारणा यांचा परिचय या लघुपटात घडतो

## आणखी दर्शनीय–

व्हर्डून भागातील फ्रान्समधील हजार फुटी (तीनशे मीटरची) कड्यावरील पॅट्रीक एडलिंगरची चढाई दाखवणारी 'ऑपेरा व्हर्टीकल' ही फिल्म थरारक आहे 'रिटर्न टू एव्हरेस्ट' ही एडमंड हिलरी व शेर्पा भूमीचा राजा असणारा एव्हरेस्ट यांचे भावनात्मक नाते उलगडविणारी फिल्म आहे 'शेर्पा' ही नेपाळी

भारवाहकाच्या जीवनाचे उत्कृष्ट चित्रण करणारी फिल्मही प्रेक्षणीय आहे 'टू द एण्डस् ऑफ द अर्थ' ही दक्षिण ध्रुव ते उत्तर ध्रुव प्रवासाचे चित्रण करणारी आणि रिचर्ड बर्टनचे कथन असणारी उत्कृष्ट फिल्म मानली जाते 'दि फ्रॅगाइल माऊटन' हा सद्रा मिकोल्झचा वृक्षसहार आणि जमिनीची धूप याचे भयानक परिणाम दाखवणारा प्रत्ययकारी लघुपट प्रत्येकाने पहायलाच हवा गिर्यारोहकाने आपल्या परिसराच्या अभिवृद्धीकडे लक्ष देणे कसे अपरिहार्य आहे, याचीच जाणीव हा लघुपट करून देतो 'एव्हरेस्ट द लास्ट अनक्लाइबड् रिज' या जो टास्कर आणि पीटर बोर्डमनच्या १७ मे १९८२ च्या चढाईचा माहितीपट उत्तम उतरला आहे 'गगा–८२' ही गगेची कहाणी सागणारी फिल्मही उल्लेखनीय आहे 'दाल पोलो अल् के-टू' आणि 'के-टू लो स्पिगीलो नॉर्ड' या लघुपटामधून काराकोरमचा राजा के-टू उर्फ कोगीरचे दर्शन घडते 'अमेरिकन्स ऑन एव्हरेस्ट' या फिल्ममध्ये पश्चिम कण्यावरून अमेरिकनांचे एव्हरेस्ट आरोहण दाखविले आहे 'माऊट एव्हरेस्ट– ईस्ट फेस' ही, एव्हरेस्टच्या पूर्व कड्यावरील आरोहणाची कथा चित्रित करणारी फिल्म आहे

या व अशा अनेक लघुपटांमधून गिर्यारोहणाच्या विविध अगांवर प्रकाश पडतो छोट्या-मोठ्या गिर्यारोहण व गिरिप्रेमी मंडळांनी फिल्मशोचे कार्यक्रम आखले पाहिजेत त्यासाठी इडियन माऊटेनियरिंग फौडेशन, भारत सरकारचे प्रसिद्धी खाते आणि अनेक परदेशांच्या वकिलाती याचे सहाय्य होऊ शकते या फिल्मस् दाखविणे हे खूपच कमी खर्चाचे असते आपले आपण प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे

—*—

'तिसऱ्या ध्रुवा'चा मानकरी

तेनसिंग नोर्गे



तेनसिंग नोर्गे

# १८ ‘ तिसऱ्या ध्रुवा ’चा मानकरी–तेनसिंग नोर्गे

२९ मे १९५३ ! जगातील सर्वोच्च शिखरावर मानवाचा दैदिप्यमान विजय !! शेर्पा तेनसिंग नोर्गे हा भारतीय आणि एडमंड हिलरी हा न्यूझिलंडचा गिर्यारोहक यांनी पृथ्वीवरील सर्वोच्च ‘ माऊंट एव्हरेस्ट ’ शिखरावर पाऊल ठेवले १९२१ पासून हॉवर्डबरी, ब्रूस, मॅलरी, आयर्विन, रटलज, मॉरीस, विल्सन, एरिक शिप्टन, हॅरॉल्ड विल्सन, डेनमान, टिलमन, लार्सन, डयूनांट, लॅम्बर्ट अशा खद्या गिर्यारोहकांना हुलकावणी देणाऱ्या एव्हरेस्ट शिखरमाथ्यावर पाऊल ठेवण्यात मानवाला यश मिळाले ब्रिटिश तुकडीला हे यश मिळाले. कर्नल हटच्या नेतृत्वाखालील गिर्यारोहण मोहिमेने ते खेचून आणले एलिझाबेथ राणीला राज्यारोहणप्रसंगी हा खास विजयी नजराणा त्या वेळी मिळाला

प्रसिद्धीचा प्रकाश अन् सुधारलेल्या जगातील पोरकट डावपेच यांच्या तावडीत तेनसिंगसारखा गिरिजन (शेर्पा) सापडला पण त्यातून तो लवकरच सावरला एव्हरेस्ट विजयाचा परीसस्पर्श झाल्याने तेनसिंगचे जीवनच बदलून गेले तेनसिंगच्या आयुष्याचा मागोवा आणि एव्हरेस्ट मोहिमांच्या कथा एकमेकांच्या अतूट भागच बनल्या आहेत चिरतरुण, स्मितवदनी शेर्पा तेनसिंग यांचे ९ मे १९८६ रोजी निधन झाले ७२ व्या वर्षांपर्यंत कार्यरत असणाऱ्या या ‘ पर्वतपुत्रा ’च्या स्मृती भारतीय गिर्यारोहण इतिहासातील तेजाळ शलाकाच आहेत.

## धर्माचारी श्रीमंत

एव्हरेस्ट परिसरातील शेर्पा जमातीमधील घांगला घराण्यात १९१४ साली एका भाग्यवान बालकाने जन्म घेतला. किंझॉन हे त्याच्या आईचे नाव आणि वडिलाचे नाव घांगला मिंग्मा हे सुलक्षणी बालक त्याचे अकरावे अपत्य सात भाऊ आणि सहा बहिणी अशा तेरा भावंडामधील फक्त चारजण (एक भाऊ व तीन बहिणी) जगले सोलो खुंबू जिल्ह्यातील मकालू पर्वतराजीत असणाऱ्या त्साचू या

ए.. १८

गावी थोआ म्हणजे 'ससाच्या वर्षा'त शेर्पा तेनसिंग नोर्गे याचा जन्म झाला त्याच पाळण्यातल नाव होत नामग्याल वांगडी बालपणी एका लामाने (धर्मगुरूने) सांगितले की, सोलोखुबूत नुकत्याच मरण पावलेल्या एका धनिकाचा हा पुनर्जन्म आहे हे बालक धर्माचारी, धनिक व दिगत कीर्ती मिळवणारे ठरणार आहे म्हणून त्याचे नाव बदलून तेनसिंग (म्हणजे धर्माचारी) नोर्गे (म्हणजे श्रीमत असे ठेवण्यात आले.

इतर शेर्पा बालकांप्रमाणेच गुरांच्या मागे दिवसभर वेळ काढणे हेच तेनसिंगच्या नशिबी आले. एकदा त्याला धर्मगुरू होण्याचे शिक्षण देण्यासाठी मठात दाखल केले. पण रागाच्या भरात एका धर्मगुरूने त्याच्या डोक्यात लाकडी फळी मारली, म्हणून तेनसिंग घरी पळून आला.

## चोमोलुंग्माची स्वप्ने

१९२१–२२–२४ वर्षातील चिलिग्ना म्हणजे विलायती साहेबाच्या एव्हरेस्ट स्वाऱ्यामुळे लहानग्या तेनसिंगच्या मनातही चोमोलुग्मावर पदार्पण करण्याची स्वप्ने तरळू लागली तेराव्या वर्षी घरून पळून गेलेला तेनसिंग काठमाडूस पोहोचला १५ दिवस तेथे भटकल्यावर घरची ओढ लागल्याने तो घरी परतला पुन्हा ५ वर्षांनी १९३२ मध्ये तेनसिंग दार्जिलिगला पळून गेला तेथे एका साहेबाकडे दूध विकण्याचे काम तो करू लागला. १९३३ च्या एव्हरेस्ट मोहिमेत भारवाहक म्हणून सामील होण्यात तेनसिंगला अपयश आले दार्जिलिगच्या आयुष्यक्रमाचा कटाळा आल्याने तेनसिंग घरी परतला. याच काळात तिबेटमधील रोंगबुक मठात तो जाऊन आला.

१९३५ मध्ये दावा फुती या सुशील युवतीशी तेनसिंगचा विवाह झाला त्याच वर्षी एरिक शिप्टनच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश मोहिमेत (५ व्या एव्हरेस्ट मोहिमेत) त्याचा भारवाहक म्हणून समावेश झाला उत्तम अर्थप्राप्ती अन् एव्हरेस्ट आरोहणाची सधी ही दोन आकर्षणे शेर्पा तरुणाना निश्चितपणे भुरळ घालीत असत गिर्यारोहण तत्राची फारशी माहिती नसताना २२ हजार फुट उचीपर्यंत सामान वाहून नेण्याची कामगिरी तेनसिंगने बजावली याच वर्षी तेनसिग व दावा फुती याना मुलगा झाला पण तो चारच वर्षात मरण पावला.

## तिसरी सधी

१९३५ च्या उत्तरार्धात काब्रू या काचनगंगा परिसरातील शिखर मोहिमेतही त्याने भारवाहकाचे काम केले १९३६ मध्ये ह्यूज रटलजच्या एव्हरेस्ट मोहिमेत त्याने भारवाहकाचे काम केले १९३७ मध्ये गढवालमधील बदरपूछ (२०,७२०

फूट) वरील अयशस्वी मोहिमेनंतर १९३८ मध्ये शिप्टनच्या गढवाल मोहिमेत तो सहभागी झाला नंतर मात्र तेनसिंगने आपला मुक्काम दार्जिलिंगला हलविला १९३८ मध्ये सातव्या एव्हरेस्ट मोहिमेत तेनसिंगला पुन्हा संधी मिळाली ही त्याची एव्हरेस्टवरील तिसरी संधी होती या मोहिमेत एका अपघातात सापडूनही सुदैवी तेनसिंग बचावला २७,२०० फूट उंची त्याने या वेळी गाठली सहाव्या तळापर्यंत पोहोचणाऱ्या व अजोड कामगिरी करणाऱ्या शेर्पांना ' टायगर मेडल्स ' दिली गेली तेनसिंगही ' हिम व्याघ्र ' पदकाचा मानकरी ठरला

१९३८ मध्ये ऑसमॅस्टन या ब्रिटिश सेनाधिकाऱ्याबरोबर गढवाल भागात तेनसिंगला जाता आले तर १९३९ मध्ये तिरीचमीर या २५,२६० फूट शिखर मोहिमेत हिंदुकुशपर्वतराजीत जाण्याची संधी तेनसिंगला मिळाली २३,००० फूट उंची त्याने गाठली यानंतर त्याचा मुलगा निमा दोर्जे मरण पावल्याने त्याने आपल्या पत्नी व मुलींना चित्रळला नेले पुढची पाच वर्षे युद्धकाळात त्याने चित्रळला काढली याच काळात हिंदी, चित्रळी, पुश्तु, इंग्रजी भाषा त्याने आत्मसात केल्या चित्रळमध्येच १९४४ मध्ये तेनसिंगची पत्नी दावा फुती मरण पावली तेनसिंगच्या दोन मुली (पेमपेम व निमा) व तेनसिंग चित्रळहून दार्जिलिंगला परतले मुलींचा सांभाळ नीट व्हावा म्हणून त्याने आंग लहामू या शेर्पा कन्येशी विवाह केला

१९४६ च्या उन्हाळ्यात गढवालमधील बंदरपूछ शिखर मोहिमेत गिब्सन बरोबर १८ हजार फूट उंची गाठण्यात तेनसिंग यशस्वी ठरला त्याच वर्षी कांचनगंगा शिखरावरील दोन अयशस्वी मोहिमांत तेनसिंग सहभागी झाला होता

तेनसिंग कुटुंबाची येथून पुढे काही वर्षे फार ओढगस्तीची, हलाखीची गेली पण आंग लहामूने सारी परिस्थिती मोठ्या कुशलतेने हाताळली १९४६ मध्ये थॉर्नली बरोबर हेमू हिमानी परिसरात तेनसिंग सहभागी झाला.

## पहिला विजय

१९४७ साली अर्ल डेनमनबरोबर एका अनधिकृत एव्हरेस्ट मोहिमेत तेनसिंग सहभागी झाला आंग दावा हा शेर्पाही या मोहिमेत होता उत्तरेकडून झालेल्या या मोहिमेला यश मिळाले नाही नॉर्थ कोलच्या थोडे खाली या त्रिकूटाला कसेबसे पोहोचता आले होते १९४७ च्या केदारनाथ शिखर मोहिमेत शेर्पा सरदार वांगडीला झालेल्या अपघातामुळे तेनसिंगला शेर्पा सरदार होण्याची संधी मिळाली चार स्विस गिर्यारोहक व तेनसिंग केदारनाथ शिखरावर पोहोचले तेनसिंगचा हा पहिला शिखरविजय होता याच मोहिमेत सतोपथ, कालिंदी व बाल्बाला शिखरावरही त्याला पोहोचण्यात यश मिळाले

१९४८ मध्ये प्रा तुसी या इटालियन अभ्यासकाबरोबर तेनसिंगने तिबेट यात्रा केली त्या वेळी ल्हासा या पवित्र नगरीचे त्याने दर्शन घेतले दलाई लामांशी प्रत्यक्ष बोलण्याची संधीही याच वेळी त्याला मिळाली

१९४८-४९ मध्ये हिंदी फौजांच्या 'ऑपरेशन रिसर्च सेक्शन' मध्ये गिर्यारोहणाचे प्रशिक्षण देण्याची संधी तेनसिंगला मिळाली १९४९ मध्ये टिलमनबरोबर नेपाळमध्ये भटकंती करताना तेनसिंगला हिमांधत्व (स्नो ब्लाइंडनेस) आले होते. १९५० साली गिब्सनच्या मोहिमेत त्याने २०,७२० फूट उंचीचे बंदरपूंछ शिखर गाठले १९५० साली थॉर्नेलीबरोबर नगा पर्वतावरील मोहिमेत तेनसिंग सहभागी झाला थॉर्नेली आणि क्रेसचा मृत्यू या मोहिमेत ओढवला आणि ही मोहीम अयशस्वी झाली

## नंदादेवी सर–

१९५१ मध्ये फ्रेंच तुकडीबरोबर नंदादेवी शिखर मोहिमेत ड्यूप्लॉटच्या नेतृत्वाखाली संधी मिळाली पूर्व नंदादेवी (२४,४०० फूट) आणि नंदादेवी मुख्य शिखर (२५,६६०) सर करण्यात तेनसिंग, लुई ड्यूप्लॉट आणि डॉ पायान याना यश मिळाले, पण ड्यूप्लॉट व व्हिग्नस याचा अपघाती मृत्यू याच मोहिमेत घडला याच वर्षी कांचनगंगेशेजारच्या काग शिखरावर (उंची १९ हजार फूट) तो सहभागी झाला परंतु फे या मोहीम-नेत्याचा मृत्यू त्यात ओढवल्याने ही मोहीम अर्धवट सोडण्यात आली

१९५२ साली स्विस तुकडीत सरदार म्हणून सामील होण्याचे आलेले निमंत्रण म्हणजे तेनसिंगच्या आयुष्यातील क्रांतिकारक घटना ठरली तिबेटचा घास लाल चिन्यानी घेतल्याने एव्हरेस्टवरील उत्तरेकडूनच्या चढाया बंद झाल्या व दक्षिणेतून एव्हरेस्ट आरोहणाच्या नव्या नेपाळी पर्वाला प्रारंभ झाला होता या बाजूची पहिलीच ब्रिटिशेतर मोहीम होती. १३ शेर्पा घेऊन ही स्विस मोहीम ॲडॉर्ड विसड्यूनाट याच्या नेतृत्वाखाली गेली लॅम्बर्ट या उमद्यापुऱ्या व मनमोकळ्या गिर्यारोहकाशी तेनसिंगचा चांगलाच स्नेह जुळला लॅम्बर्ट व तेनसिंग २८,२५० फूट उंचीवर पोहोचू शकले प्रत्यक्ष शिखर ७७९ फुटावर राहिलेले असताना त्यांना परतावे लागले एवढ्या उंचीवर तोपर्यंत कोणीही गेलेले नव्हते हातातोंडाशी आलेले त्याचे यश यामुळे थोडक्यात हुकले

## 'मी तुझा ऋणी आहे'

१९५२ च्या हिवाळ्यात डॉ गॅब्रियल शिव्हलरीच्या नेतृत्वाखाली आणखी एक दिवस एव्हरेस्ट मोहीम निघाली या तुकडीत तेनसिंग व लॅम्बर्टचाही समावेश


होता, पण एव्हरेस्ट काही त्यांना गाठता आले नाही या मोहिमेनतर नेपाळचे राजे त्रिभुवन यानी 'नेपाळप्रतापवर्धक' हा सन्मान व पदक तेनसिंग याला दिले १९५२ च्या डिसेंबरात तेनसिंग खूप आजारी पडला त्यातच त्याला १९५३ साली ब्रिटिश एव्हरेस्ट मोहिमेचे निमत्रण आले ही तेनसिंग नोर्गे याची सातवी वेळ होती वीस शेर्पांचा सरदार व मोहिमेचा सभासद म्हणून त्याची निवड झाली होती प्रचंड परिश्रमानतर सर्व अडीअडचणीवर मात करीत या मोहिमेने २७,३५० फूट उचीवर शेवटचा तळ उभारला बोर्डोलिन आणि इव्हान्स यांच्या तुकडीला एव्हरेस्ट गाठण्यात अपयश आल्यानतर हिलरी व तेनसिंग यानी २९ मे ५३ रोजी दुसरा प्रयत्न केला आणि ते यशस्वी ठरले

एव्हरेस्ट विजयानतर लगेच काही क्षणात तेनसिंग याने 'थुजीचे, चोमोलुगमा थुजीचे !' म्हणजे 'एव्हरेस्ट मी तुझा ऋणी आहे' हे प्रसिद्ध उद्गार काढले निमा या तेनसिंगच्या मुलीने दिलेली लाल निळी पेन्सिल आणि भारत, नेपाळ, इग्लड व सयुक्त राष्ट्रसघाचे ध्वज त्यांनी शिखरावर ठेवले एका खेडवळ, गरीब तेनसिंगचे रूपातर 'विजेत्या एव्हरेस्टवीर' तेनसिंगमध्ये झाले प्रसिद्धीमागोमाग येणारा कटकटीचा उपद्रव तेनसिंगसारख्या साध्या, सरळ वृत्तीच्या माणसाला फार झाला

एव्हरेस्ट विजयानतर तेनसिंग सहकुटुब सहपरिवार युरोप दौऱ्यावर गेला त्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरूचे त्याला खूप सहाय्य झाल्याचे त्याने नमूद केले आहे भारतीय गिर्यारोहण क्षेत्राला घडविण्यात तेनसिंग नोर्गे याचा महत्त्वाचा वाटा आहे दार्जिलिंगला सुरू झालेल्या हिमालयीन माऊंटेनियरिंग इन्स्टिटयूटच्या प्रमुख शिक्षकाची जागा पत्करून त्याने अनेक गिर्यारोहक तयार केले या सस्थेशी तो एकरूपच झाला

१९६१ मध्ये तेनसिंग याने दाकूबरोबर विवाह केला त्याला तीन मुलगे व एक मुलगी अशी अपत्ये झाली. हिमालयाएवढ्या मनाचा व खूप कर्तृत्ववान असा महान गिर्यारोहक आता आपल्यात नाही. परतु हिमालयातील नवनवी शिखरे जिकणे व नवनवीन आव्हाने पेलून ती यशस्वी करणे हीच तेनसिंग नोर्गे याला खरी श्रद्धाजली ठरेल

# कहाणी दुसऱ्या शिखराची



## १९ कहाणी दुसऱ्या शिखराची

**के-टू (K-2) चोगोरी / कोगीर / माऊंट गॉडविन ऑस्टीन–**

(८६११ मी/२८२५३ फूट) विश्वकळस बनण्याचा मान थोडक्यात हुकलेले हे दुर्दैवी शिखर एव्हरेस्टच्या प्रसिद्धी वलयासारखे वलय या शिखराला नाही एव्हरेस्ट चढायाची महाकाव्ये मोठ्या चवीढवीने वाचली जातात, सांगितली जातात. के-टू या शिखराची माहितीही कोणाला नसते एव्हरेस्टसारखेच नावाचे घिडवडे याही शिखरराजाच्या वाट्याला आले आहेत ८६११ मीटर्स/२८२५३ फूट उंचीच हे शिखर आहे, आपल्या काश्मीरात भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि लगेचच पाकिस्तानने काश्मीरचा जो लचका तोडला, त्यातच के-टू (८६११ मी) चा परिसर, नगापर्वत (८१२६ मी) स्वात–चित्रळ–हुंझा–गिलगिट–बाल्टिस्तान हा सारा प्रदेश त्यांच्या ताब्यात गेला तो जेव्हा मिळेल तेव्हा मिळेल पण सर्वोच्च भारतीय शिखर म्हणून के-टू शिखराची नोंद करावीच लागेल या भागातील अस्थिर राजकीय परिस्थिती, पाकव्याप्त काश्मीरमधील शासनाची वृत्ती आणि मुळातच दुर्गम डोंगरी प्रदेशातील दळणवळणाच्या अडचणी या सर्वांचा एकत्रित विचार केला तर प्रसिद्धी आणि के-टू याची फारकत कशी झाली याचा आपल्याला पुरेसा उलगडा होऊ शकतो


१८९९ मध्ये कॉनवे या ब्रिटिश संशोधकाने काराकोरम पर्वतराजीच्या प्रदेशात प्रवेश केला इकडे येणारा हा पहिला पाश्चात्त्य या प्रदेशाची पाहणी व परिचय त्याने स्वत करून घेतला व इतरांना करून दिला १९०२ मध्ये ऑस्कर जोहान्स लुडविक एकेस्टीन याने के-टू शिखरावरील पहिली मोहीम आखली त्याला यश मात्र मिळाले नाही

**नामकहाणी–**

के-टू हे नाव जरा चमत्कारिकच वाटते अर्थात त्याचे कारणही तसच आहे,

जस एव्हरेस्टला पाश्चात्यानी नाव देण्याअगोदर सुरुवातीला 'h' आणि नतर XV अस सबोधल होत तसच काराकोरम भागातील मोजणी करताना **के म्हणजे काराकोरम** आणि **टू म्हणजे दुसर शिखर** म्हणून या शिखराला **के-टू / के-दोन** अस म्हणू लागले दुसरेपणाची सर्व दुःख या शिखराच्या वाट्याला आली याला धड चागल नाव ठेवायचा कोणी प्रयत्न केला नाही किवा याच स्थानिक नाव कोणत हे शोधायचा प्रयत्नही फारसा कोणी केलेला दिसत नाही स्थानिक लोक या शिख-राला '**चोगोरी**' म्हणून ओळखतात अशी नोद डायहर्नफर्थ या प्रख्यात गिर्यारोह-काने केलेली आढळते काहीजण– विशेषत चिनी वर्तुळात– मात्र याचा उल्लेख '**कोगीर**' असा करतात.

लेफ्टनट कर्नल हेन्री हॅवरशॅम गॉडविन ऑस्टीन यान १८५७ ते १८७७ या काळात भारतीय सर्वेक्षण खात्यात नोकरी केली तेव्हा त्याने बाल्टोरा हिमानी आणि काराकोरम पर्वतराजीची मोजणी-नोदणी व पाहणी केली या क्षेत्रातील ती एक उत्तम कामगिरी समजली जाते १८६१ मध्ये के-टू परिसराची पहाणी पूर्ण झाली तेव्हा के-टू या शिखरालाच **माऊट गॉडविन ऑस्टीन** म्हणाव अशी कल्पना पुढ आली पण त्याचा पाठपुरावा काही झाला नाही अधिकृतपणे ते नाव जरी मान्य झाले नव्हते, तरी बरेच लोक के-टू ऐवजी माऊट गॉडविन ऑस्टीन असा उल्लेख करू लागले पुढे पाकिस्तानने हा सारा भाग आपल्या कब्जात आणला,



के–२ शिखर परिसर

चीननेही या परिसरात जरुरीपेक्षा अधिक लक्ष घातल आणि मूळ मालक असणाऱ्या हिंदुस्थानला न विचारता या भागातील सीमाआखणी करून टाकली त्यामध्ये के-टू ची दक्षिण बाजू पाकिस्तानकडे आणि उत्तरेकडील बाजू चीनकडे व प्रत्यक्ष शिखर दोघांच्या सामाईक मालकीचे यावर दोघाचे एकमत झाले

जुन्या मोजणीप्रमाणे २५००० फूट उचीपेक्षा जास्त उची असणाऱ्या शिखरांना आगळ महत्त्व होत आता मेट्रिक परिमाणात मोजणी सुरू झाल्यावर आठ-हजार मीटरपेक्षा अधिक उचीं असणाऱ्या शिखराचा खास वर्ग तयार झाला आहे तर अशा २५ हजार फूटांहून अधिक उची असणारी २२ शिखर नेपाळात व १९ शिखर काराकोरममध्ये आहेत या वर्गातील शिखरावर होणाऱ्या मोहिमांकडुन मिळणारा आर्थिक फायदा– आनुषंगिक पर्यटन व्यवसाय, स्थानिक रोजगार असे अनेक ' रोजी-रोटी ' चे प्रश्न त्याभोवती असल्याने शासनालाही अशी शिखर असण फायद्याच ठरत

एव्हरेस्टपेक्षा चढाईला कठीण असणार हे पर्वतशिखर व त्याचे ॲब्रूझी कणा ऊर्फ वायव्य कणा (पोलिश चढाई), दक्षिण बट्रेस (फ्रेंच चढाई), दक्षिण उतार (फ्रेंच चढाई), दक्षिण कणा (इंग्लिश चढाई), पूर्ण कणा (पोलिश चढाई), पश्चिम कडा अशा अनेक बाजूनी शिखर चढाया होतात के टू च्या आसपास अस्कोळ व बाल्टी लोकांची वस्ती आहे पश्चिमेस हुंझा तर पूर्वेस लडाखी लोक राहतात सॅव्हाय हिमानी अन् गॉडविन ऑस्टीन हिमानी याच्या सगमावरच के-टू शिखर आहे या सगमानतरच्या हिमानीला मात्र पुढे बाल्टोरा हिमानी म्हणतात हिस्पार बैफो १०४ कि मी /७६ मैल लाबीची, सियाचेन हिमानी ६७ कि मी /४५ मैल लांबीची, बाल्टोरा ५४ कि मी /३६ मैलांची आणि बाटुरा ५४ कि मी /३६ मैलाची हिमानी मोठ्या महत्त्वाच्या मानल्या जातात हिमानीचा अभ्यास करणाऱ्याना ध्रुवीय प्रदेशाखेरीज इतरत्र मिळणाऱ्या हिमनद्या मोठ्या अभ्यसनीय वाटतात

या शिखरराजाच्या दरबारात मशेरब्रुम ७८२१ मी /२५६६० फूट, चोगोलिसा ७६५३ मी /२५११० फूट, गशेरब्रुम एक ८०६८ मी /२६४७० फूट, गशेरब्रुम दोन ८०३१ मी /२६३५० फूट, ब्रॉडपीक ८०४६ मी /२६४०० फूट असे उच-उच मानकरी आहेत

२९ मे १९५३ रोजी एव्हरेस्टवर मानव पोहोचला अन् पुढच्याच वर्षी के-टू चा किल्लाही ढासळला त्याच वर्षी सिक्कीम हिमालयातील कांचनगगा (८५९७ मी /२८२०७ फूट) आणि मकालू (८४८१ मी./२७८२४′) या शिखरावर जाण्यात अनुक्रमे ब्रिटिश व फ्रेंच गिर्यारोहकांनी यश मिळवल १९५६ मध्ये ल्होत्से (८५०१

मी/२७८९० फूट) उंचीच पाचव्या क्रमांकाच शिखर स्विस गिर्यारोहकांनी गाठल

## के-टू वरील चढाया

ऑस्कर जोहान्स लुडविग एकेस्टीनच्या १९०२ मधील चढाईला जरी अपयश आल तरी, ईशान्य कड्यावरून गुईलरमॉड व वेसली यांनी ६५२२ मी/२१४०० फूट उंची गाठली होती

१९०९ मध्ये ड्यूक ऑफ ॲब्रूझी (इटलीचा राजा व्हिक्टर इमन्यूएल दुसरा याचा नातू) याने के-टू मोहीम आखली दक्षिणेकडून पाहणी व वायव्येच्या दिशेकडील कण्यावरून (यालाच पुढे ॲब्रूझी कणा म्हणू लागले) ६७०५ मी/बावीस हजार फूटांची मजल त्यांना गाठता आली

१९३८ मध्ये हौस्टनच्या नेतृत्वाखाली एका अमेरिकन मोहिमेत हौस्टन व पेट झोल्ट या गिर्यारोहकांनी ७९५५ मी/२६१०० फूट उंची गाठली

१९३९ मध्ये विसनरच्या नेतृत्वाखालील अमेरिकन तुकडीने ८३८२ मी/२७५०० फूट उंची गाठली विसनर व पासागदावा तेथवर पोहोचले होते

१९५३ मध्ये चार्लस् एस् हौस्टनच्या नेतृत्वाखालील तिसरी अमेरिकन मोहीम के-टू वर चालून आली

७६२० मी/२५००० फूट उंचीवर पोहोचलेल्या गिल्की व पाच शेर्पांची तेथून घसरगुंडी सुरू झाली या अपघातात ते सारेजण मरायचेच पण पी स्चोनिंग याला त्या सर्वांना वाचविण्यात यश मिळाल हा अपघात व त्यातून सुटका हा विस्मयकारक प्रसंग म्हणूनच गिर्यारोहण क्षेत्रात ओळखला जातो

१९५४ च्या इटालियन मोहिमेला देसिओचे नेतृत्व लाभले होते एल् लेसडेल्ली व ए कॉम्पाग्नोनी या दोघांनी ३१ ऑगस्ट १९५४ रोजी शिखरमाथा गाठला के-टू च्या या हिलरी-तेनसिंगची नावही कोणाला माहिती नाहीत

१९५३ च्या मोहिमेवर आधारित असलेल दि सॅव्हेज माऊंटन हे हौस्टनचं पुस्तक आणि सेल्ला व एरिक शिप्टनच १९०९ मधील मोहिमेवर आधारित के-टू वरील पुस्तक खूपच उपयुक्त आहे

१९७७ पर्यंत के-टू तस सर्वांच्या आवाक्याबाहेरच राहिल पण पुढे पाकिस्तानी सरकारने अनधिकाराने बळकावलेल हे शिखर गिर्यारोहणासाठी खुल केल १९७७ ऑगस्टमध्ये इचिरो योशिझाना या ७४ वर्षीय डोंगरपंडिताच्या मार्गदर्शनाखाली जपानी पथक सज्ज झाल ४५ वर्षांचा इसाओ शिमकाई याने चढाईसाठी नेतृत्व केले ५००० मी उंचीवर गॉडविन ऑस्टीन हिमानीत तळ ठोकून ॲब्रूझी कण्यावरून चढाई केलेल्या जपानी तुकडीतील त्सुनिओ शिगेहारा (३०), शोजी नाकामुरा (३५), टाकेयाशी टाकात्सुको (३५), हे गिर्यारोहक ८ ऑगस्ट १९७७

रोजी शिखरावर पोहोचले दुसऱ्या तुकडीत मासाहिडे ओनोडेरा (२४), सुबुरो हिरीशिमा (३४), हिडेओ यामामोटो (३३), हे जपानी व अश्रफ आमन (३४) हा पाकिस्तानी गिर्यारोहक शिखरमाथ्यावर पोहोचले ५२ गिर्यारोहक (त्यांतील ११ चित्रणतज्ञ) असणाऱ्या या तुकडीला साडेनऊशे भारवाहकाची गरज लागली होती अक्षरशः मिलियन डॉलर एक्सपीडीशन म्हणून या मोहिमेची नोद केली जाते

१९७८ च्या मे-जूनमध्ये क्रिस बॉनिंग्टन (४३) च्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांनी शिखरमोहीम आखली पीटर बोर्डमन (२६), पॉल ब्रेथवेट (३०), जीम डफ (३०), निक एस्टकॉर्ट (३२), टॉम रिली (३५), डगस्कॉट (३५), जो टस्कर (२९) असे कसलेले व नामवत आरोहक या तुकडीत होते निक एस्टकॉर्टचा मृत्यू व डगस्कॉटचे मृत्यूच्या ओठावरून परत फिरणे या गोष्टी घडल्या, पण त्यांच्या पदरी यश काही पडल नाही

१९७८ मध्येच जीम व्हिटॅकरच्या नेतृत्वाखाली १२ जणांच्या अमेरिकन मोहिमेने के-टूवर मोहीम आखली ६ सप्टेंबर १९७८ रोजी लौ रिचर्ड या एम डी झालेल्या सॅन फ्रान्सिस्कोच्या डॉक्टरने व जेम्स विकवायर ह्या सीॲटलच्या ॲटर्नी जनरलने ६ सप्टेंबर ७८ रोजी शिखरमाथा गाठला फक्त शेवटच्या टप्प्यात प्राण-वायूच्या नळकांड्याचा वापर न करता रिजवे व रॉस्केली यांनीही त्याच दिवशी शिखरमाथा गाठला या तिसऱ्या यशस्वी मोहिमेमुळे १३ जण के-टू वीर झाले विकवायर या गिर्यारोहकाचा मार्ग चुकणे, पण अनाकलनीयरीत्या परतणे आश्चर्य-कारक ठरले अर्थातच विकवायरला पुढे प्लूरसीचा त्रास झालाच

शिखरभक्षक मेसनरचे लक्ष के-टू कडे वेधले गेले नसते तरच नवल पश्चिम कण्यावरून आरोहण करण्याची कल्पना बाजूला सारून त्याला ॲब्रुझी कण्यावरून आरोहण करण्याची रीतसर परवानगी मिळाली मायकेल डॅचरबरोबर त्याने के टू शिखरमाथा सप्टेंबर १९७९ मध्ये गाठला, तोही प्राणवायूच्या नळकांड्याचा वापर न करता

त्याच हगामात फ्रेंच तुकडीला शिखराखालून अवघ्या १६० मी / ५०० फूट उंचीवरून परत फिरावे लागले प्रचड वारा, सतत हिमवर्षाव, कडाक्याची थडी, धूसर व अस्पष्ट वातावरण यामुळे त्यांना माघारी फिरावे लागले पण जीन मार्क बोईव्हिन याने ७५०० मी / २४९३५ फूट उंचीवरील चौथ्या तळावरून हॅंग ग्लाय-डरच्या सहाय्याने उड्डाण करून अवघ्या तेरा मिनिटात ५०२९ मी / १६५०० फूट उंचीवरचा बेसकॅम्प गाठला हॅंग ग्लायडरच्या इतिहासात हा एक विक्रमच समजला जातो

पाकिस्तानशी साटेलोटे जमवल्यानतर चिनी गिर्यारोहकांनी दोन प्रयत्न उत्तरेकडून केले पण त्यांची अधिकृत माहिती जगापुढे कधी आलीच नाही त्यांना

यश न मिळाल्याने हे अयशस्वी प्रयत्न गुलदस्तातच राहिले बांबूच्या पडद्याआडच्या या हालचालीवर कधी काळी प्रकाश पडेलही

२४ ऑगस्ट ८० रोजी रात्री ८ वाजता नाओई साकाशिटा (३५), हिरोशी योशिनो (३२), युकिहिरो यानागिसावा (२७) यानी शिखरमाथा गाठला पण यानागिसावाला ३००० मीटर खाली पडून मृत्यू आला २५ ऑगस्ट रोजी दुपारी दुसरी जपानी तुकडी शिखरावर पोहोचली हारुइचि कावामुरा (३४), काझुशिगे टाकामी (३७), टात्सुजी शिगेनो (३९), हिरोनोब कामुरा (३०) यानी शिखर गाठले व के-टू विजेत्याची सख्या एकवीसवर जाऊन पोहोचली या जपानी तुकडीचे नेतृत्व केंजिरा इमैदा इसाओ शिन्के, मासात्सुगा कोनिशी याच्याकडे होते चीन-जपान राजनैतिक सबंध सुधारल्याच्या दहाव्या वर्धापनवर्षानिमित्त ही मोहीम आखण्यात आली होती उत्तरेकडून चीनने परवानगी दिल्याने ही मोहीम निघू शकली होती याच मोहिमेत टाकाशी ओझाकी (२९) व डॉ तोशिटाका साकानो (३८) यांना मृत्यू आला होता दोन जणाना हिमदशाची बाधा झाली

१९८२ मध्ये एव्हरेस्ट विजेत्या वाडा रुटकीविक्स या पोलिश महिलेने के-टू शिखर मोहीम आयोजित केली परतु एका सदस्याचा मृत्यू व खराब हवामान यामुळे ही मोहीम अयशस्वी ठरली

१९८३ मधील डग स्कॉटच्या ब्रिटिश मोहिमेलाही के-टू शिखरमाथा गाठता आला नाही

१९८४ मध्ये परत वाडा रुटकीविक्स, डोब्रास्लावा मिओडोविक्स-वुल्फ, ॲना झेविन्स्का, क्रिस्तिआना पालमोवस्का या महिला, स्टीफन कोर्नर (स्वित्झर्लंड), स्टीफन शॉफ्टर, रेनहार्ड सुटर, हान्स रेंगली, डॉ उलरिच वि गेट, पिटर हेब्लर, कुर्ट डायम्बर्गर, मान्फ्रेड लोरेन्स रेनहार्ड क्लासिच, रोल्फ रिटर, रुडीगर श्लेयपेन, ज्युली तुलिस अशाची एक मोहीम के-टू साठी प्रयत्न करण्यास सिद्ध झाली पण त्यांनाही आग्नेय कण्यावरून शिखरमाथा गाठण्यात यश आले नाही

पाकिस्तान हे काही गिर्यारोहण क्षेत्रातील नामांकित राष्ट्र नाही पण बळकावलेल्या हिंदी प्रदेशातील काश्मीरी पर्वतराजीमुळे त्या देशाला आजतरी थोडेफार महत्त्व आले आहे पाकिस्तानी मडळीना मुळातच गिर्यारोहणाबद्दल प्रेम नाही आणि शासनाकडूनही फारशी आस्था या क्रीडाप्रकाराबद्दल दाखवली जात नाही परंतु अल्पाइन क्लब ऑफ पाकिस्तान, आणि ॲडव्हेंचर फाऊंडेशन ऑफ पाकिस्तान या दोन सस्था तेथील गिर्यारोहण व मोहिमाबद्दल लक्ष घालतात

आबोटाबादला ॲडव्हेंचर फाऊंडेशन ऑफ पाकिस्तान आहे त्यांनी गिर्यारोहण व डोंगरात भटकण्यास लागणारे साहित्य निर्माण करणे व भटकतीस मार्गदर्शन करणे हे आपले क्षेत्र ठरवले आहे. अल्पाइन क्लब ऑफ पाकिस्तान या

सस्थेने गिलगिट ह्या पाकव्याप्त काश्मीरातील गावाजवळील निल्ट येथे एक गिर्यारोहण प्रशिक्षण सस्था सुरू केली आहे काही शे तरुणाना त्यानी मार्गदर्शक शिक्षणक्रमात शिक्षण दिले आहे काराकोरम पर्वतराजीकडे परदेशी पर्यटक, ट्रेकर्स व गिर्यारोहक आकर्षित होत आहेत परतु हा भारतीय प्रदेश असल्याने येथील हालचाली लष्करी मार्गदर्शनाखालीच प्रामुख्याने होत असतात गिर्यारोहणापेक्षा एक लष्करी मोक्याचा भाग म्हणूनच पाकिस्तान शासन इकडे पाहते नाहीतर 'एव्हरेस्ट इडस्ट्री'ची छोटी आवृत्ती 'के-टू इडस्ट्री येथे निश्चित उभी राहू शकली असती

सहा ते सात हजार मीटर उची असलेल्या शिखरासाठी सात हजार रुपये, सात ते साडेसात हजार मीटर उचीच्या शिखरासाठी बारा हजार रुपये, साडेसात ते आठहजार मीटर उचीच्या शिखरासाठी पधरा हजार रुपये, आठ हजारांपेक्षा जास्ती उचीच्या शिखरासाठी वीस हजार रुपये आणि के-टू साठी तीस हजार रुपये अशी राजस्व रक्कम (रॉयल्टी) पाकिस्तान सरकार गिर्यारोहण मोहिमांकडून वसूल करते

अशी ही के-टू शिखराची अर्धी मुर्धी कथा

## एव्हरेस्टची कहाणी

एव्हरेस्टची ही कहाणी तुम्हाला कदाचित अर्धी-मुर्धीही वाटली असेल यापेक्षा अधिक विस्तृत, अधिक नकाशे, चित्रे आणि सगळ्या एव्हरेस्ट वीराचे फोटो, एव्हरेस्टशी निगडित असणाऱ्या सर्वांचा थोडथोडा परिचय अस यामध्ये हव होत हे तुम्हाला जस वाटल तस मलाही ते हव होत पण उत्तुग एव्हरेस्टबद्दल किती लिहाव अन् किती नाही, अस होऊन जात हिमशिखराच्या या राजाबद्दल प्रचड माहिती उपलब्ध आहे आणखीही नवनवी माहिती नव्याने उपलब्ध होत आहे

एव्हरेस्टबद्दल माझ्या मनात प्रचंड कुतुहल आहे आणि होतही । त्यामुळेच या विश्वकळसाच्या दर्शनासाठी मी त्याच्या पायथ्यापर्यंत गेलो गेली कित्येक वर्षं, मी या तिसऱ्या ध्रुवाची माहिती जमवीत राहिलो त्यातून मला जस समजल, जस कळल, तसं उतरविण्याचा हा एक छोटासा प्रयत्न केला आहे अर्थात ते करताना अनेक मर्यादाच्या चौकटींच भान ठेवण मला आवश्यक होत

या माहितीमध्ये काही चुका, उणीवा, त्रुटी, गफलती अस काही असल अन् ते तुमच्या नजरेला आल, तर ते सार खुलासेवार मला कळवा कोण्या ग्रथात आणखी काही महत्त्वाची माहिती असेल तर त्याचा सदर्भ व तो ग्रथ कोठे आहे, हे कळवायला विसरू नका

मराठीमध्ये मुळातच गिर्यारोहणावर पुस्तक कमी त्यातूनही एखाद्याच शिखराची बरीचशी माहिती देणारी पुस्तक तर फारच कमी या पुस्तकामुळे एव्हरेस्टबाबत थोडीफार माहिती एकत्र मिळू शकेल अर्थात हे त्या दिशेन टाकलेल एक छोटस पाऊल आहे

या शेवटच्या पानापर्यंत आपण आलात म्हणून तुम्हाला धन्यवाद !

बर आहे, भेटू या कधीतरी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २०२८५
२५।१८

REFBK-0025286